ग्रंथ संपादक व ग्रंथप्रसारक मंडळीची ग्रंथमाला.

( पुस्तक ३ रें. )

# अर्थशास्त्र.

POONA UNIVERSITY LIBRARY

लेखक,

**प्रो. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर, बी. ए.,**

बडोदें व्हर्न्याक्युलर कॉलेजमधील माजी अर्थशास्त्राचे प्रोफेसर.

प्रकाशक,

**दामोदर सांवळाराम आणि मंडळी.**

प्रिंटर्स, पब्लिशर्स, कमिशन एजंटस,—ठाकुद्वार, मुंबई.

आवृत्ति दुसरी.

मुंबई, 'इंदुप्रकाश' स्टीम प्रेसमध्यें छापिला.

सन १९१० इसवी.

किंमत आठ आणे.

12 JAN 1950

8537

या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकांनीं
आपणाकडे ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

सृष्टींत प्रथम व्यवहार चालू होतो. ज्यास जसें अनुकूल पडेल, ज्यास जसें नीट दिसेल, तसें प्रथम तो वर्तन करूं लागतो; आपल्यास आलेला बरा वाईट अनुभव दुसऱ्यास सांगतो; अशा रीतीनें कांहीं काळ गेल्यावर पुष्कळ गोष्टी आपोआप मुकरर होऊन जातात. सर्वत्र लागू पडतील असे कांहीं नियम निष्पन्न होतात. या नियमांचें पुढें एकीकरण होतें, व त्यांची नीट व्यवस्था लागली ह्मणजे एक शास्त्र बनतें. वैद्यशास्त्र घ्या, नौकाशास्त्र घ्या, व्याकरणशास्त्र घ्या, कोणतेंही शास्त्र घ्या, त्याचा उपक्रम बहुधा असाच असावयाचा. निरनिराळे रोगांनीं ग्रस्त झाले असतां, ज्यास जें सुचेल तें औषध करून तो बरा होऊं लागला. माझा अमुक रोग अमुक औषधानें गेला, असें जो तो आपल्या अनुभवानें दुसऱ्यास सांग लागल्यावर, अमक्या रोगावर अमुक औषध लागूं पडतें, तें दिलें असतां तो बरा होतो, अमुक चिन्हें झालीं असतां त्यास अमुक रोग ह्मणावें, असे साधारण नियम मुकरर झाले. पुढें या नियमांचें एकीकरण होऊन व्यवस्था लागल्यावर वैद्यशास्त्र तयार झालें. याचप्रमाणें 'भाषाशास्त्र' अथवा 'व्याकरणशास्त्र.' व्यवहारामध्यें हजारों वर्षें लोक आपआपले विचार एकमेकांस व्यक्त करण्यासाठीं भाषेचा उपयोग करीत असून कांहीं काळानें जेव्हां तिचें नियमन झालें, तेव्हां 'व्याकरणशास्त्र' उदयास आलें. 'अर्थशास्त्रा' चीही अशीच स्थिति आहे.

संपत्तीची उत्पत्ति, व तिची वांटणी करण्याचे जे नियम आहेत, त्यांचें विवेचन ज्या शास्त्रांत केलेलें आहे. त्या शास्त्रास 'अर्थशास्त्र' अशी संज्ञा आहे. दररोज व्यवहारांत आपण जीं कृत्यें करितों, त्यांशीं अर्थशास्त्राचा अत्यंत निकट संबंध आहे. तथापि 'अर्थशास्त्र' शिकल्यावांचून आपल्यास तीं कृत्यें करितां येणार नाहींत, व सर्व व्यवहार, राज्य-क्रिया इत्यादि अगदीं बंद पडतील, असें बिलकूल होणार नाहीं. हें शास्त्र शिकल्यावांचूनही वरील सर्व कामें बिनचूक होऊं शकतील. तथापि त्यांचा कार्यकारणसंबंध व त्यांची उपपत्ति समजणें अगदीं अगत्याचें आहे.

अर्थशास्त्राचे नियम व्यवहारांतील अनुभवावरून सिद्ध झालेले आहेत, असें वर सांगितलें आहे. हे नियम शास्त्र-दृष्टया जरी खरे आहेत, तथापि विशेषप्रसंगीं विशेष स्थितीस ते लागू करावयाचे असल्यास, व्यवहारांतील अनेक दुसऱ्या गोष्टींकडे लक्ष पुरविलें पाहिजे. दुसऱ्या अनेक शास्त्रांचा साधकबाधकपणा पाहिला पाहिजे. देशस्थिति व देशांतील लोकांच्या रीतिभाती या सर्वांचा विचार केला पाहिजे. राज्यशास्त्राचे नियम तर विशेषेंकरून ध्यानांत ठेविले पाहिजेत. अर्थशास्त्राचे नियम, वरील सर्व विचार मनांत न आणितां, जर व्यवहारांत लागू करण्याचा प्रयत्न केला, तर एकादे वेळीं चूक होऊन ठरविलेले सिद्धांत अनुभवास न येतां, ते खोटे आहेत, असाही समज होण्याचा संभव आहे. हें जरी खरें आहे, तथापि विशेष-स्थितीचे संबंधानें अनुभव अर्थशास्त्राचे ठरलेल्या सिद्धांताचे उलट आला, तरी तेवढ्यावरून ते सिद्धांत चुकीचे आहेत,

असें होणार नाहीं; त्या सिद्धांताप्रमाणें व्यवहारांत अनुभव न येणें याचीं कारणें निराळीं असलीं पाहिजेत. शास्त्राचें काम 'सत्यविवेचन करणें' इतकेंच आहे; यापलीकडे कांहीं नाहीं.

अर्थशास्त्राचा उपयोग व्यवहारांत पावलोपावलीं आहे. प्रत्येक राजकीय, सार्वजनिक, व्यावहारिक, व्यापार वगैरे-संबंधीं विषयांचें विवेचन करण्यास या शास्त्राची थोडी-बहुत माहिती पाहिजेच. असें असतांही आपल्या देशांत या शास्त्राचा उदय अद्यापपावेतों झाला नाहीं, याचें कारण काय असावें, असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. परंतु यांत मोठेंसें आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. युरोपांतील सुधारलेल्या देशांतही या शास्त्राची उत्पत्ति व वृद्धि नुकतीच दोन तीनशें वर्षांपासून झाली आहे. युरोपांतील सर्व राष्ट्रें स्वतंत्र असल्यामुळें ज्यांचा राज्यकारभार त्यांसच चालविण्याची अनुपम संधि तिकडील लोकांस आहे. व राज्यव्यवहारास या शास्त्राची विशेष आवश्यकता असल्यामुळें तिकडील लोकांचें लक्ष या शास्त्राकडे सहजच वळलें. व्यापारासही या शास्त्राची अत्यंत जरूर आहे; आणि पश्चिमेकडील सर्व देश व्यापारांत एकमेकांस दररोज मागें टाकण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळें, त्यांस अर्थ-शास्त्राची आवश्यकता व योग्यता दिवसेंदिवस जास्त वाटूं लागली. आपला हिंदुस्थान देश आज कितीएक वर्षें परकीय राजांचे अमलांत आहे, स्वातंत्र्याचें वारेंही त्यास कसें तें माहीत नाहीं; राज्यप्रकरणांत मुळींच प्रवेश नाहीं; व्यापारासंबंधानें पाऊल फारच मागें; वाणिज्यवृत्ति करून निर्वाह चालविणें म्हणजे फार हलकें काम, अशा

कायमच्या समजुती; मोलमजुरी करून थोडेंबहुत मिळेल तेवढें खाऊन निर्वाह चालवावा; फार झालें तर शिपायाचा अगर कारकुनाचा धंदा करून थोडेंबहुत पोटास मिळवावें; अशी आपली कितीएक वर्षे स्थिति आहे. तेव्हां राज्यशास्त्राचे व अर्थशास्त्राचे रिकाम्या उठाठेवींत कोण पडतो ? साधारण लिहितां वाचतां येण्याची मारामार, मग एवढाल्या गहन शास्त्रांचें अध्ययन कोण करीत बसेल ? अलीकडे इंग्रजी राज्यांत, व विशेषेंकरून गेल्या ३०–४० वर्षांत विद्येस पुष्कळ उत्तेजन मिळालें. कॉलेजांतून उच्चप्रतीचें शिक्षण मिळूं लागलें, त्यामुळें अर्थशास्त्राचा परिचय इकडील लोकांस थोडाबहुत होऊं लागला आहे. तथापि कॉलेजांत जाणारे सर्वच लोक या शास्त्राचा अभ्यास करितात असें नाहीं. राज्यप्रकरणांत, सामाजिक व्यवस्थेंत, व व्यापारांत रिघाव व्हावा, तितका झाला नसल्यामुळें, आपल्या लोकांपैकीं ज्या थोड्यांस अर्थशास्त्राचें ज्ञान झालें आहे, त्यांस आपले ज्ञानाचा व्यवहारांत उपयोग करून दाखविण्याची संधि मुळींच येत नाहीं. यास्तव तेही या शास्त्राचे अभिवृद्धी-विषयीं उदासीन राहतात. या औदासिन्याचें दुसरें एक कारण असें वाटतें कीं, आपल्या भाषेंत या विषयावर असावे तसे ग्रंथ झालेले नाहींत. मराठी भाषेंत अर्थ-शास्त्रावर ग्रंथ करण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे असें नाहीं. प्रसिद्ध ग्रंथकार 'जॉन स्टुअर्ट मिल' याच्या 'प्रिन्सिपल्स ऑफ् पोलिटिकल इकॉनमी' या नांवाचे अनुपम ग्रंथाचें भाषांतर करण्याचा प्रयत्न कैलासवासी महापंडित कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं करून, कांहीं

भाग छापवूनही प्रसिद्ध केले आहेत. परंतु शास्त्रीबावांचे हातून सगळ्या ग्रंथाचें भाषांतर पुरें झालें नाहीं. ग्रंथ फार मोठा व विषयाविषयीं लोकांची अनभिरुचि असल्यामुळें, कदाचित् भाषांतराचें काम अपुरतें राहिलें असावें. शास्त्रीबावांनीं प्रसिद्ध केलेलीं पुस्तकेंही हल्लीं दुर्मिळ आहेत. या विषयावर दुसरा ग्रंथ 'देशव्यवहारव्यवस्था' या नांवाचा आहे. रा. रा. हरि केशवजी व ऑनरेबल् रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं एका इंग्रजी ग्रंथाचें हें भाषांतर केलेलें आहे, व तेंही हल्लीं दुर्मिळ आहे. याशिवाय मराठी सहावें पुस्तक, विविधज्ञानविस्तार, माजी ज्ञानसंग्रह वगैरे पुस्तकांत या विषयावर बरेच निबंध लिहिले गेले आहेत. कांहीं वर्षीवर रा. रा. गणेश जनार्दन आगाशे, बी. ए. यांनीं या विषयावरील इंग्रजींत असलेल्या 'लेडी फासेट' यांच्या उत्तम पुस्तकाचें भाषांतर केलेलें आहे.

देशसुधारणेच्या कामीं उत्तम ग्रंथसामग्री निर्माण होणें अत्यंत आवश्यक आहे, हें खरें आहे, तथापि ग्रंथ तयार होणें हेंही कितीएक अंशीं लोकांचे वाचनाचे अभिरुचीवर अवलंबून असतें. देशांतील वाचकवर्ग अलीकडे झपाट्यानें सुधारत चालला आहे. निरनिराळे शास्त्रीय विषयांवर ग्रंथ असण्याची जरूरी भासूं लागत चालली आहे. कांहीं उत्तम ग्रंथही तयार होऊं लागले आहेत. देशाची सुधारणा होणें आहे, तर त्याची सांपत्तिक स्थिति प्रथम सुधारली पाहिजे. आणि संपत्तिमान् होण्यास 'जगत् क्षणभंगुर आहे, नश्वर वस्तूंचा अभिलाष न करतां त्या तिरस्कारासच पात्र आहेत,' अशी दृढ समजूत धरून बसून उपयोग

नाहीं. देशाची सांपत्तिक स्थिति कशा रीतीनें सुधारतां येईल; संपत्ति कोणत्या नियमांनीं उत्पन्न होते, वाढते व रक्षण केली जाते, त्या नियमांस अनुसरून आपल्यास चालतां येईल किंवा नाहीं; नसेल तर कां; देशस्थिति सुधारण्याचे कामीं राज्यकर्त्यांस काय काय योजना कराव्या लागतात; या योजना पुष्कळ वेळ गैरसमजुतीनें झाल्या असल्यामुळें, देशाची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचे बदल्यांत ती उत्तरोत्तर वाईट कशी होत जाते, इत्यादि अनेक गोष्टींचें ज्ञान लोकांस संपूर्ण असणें अत्यंत आवश्यक आहे.

देशाचे राज्यकारभाराकडे अलीकडे अधिक अधिक लोकांचें लक्ष लागत चाललें आहे. दहा पांच वर्षांपूर्वीचे व हल्लींचे स्थितींत पुष्कळ अंतर पडलें आहे. राज्यव्यवस्थेंत आपला प्रवेश अंशतः होण्याची तजवीज राज्यकार्यधुरंधर 'लॉर्ड रिपन' साहेब, हिंदुस्थानचे माजी गव्हर्नर जनरल, यांनीं, थोड्या वर्षांवर केली आहे. चोहोंकडे म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें, स्थानिक स्वराज्य, कॉन्फरन्स, नॅशनल कांग्रेस, इंडस्ट्रिअल कॉन्फरन्स इत्यादींनीं लोकांचे मनांत चळवळ उत्पन्न झाली आहे. कायदेकौन्सिलांत बरेच लोकांचा प्रवेश होऊन सरकारास प्रश्न विचारण्याचा अधिकार मिळाल्यानें अनेक विषयांचें पूर्ण ज्ञान करून घेण्याची आवश्यकता लोकांस वाटूं लागली आहे. रुप्याचा भाव फार उतरल्यानें हुंडणावळींत मोठा फेरफार झाला आहे. विलायती व देशी कापडावर व सुतावर जकात बसविल्यानें सर्व देश हल्लून गेला आहे; आणि 'अन्याय झाला अन्याय झाला' अशी चोहोंकडून ओरड सुरू झाली आहे. देशांत राज्य चालविण्याचा

खर्च अतोनात वाढला आहे. कराचे बोज्यानें लोक अगदीं चिरडून गेले आहेत. सगळा देश कंगाल होत चालला आहे. या गोष्टी कितपत खऱ्या आहेत, याचा तपास करण्यासाठीं इंग्रजसरकारांनीं रॉयल कमिशनची नेमणूक केली आहे. इकडे देशांतही अनेक खटपटी सुरू आहेतच. विलायती कापड घेण्याचें बंद करण्याबद्दल कितीएक ठिकाणीं लोक बहुमतानें ठराव करीत आहेत. कांहीं लोक त्यांचेविरुद्ध लेख लिहीत आहेत. जो तो आपल्याच पक्षाचें समर्थन करण्यास झटत आहे. अशा कालीं खरें काय आहे, हें समजणें शहाण्या लोकांसही कठीण पडतें, मग साधारण समजुतीचे जनसमूहाची गोष्टच विचारावयास नको. अशा भानगडीचे वेळीं कोणताही एक निश्चय करण्यापूर्वीं सांपत्तिक स्थिति सुधारण्याचीं मूलतत्वें काय आहेत, अर्थशास्त्राचे मूळ नियम काय आहेत, हें समजण्याची किती आवश्यकता आहे, हें विस्तारानें सांगण्याची जरूर नाहीं. अर्थशास्त्राचा व्यासंग केल्याशिवाय आपलें गाडें चांगलें निभेल असा संभव नाहीं, म्हणून या संधीस या विषयावर एकादें पुस्तक लिहिलें तर पूर्वींप्रमाणें त्याचा अव्हेर होणार नाहीं, व लोक औदासिन्य प्रकट करणार नाहींत, अशी उमेद असल्यानें हा यत्न करण्यांत आला आहे.

अर्थशास्त्राचा विषय फार मोठा व भानगडीचा आहे. शास्त्रीय विषय स्वभावतःच कठीण असतात, व तशांत पारिभाषिक शब्द वगैरे आल्यामुळें मूळचें काठिण्य जास्त वाढलें. कादंबऱ्यांसारखा सहज समजणारा व मनोरंजक अर्थशास्त्राचा विषय नव्हे, आणि तशांतून लहानशा पुस्तकांत

सर्व सिद्धांतांचा यथास्थित विचार करण्यास अवकाश होणें कठीण, यासाठीं थोडक्यांत सुलभ रीतीनें शुद्ध मराठी वाचकांस समजण्यास कठीण पडूं नये, या हेतूनें केवळ कांहीं मुख्य विषयांचेंच या पुस्तकांत विवेचन केलें आहे. हें पुस्तक वाचून या विषयाचा जास्त अभ्यास करण्याची वाचकवर्गास जास्त इच्छा उत्पन्न होईल अशी उमेद आहे. या पुस्तकांत अर्थात् पुष्कळ कमतरता आहेच, तथापि विषय फार मोठा व कठीण या गोष्टींकडे लक्ष देऊन न्यूनाधिक्याबद्दल सुज्ञ-वाचकांकडून वेळोवेळीं योग्य सूचना होतील, तर दुसरी आवृत्ति काढण्याची संधि आल्यास योग्य विचार करण्यांत येईल. केवळ मराठी जाणणारांस अर्थशास्त्राचीं मूलतत्वें थोडक्यांत सुलभ रीतीनें समजावीं, एवढ्याच हेतूनें हें लहानसें पुस्तक वाचकांस सादर करण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. या पुस्तकाचे वाचनानें जर लोकांस या विषयाची गोडी लागल्याचें दिसून येईल, तर पुस्तक लिहिण्याचें साफल्य झालें, अशा समजुतीनें सुज्ञ जनांची ही अल्पसेवा करण्यांत येत आहे.

बडोदें येथें कांहीं वर्षांपूर्वीं 'व्हर्नाक्युलर कॉलेज ऑफ् सायन्स' नांवाची पाठशाळा होती. तींतील कायदे शिकणारे विद्यार्थ्यांस अर्थशास्त्राचा विषय शिकविण्यांत येत असे. तो शिकवितांना केलेल्या टिपणांत कमजास्त करून हल्लींचें पुस्तक छापण्यांत येत आहे. हें लिहिण्याचे कामीं रा. रा. विष्णु गोविंद चिपळोणकर यांची चांगली मदत झाली आहे. तसेंच हें पुस्तक मार्मिक रीतीनें वाचून योग्य सूचना

व अभिप्राय* रा. सा. नारायणराव शिवराम गोऱ्हे, बडोद्याचे एक्स्ट्राडिशन खात्याचे अधिकारी, यांनीं दिला आहे. त्यांचा पुस्तककर्ता फार आभारी आहे.

---

*रा. सा. नारायणराव शिवराम गोऱ्हे यांचा अभिप्राय:-

My dear sir,

I am glad to inform you that I have gone through the papers you gave me and find them most entertainng *through out.* Your arrangement of the subject is extremely lucid and skilful, and the ascent is very easy, natural and untiring. Your short and impressive sentences are admirable and the language in general is exceedingly well adapted to the subject. Of course the work is designed for mere beginners, and you could therefore show in it the broadest features of the subject only. The vexatious details and discussions are wisely kept behind and I am of opinion that as a work for beginners it is successful.

Yours very sincoerly,

**Narayan S. Gorhe.**

प्रस्तावना. ... ... ... ... १—९
अनुक्रमणिका. ... ... ... ... ११-१८
उपोद्घात. ... ... ... ... १—२

**खंड १.**

**संपत्तीचें स्वरूप.** जो पदार्थ दिला असतां त्याऐवजीं दुसरा कांहीं पदार्थ मिळेल त्यास संपत्ति ह्मणावें; पाहिजे तो हलका सलका पदार्थ संपत्ति आहे; सोनें, रुपें, पैसा ह्मणजेच कायती संपत्ति, व इतर वस्तु संपत्ति नव्हत, हा समज चुकीचा आहे; पैसा हा केवळ संपत्तीचें एक दर्शक चिन्ह, व देवघेव करण्यास सुलभ पडावें ह्मणून योजिलेलें मधलें साधन आहे; देशांत जास्त पैसा आल्यानें देश श्रीमंत होत नाहीं; याविषयीं त्रोटक विचार.... ... ... ३—८

**खंड २.**

**संपत्तीचे उत्पत्तीविषयीं विचार.** उत्पत्तीचीं तीन कारणें, १ जमीन, २ श्रम, ३ भांडवल. ... ९-१०

**प्रकरण १.**

जमीन हें संपत्तीच्या उत्पत्तीचें कारण आहे. ... १०-११

**प्रकरण २.**

**भाग १.** जमिनीप्रमाणेंच मेहनत ही संपत्ति उत्पन्न होण्याचें कारण आहे. वस्तु जमिनींतूनच उत्पन्न होतात, पण मेहनतीनें त्या योग्य ठिकाणीं योग्यरूपानें नेल्या जातात; यामुळें वस्तूंचे अंगीं विशेष योग्यता उत्पन्न होऊं लागते, व त्यामुळें त्यांना संपत्तीचें रूप प्राप्त होतें. ... ... ... ... ११-१४

भाग २. उत्पादक श्रम व अनुत्पादक श्रम. ज्या श्रमांपासून संपत्ति उत्पन्न होते त्यांस उत्पादक श्रम, व ज्यापासून संपत्ति उत्पन्न होत नाहीं त्यास अनुत्पादक श्रम ह्मणतात. उत्पादक श्रमाचे दोन प्रकार. प्रत्यक्ष रीतीनें संपत्ति उत्पन्न करणारे; व अप्रत्यक्ष रीतीनें ती उत्पन्न करणारे; त्यांचीं उदाहरणें. अनुत्पादक श्रम निरुपयोगी आहेत असें नाहीं. श्रमविभाग ह्मणजे काय. श्रमविभागापासून उत्पत्तीचे कामीं होणारा फायदा. श्रमांचें एकीकरण. श्रमविभागाप्रमाणेंच श्रमांचे एकीकरणापासून होणारे फायदे. उत्पत्तीचे कामीं यंत्रांचा उपयोग केल्यापासून फायदे. मजुरांचें कसब, ज्ञान, नीति, इमानीपणा इ. वाढल्यानें उत्पत्तीचे कामीं होणारे फायदे. ... ... १४–२०

भाग ३. उत्पादक व अनुत्पादक व्यय. सर्वच व्यय उत्पादक नव्हे. उत्पत्तीचे कामीं झालेला व्यय मात्र उत्पादक व्यय होय. चैनबाजींत झालेला खर्च अनुत्पादक व्यय समजावयाचा. चैनबाजींत पैसा खर्च केल्यानें मजुरांस धंदा दिला व उत्तेजन दिलें असें होत नाहीं. उधळे लोक देशाचे हितकर्ते नव्हत. काटकसरीनें खर्च करून संग्रह करणारे लोक देशाचा फायदा करणारे होत. ... ... ... २०–२३

## प्रकरण ३.

भाग १. भांडवल ह्मणजे पैसाच मात्र नव्हे. भांडवल शब्दांत पुष्कळ वस्तूंचा समावेश होतो. भांडवलाची व्याख्या. पुढें उत्पत्ति व्हावी या हेतूनें खर्च करण्यासाठीं प्रथम उत्पन्न झालेल्या संपत्तीपैकीं वेगळा काढून ठेविलेला भाग, त्यास भांडवल ह्मणतात ... २३–२६

भाग २. भांडवलासंबंधानें कांहीं महत्वाचे सिद्धांत. सिद्धांत ( १ ) तयार केलेला आयता माल विकत घेतला असतां आपण मजुरांचें संरक्षण केलें असें नाहीं. उदाहरण, ऐषआरामाचे पदार्थ विकत घेतल्यानें मजुरांचे आपण कल्याण करीत नाहीं. सिद्धांत ( २ ) भांडवल हें संचयाचें फळ आहे. उधळ्या माणूस देशाचा व मजुरांचा मित्र नव्हे. सिद्धांत ( ३ ) भांडवल जरी संचयाचें फल आहे, तरी भांडवल हें नांव प्राप्त होण्यास त्याचा व्ययच झाला पाहिजे. पेटींत घालून ठेवलेले किंवा दागिन्यांत घातलेले पैसे भांडवल नव्हत.... ... ... ...२६–३४

भाग ३. चल भांडवल व अचल भांडवल. व्याख्या. मजुरी वगैरे एक वेळच उपयोगांत येणारें भांडवल तें चल भांडवल होय. यंत्रें वगैरे अचल भांडवल आहेत. उत्पत्तीचे कामीं यंत्रांचा उपयोग करूं लागल्यानें पुष्कळ चल भांडवलास अचल भांडवलाचें रूप येतें; व यामुळें प्रथम मजुरांचें नुकसान होतें, पण पुढें उत्पत्ति पुष्कळ होऊं लागून फायदा होतो. ... २६–३४

भाग ४. उत्पत्ति लहान पायावर केली अथवा मोठ्या पायावर केली तर फायदेशीर होईल, याविषयीं सर्वसाधारण एक नियम सांगतां येणार नाहीं. निरनिराळे धंद्यांत स्थितीप्रमाणें हें ठरविलें पाहिजे. यंत्रांनीं होणारे पदार्थांचे कारखाने मोठ्या पायावर असतील तितके चांगले. शेतकीविषयीं हा नियम सर्वत्र सारखा लागू पडणार नाहीं. ... ... ... ३७–३९

खंड ३.

विषयव्यवस्था. ... ... ... ३९–४०

## प्रकरण १.

**भाग १.** मौल्य आणि किंमत. व्याख्या. दोहोंतील भेद. एका वस्तूंचें मौल्य वाढलें कीं, इतर सर्व वस्तूंचें कमी झालें पाहिजे. वस्तूंचें मौल्य वाढलें या ह्मणण्याचा कांहीं अर्थ नाहीं. सर्व वस्तूंची किंमत एकदम वाढेल, पण मौल्य वाढणार नाहीं. ... ... ४०–४५

**भाग २.** नाण्याविषयीं व्याख्या. पदार्थांचें मौल्य ठरविण्यास, व देवघेव सुलभ रीतीनें चालवितां यावी, यासाठीं सर्वानुमतें मुकरर केलेला पदार्थ, यास नाणें ह्मणतात. ज्या पदार्थांचें नाणें करावयाचें त्याचे अंगीं अवश्य असणारे तीन गुण. (१) त्याचें मौल्य हमेषा एकसारखें राहिलें पाहिजे. (२) तो सर्वांस हवासा असला पाहिजे. त्यास कांहीं अंगची किंमत असली पाहिजे. (३) तो सांठवून ठेवण्यास जागा थोडी लागेल व तो सहज नेतां आणतां येईल असा पाहिजे. यांचा अनुक्रमें विचार. नाणें व संपत्ति एकच नव्हे. देशांत नाणें पुष्कळ झालें ह्मणजे देश श्रीमंत झाला असें नाहीं. ... ... ... ... ४५–५२

**भाग ३.** पदार्थांची किंमत कशानें ठरते. पदार्थांचे तीन वर्ग. (१) ज्यांचा सांठा वाढवितां येत नाहीं; (२) ज्यांचा सांठा वाढवितां येतो, परंतु उत्पत्तीचा खर्च प्रमाणापेक्षां जास्त वाढतो; (३) ज्यांचा सांठा वाढविला असतां उत्पत्तीचा खर्च न वाढतां उलट कमी होतो. उत्पत्तीचा खर्च ह्मणजे काय, यांत मजुरांची मजुरी, भांडवलावरील नफा वगैरेंचा समावेश होतो. पुरवठा ह्मणजे काय, खप कशास ह्मणतात. पदार्थांची किंमत साधारणतः उत्पत्तीचे खर्चावर अवलंबून असते.

ती खप व पुरवठा जसजसा कमीजास्त होईल तस-तशी फिरते. पहिल्या वर्गातील पदार्थांची किंमत उत्पत्तीचे खर्चानें ठरत नाहीं. ती खप व पुरवठ्यानेंच मुकरर होते. दुसऱ्या वर्गातील पदार्थांची किंमत त्यांचे उत्पत्तीचे खर्चाचे मानानें बहुधा मुकरर होते. यांचा खप वाढला असतां काय परिणाम होतात. धान्य वगैरे पदार्थ या वर्गात येतात. लोकसंख्या वाढून अथवा परदेशीं धान्य पाठवावें लागल्यानें, त्याचा खप वाढला असतां काय परिणाम होतो. धान्य महाग झालें तर शेतकऱ्यांचा फायदा होतो, हें ह्मणणें चुकीचें आहे. तिसरे वर्गातील पदार्थांची किंमत उत्पत्तीचे खर्चावरूनच ठरते. देशांत फक्त धान्यच पिकविण्याचा धंदा असल्यानें काय होईल. ... ... ५२-६९

**प्रकरण २.**

**भाग १.** संपत्तीची वांटणी, जमिनीचे मालक, मजूर व भांडवल या तिघांमध्यें होते, त्या विभागांस, सारा, मजुरी व नफा असें ह्मणतात. ... ... ७०-७१

**भाग २.** जमिनीचा सारा. जमिनीचा सारा ह्मणजे काय. सारा मुख्य दोन कारणांनीं येतो. (१) जमिनीचा सुपीकपणा; (२) व ती सवडीचे ठिकाणीं असणें. लागवडींतील शेवटली जमीन ह्मणजे काय. या जमिनीचे सारे वाढतात. देशांत लोकसंख्या वाढणें हें सुस्थितीचें चिन्ह नव्हे. सारे वाढले असतां धान्य महाग होतें हें ह्मणणें चुकीचें आहे. सारा घेण्याचे निरनिराळे प्रकार; रयतवारी रिवाजाचा परिणाम. ७१-८४

**भाग ३.** मजुरांची मजुरी. मजुरीचे दर स्पर्धेनें मुकरर होतात. ते देशांतील एकंदर भांडवल व एकंदर

मजुरांची संख्या यांचे प्रमाणानें मुकरर होतात. उत्पत्तीचे कामीं यंत्राचा उपयोग केला असतां मजुरीवर होणारे परिणाम. जिन्नस महाग झाल्यानें मजुरीचे दर वाढतात असें नाहीं. निरनिराळ्या धंद्यांतील मजुरीचे दर कमी जास्त असण्याचीं पांच कारणें. ८४–९३

भाग ४. भांडवलावरील नफे. नफा या शब्दाचा अर्थ. नफा व भांडवलाचें व्याज यांतील भेद. सर्व धंद्यांत व्याजाचा दर एक असूं शकेल, पण सर्व धंद्यांत नफे सारखे असूं शकणार नाहींत. लोकसंख्या वाढल्यानें नफ्यावर होणारे परिणाम. असें झाल्यानें नफे कमी होतात. जिन्नस महाग झाल्यानें नफे वाढत नाहींत. धान्य महाग झालें असतां शेतकऱ्यांचा फायदा होतो हें म्हणणें चुकीचें आहे. देशांत लोकसंख्या वाढल्यानें देशाचें नुकसान होतें. ... ... ... ९३–१०६

## प्रकरण ३.

भाग १. परकीय देशांशीं व्यापार. विषयव्यवस्था. व्यापार ह्मणजे काय. व्यापाराचा उपयोग. दोन वस्तूंचा व्यापार केव्हां होऊं शकेल. दोन देशांत व्यापार सुरू होण्यास ज्या जिनसांचा व्यापार होणें आहे, त्यांच्या उत्पत्तीच्या खर्चाचें प्रमाण सारखें असून उपयोगी नाहीं, तें भिन्न असलें पाहिजे. दोन देशांत फायदा झालाच पाहिजे. ... ... १०७–११९

भाग २. दोन देशांचे व्यापारांत ज्यांचा व्यापार होतो त्या जिनसांच्या किंमतीविषयीं. ही जिनसांची किंमत काय धोरणानें मुकरर होते. बाहेरून येणाऱ्या जिनसाची किंमत तो जेथें आणला असेल तेथें त्याचे मोबदला जो जिन्नस मिळूं शकेल त्याचे उत्पत्तीचे

खर्चानें ठरली जाईल, व ती या पदार्थाचा खप व पुरवठा यांनीं मुकरर होईल. व्यापारापासून होणारा फायदा दोन्ही देशांस काय प्रमाणानें मिळेल. दरेक देशास तो त्या देशांत बाहेरून येणाऱ्या मालाच्या खपाच्या उलट प्रमाणानें असतो. एक महत्वाचा सिद्धांत. देशांतून बाहेर जाणाऱ्या मालापेक्षां बाहेरून देशांत येणारा माल जास्त असला तरच देशाचा फायदा होतो. ... ... ... ११९-१३३

भाग ३. परकी देशांशीं व्यापाराचे बाबतींत कांहीं गैरसमज. परदेशांस जास्त माल पाठविण्यांत आपला फायदा नाहीं. परदेशांतून अधिक माल आपल्या देशांत आणण्यांत जास्त फायदा आहे. देशांत माल न येऊं देतां रोकड पैसा आणिल्यानें काय परिणाम होतात. हिंदुस्थानचे व्यापाराचे स्थितीचें दिग्दर्शन. होम चार्जेस. ... ... ... १३३-१४८

भाग ४. करांविषयीं. कर बसविण्याचीं कारणें. कर बसविण्याचे बाबतींत अॅडम स्मिथनें सांगितलेले चार नियम. दरेकाचा विचार.] ... ... १४८-१५३

भाग ५. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांविषयीं. प्रत्यक्ष कर ह्मणजे काय. अप्रत्यक्ष कर ह्मणजे काय. प्रत्यक्ष कर-जमिनीचे साऱ्यावर बसविलेले कर जमिनीचे मालकावर पडतात. नफ्यावरील कर. मजुरांवरील कर. प्राप्तीवरील कर बसवितांना ध्यानांत ठेवण्याच्या गोष्टी. १५४-१५९

भाग ६. जिनसांवर बसविलेले व दुसरे अप्रत्यक्ष कर. जिनसांवर बसविलेल्या जकातीमुळें किंमत वाढते. चैनीचे पदार्थांवर बसविलेल्या जकाती. उपजीविकेच्या पदार्थांवर बसविलेल्या जकाती. प्रत्यक्ष कर बसविणें

चांगलें किंवा अप्रत्यक्ष कर बसविणें चांगलें. हिंदुस्थानांत कांहीं जकाती बसविल्या आहेत त्यांचे परिणाम. मीठ, कापड, जमीन वगैरेंवरील कर ... १५६-१६८

**भाग ७.** परकी देशांशीं होणाऱ्या व्यापारावरील जकाती. येणाऱ्या मालावरील व जाणाऱ्या मालावरील जकाती. आवक ( आयात ) व जावक ( निर्गत ) जकाती. जावक मालावरील जकातींचे परिणाम. हें ओझें दुसऱ्या देशावर पडावें असा हेतु असतो, पण सर्व जिनसांवर अशी जकात बसविली तर परिणाम सारखाच होत नाहीं. ज्या मालाचा खप बाहेर कमी होण्याचा संभव नाहीं, त्यावर जकात बसविली असतां हरकत नाहीं. आवक मालावरील जकात. ही जकात संरक्षणादाखल असूं नये. साधारणपणें आवक जकातीचा बोजा आपले देशांतील लोकांवर पडतो. दोन जकातींपैकीं चांगली कोणती याबद्दल सर्वसाधारण नियम सांगणें कठीण आहे. ... ... १६९-१७७

**भाग ८.** अप्रतिबद्ध व्यापारास संरक्षण. व्यापारास संरक्षण असणें याचा अर्थ. संरक्षणापासून होणारे तोटे. संरक्षण असण्याचीं कारणें व त्यांचा विचार. संरक्षणाविषयीं मिलसाहेबांचे विचार. ईस्ट इंडिया कंपनीचे वेळीं इंग्लंडांत संरक्षणादाखल होत असलेल्या तजविजी... ... ... ... १७८-१९२

संरक्षणाविषयीं प्रिन्सिपॉल वर्डस्वर्थसाहेबांचे विचार १९२-१९७

उपसंहार... ... ... ... १९७-१९८

---

# अर्थशास्त्राचीं मूलतत्वें.

## उपोद्घात.

मुंबईसारख्या मोठ्या शहरांत रस्त्यानें फिरत असतां जिकडे पहावें तिकडे मौज नजरेस पडते. मोठमोठ्या हवेल्या; सुंदर व सुशोभित बंगले; जागजागीं चित्रविचित्र व रमणीय बाग; विस्तीर्ण व स्वच्छ रस्ते; कापडाचे, लोखंडाचे, आगगाडीचे, वगैरे अनेक अवाढव्य कारखाने, सर्व प्रकारच्या मालांचीं उत्कृष्ट दुकानें; रस्त्यानें जाणाऱ्या हजारों गाड्याघोड्यांची झालेली एकच गर्दी, शेंकडों प्रकारचे धंदे व कामें चोहींकडे सुरू झालेलीं; असे अनेक प्रकार पहाण्यांत येतात. तेंच घांटावर अगर कोंकणांत एकाद्या खेडयांत जावें तों, धड कोणास घरही नाहीं; गवताच्या लहानसहान झोंपडयाखेरीज दुसरी इमारत नाहीं; कोणाचे अंगावर धड वस्त्र नाहीं; बागबगीचे, बंगले, गाड्या, यांची तर गोष्टच विचारावयास नको; अशी कंगाल स्थिति पहाण्यांत येते.

या दोन ठिकाणच्या स्थितीमध्यें एवढें मोठें अंतर कां असावें; मुंबई शहरांत जिकडे तिकडे संपत्ति व लोक श्रीमान् कां दिसावे; आणि खेड्यांत कंगाल स्थिति व दारिद्र्य कां दृष्टीस पडावें; यांच्या कारणांचा थोडाबहुत विचार करणें जरूर आहे.

१–९१८–२०००

मुंबई शहर व खेडेगांव यांचे स्थितींत वर सांगितलेला फरक असण्याचें कारण 'त्यांची कमीजास्त संपत्ति' हें होय, असें कोणीही सहज सांगू शकेल, तरी पण एका ठिकाणापेक्षां दुसऱ्या ठिकाणीं संपत्ति जास्त कां असावी; एका मनुष्यापेक्षां दुसरा मनुष्य श्रीमान् कां असावा; एका देशापेक्षां दुसरा देश समृद्ध कां व्हावा; यांचीं तरी कारणें काय असावीं, तीं अवश्य समजलीं पाहिजेत.

वरील कारणांचा शोध करूं लागलें असतां, आपल्यास तीन गोष्टींचा विचार करणें भाग पडेल. (१) **संपत्ति** ह्मणजे काय? संपत्ति हें नांव कशास देतां येईल? तिचें **स्वरूप** काय? वगैरे. (२) **संपत्ति** उत्पन्न कशी होते? अथवा तिच्या **उत्पत्तीचे नियम** काय आहेत? (३) तिचे **विभाग** कसे होतात?—ह्मणजे निरनिराळे लोकांत अगर देशांत संपत्तीची **वांटणी** कशी होते, तिची **अदला-बदल** होण्याचे नियम कोणत्या प्रकारचे आहेत, वगैरे.

ज्या शास्त्रांत वरील तिन्ही गोष्टींचा, ह्मणजे संपत्तीचें (१) **स्वरूप,** (२) तिच्या उत्पत्तीविषयीं **नियम,** व (३) तिचे **विभाग** आणि **अदलाबदल,** यांचा विचार केलेला आहे, त्यास '**अर्थशास्त्र**' असें नांव आहे.

अर्थशास्त्राचा मुख्य विषय जर '**संपत्ति**' हा आहे, तर **संपत्ति** ह्मणजे काय, याचा विचार प्रथम केला पाहिजे; ह्मणजे तिची उत्पत्ति व वांटणी कशी होते हें नीट समजेल. ह्मणून संपत्ति ह्मणजे काय, हें प्रथम पाहूं; व पुढें दुसऱ्या दोन राहिलेल्या गोष्टींचा अनुक्रमें विचार करूं.

# खंड १ लें

## संपत्तीचें स्वरूप.

### संपत्ति ह्मणजे काय? संपत्ति कशाला ह्मणावें?

संपत्ति ह्मणजे कोणताही पदार्थ, कीं जो दिला असतां त्याचे मोबदला दुसरा कोणताही पदार्थ मिळू शकेल. एक धोतरजोडा दिला असतां एक मण बाजरी मिळेल, अगर दहा बकरे देऊन एक घोडा मिळेल, अगर घागरभर पाणी देऊन दोन शेर धान्य मिळेल, तर धोतरजोडा, बकरे, व पाणी, हीं सर्व संपत्ति होत. नदी, तलाव वगैरेंच्या कांठीं पाणी फुकट मिळतें, तेथें त्यास कांहीं मूल्य येत नाहीं, ह्मणजे त्याचे मोबदल्यांत कांहीं मिळत नाहीं; ह्मणून त्या ठिकाणीं पाणी हें संपत्ति होणार नाहीं. परंतु मारवाडासारख्या देशांत, अगर आगगाडीचे स्टेशनावर पाणी मुफत मिळत नाहीं, हें सर्वांस माहीत आहेच; मुंबई, पुणें, बडोदें, अमदाबाद, इत्यादि शहरांतून पाण्याबद्दल पैसे द्यावे लागतात; तसेंच कालवे वगैरेंमधून शेतीचे कामांत घेतलेल्या पाण्याबद्दलही पैसा द्यावा लागतो; या सर्व ठिकाणीं पाण्यास मूल्य येतें, सबब पाणी हें त्या ठिकाणीं संपत्ति होय.

यावरून सहज लक्षांत येईल कीं, पाहिजे तो हलकासलका पदार्थ देखील संपत्ति होऊं शकेल. मात्र तो असतां, त्याचे मोबदला दुसरा कांहीं तरी पदार्थ मिळेल, असा तो असला पाहिजे. एका अगदीं हलक्या पदार्थाचें आपण

उदाहरण घेऊं. दररोज सर्व लोक आपआपल्या घरांतील टोपलीच्या टोपली केरकचरा काढून फेंकून देतात; गुराढोरांच्या खालील गळाठा, शेण वगैरे दररोज काढून टाकून देतात. केरकचरा, गळाठा, शेण या वस्तु फारच हलक्या असून त्या दररोज काढून टाकल्या नाहींत, तर मनुष्यांच्या शरीरप्रकृतीस त्या अपायकारक होतात. या वस्तु देखील संपत्ति होऊं शकतात, असें जर सांगितलें, तर प्रथमदर्शनीं तें कांहीं लोकांस खरें वाटणार नाहीं. पण थोडा विचार केला तर लक्षांत येईल कीं, घरांतून निघणारा केरकचरा, शेण, वगैरे हें दररोज एका ठिकाणीं टाकीत गेल्यानें त्याचे मोठे उकीरडे बनून शेतीच्या कामीं उपयोगीं पडण्यासारखें उत्तम प्रकारचें खत होतें; व हें खत कधीं कधीं एक रुपयास चार गाडे, दोन गाडे, व एक गाडाही असें विकलें जातें. या प्रसंगीं केरकचरा ही संपत्ति होय, हें निर्विवाद सिद्ध आहे. याप्रमाणें धान्य, कापड, लांकूड, जनावरें, घरें, कोळसे, धातु, दगड, माती, औषधें, झाडांचीं पानें इत्यादि अनेक पदार्थ संपत्ति होत, हे नीट लक्षांत ठेविलें पाहिजे.

वरील विवेचनावरून संपत्ति कशास म्हणावें व तिचें स्वरूप काय, हें नीट लक्षांत आलेंच असेल; तथापि संपत्तीच्या स्वरूपाविषयीं कांहीं लोकांचा ग्रह चमत्कारिक झालेला आढळण्यांत येतो, ह्मणून त्याविषयीं या स्थळीं थोडेंसें जास्त सांगण्याची जरूर आहे.

कांहीं लोक समजतात कीं, सोनें, रुपें, व पैसा ह्मणजेच कायती संपत्ति, आणि त्यांशिवाय इतर जिन्नस संपत्ति नव्हत. आपल्या देशांत सोनें, रुपें वगैरेंचा सांठा जेवढा

संपन्न गणला जाईल. आपल्या देशांतील सोनें, रुपें, पैसा, नाणें हीं बाहेर गेलीं असतां आपला देश भिकारी होईल. याकरितां हमेष आपल्या देशांतून माल परदेशीं पाठवून त्याचे मोबदला आपल्या देशांत सोनें, रुपें, पैसा येईल असें करावें. दुसऱ्या देशांतील माल आपल्या देशांत येऊं देऊं नये; व येईल तर त्यावर अनेक प्रकारचे कर, जकाती वगैरे बसवून हरप्रयत्नानें तो येण्याचें बंद पाडावें. आपल्या देशांतील सोनें, रुपें, पैसा, परदेशांत जाऊं देऊं नये, अशा पुष्कळ लोकांच्या समजुती आहेत.

पैसा व संपत्ति या दोहोंच्या अर्थात् गोंधळ झाल्यामुळें वर सांगितल्याप्रमाणें खोट्या व अनिष्टकारक समजुती पुष्कळ लोकांच्या झालेल्या दिसतात. अशी समजूत होणें अगदीं साहाजिक आहे, हें जरी खरें आहे, तरी पैसा ह्मणजेच कायती संपत्ति, पैशावांचून इतर पदार्थ संपत्ति नव्हत, हें ह्मणणें बरोबर नाहीं. एखाद्या शेतकऱ्याजवळ पुष्कळ बैल अगर गल्ला असेल व पैसा मुळींच नसेल, तर त्याला संपत्तिमान् ह्मणूं नये काय? धनगराजवळ मेंढ्यांचें कळप असतात, पैसा मुळींच नसतो, ह्मणून तो भिकारी ह्मटला जाईल काय? कोळशाचे खाणीच्या मालकाजवळ, खाणींतून निघालेला पुष्कळ कोळसा शिल्लक आहे, पैसा नाहीं, ह्मणून त्याला निर्धन ह्मणावें काय? पुष्कळ खेड्यापाड्यांतून लोक धान्य देऊन कापड, भाजीपाला व इतर जिन्नस घेतात, व सर्व प्रकारची आपली देवघेव पैशावांचून चालवितात; अशा ठिकाणच्या लोकांजवळ पैसा नसतो, ह्मणून त्यांच्या.

जवळ संपत्तीही नाहीं, असें ह्मणणें रास्त होणार नाहीं. कारण, खेड्यापाड्यांत पुष्कळ शेतकरी व इतर लोक, जवळ सोनें, रुपें, पैसा नसतांही, गब्बर असतात, हें सर्वांस माहीत आहे.

संपत्ति ह्मणजे काय, हें सांगितलेंच आहे. पैसा हींच कायती संपत्ति, ही समजूत बरोबर नाहीं; पैशावांचून इतर अनेक वस्तु संपत्ति होत, हेंही सांगण्यांत आलेंच आहे. यावरून संपत्तीचें स्वरूप नीट लक्षांत येऊन चुकलेंच असेल; तथापि संपत्ति आणि पैसा यांच्या अर्थांत् जो हा मोठा गोंधळ होण्याचा हमेष संभव आहे, तो न व्हावा यासाठीं संपत्ति ह्मणजे काय, हें जसें सांगण्यांत आलें, तसेंच पैसा ह्मणजे काय, पैसा अथवा नाणें कशास ह्मणण्याचा परिपाठ आहे, संपत्ति व पैसा यांत भेद काय, हेंही थोडक्यांत सांगण्याची आवश्यकता आहे.

अमुक मनुष्य किती श्रीमंत आहे, अमक्याची मिळकत किती आहे, वगैरे ज्या वेळीं दाखविण्याचें असतें, त्यावेळीं त्याच्याजवळ कापडाचे गठ्ठे अमुक आहेत, अथवा त्याचे घरीं अमुक बैल किंवा अमुक धान्य आहे, असें न सांगतां, त्याच्या श्रीमंतीची, त्याच्या मिळकतीची कल्पना झटदिशीं मनांत येण्यासाठीं कांहीं एक दर्शक चिन्ह योजण्याचा प्रघात आहे. ह्मणजे अमुक, दहा हजारांचा मालक आहे; अमका, एक लाखाची असामी आहे; अशा प्रकारें त्याच्या संपत्तीचा अंदाज दाखविण्यांत येतो; कोणी मनुष्य एक लाखाची असामी आहे, असें ह्मटलें, ह्मणजे त्याच्याजवळ लाख रुपयांचे तोडे भरलेले आहेत असें समजावयाचें नाहीं; तर त्याचें घरदार, गुरेंढोरें, कपडालत्ता, शेतपोत, दाणादुणा

वगैरे सर्व मिळून एक लाख रुपये किंमतीचा माल त्याजपाशीं आहे असें समजावयाचें. येथें एक लाख हें केवळ त्या मनुष्याजवळच्या संपत्तीचा अंदाज दाखविण्यासाठीं दर्शक चिन्ह उपयोगांत आणिलेलें आहे. ह्मणून पैसा हीच संपत्ति नसून सर्वानुमतें ठरविलेल्या संपत्तीचें तो एक दर्शक चिन्ह आहे असें समजावयाचें.

पैसा जसें संपत्तीचें दर्शक चिन्ह आहे, तसेंच तो, पदार्थ देवघेव करण्यास सुलभ पडावें यासाठीं योजिलेलें, एक मधलें साधन आहे. पैसा नसला, तर पदार्थ अदलाबदल करण्यास, देवघेव करण्यास, व्यापार चालविण्यास, अनेक हरकती येतात. समजा कीं, एका मनुष्याजवळ धान्य पुष्कळ आहे, पण पैसा नाहीं. त्याला धोतर पाहिजे आहे, तर ज्याजपाशीं तें असेल त्याजवळ जाऊन आपलें धान्य त्यास देऊन त्याजपासून धोतर घेतलें पाहिजे. धोतरवाल्यास जर धान्याची जरूर नसेल, तर त्याला ज्या जिनसेची जरूर असेल ती ज्या मनुष्याजवळ असेल त्याला आपलें धान्य देऊन ती जिन्नस घेऊन धोतरवाल्यास आणून दिली पाहिजे, तेव्हां धोतर मिळावयाचें. जर कदाचित् ती जिन्नस जवळ असणाऱ्या इसमास धान्याची जरूर नसेल तर धान्यवाल्यास आपलें धान्य देऊन धोतर घेण्याची सवड मिळणार नाहीं; त्यानें धोतरावांचून राहिलें पाहिजे. अशी अडचण दरेक वेळेस पावलोंपावलीं येणार, व त्यामुळें व्यवहारास फारच अडचण होणार. यासाठीं पदार्थ अदलाबदल करण्याचें एक मधलें साधन सर्वानुमतें नक्की करण्यांत आलें आहे. त्या साधनास पैसा हें नांव आहे. या साधनानें देवघेव सुलभ रीतीनें होते.

धोतर किंवा दुसरी कोणती पाहिजे ती जिन्नस सुलभ रीतीनें विकत घेईल. अदलाबदल करण्याच्या ज्या **जिनसा त्या संपत्ति** होत, आणि जिनसा सुलभ रीतीनें अदलाबदल कारितां याव्या, यासाठीं योजिलेलें जें **मधलें साधन** तो **पैसा** होय, हें लक्षांत येईल.

वरील विवेचनावरून स्पष्ट समजेल कीं, सर्व पदार्थ, कीं जे दिले असतां मोबदल्यांत दुसरे पदार्थ मिळतील, ते सर्व संपत्ति होत. पैसा ह्मणजेच कायती संपत्ति आणि पैशाखेरीज इतर वस्तु संपत्ति नव्हत, ही समजूत खोटी आहे. पैसा हें केवळ संपत्तीचें दर्शक चिन्ह, व पदार्थ सुलभ रीतीनें अदलाबदल कारितां यावेत यासाठी सर्वानुमतें योजिलेलें एक मधलें साधन आहे. पैशाखेरीज दुसरे अनेक पदार्थही संपत्ति होत.

जर 'पैसा ह्मणजे संपत्ति नव्हे' हें सिद्ध झालें, तर आपल्या देशांत परकी देशांतून माल येऊन, त्याबद्दल आपल्या देशांतून सोनें, रुपें बाहेर गेलें, ह्मणजे आपल्या देशांतून संपत्ति बाहेर गेली, व तितक्या अंशानें आपला देश भिकारी झाला; हें ह्मणणें निराधार होईल. तसेंच बाहेरील माल आपल्या देशांत येऊं नये, ह्मणून त्यावर जब्बर जकाती बसविणें, व तो येण्याचें बंद करणें, हें देशास फायदेशीर न होतां उलटें नुकसानीचें होईल; या विषयासंबंधानें या स्थळीं जास्त विवेचन केल्यानें विषयांतर होईल, यासाठीं याबद्दल अधिक विचार प्रसंगोपात करण्यांत येईल.

## संपत्तीची उत्पत्ति.

—०※०—

अर्थशास्त्राचा विषय जी संपत्ति, तिचें स्वरूप काय? पैसा ह्मणजेच संपत्ति असें नाहीं, तर पैशाखेरीज इतर वस्तूंसही संपत्ति ह्मटलें पाहिजे; कोणाजवळ पैसा नसून केवळ इतर पदार्थच असतील, तरी पण तो संपत्तिमान् होय; वगैरे गोष्टींचें विवरण मागील प्रकरणांत झालें. आतां या प्रकरणांत अर्थशास्त्राचा दुसरा मुख्य विभाग जो 'संपत्तीची उत्पत्ति' त्याचा विचार करणें आहे.

संपत्ति कशी उत्पन्न होते, तिचे उत्पत्तीचे नियम काय आहेत, व ते कसकसे बदलतात, याचा विचार आपण करूं लागलों असतां शेवटीं आपल्यास असें समजेल कीं, संपत्ति उत्पन्न होण्यास अवश्य कारणें तीन आहेत. १ जमीन, २ मेहनत, आणि ३ उत्पत्ति होतेवेळीं लागणारा खर्च अथवा भांडवल. कोणतीही वस्तु घ्या; ती उत्पन्न होण्यास जमीन, मेहनत व भांडवल, यांची आवश्यकता आहेच; उदाहरणार्थ, अंगावरील धोतर कापसाचें केलेलें आहे, व कापूस जमिनीपासून होतो; ह्मणून धोतर होण्यास जमीन हें कारण आहे. तसेंच जमिनींत कापूस पेरणें, तो तयार झाल्यावर त्याचें सूत काढणें, सुताचें धोतर विणणें, वगैरे कृत्यांस मेहनत जरूर आहे. सबब धोतर होण्यास दुसरें अवश्य कारण मेहनत हें होय. याचप्रमाणें जमीन नांगरून, कापूस पेरून, धोतर तयार होईपर्यंत त्याच्यावर

अनेक प्रकारचे खर्च होतात. जमीन नांगरणारा, कापूस पेरणारा, सूत काढणारा, धोतर विणणारा, इत्यादि लोक श्रम करीत असतां त्यांना खाण्यास पाहिजे व तें न मिळेल, तर त्यांच्या हातून मेहनत होणार नाहीं व धोतर तयार होणार नाहीं, यासाठीं धोतर तयार होण्यास जमीन व मेहनत जशी अवश्य आहे, तसा तें तयार करण्यास ह्मणजे संपत्ति उत्पन्न होण्यास, अवश्य कारणें तीन असलीं पाहिजेत: जमीन, श्रम, आणि भांडवल: हें लक्षांत येईल.

## प्रकरण १ लें

### जमीन.

वर आतांच सांगितलें कीं, धोतर कापसाचें होतें, व कापूस जमिनींत होतो; तेव्हां धोतर उत्पन्न होण्यास जमिनीची आवश्यकता आहे. याचप्रमाणें आपण कोणताही पदार्थ घेतला, तरी आपले लक्षांत येईल कीं, तो उत्पन्न होण्यास जमिनीची जरूर आहेच. आपल्या घरांतील भांडीं पहा. तीं धातूंचीं केलीं आहेत, व ते धातु जमिनींतून निघतात. आपण जें अन्न खातों तें पहा. तें निरनिराळ्या प्रकारच्या धान्यांचें केलेलें आहे, व तीं सर्व धान्यें जमिनींतून उत्पन्न होतात. अनेक प्रकारचीं फळें आपण नेहमीं खातों; तीं ज्या झाडांचीं आहेत तीं झाडें जमिनींतच होतात. तेल, तूप, साखर, धान्यें इत्यादि उपजीविकेस लागणारे अनेक पदार्थ, सगळ्या प्रकारचीं फळें, वस्त्रें, पात्रें आणि पदार्थ

येईल कीं, त्या सर्वांची उत्पत्ति होण्यास ‘ जमीन ’ कारण आहे. याकरितां पदार्थमात्रांच्या उत्पत्तीचें मूळ कारण एक जमीनच आहे, असें ह्मटलें तरी चालेल. तथापि मेहनत व भांडवल हींही जमिनीप्रमाणेंच उत्पत्तीस अवश्य कारणें आहेत, हें पुढील प्रकरणावरून समजेल.

---

## प्रकरण २ रें

### भाग १ ला,

### मेहनत अथवा श्रम.

सर्व पदार्थांस उत्पन्न होण्यास जमीन अवश्य आहे हें स्पष्ट झालेंच; तथापि कोणत्याही पदार्थास संपत्तित्व, ह्मणजे तो दिला असतां मोबदल्यांत दुसरा पदार्थ मिळण्याची योग्यता त्याचे अंगीं येण्यास त्या पदार्थावर थोडीबहुत मेहनत होणें जरूर पडतेंच. कितीएक पदार्थांचे उत्पत्तींत जमिनीचा तादृश उपयोग नसून, त्यावर केवळ मेहनत झाल्यामुळेंच त्यांचे अंगीं संपत्तित्व येतें. उदाहरणार्थ, पाणी घ्या. पावसाचें पाणी एका ठिकाणीं जमून नदीच्या रूपानें वाहूं लागतें. तें उत्पन्न होण्यास जमिनीची विशेष जरूर नाहीं. हें पाणी आपण नदीच्या कांठीं गेलों असतां श्रमावांचून मिळतें; ह्मणून त्याचा मोबदला कांहींएक मिळणार नाहीं. अशा वेळीं पाण्यास संपत्ति हें नांव देतां येणार नाहीं. परंतु तेंच पाणी मिळविण्यास जेव्हां खोल विहीर

अगर मोठा तलाव बांधावा लागतो, आणि तेथून यंत्रानें काढल्याशिवाय तें मिळूं शकत नाहीं, तेव्हां तें पाणी मिळण्यास मोठे श्रम करावे लागतात. पाण्यावर अशा प्रकारें श्रम झाले, ह्मणजे त्याच्या अंगीं विशेष योग्यता उत्पन्न होते, व पाणी दिलें असतां त्याचे बदला कांहीं तरी दुसरा पदार्थ मिळतो. अर्थात् त्याला संपत्तीचें रूप प्राप्त होतें. शेतकीच्या कामीं अगर पिण्याकरितांही असलें पाणी फुकट मिळत नाहीं, तर त्याबद्दल कांहीं द्यावें लागतें, हें सर्वांस माहीत आहेच. याचप्रमाणें कोणतीही वस्तु प्रथम जरी फुकट मिळणारी असली (व त्यावेळीं तिला संपत्ति हें नांव देतां येणार नाहीं), तरी तिच्यावर थोडीबहुत मेहनत झाली कीं, लागलीच तिला संपत्तीचें स्वरूप प्राप्त होतें.

मेहनतीपासून वस्तु उत्पन्न होतात असें नाहीं; त्या जमिनींतूनच उत्पन्न होतात. कितीएक वस्तु जमिनींतून उत्पन्न करण्यास मेहनत करावी लागते, पण कितीएक पदार्थ जमिनींतून आयतेच तयार झालेले मिळतात; तरीपण ते आयते तयार झालेले पदार्थ लोकांच्या उपयोगास येतील असे करण्यास निदान थोडीबहुत तरी मेहनत करावी लागतेच. धान्य जमिनींतून उत्पन्न झालें खरें, पण तें पेरणें वगैरेस जशी मेहनतीची जरूर आहे, तसेंच तें दळणें, त्याची भाकर करणें, खाण्यास उपयोगी पडेल अशा स्थितींत तिला आणणें, यास मेहनत अवश्य पाहिजे. भाकरी तयार होण्यास अशा तऱ्हेची मेहनत लागल्यामुळें तिला कांहीं मूल्य येईल. हिरा खाणीमध्यें आयताच तयार झालेला असतो, तो होण्यास मेहनत करण्यांत आलेली नाहीं; परंतु

तो हिरा जोंपावेतों खाणींतच आहे तोंपावेतों त्याचे मोबदला कांहींएक मिळत नाहीं; म्हणजे तोंपर्यंत त्याला संपत्ति हें नांव प्राप्त होत नाहीं. तोच हिरा खाणींतून उकरून काढून मोठ्या शहरांत नेण्याची मेहनत त्यावर घडली, तर तो तेथें पुष्कळ किंमतीस जातो; ह्मणजे त्यास संपत्तीचें रूप प्राप्त होतें. हिमालय पर्वताच्या उत्तम उत्तम औषधि आहेत. त्या जमिनींतून आयत्या उत्पन्न झाल्या आहेत; परंतु त्या तेथें केवळ निरुपयोगी आहेत. त्या औषधींबद्दल कोणी छदामसुद्धां देत नाहीं, त्यावेळीं त्यांस संपत्ति हें नांव देतां येणार नाहीं. परंतु जर मुंबईसारख्या शहरांतील एकाद्या मोठ्या सावकारास भयंकर रोग होऊन तो दूर होण्याकरितां त्यास कोणी त्या औषधींपैकीं एकादी आणून देईल, तर तीस लागलीच पुष्कळ मोल येईल, व तिला संपत्तीचें रूप प्राप्त होईल. यावरून सहज लक्षांत येईल कीं, मेहनत नसली तरीही, वस्तु जमिनींतून आपोआप उत्पन्न होतात, हें जरी खरें आहे, तथापि त्या वस्तूस संपत्तीचें स्वरूप प्राप्त होण्यास कांहीं मेहनत त्यांवर घडावी लागते. ती घडल्याशिवाय त्या वस्तूंना संपत्तित्व प्राप्त होत नाहीं. जमीन नसेल तर नुसत्या मेहनतीनें वस्तु उत्पन्न होत नाहींत. मेहनतीचा उपयोग इतकाच आहे कीं, जमिनींत उत्पन्न झालेल्या वस्तु ज्या योग्य ठिकाणीं ज्या रूपानें असणें जरूर आहे, तेथें त्या रूपानें त्या नेल्या जातात: एवढेंच कार्य तें मेहनतीनें होऊं शकतें आणि योग्य ठिकाणीं वस्तु योग्य रूपानें हाजर करण्याची मेहनत त्याच्यावर घडली असतां त्यांच्या अंगीं कांहीं विशेष योग्यता उत्पन्न होऊन त्यांचे मोबदला

२-९१८-२०००

इतर पदार्थ येऊं लागतात, व तसें झालें असतां त्या वस्तूस संपत्तीचें रूप प्राप्त होतें. अथवा वस्तूस संपत्तीचें रूप प्राप्त होण्यास ह्मणजे संपत्ति उत्पन्न होण्यास मेहनत अवश्य आहे, हें लक्षांत येईल.

## भाग २

### उत्पादक श्रम आणि अनुत्पादक श्रम.

कितीएक वेळां जमिनींतून पदार्थ उत्पन्न होण्यास मेहनतीची जरूर लागते, व कितीएक वेळां मेहनतीवांचून आयते उत्पन्न झालेल्या पदार्थांस संपत्तित्व प्राप्त होण्यास त्यांच्यावर मेहनत घडावी लागते. यावरून संपत्तीची उत्पत्ति होण्यास जमीन जशी आवश्यक आहे, तशीच मेहनतही आवश्यक आहे, हें मागील प्रकरणांत सांगण्यांत आलेंच आहे. आतां या भागांत मेहनतीच्या कांहीं प्रकारांविषयीं विवेचन करूं.

संपत्ति उत्पन्न होण्यास मेहनत आवश्यक आहे, हें जरी खरें आहे, तथापि इतकें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, सर्व प्रकारच्या मेहनतीपासून संपत्ति उत्पन्न होतेच असें नाहीं. कांहीं मेहनत अशा प्रकारची असते कीं, तिजपासून संपत्ति मुळींच उत्पन्न होत नाहीं.

ज्या प्रकारच्या मेहनतीपासून संपत्ति उत्पन्न होते, तिला अर्थशास्त्रांत ‘ उत्पादक श्रम ’ असें ह्मणतात. आणि ज्या मेहनतीपासून मुळींच संपत्ति उत्पन्न होत नाहीं, तीस ‘ अनुत्पादक श्रम ’ असें ह्मणतात.

शेतकरी शेतांत श्रम करून धान्य उत्पन्न करितो. कोष्टी मेहनत करितो, त्यापासून धोतर तयार होतें. कुंभाराच्या श्रमापासून मडकें बनलें जातें. सुतार मेहनत करितो, त्यामुळें खुर्ची तयार होते. शेतकरी, कोष्टी, कुंभार, सुतार वगैरेंच्या श्रमांपासून धान्य, धोतर, मडकीं, खुर्च्या इ० संपत्ति उत्पन्न होते; यामुळें त्यांचे श्रम '**उत्पादक श्रम**' समजले जातात.

कांहीं श्रम केवळ **अनुत्पादक** असतात, ह्मणजे त्यापासून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणत्याच रीतीनें संपत्ति उत्पन्न होत नाहीं. जसें गाणार, वाजविणार, नाचणार, नाटकें व तमाशे करणार, इत्यादिकांचे श्रम '**अनुत्पादक श्रम**' होत. या लोकांच्या श्रमांपासून संपत्तीची उत्पत्ति बिलकूल होत नाहीं.

**उत्पादक** श्रमाचेही दोन प्रकार आहेत. कांहीं श्रम '**प्रत्यक्ष**' रीतीनें उत्पादक असतात, ह्मणजे श्रम घडले कीं, लागलीच प्रत्यक्ष त्यापासूनच संपत्तीची उत्पत्ति होते. जसें शेतकऱ्यानें शेतांत मेहनत केली कीं, त्या मेहनतीपासूनच प्रत्यक्ष रीतीनें धान्य उत्पन्न होतें. सुतारानें मेहनत केली कीं, लागलीच खुर्ची किंवा दुसरा एखादा पदार्थ बनतो. यासाठीं श्रम घडतांच प्रत्यक्ष त्याच श्रमापासून या वस्तु उत्पन्न झाल्या.

कांहीं श्रम '**अप्रत्यक्ष**' रीतीनें उत्पादक असतात, ह्मणजे त्या श्रमापासून प्रत्यक्ष कांहीं पदार्थ उत्पन्न न होतां, फक्त दुसऱ्या पदार्थांचे ठायीं संपत्ति उत्पन्न करण्याची योग्यता अथवा साधन मात्र ते उत्पन्न करितात. पंतोजी

मुलांस शिकवितो, कोणी ग्रंथकार ग्रंथ लिहितो, कोणी यंत्रशास्त्री नवीन शोध लावितो, पोलिसाकडून लोकांचें संरक्षण होतें, न्यायाधीश लोकांस न्याय देतो. आतां पंतोजी, ग्रंथकार, नवीन शोध काढणार, पोलीस व न्यायाधीश या लोकांच्या श्रमांपासून संपत्ति प्रत्यक्ष रीतीनें उत्पन्न होत नाहीं, हें खरें आहे; तथापि त्यांच्या श्रमांपासून संपत्ति उत्पन्न होण्यास साधन अथवा साह्य मिळतें, व त्या साधनापासून पुढें संपत्ति उत्पन्न होते; यामुळें असल्या प्रकारचे श्रम अप्रत्यक्ष रीतीनें उत्पादक आहेत असें ह्मटलें पाहिजे.

सुतार अगर कोष्टी यांच्या श्रमांपासून प्रत्यक्ष रीतीनें संपत्ति उत्पन्न होते, ह्मणून तसल्या श्रमास प्रत्यक्ष उत्पादक श्रम असें ह्मटलें. पंतोजी किंवा हत्यारें तयार करणार यांच्या श्रमांपासून प्रत्यक्ष कांहीं उत्पत्ति होत नाहीं; पण पंतोजी ज्या मुलांस विद्या शिकवितो, त्या मुलांच्या अंगीं तो असे गुण उत्पन्न करितो कीं, त्या गुणांपासून पुढें संपत्तीची उत्पत्ति होऊं लागते. तसेंच हत्यारें करणार जीं हत्यारें करितो त्या हत्यारांपासूनही पुढें पुष्कळ जिन्नस तयार होतात. ह्मणून पंतोजी, हत्यारें करणार, इत्यादिकांचे श्रम अप्रत्यक्ष उत्पादक आहेत, असें ह्मणावयाचें.

नाटककार, तमासगीर वगैरेंच्या श्रमांपासून प्रत्यक्ष उत्पत्ति होत नाहींच, पण अप्रत्यक्ष रीतीनेंही त्यांपासून कोणत्याच प्रकारची उत्पत्ति होत नाहीं. आपल्या श्रमापासून दुसऱ्याच्या अंगीं ते असा कोणताही गुण उत्पन्न करीत नाहींत कीं, जेणेकरून पुढें संपत्तीची उत्पत्ति होऊं लागेल; ह्मणून असल्या श्रमास अनुत्पादक श्रम ह्मटलें. आतां

हे श्रम प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें संपत्ति उत्पन्न करणारे नहींत, ह्मणून ते निरर्थक अथवा निरुपयोगी आहेत असें समजावयाचें नाहीं. असले श्रम कधीं कधीं फारच उपयोगी व आनंददायक असतात. जसें संपत्ति उत्पन्न करणें अत्यंत आवश्यक आहे, तसाच उत्पन्न झालेल्या संपत्तीचा उपभोगही झाला पाहिजे. संपत्तीच्या उपभोगांत अनेक प्रकारचे ऐषआराम, चैन, व मनास आणि शरीरास आनंद व सुख होण्याचे प्रकार, यांचा समावेश होतो. ह्मणून जोंपर्यंत सुखोपभोग, ऐषआराम इ. या जगांत आहेत, जोंपर्यंत 'संपत्ति उत्पन्न करणें इतकेंच कायतें जन्मास येऊन इतिकर्तव्य करावयाचें असें मानिलें जात नाहीं, तोंपर्यंत कितीएक प्रकारचे अनुत्पादक श्रम चालूच राहिले पाहिजेत. अनुत्पादक श्रम कितीएक वेळां फार उपयोगी असतात; ह्मणून ते करण्याकडे कितीएक लोक गुंतलेले आहेत, हें पाहून फारसें वाईट वाटण्याचें कारण नाहीं. मात्र अर्थशास्त्रदृष्ट्या पाहिलें असतां, या प्रकारचे श्रम अनुत्पादक सबब निरुपयोगी आहेत, असें ह्मणावें लागेल.

उत्पत्तीस श्रमाची आवश्यकता आहे. श्रम केल्यावांचून संपत्ति उत्पन्न होत नाहीं, हें स्पष्ट झालेंच आहे. पण थोड्या श्रमानें फार उत्पत्ति कशी करावी, काय काय युक्त्या केल्या असतां मेहनत थोडी पडून संपत्ति पुष्कळ उत्पन्न होईल, हें समजून घेणें असेल, तर पुढील गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे.

१ **श्रमविभाग.**—कोणतीही वस्तु उत्पन्न करीत असतां निरनिराळ्या प्रकारच्या क्रिया निरनिराळ्या मनुष्यांनीं केल्यापासून अतोनात फायदा होतो. आपल्या देशांत श्रमविभा-

गाची योग्यता लोकांस समजावी तशी अद्यापि समजलेली नाहीं. उत्तम नकशीचें काम करणारा सोनार आहे. तो आपण स्वतःच जर सगळीं कामें–ह्मणजे भाता फुंकणें, सोनें गाळणें, तें ठोकून त्यास वरचेवर ताव देऊन तें घडणें, त्याचा पत्रा करणें व नंतर त्यावर नकशीचें काम करणें, इत्यादि–करूं लागला, तर त्याचे हातून एक डागिना होण्यास कितीएक दिवस लागतील, व तितके दिवस लागूनही तो डागिना चांगला होणार नाहीं. त्याची फार किंमतीची मेहनत किरकोळ व क्षुल्लक कामांकडे व्यर्थ खर्चली जाऊन, मेहनतीच्या मानानें उत्पत्ति फारच कमी होईल. पण जर तो स्वतः फक्त नकशीचेंच काम करून बाकीचीं किरकोळ कामें दुसऱ्या मनुष्याकडून करवील, तर थोड्या वेळांत व थोड्या श्रमांत पुष्कळ व चांगलें काम होऊं लागेल. श्रमविभागापासून जे फायदे होतात त्याचें उत्कृष्ट वर्णन आडाम स्मिथ नांवाच्या ग्रंथकर्त्यानें आपल्या इंग्रजी ग्रंथांत केलें आहे. छापखान्याचें उदाहरण घेतलें असतां श्रमविभागाचा फायदा चांगला लक्षांत येईल. मजकूर लिहिणारा, ( एडिटर ) स्वतःच जर खिळे जुळणें, शाई फिरविणें, प्रफ–शीट तपासणें, कागद घालणें, प्रेस फिरविणें, बुकें बांधणें, तीं विकणें, वगैरे कामें करण्याचें पत्करील, तर काय व्यवस्था होईल, हें छापखान्याच्या कारखान्याची ज्यांस थोडीबहुत माहिती आहे, त्यांच्या सहज लक्षांत येईल. एकच मनुष्य हीं सर्व कामें करीत नाहीं, तर निरनिराळे लोक निरनिराळीं कामें करितात, यामुळें श्रमविभाग होऊन थोड्या मेहनतींत पुष्कळ व चांगलें काम होतें.

२ श्रमांचें एकीकरण.—श्रमविभागापासून जसे फायदे होतात, तसेच किंबहुना जास्तही फायदे श्रमाच्या एकीकरणापासून होतात. इमारतीचा मोठा दगड उचलून दुसऱ्या मजल्यावर ठेवण्यास एकटा मनुष्य कितीही खटपट करील, तरी ती सर्व व्यर्थ होईल. पुष्कळ मनुष्यें जर एकदम उचलतील, तर तो दगड सहज उचलला जाईल. धोतर तयार करण्यांत किती लोकांच्या श्रमांचें एकीकरण झालें आहे? जमीन नांगरणार, बीं पेरणार, कापूस काढणार, गठ्ठे बांधणार, वाहून नेणार, सूत कातणार, विणणार, इ० सर्व आपआपली मेहनत जेव्हां एका ठिकाणीं करितात, तेव्हां एक धोतर तयार होतें.

३ कामांत यंत्राचा उपयोग करणें.—यंत्रांचा उपयोग केल्यापासून काम किती जलद, चांगलें व पुष्कळ होतें, हें इतकें स्पष्ट आहे कीं त्याजबद्दल जास्त विवरण करण्याची गरज नाहीं. आगगाडीनें थोड्या वेळांत अल्प आयासानें लाखों खंडी माल एका ठिकाणाहून दुसरीकडे नेला जातो, हें सवास माहीत आहेच. साधारण शेतकीच्या कामासही कांहीं ओबडधोबड हत्यारें व यंत्रें लागतातच. हींच हत्यारें व यंत्रें चांगलीं केलीं, तर उत्पत्ति जास्त होईल. आपल्या देशांत कापड हातानें विणण्याचा प्रघात आहे. हातानें कापड विणतांनाही माग वगैरे कांहीं तरी हत्यारांची जरूर लागतेच. परंतु अलीकडे गिरण्या वगैरे स्थापन होऊन या कामीं यंत्रांचा उपयोग होऊं लागल्यापासून कापड तयार करण्याच्या कामीं केवढे मोठे फेरफार झाले आहेत, ते सर्वांस विदित आहेतच.

४ वरील कारणांखेरीज मजुरांचें कसब, त्यांचें ज्ञान, त्यांची नीति व त्यांचा इमानीपणा हीं जसजशीं वाढतील तसतशी उत्पत्ति जास्त होत जाईल. मजुरांचें अंगचें कसब वाढलें असतां, ते जास्त उत्पत्ति करूं शकतील हें उघडच आहे. त्यांचें ज्ञान वाढलें असतां नवीन नवीन युक्त्या काढणें, शोध करणें, वगैरे काम त्यांच्या हातून होऊं लागेल. त्यांची नीति सुधरली, ह्मणजे दारू पिणें व इतर अंमल करणें इत्यादि दुर्व्यसनांपासून ते मोकळे राहून काम पुष्कळ व लक्षपूर्वक करतील. ते इमानी असल्याकारणानें काम करीत असतां त्यांच्यावर देखरेख करणारा इसम निराळा ठेवण्याची जरूर राहणार नाहीं, व देखरेख करणाराचे श्रम व्यर्थ खर्च करण्याची गरज पडणार नाहीं. ह्मणून मजुरांस साधारण शिक्षण देण्याची आवश्यकता आहे; त्यांना धंदेशिक्षणही दिलें पाहिजे; आणि त्यांची नीति व इमानीपणा हीं वाढतील असे कायदे व इतर तजविजी केल्या पाहिजेत.

## भाग ३ रा

## उत्पादक व अनुत्पादक व्यय.

उत्पादक श्रम व अनुत्पादक श्रम ह्मणजे काय, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. उत्पादक श्रमाशीं उत्पादक व्यय व अनुत्पादक व्यय यांचा फार निकट संबंध आहे; यासाठीं 'उत्पादक व्यय' व 'अनुत्पादक व्यय' कशास ह्मणावें, हें समजण्याची फार आवश्यकता आहे. भांडवलाच्या सिद्धांताशीं या विषयाचा पुष्कळ संबंध आहे, ह्मणून त्या

प्रकरणांत याचा विचार करणें बरें झालें असतें; परंतु जरूरीपुरता या विषयाचा विचार येथेंच करणें प्रशस्त वाटतें.

साधारणपणें पाहतां उत्पादक श्रम करणाराच्या हातून होणारा व्यय ' उत्पादक ' व अनुत्पादक श्रम करणाराच्या हातून होणारा व्यय ' अनुत्पादक ' असें ह्मटलें तरी चालेल. परंतु हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, उत्पादक श्रम करणाराचा सगळा व्यय अथवा त्यास लागणारा सगळा खर्च ' उत्पादक व्यय ' नसतो. श्रम करणारास उत्पादन करतेवेळीं मात्र खाण्यापिण्यास लागणारे जे अवश्य पदार्थ, तेवढ्यांचाच ' उत्पादक व्ययांत ' समावेश केला जाईल. उत्पादक श्रम करणारानें उपजीविकेस अवश्य नसणारा व केवळ चैनीसाठीं केलेला खर्च ' उत्पादक व्यय ' होऊं शकणार नाहीं. चैनीचे जितके पदार्थ आहेत तितक्यांचा व्यय साधारणतः अनुत्पादक ह्मटला पाहिजे. कारण तसल्या पदार्थांच्या व्ययापासून संपत्तीची अधिक उत्पत्ति होण्यास कोणत्याच प्रकारचें साह्य होत नाहीं. चैनीच्या पदार्थांस केलेला खर्च जर अनुत्पादक व्यय होय, तर देशांत जसजशी चैन वाढेल तसतसा देशांत एकंदर होणारा ' अनुत्पादक व्यय ' जास्त झाला असें ह्मटलें पाहिजे. आणि ' अनुत्पादक व्यय ' जास्त झाल्यामुळें संपत्तीची उत्पत्ति कमी होऊं लागेल, व देश दिवसेंदिवस निकृष्टावस्थेस येऊन पोंहचेल.

कितीएक लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, चैनीचे पदार्थ आपण खरेदी केले असतां कांहीं नुकसान होत नाहीं. इतर जिनसांप्रमाणेंच चैनीचे जिन्नस विकत घेतले असतां ते

त्यांचा धंदा जारी राहील. विचार केला असतां हें ह्मणणें बरोबर नाहीं असें ध्यानांत येईल. उदाहरणार्थ, कल्पना करूं कीं, एका उत्पादक श्रम करणाऱ्या मनुष्या-जवळ एक रुपया आहे. त्या रुपयाची बाजरी विकत न घेतां त्यानें अत्तर घेतलें, तर त्याचा काय परिणाम होईल? बाजरी न घेतल्यामुळें जितक्या अंशानें बाजरीच्या धंद्यास कमीपणा आला, तितक्याच अंशानें अत्तरवाल्याचा धंदा वाढला, यांत एकंदर देशाचें काय नुकसान झालें? एकाचा धंदा कमी झाला तितका दुसऱ्याचा वाढला, यापेक्षां अधिक कांहीं नाहीं. इतर लोकांच्या संबंधानें हें ह्मणणें बराबर आहे; पण खुद्द श्रम करणाराची काय स्थिति होते? जवळ एक रुपया होता तो अत्तर घेण्यांत खर्च केला. परंतु संपत्ति उत्पन्न करण्याच्या कामीं अत्तराचा कांहीं उपयोग होत नाहीं. उत्पादन करीत असतां त्यापासून पोषण होऊं शकत नाहीं. ह्मणून रुपयाच्या ऐवजीं अत्तर आल्या दिवसापासून श्रम करणारास खावयास नसल्यामुळें उत्पत्तीचें काम बंद पडलें. अत्तर न घेतां बाजरी घेतली असती, तर श्रम करीत असतां उपजीविका होऊन जास्त उत्पत्ति होत गेली असती. मूळांत एकच रुपया असल्यामुळें अत्तर व बाजरी हीं दोन्ही मिळूं शकणार नाहींत; कांहीं तरी एक मिळेल. हा रुपया अत्तर घेण्यांत खर्चल्यामुळें संपत्तीची पुढें होणारी उत्पत्ति बंद पडली; यास्तव हा व्यय अनुत्पादक झाला. पण तोच रुपया बाजरी घेण्यांत खर्च केला असता, तर बाजरी खा-

ऊन पुढें उत्पत्तीचें काम जारी राहिलें असतें; ह्मणन त्याला **उत्पादक व्यय** हें नांव देतां आलें असतें.

वरील विवेचनावरून सहज ध्यानांत येईल कीं, चैनीनें हवा तसा पैसा उधळणें, ह्मणजे मजुरास कामधंदा देणें, व व्यापारास उत्तेजन देणें, असें होत नाहीं. चैनी व उधळे लोक, व्यापाऱ्यांचे, मजुराचे व देशाचे हितकर्ते आहेत, असें ह्मणणें बरोबर नाहीं; इतकेंच नाहीं, तर हे लोक देशाचे शत्रू आहेत, हें ह्मणणें भाग पडेल. कारण हे लोक हमेशा अनुत्पादक व्यय करीत असल्यामुळें त्यांच्या वर्तनापासून देशास कोणत्याही प्रकारचा फायदा न होतां, उलटें दुसऱ्यांनीं उत्पन्न केलेल्या संपत्तीचा ते उत्तरोत्तर नाश मात्र करितात. देशाचे खरे हितकर्ते ह्मटले ह्मणजे, काटकसरीनें नेहमीं **उत्पादक व्यय** करणारे जे लोक असतात, तेच होत.

या विषयाचा अधिक खुलासा होण्यास भांडवलाचा विचार करणें जरूर पडतें, ह्मणून जास्त विचार येथें न करितां भांडवलाविषयीं विचार करूं.

## प्रकरण ३ रें

### भाग १ ला

### भांडवलाविषयीं.

संपत्ति उत्पन्न होण्यास अवश्य जी तीन साधनें, त्यांपैकीं जमीन व श्रम या दोहोंचें विवेचन मागील प्रकरणांत करण्यांत आलें. या भागांत तिसरें साधन जें भांडवल त्याचा विचार करणें आहे.

अनेक वस्तु संपत्ति होऊं शकतात, असें मागें सांगण्यांत आलेंच आहे. पैसा ह्मणजेच कायती संपत्ति अशी जशी पुष्कळ लोकांची समजूत आहे, तशीच भांडवल ह्मणजे पैसाच, व पैशाखेरीज इतर वस्तु भांडवल नव्हत, असें कितीएक लोक समजतात; पण ही समज बरोबर नाहीं. जसें पैसा व संपत्ति हीं एक नाहींत, तसेंच पैसा ह्मणजेच कायतें भांडवल, हें ह्मणणेंही बरोबर नाहीं.

पैसा ह्मणजे वस्तूंची अदलाबदल सुलभ रीतीनें करण्याचें एक साधन आहे, असें मागें सांगितलेंच आहे. अदलाबदल करण्यापेक्षां उत्पादनाच्या कामीं पैशाचा कोणताही दुसरा उपयोग होत नाहीं. श्रम करीत असतां मजुरांचें पोषण होण्यास पैसा कांहीं उपयोगांत येत नाहीं. तो खातां येत नाहीं, पितां येत नाहीं. त्यापासून कोणत्याच प्रकारानें उपजीविका होऊं शकत नाहीं. जर उत्पत्तीच्या कामीं तो कांहीं उपयोगीं पडत नाहीं, तर तो भांडवल होऊं शकणार नाहीं; कारण भांडवल हें संपत्तीच्या उत्पत्तीच्या तीन साधनांपैकीं एक आहे. पैसा ह्मणजे जर भांडवल नव्हे, तर भांडवल ह्मणजे काय? कशास भांडवल ही संज्ञा द्यावी? असा प्रश्न सहज उत्पन्न होतो.

भांडवल ह्मणजे, पुढें संपत्ति उत्पन्न करितां यावी यासाठीं, पूर्वीं उत्पन्न झालेल्या संपत्तीचा वेगळा काढून ठेवलेला भाग होय. कोणी शेतकरी आपल्या शेतांत धान्य उत्पन्न करण्याची इच्छा करीत आहे, तर जें धान्य उत्पन्न करावयाचें तें संपत्ति होय. ही संपत्ति उत्पन्न होण्यास

अवश्य जीं तीन साधनें सांगितलीं, त्यांपैकीं जमीन व शेतकऱ्याची मेहनत हीं तर आहेतच; पण तेवढ्यानेंच धान्य उत्पन्न होऊं शकणार नाहीं. शेतांत धान्य पेरून तें उगवून, खाण्यास मिळेपर्यंत पुष्कळ काळ जातो. तितक्या काळांत श्रम करीत असतां, शेतकऱ्यास खावयास पाहिजे, तें त्यानें कोठून आणावें ? शेतांत उत्पन्न होणारें जें भावी धान्य त्यापासून हल्लीं त्याची उपजीविका होणार नाहीं. त्याला खाण्यासाठीं निराळाच धान्याचा संग्रह पाहिजे. तें सर्व नवीन धान्य उत्पन्न होण्यापूर्वी कोठून तरी आणिलें पाहिजे. तसें न होईल, तर शेतकऱ्याच्या हातून नवीन धान्याची उत्पत्ति होणार नाहीं. ह्मणून ती करण्यासाठीं श्रम करीत असतां, त्याच्या स्वतःच्या व त्याच्याबरोबर असणाऱ्या मजुरांच्या उपजीविकेस लागणारें धान्य अगोदर संग्रह करून ठेविलें पाहिजे. उत्पादनाच्या कामीं पडावा, एवढ्याकरितांच संग्रह करून ठेविलेला असा जो संपत्तीचा भाग, त्यास भांडवल ह्मणावें. उत्पादनाच्या कामीं श्रम करीत असतां मजुरांचें पोषण होण्याची जशी जरूर आहे, तशीच त्यांना पांघरण्यास वस्त्रें पाहिजेत, त्यांना कांहीं हत्यारें पाहिजेत, राहण्यास व काम करण्यास घरें पाहिजेत, गुरेंढोरें व इतर साधनेंहीं पाहिजेत. सबब यांचाही संग्रह पूर्वीच करून ठेविला पाहिजे. ज्या अर्थी अशा सांठवून ठेविलेल्या भागांत अन्न, वस्त्रें, पात्रें, हत्यारें, घरें, गुरेंढोरें वगैरेंचा सामावेश होतो, त्या अर्थी या सर्वांस भांडवल हें नांव दिलें पाहिजे. ह्मणून पैसा ह्मणजेच भांडवल नव्हे, हें स्पष्ट आहे. उत्पादन करीत असतां मजुरांस जी

१-६१८-२०००

मजुरी देण्यांत येते, तीहीं यापूर्वी करून ठेविलेल्या संग्रहां-तूनच द्यावी लागते. ही मजुरी कधीं कधीं धान्याच्या रूपानें देतात, व कधीं कधीं पैशानें देतात. मजुरी पैशाच्या रूपानें दिली, तथापि मजुरांचा निर्वाह पैशावर कोणत्याही प्रकारें होऊं शकत नाहीं. मजूर लोक त्या पैशाच्या, धान्य वगैरे उपजीविकेच्या वस्तु घेतात, व त्यांवर त्यांचा निर्वाह होऊन त्यांच्या हातून उत्पत्ति होते. ह्मणून पैशास भांडवल न ह्मणतां, धान्य इत्यादि वस्तु, ज्या उत्पत्ति होण्याच्या कामीं अवश्य जरूरीच्या आहेत, त्यांसच भांडवल ह्मटलें पाहिजे.

उत्पादन करितेवेळीं मजुरांच्या उपजीविकेस लागणाऱ्या पदार्थांखेरीज दुसरे कितीएक जिन्नस उत्पत्ति होण्यास अवश्य लागतात: हत्यारें, यंत्रें, कारखाने चालविण्यासाठीं बांधिलेलीं घरें, इत्यादि. या सर्वांस भांडवल ह्मणणें जरूर पडतें. सबब 'भांडवल' याची व्याख्या पुढें लिहिल्या-प्रमाणें केली असतां हरकत नाहीं. '**उत्पन्न होणाऱ्या संपत्तीस लागणारें संरक्षण, आश्रय, हत्यारें, यंत्रें व इतर पदार्थ, तसेंच श्रम करीत असतां मजुरांस देण्याची मजुरी: इतक्या सर्व कामांकरितां वेगळा काढून ठेविलेला जो संपत्तीचा भाग, तें भांडवल होय.**'

## भाग २ रा.

## भांडवलाच्या संबंधाचे कांहीं महत्वाचे सिद्धांत.

---***---

वरील विचारावरून लक्षांत आलेंच असेल कीं, जिन्नस

तयार होत असतां उपयोगांत येणारा जो संपत्तीचा भाग, त्यासच भांडवल ह्मटलें पाहिजे. जिन्नस तयार झाल्यानंतर तो विकत घेण्यासाठीं दिलेला पैसा अगर संपत्ति यांस भांडवल ह्मणतां येणार नाहीं. कितीएक लोकांचा असा समज आहे कीं, आयते तयार झालेले जिन्नस आपण विकत घेतले असतां, ते करण्याच्या कामीं आपण भांडवल घातलें, व त्या भांडवलामुळें आपण मजुरांचें पोषण केलें. हा समज अगदीं चुकीचा आहे. या चुकीच्या संबंधानेंच भांडवला-विषयीं अर्थशास्त्राचा एक अति महत्वाचा सिद्धांत आहे. त्याचें या ठिकाणीं स्पष्टीकरण करणें अगत्याचें आहे. तो सिद्धांत खालीं लिहिल्याप्रमाणें:—

## १ सिद्धांत.

'तयार झालेला आयता माल विकत घेतला असतां, तो उत्पन्न करण्यास आपण भांडवल खर्च केलें, व आपण मजुरांचें पोषण केलें, असें होत नाहीं.' मजुरांचें पोषण होणें तें भांडवलानें, ह्मणजे उत्पत्तीच्या कामीं खर्च पड-ण्यासाठीं पूर्वी उत्पन्न झालेल्या संपत्तीच्या वेगळ्या काढून ठेविलेल्या भागानें होतें. हें भांडवल, जिन्नस तयार होते-वेळीं पाहिजे. तो तयार होऊन विकला जाईपर्यंत मजुरांस उपाशीं बसतां येत नाहीं, ह्मणून जिन्नस तयार होत अस-तांना लागलेल्या मजुरांचें पोषण आपण दिलेल्या पैशानेंच झालें, असें ह्मणतां येणार नाहीं. व जर आपल्या पैशानें मजुरांचें पोषण झालेलें नाहीं, तर जिन्नस विकत घेऊन त्याच्या मोबदला आपण जो पैसा अगर दुसरा पदार्थ दिला, तो भांडवल होऊं शकणार नाहीं. भांडवलाची जरूर जिन्नस

तयार होतांना असते. तो तयार झाला कीं, भांडवल खर्च होऊन चुकलें; मग तो पदार्थ विकला जावो अगर न जावो. विकत घेणारा जे पैसे देतो, ते जिन्नस तयार झाल्यावर देतो. जिन्नस तयार होत असतां, त्याच्या पैशाचा कोणत्याही तऱ्हेचा उपयोग झालेला नाहीं. तो तयार झाला, तो दुसऱ्याच्याच पैशानें; विकत घेणाराच्या पैशानें नव्हे. माल भांडवलवाल्यानें आपल्या स्वतःच्या भांडवलानें उत्पन्न केला पाहिजे. तो विकला गेला असतां, इतकेंच होतें कीं, माल तयार करण्याच्या कामीं भांडवलाचा व्यय झाल्यामुळें त्याचें रूपांतर होऊन भांडवलपणा नाहींसा झाला असतो, तो पूर्वरूपास आणिल्यासारखा होतो.

वरील सिद्धांत उदाहरणानें स्पष्ट केला असतां चांगला लक्षांत येईल, ह्मणून एक उदाहरण घेऊं. एक सरकारी नोकर आहे, तो दरसाल २०० रुपयांचें कापड विकत घेत असतो. कापडास खप आहे असें पाहून, साळी वगैरे लोक तें आपल्या भांडवलानें तयार करून ठेवितात. नोकराचे २०० रुपये कापड तयार होईपर्यंत् पेटींत पडून राहिले असतात. कापड तयार होतेवेळीं मजुरांची मजुरी वगैरे जी द्यावी लागली, ती या दोनशें रुपयांपैकीं नाहीं, ह्मणून या दोनशें रुपयांस भांडवल मुळींच ह्मणतां येणार नाहीं. कापड तयार झाल्यानंतर तें विकलें गेल्यामुळें कापडवाल्याचें भांडवल जास्त झालें, असेंही होत नाहीं. कारण कापड तयार केल्यामुळें साळ्याजवळच्या भांडवलाचें रूपांतर झालें होतें. तें कापड विकत घेऊन नोकरानें परत केलें, इतकेंच मात्र झालें. समजा कीं, नोकराची

नोकरी निघाली, व त्यामुळें १०० रुपयांच्या कापडाचा खप कमी झाला. पण यामुळें कापडाच्या कारखान्यांत असलेलें भांडवल कमी झालें काय? मुळींच नाहीं. तें पूर्वींइतकेंच कायम राहिलें आहे. कदाचित् कापडाचा खप कमी होईल, तर कारखानदार पूर्वींइतकें कापड न करितां तितक्या अंशानें कमी तयार करील; व मोकळें झालेलें भांडवल दुसऱ्या ज्या जिनसांस खप आहे त्या उत्पन्न करण्याकडे लावील. एतावता पूर्वींइतक्या मजुरांचें पोषण होण्यास अडचण पडणार नाहीं. नोकरानें कापड घेण्याचें बंद केलें, ह्मणून मजुरांचें कांहीं नुकसान होणार नाहीं. कापडाचा कारखाना जितक्या अंशानें कमी होईल, तितक्या मानानें दुसरा एकादा कारखाना वाढून तिकडे मजुरी मिळूं लागेल. यावरून स्पष्ट आहे कीं, नोकर जेव्हां कापड विकत घेत होता, तेव्हां त्याच्या पैशानें कापडाच्या कारखान्यांतील भांडवल वाढलें नव्हतें; व त्याच्या पैशानें मजुरांचें पोषणही होत नव्हतें; तसेंच त्यानें कापड घेण्याचें बंद केल्यामुळें कापडाच्या कारखान्यांतील भांडवल त्यानें कमी केलें, असेंही नाहीं. कदाचित् थोडेंबहुत कमी झालेंच, तर दुसऱ्या एखाद्या कारखान्यांत तें वाढेल; ह्मणजे देशांतील एकंदर भांडवल जेवढ्याचें तेवढेंच राहिल्यामुळें, पूर्वीं जेवढ्या मजुरांचें पोषण होत होतें, तें बंद पडणार नाहीं. यावरून जिन्नस तयार झाल्यावर विकत घेतल्यानें देशांतील एकंदर भांडवल आपण वाढविलें, अगर घेतलेल्या जिनसांची उत्पत्ति आपण केली अथवा मजुरांचें पोषण केलें, असें मुळींच होत नाहीं. आपल्या विकत घेण्यानें फक्त कोणते प्रकारचा माल तयार

करावा, ही सूचना भांडवलवाल्यांस मिळून त्या धोरणानें ते आपल्या भांडवलानें माल तयार करितात; व तो आपण घेतला, ह्मणजे मालामध्यें रूपांतर होऊन गुंतून राहिलेलें त्यांचें भांडवल आपण मोकळें केलें, इतकेंच मात्र होतें. आपल्या पैशानें तो तयार झालेला नाहीं, व आपल्या पैशास भांडवल हें नांवही देतां येणार नाहीं.

वरील सिद्धांत अत्यंत महत्त्वाचा आहे, व प्रथमारंभीं तो फार चमत्कारिकसा भासतो. याकरितां आणखी एक उदाहरण घेऊन तो स्पष्ट करूं. एका साळ्याचा कापडाचा कारखाना आहे. त्यांत भांडवल १०० रुपये आहे. त्या साळ्याचा दरसाल ५० रुपयांचें अत्तर विकत घेण्याचा परिपाठ आहे. आतां कितीएक लोक असें ह्मणतील कीं, साळी जर अत्तर घेणार नाहीं, तर अत्तराच्या कारखान्यांत भांडवल कोठून येईल, व त्या कारखान्यांतील मजुरांचें पोषण कसें होईल? अम्मळ विचार केला असतां ध्यानांत येईल कीं, साळ्याचे ५० रुपये हे अत्तराच्या कारखान्यांतील भांडवल नव्हत, व त्या ५० रुपयांमधून अत्तराच्या कारखान्यांतील मजुरांचें पोषण होऊं शकत नाहीं. कारण अत्तर तयार होईपर्यंत साळ्याचे रुपये त्याच्याचजवळ निरुपयोगी पडून राहतात. अत्तर तयार करण्याच्या कामीं जें भांडवल गुंतलेलें आहे, तें साळ्याजवळ असलेले ५० रुपये नव्हत, तर अत्तार्‍यांचें स्वतःचेंच आहे. साळ्याचे ५० रुपये त्याच्याजवळ निरुपयोगी पडलेले आहेत, त्यांस भांडवल हें नांव देतां येत नाहीं. आतां उलटपक्षीं विचार करूं. साळ्यानें अत्तर घेण्याचें बंद केलें, तर काय होईल? अत्तराला खप नाहीं,

असें अत्तरवाल्यास समजतांच, तो आपलें भांडवल अत्तराच्या कारखान्यांतून काढून घेईल. पण तें तो व्यर्थ खर्चून टाकणार नाहीं. दुसऱ्या ज्या कोणत्या जिनसेचा खप असेल, ती तयार करण्याकडे हें आपलें भांडवल तो लावील; व अत्तर काढण्यांत जे मजूर लागले होते, ते, आतां दुसऱ्या कारखान्यांत जातील. कामांत फरक झाला; पण भांडवल कमी झालें, अगर कमी मजुरांचें पोषण होऊं लागलें, असें कांहींएक नाहीं. आयतें तयार झालेलें अत्तर घेण्याचा परिपाठ साळ्याचा होता, तेव्हां त्याच्या ५० रुपयांनीं अत्तरवाल्याचें भांडवल वाढलें नव्हतें. व तो परिपाठ त्यानें बंद केल्यामुळें पूर्वीं असलेलें एकंदर भांडवल कमीही झालें नाहीं. यावरून तयार झालेला माल विकत घेतला असतां, तो तयार करण्यास लागलेलें भांडवल आपण दिलें, व त्यांत गुंतलेल्या मजुरांचें पोषण आपण केलें, असें होत नाहीं; हें सिद्ध झालें.

वरील विचारावरून दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेंवण्यासारखी अशी दिसून येईल कीं, ऐषआरामाचे पदार्थ आपण विकत घेतले असतां व्यापारास उत्तेजन येतें, व मजुरांचें हित होतें. हें ह्मणणें केवळ निराधार आहे. असल्या प्रकारच्या व्ययापासून मजुरांचें केव्हांही हित होण्याचा संभव नाहीं. ऐषआरामाचे पदार्थ तयार करणाऱ्या मजुरांचें पोषण व्हावें, या हेतूनें तसले जिन्नस घेण्यांत खर्च करण्याचा आपण परिपाठ ठेविला, तर मजुरांचें हित न होतां उलट तोटाच होईल. चैनीचे पदार्थ घेणें हा अनुत्पादक व्यय होय. यापासून मजुरांचें नुकसान

आहे, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. ते पदार्थ जसजसे आपण खर्च करीत जाऊं, तसतशी देशांतील संपत्ति कमी कमी होत जाईल. आणि देशांतील संपत्ति कमी होत गेली, ह्मणजे भांडवल अर्थात् कमी झालें. आणि ज्याअर्थी मजुरांचें पोषण भांडवलामधूनच झालें पाहिजे, त्याअर्थी तें भांडवल कमी झालें कीं, मजुरांचें नुकसान झालें, हें सांगण्याची गरज नाहीं.

उदाहरणार्थ, कोणी शेतकरी आपल्या शेतांत मजुरी करण्याकरितां मजूर लावून दरसाल १०० रुपये खर्च करितो. शेतकऱ्यानें आपला विचार बदलून शेतकामांत मजूर न लावितां आपल्यास राहण्याकरितां एक उत्तम बंगला करून, त्यांत चित्रें काढण्याकडे वरील रक्कम खर्च केली, तर त्यात मजुरांचें काय नुकसान आहे, असें कोणी ह्मणतील. शेतकामांत जे मजूर गुंतले होते, ते हल्लीं चित्रें काढण्याकडे लागतील, यापेक्षां जास्त फरक नाहीं. प्रथम दर्शनीं हें ह्मणणें खरेंसें भासेल. परंतु विचार केला असतां, या दोन प्रकारांत फार मोठा फरक आहे, असें तेव्हांच दृष्टीस पडेल. पहिल्या प्रकारानें मजुरांकडून झालेला व्यय हा ' उत्पादक व्यय ' आहे. ह्मणजे शेतांत काम करीत असतां, त्यांनीं जो व्यय केला, त्यापासून अधिक संपत्तीची उत्पत्ति झाली, व त्यामुळें पुढें अधिक मजुरांचें पोषण होऊं लागलें. पण दुसऱ्या प्रकारानें म्हणजे चित्रें काढण्याचे श्रम ते करीत असतां, त्यांच्या हातून कांहीं एक नवीन संपत्तीची उत्पत्ति झाली नाहीं, त्यामुळें पुढें मजुरांचें पोषण होणें बंद पडलें.

## २ सिद्धांत.

वरील विचारावरून आणखी एक सिद्धांत निष्पन्न होतो. तो असा कीं, 'भांडवल हें संचयाचें फळ आहे.' संचय केला असतां भांडवल अधिक वाढतें, खर्च केला असतां वाढत नाहीं. जो उधळ्या माणूस चैनबाजी, नाच, तमाशे करून खर्च करितो, तो देशाचें भांडवल कमी करितो; व तो देशाचा हितचिंतक नसून शत्रु समजला पाहिजे. जे लोक आपल्या उधळेपणामुळें व्यापारी लोकांस व मजुरांस फायदा मिळतो असें ह्मणतात, व आपण पुष्कळ लोकांचे पोशिंदे आहोंत, असें मानितात, ते मोठी चूक करितात, हें सहज लक्षांत येईल.

## ३ सिद्धांत.

भांडवलाविषयीं तिसरा सिद्धांत असा आहे कीं, 'भांडवल' हें जरी संचयाचें फळ आहे, तरी केलेल्या संचयास भांडवल हें नांव प्राप्त होण्यास त्याचा व्ययच झाला पाहिजे. जमिनींत पुरून ठेविलेलें अगर कोठारांत अथवा जामदारखान्यांत भरून ठेविलेलें द्रव्य हें भांडवल नव्हे. भांडवल कशाला ह्मणावें, हें मागें सांगितलेंच आहे. पुढें उत्पादन करण्याच्या कामीं ज्याचा उपयोग केला गेला आहे, ज्यांतून मजुरांस पोटास मिळतें, कारखाने चालविण्याकरितां घरें, यंत्रें, हत्यारें, वगैरे सामुग्री ज्यांतून घेतली जाते, त्यासच भांडवल ह्मणतां येईल; व त्याचा व्यय होईल, तरच पुढें उत्पत्ति होईल. धान्य मजुरांनीं खाऊन टाकिलें पाहिजे, यंत्रें वगैरे झिजलीं पाहिजेत, हें उघड आहे. मजुरांस जें अन्न लागतें, यंत्रांस जे कोळसे वगैरे लागतात, त्यांचा व्यय तत्काळ होऊन

जातो. घरें, हत्यारें, यंत्रें, यांचा व्यय एकदम होत नाहीं. थोडथोडा व्यय होत असल्यामुळें, तीं पुष्कळ दिवस जरी टिकूं शकतात. सर्व भांडवलाचा व्यय झाला पाहिजे, असें जरी खरें आहे, तरी कांहीं भांडवलाचा व्यय तावडतोब होतो, व कांहीचा अवकाशानें होतो; ह्मणून भांडवलाचे दोन भेद केले जातात. एक 'अचळ' (गुंतून राहिलेलें) भांडवल, व दुसरें 'चळ' (फिरतें भांडवल).

## भाग ३

## भांडवल

### अचळ व चळ.

### (गुंतून राहिलेलें व फिरतें).

कांहीं भांडवलाचा उपयोग फक्त एक वेळच होऊं शकतो. उपयोग झाल्याबरोबर तें नाहींसें होतें; पुनः त्याचा उपयोग होत नाहीं. जसें अन्न, भट्टीस लागणारे कोळसे, लांकडें, वगैरे. हीं एकवार उपयोगांत आणिलीं कीं, त्याचा नाश होतो, व त्यांचा पुनः उपयोग होत नाहीं. अशा प्रकारच्या भांडवलास चळ किंवा फिरतें भांडवल असें ह्मणतात.

कांहीं भांवडल एकवार उपयोगांत आणिल्यानें सगळें नाश पावत नाहीं. त्याच भांडवलाचा पुनःपुनः अनेकवार उपयोग करावयास सांपडतो. जसें यंत्रें, नांगर, हत्यारें, घरें इत्यादि. हीं पुष्कळ दिवस टिकूं शकतात. एकाच नांगरानें

पुष्कळ शेतें नांगरलीं जातात; एका हत्यारानें पुष्कळ जिन्नस तयार होऊं शकतात; एकवार उपयोगांत आणिलें कीं, अन्नाप्रमाणें त्यांचा पूर्णपणें नाश होत नाहीं; अशा प्रकारच्या भांडवलास अचल किंवा गुंतून राहिलेलें भांडवल असें ह्मणतात.

चल भांडवल खर्च झालें कीं, त्याचा सगळा मोबदला एकदम मिळाला पाहिजे. अचल भांडवलाचा मोबदला एकदम मिळत नाहीं. पुष्कळ दिवसांनीं थोडथोडा मिळत जातो. शेतकऱ्यानें मजुरी व बीं यांसाठीं जो खर्च केला, तें चल भांडवल होय, व त्याबद्दल त्यास शेतांतून एकदम मोबदला मिळाला पाहिजे. पण जर तो शेतकरी जमीन नांगरण्यास नांगर करील, बैल घेईल, अथवा शेतांत विहीर करील, तर नांगराचा, बैलाचा व विहिरीचा सगळा खर्च एक सालच्या पिकावर निघणार नाहीं. नांगर, बैल, अथवा विहीर हें अचल भांडवल झालें, व हें भांडवल शेतांतून परत फिटण्यास कितीएक वर्षें लागतील.

मजुरांस मजुरी देण्याकरितां वेगळा काढिलेला जो भांडवलाचा भाग असतो, तें चल भांडवल होय. चल भांडवलांतूनच मजुरांची मजुरी मिळते. जसजसें चल भांडवल देशांत वाढत जाईल, तसतशी मजुरांस मजुरी अधिक मिळेल; व जसजसें चल भांडवल कमी होईल, तसतशी मजुरीही कमी मिळूं लागेल. तर मग देशांतील चल (फिरतें) भांडवल कांहीं कारणांनीं कमी झालें, तर मजुरांचें नुकसान होईल, हें सांगण्याची गरज नाहीं. चल भांडवलास अचल रूप दिलें, तर ह्याच परिणाम होईल. पहा कीं, एका

व्यापाऱ्यानें आपल्या भांडवलापैकीं १००० रुपये खर्चून एक यंत्र आणिलें, तर १००० रुपये चल भांडवलास त्यानें अचल भांडवलाचें रूप दिलें, असें झालें. याचा परिणाम असा होईल कीं, मजुरांस देण्याकरितां त्यानें जी रक्कम पूर्वी काढून ठेविली होती, ती हल्लीं हजार रुपयांनीं कमी झाली, व तेणेंकरून पूर्वीइतकी मजुरांस मजुरी मिळेनाशी होईल. ह्मणून देशांतील चल भांडवल कमी करून तें अचळ केलें, तर मजुरांचें नुकसान होतें, ही गोष्ट सिद्ध आहे. यंत्रें वगैरे देशांत आणूं लागलें कीं, पुष्कळ चल भांडवल अचल होऊन बसतें, व त्यापासून पुष्कळ मजूर रिकामे पडतात.

वर जी, चल भांडवल मोडून अचल केलें असतां मजुरांचा तोटा होतो ह्मणून, गोष्ट सांगितली, ती अगदीं खरी आहे. तथापि जो तोटा होतो, तो केवळ थोड्या वेळेपुरताच. चल भांडवलांतून यंत्रें आणिलीं असतां, कांहीं मजूर रिकामे पडतील खरे, परंतु यंत्रापासून उत्पत्ति फार झपाट्यानें व अगदींच थोड्या खर्चांत होऊं लागेल. थोड्या खर्चांत पुष्कळ उत्पत्ति झाल्यामुळें, लवकरच भांडवल वाढूं लागेल; व जसजसें भांडवल वाढेल, तसतसा मजुरांचा फायदाच होईल. आपल्या देशांत सुताचे, लोखंडाचे, कागदाचे, वगैरे कारखाने यंत्रानें चालूं लागले; आगगाड्या सुरू झाल्या; यामुळें देशांतील फारच मोठा चल भांडवलाचा भाग अचल होऊन बसला; व त्यामुळें शेंकडों साळी, लोहार, कागदकुटे, भाडेकरी व इतर मजूर यांचा धंदा बंद पडला, ही गोष्ट खरी आहे. ज्या ज्या ठिकाणीं यंत्राचा

प्रवेश होतो, तेथें तेथें पुष्कळ चल भांडवल नाहींसें होऊन अचल होतें; व त्यामुळें प्रथम मजुरांचा फार तोटा होतो. पण थोडयाच दिवसांत हें सर्व नुकसान भरून येतें; इतकेंच नाहीं, तर उत्पत्ति फार होऊन प्रमाणानें खर्च फारच थोडा लागू लागल्यानें अखेरीस सर्व देशाचा फार फायदा होतो.

## भाग ४

## किरकोळ.

### ( उत्पत्ति लहान पायावर करावी किंवा मोठे पायावर ).

भांडवलाच्या संबंधानेंच आणखी एका गोष्टीचा विचार करून हें प्रकरण संपवूं. उत्पत्ति मोठ्या प्रमाणावर करावी, किंवा लहान पायावर करावी, कोणत्या रीतीनें उत्पत्ति केली असतां फायदेशीर होईल, हें ठरविण्यास सर्वत्र लागू पडेल, असा एक नियम सांगता येणार नाहीं. निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या धंद्यांमध्यें विशेष स्थितीस अनुसरून तें ठरविलें पाहिजे. श्रमविभागापासून फार मोठे फायदे होतात, असें मागें सांगण्यांत आलेंच आहे. यंत्रापासून उत्पत्ति करूं लागलें असतां, श्रमविभागाचे फायदे पूर्णपणें मिळूं लागतात; आणि कारखान्यांत जसजसा यंत्रांचा प्रवेश होईल, तसतशी उत्पत्ति मोठ्या पायावर करणें, अधिक फायदेशीर होईल. कांहीं दिवसांपूर्वी यंत्रानें कापड निघत नसे; प्रत्येक साळी आपला माग आपल्या घरांत वेगळा लावी. त्यावेळीं

धंद्यांत यंत्रांचा प्रवेश होतांच, हजारों माग एकत्र चालू ठेवण्यांत फायदा होऊं लागला. जागा, देखरेखीचा खर्च, हिशेब वगैरे ठेवण्याचा खर्च, हे फार थोडे लागू लागतात. व जेवढा कारखाना वाढवावा तितक्या मानानें कमी होऊं लागतात. मोठ्या पायावर कारखाने न काढिले, तर यंत्रांचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं; आणि जर यंत्रांपासून घेऊं शकवेल तितकें काम न घेतां, तीं रिकामीं पडूं दिलीं, तर तितकें भांडवल व्यर्थ गेलें असें ह्मटलें पाहिजे. यावरून साधारणपणें असें ह्मणण्यास हरकत नाहीं कीं, यंत्रानें चालणारे सर्व कारखाने मोठ्या पायावरच असावे. असले मोठे कारखाने काढण्यास भांडवल पुष्कळ लागतें, तें एका मनुष्याच्यानें पुरें करवणार नाहीं. पुष्कळ लोकांनीं आपआपलें भांडवल एकत्र केलें पाहिजे, तरच मोठें भांडवल जमून आगगाड्यासारखे कारखाने सुरू होण्याचा संभव आहे. ज्यास इंग्रजींत 'जॉइंट स्टॉक कंपनी' असें ह्मणतात, तसल्या प्रकारच्या मंडळ्या काढून मोठें भांडवल जमवून मोठ्या पायावर कारखाने काढिले, तर फार फायदे होतात. ते येथें दाखविण्यास स्थलसंकोचामुळें सवड नाहीं. तो विषय इकडील लोकांस हळू हळू समजूं लागला आहे, व निरनिराळे पुष्कळ कारखाने, गिरण्या, वगैरे या पद्धतीनें, कंपन्या करून लोक चालवूं लागले आहेत. तथापि हा विषय लोकांस जास्त समजण्याची जरूर आहे.

शेतकी मोठ्या पायावर चालवावी किंवा लहान पायावर चालवावी, हेंही ठरविणें कठीण आहे. निरनिराळ्या देशांत

पडतात. ज्या देशांत शेतकीच्याकामीं यंत्रांचा उपयोग होऊं लागला आहे, तेथें ती मोठ्या पायावर होण्याचा प्रघात सुरू झाला आहे; तो फायदेशीरही होतो. हिंदुस्थान देशांत मजुरी फार स्वस्त आहे. बहुतेक ठिकाणीं जमिनीवरील मालकी सरकारानें आपल्याकडे घेतली आहे. शेतकरी लोक सारा देऊन ती वहीत करितात. दरएक शेतकरी स्वतः मंजुरी करितो. लोक फार गरीब असल्यामुळें यंत्रें वगैरे घेण्याचें त्यांस सामर्थ्य येईपर्यंत, अथवा ज्यांच्या अंगीं तसें सामर्थ्य आहे, तशा लोकांच्या हातीं जमीन जाईपर्यंत, शेतकी लहान पायावरच चालविली असतां फायदेशीर होईल. लहान शेतें असल्यामुळें मालक स्वतः मजुरी करूं शकतो; व स्वतःच्या मेहनतीनें व देखरेखीनें शेतकीकेली असतां जेवढा फायदा होतो, तेवढा मजुरांकडून ती करविली असतां होत नाहीं, हें प्रसिद्धच आहे.

भांडवलाविषयींचे नियम फार महत्वाचे आहेत, व पुढील प्रकरणें समजण्यास त्यांचा फार उपयोग होतो. याकरितां ते विशेष लक्ष देऊन पाहिले पाहिजेत.

---

## खंड ३ तिसरें.

अर्थशास्त्राचीं मुख्य तीन खंडें, त्यांपैकीं ' स्वरूप " व ' तिची उत्पत्ति ' या दोहोंचा विचार मागील खंडांत करण्यांत आला. आतां तिसरें खंड जें ' संपत्तीची वांटणी आणि अदलाबदल ' त्याचा विचार करणें आहे. हें खंड फार

महत्वाचें आहे, व यांत अनेक गोष्टींचा समावेश असल्यामुळें हें एवढें मोठें आहे कीं, एका प्रकरणांत याचें निरूपण करितां येणार नाहीं. सबब या खंडाचीं तीन प्रकरणें केलीं आहेत. ( १ ) संपत्तीची अदलाबदल, ( २ ) तिची वांटणी, ( ३ ) परदेशाशीं व्यापार, कर, इत्यादि. वस्तुतः पाहतां दुसरें प्रकरण ह्मणजे ' संपत्तीची वांटणी, ' याचा विचार प्रथम करणें योग्य होते. परंतु तो विषय चांगला समजण्यास मौल्य, किंमत व दुसरे कांहीं विषय, जे ' संपत्तीची अदलाबदल ' या प्रकरणांत येतात, ते प्रथम समजण्याची आवश्यकता आहे. ह्मणून प्रथम ' संपत्तीची अदलाबदल ' हेंच प्रकरण घेऊन, नंतर ' तिची वांटणी ' हें प्रकरण घातलें आहे. तसेंच ' अदलाबदलीच्या ' प्रकरणापैकीं फार महत्वाचा विषय जो ' परदेशाशीं व्यापार ' तो व कर, इत्यादि विषयांचा पृथक् विचार करणें बरें वाटल्या वरून, त्यांचें एक स्वतंत्र प्रकरणच केलें आहे. लहानशा पुस्तकांत मोठाले आति महत्वाचे पुष्कळ विषय सुलभ रीतीनें घालावयाचे, त्याकरितां ही फोडाफोड करणें बरें दिसल्यावरून केली आहे.

## प्रकरण १ लें.

### ( संपत्तीची अदलाबदल. )

### भाग १

### मौल्य आणि किंमत.

—*०*—

मौल्य आणि किंमत यांचा पुढील प्रकरणांत येणारे विष-

8577

प्रथम न समजेल, तर तें समजण्यास फार हरकत होईल. ह्मणून या शब्दांचा अर्थ काय, हें अगोदर पाहिलें पाहिजे.

कोणत्याही जिनसेचें मौल्य ठरविणें, तें त्या जिनसेशी दुसऱ्या एकाद्या जिनसेचीं तुळना करून, अथवा त्या जिनसेचे मोबदला दुसरी जिन्नस किती मिळेल हें पाहून ठरविलें जातें. जसें, एक शेर साखरेबद्दल एक शेर बाजरी येईल, तर एक शेर साखरेचें मौल्य एक शेर बाजरी झालें. यावरून मौल्य या शब्दांत तुळनेचा अर्थ ध्वनित होतो. तुळना केल्याखेरीज मौल्य ह्मणजे काय, हें सांगतां येणार नाहीं. असें जर आहे, तर पदार्थांचें मौल्य कमजास्त होणें तें दोन रीतींनीं होईल. एक, ज्या पदार्थांचें मौल्य ठरविणें त्या पदार्थांत स्वत: कांहीं कमजास्त झाल्यामुळें; आणि दुसरें, मोबदला येणारे पदार्थांत कांहीं कमजास्त झाल्यानें. पहिलें अंतः-कारण, व दुसरें बाह्यकारण होय. एक शेर साखरेस बाजरी मिळत होती, ती दोन शेर मिळूं लागल्यास, साखरेचें मौल्य वाढलें असें ह्मटलें पाहिजे; व हें दोन कारणांनीं होण्याचा संभव आहे. एक, साखर पूर्वी विकत असे त्याच्या अर्धी विकली पाहिजे, अथवा बाजरी पूर्वीच्या दुप्पट झाली पाहिजे. दोहोंपैकीं कोणतेंही झालें असतां, परिणाम सारखाच होईल. साखर पिकल्यानें जें तिचें मौल्य वाढेल, तें अंतः-कारणानें, ह्मणजे साखर स्वतःच कमी झाल्यामुळें वाढलें. साखर पूर्वीइतकीच राहून बाजरी दुप्पट पिकल्यानें जें साखरेचें मौल्य वाढेल, तें बाह्यकारणानें; ह्मणजे साखरेंत कांहीं कमजास्त न होतां मोबदला येणारी बाजरी जास्त

झाल्यानें. एक शेर साखरेस एक शेर बाजरी बरस होत होती तो, साखर अर्धी पिकली ह्मणजे, दोन शेर द्यावी लागेल; तसेंच बाजरी दुप्पट पिकल्यानेंही होईल. या दोहों प्रकारांनीं साखरेचें मौल्य वाढलें हें आपल्यास समजेल; पण साखरेचें मौल्य वाढलें, तर बाजरीचें कमी झालें ह्मटलें पाहिजे. कारण पूर्वी एक शेर साखरेस जेवढी बाजरी येत होती, त्याच्या दुप्पट हल्लीं येते. ह्मणजे पूर्वीपेक्षां बाजरी हल्लीं स्वस्त झाली; अर्थात् तिचें मौल्य कमी झालें.

ज्याअर्थी मौल्य ह्मणजे दोन वस्तूंमधील परस्पर संबंध होय, त्याअर्थी तुलना केलेल्या दोन वस्तूंपैकीं एकीचें मौल्य वाढलें असें ह्मटलें कीं, लागलीच दुसरीचें कमी झालें, हा अर्थ गर्भित निघतोच. दोन्ही वस्तूंचें मौल्य एकदम वाढलें अगर कमी झालें असें ह्मणणें चुकीचें होईल. कारण दोन भावापैकीं एक मोठा आहे असें ह्मटलें कीं, दुसरा अर्थात् धाकटा आहे असें झालेंच. दोघेही मोठे आहेत, अथवा दोघेही लहान आहेत, असें ह्मणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. तसेंच सर्व वस्तूंचें मौल्य वाढलें अथवा कमी झालें, या ह्मणण्याचा कांहीं अर्थ होणार नाहीं. एका वस्तूचें मौल्य वाढलें कीं, इतर सर्व वस्तूंचें कमी झालें असें अर्थात् होतें.

पुष्कळ ठिकाणीं व विशेषेंकरून खेड्यापाड्यांत देवघेव पैशाच्या द्वारें न होतां, एका जिनसेबद्दल दुसरी जिन्नस देऊनच होते. हा देवघेवीचा प्रकार फार अडचणीचा आहे, व यापासून व्यापारास फार हरकत होते. ज्या ठिकाणीं दररोज लाखों रुपयांची घडामोड होते, तेथें जिनसेचे बदला जिन्नस देण्याघेण्याचा रिवाज असेल, तर

व्यापार सुरळीत चालणार नाहीं. ही अडचण दूर करण्या-साठीं सर्व वस्तूंचें मौल्य ज्यानें मापितां येईल, असा एक पदार्थ सर्वानुमतें निवडून काढणें भाग पडलें. या पदा-र्थाच्या साधनानें देवघेव सुलभ रीतीनें होऊं लागली. हा पदार्थ ‘ नाणें ’ होय. एक शेर साखरेचें मौल्य बाजरी, अथवा एक पागोटें, अथवा एक धोतर, किंवा दुसरी कांहीं जिन्नस, असें न ह्मणतां, तिचें मौल्य एक रुपया आहे, असें ह्मणण्याचें सर्वानुमतें ठरल्यानें लोकांस फार सवड झाली. पूर्वीं साखरवाल्यास अंगरखा पाहिजे असेल, तेव्हां त्यानें, व्यापाऱ्याशीं तो असेल. त्याला आपली साखर देऊन तो घेतला पाहिजे. त्यालाही साखरेची गरज नसून दुसऱ्या एकाद्या जिनसेची गरज असेल, तर ती ज्यापाशीं असेल त्याला शोधून काढून त्यापासून ती घेऊन, बाजरीवाल्यास द्यावी, व त्यापासून बाजरी घेऊन, ती अंगरखेवाल्यास द्यावी, तेव्हां साखरवाल्यास अंगरखा मिळणार. नाण्यानें देवघेव होऊं लागल्यानें इतकी खटपट करण्याची गरज राहिली नाहीं. साखर देऊन पैसा घ्यावा, व त्या पैशाचा अंगरखा अथवा दुसरा पाहिजे तो पदार्थ विकत घेतला असतां सहज मिळतो.

कोणत्याही पदार्थाचें ‘ नाण्यानें ’ अथवा ‘ पैशानें ’ केलेलें जें मौल्य त्यास ‘ किंमत ’ असें ह्मणतात. साखरेचे मोबदला बाजरी घेतली, तर बाजरी हें साखरेचें ‘ मौल्य ’ होईल. पण जर साखर देऊन पैसा घेतला, तर पैसा हा साखरेची ‘ किंमत ’ आहे, असें ह्मणण्याचा प्रघात आहे. पदार्थांच्या रूपानें आलेला जो मोबदला त्यास ‘मौल्य’ ह्मणावें.

परंतु नाण्याच्या रूपानें आलेला जो मोबदला येईल
' किंमत ' हें नांव देतात. दोन ' जिनसांची ' (
तुलना असेल, तेव्हां ' मौल्य ' शब्दाची योजना
अमुक पदार्थाची ' किंमत ' काय आहे, असा प्रश्न
कीं, ' एक पदार्थ ' व ' पैसा ' या दोहोंत तुलना
आहे, असें समजलें पाहिजे.

सर्व वस्तूंचें ' मौल्य ' एकदम वाढलें असें ह
येणार नाहीं, असें नुकतेंच सांगण्यांत आलें आहे. र
सर्व वस्तूंची ' किंमत ' एकदम वाढली, असें ।
गैरवाजवी होणार नाहीं. उदाहरणार्थ, असें मान
एका धोतरजोड्याचें मौल्य दोन पागोटीं आहेत.
धोतरजोडे व पागोटीं या दोहोंचेंही मौल्य वाढलें
ह्मणण्याचा कांहींच अर्थ होणार नाहीं. कारण जर
राचें मौल्य वाढेल, तर पागोट्याचें कमी झालें प
व पागोट्याचें मौल्य वाढलें, तर धोतरजोड्याचें
झालें पाहिजे. हें जरी खरें आहे, तथापि दोहोंचीही 'कि
एकदम वाढली, असें ह्मटलें असतां कांहीं बाध
नाहीं. कारण वस्तूंचें मौल्य आहे तेवढेंच राहून
' किंमत ' कमीजास्त होऊं शकेल. एका धोतरजोड
किंमत पांच रुपये आहे; व दोन पागोट्याची मिळून
रुपये; ह्मणजे एक एक पागोट्याची किंमत अडीच
आहे अशी कल्पना केली. आतां कांहीं कारणांनीं
होऊं शकेल कीं, एका धोतरजोड्यास पांचाच्या ठि
दहा रुपये किंमत पडूं लागेल, व एका पागोट्यास अ
रुपायांच्या ठिकाणीं पांच रुपये पडतील. अशीं

जिनसाची ' किंमत ' जरी दुप्पट वाढली, तरी त्या जिनसांचें ' मौल्य ' पूर्वीइतकेंच राहिलें आहे. ह्मणजे एका धोतरजोड्यास दोन पागोटीं पूर्वीप्रमाणें हल्लींही मिळतील. यावरून सर्व वस्तूंचें मौल्य जरी एकदम वाढेल अगर कमी होईल, असें ह्मणतां येणार नाहीं, तरी सर्व वस्तूंची किंमत एकदम उतरली अगर चढली, हें ह्मणणें अगदीं बरोबर होईल.

## भाग २ रा
## नाणें.

व्यवहारांतील दररोजची देवघेव सुलभ रीतीनें करितां यावी, व व्यापार बिनहरकत झपाट्यानें करितां यावा, यासाठीं एक पदार्थ देऊन त्याचे बदला दुसरा घ्यावा, अशा तऱ्हेची जी अडचणीची रीत होती ती बंद होऊन, सगळे देवघेवीचे व्यापार पैशाच्या द्वारें होऊं लागले. हें फारच सोईचें झालें आहे, हें सांगण्याची जरूर नाहीं. पदार्थांचें मौल्य ठरविण्यास व देवघेव सुलभ रीतीनें चालण्यास सर्वानुमतें जो पदार्थ शोधून काढिलेला आहे, त्यास पैसा, अथवा ' नाणें ' असें ह्मणतात. हें नाणें सोन्याचेंच असलें पाहिजे असें नाहीं. कोठें तांबें, कोठें लोखंड, कोठें कवड्या, कोठें शिंपा व बदाम, इत्यादि पदार्थ अद्यापि नाण्याप्रमाणें वापरले जातात. जरी ह्या त्या पदार्थांचें नाणें करितां येईल, तथापि नाणें होण्याची योग्यता येण्यास पदार्थाच्या अंगीं मुख्य तीन गुण असले पाहिजेत.

१. ज्या पदार्थांचें नाणें करावयाचें आहे, त्याचें मौल्य हमेशा एकसारखें राहिलें पाहिजे. ह्मणजे त्याच्या मौल्यांत फार मोठा चढउतार नेहमीं होतां कामा नये.

२. तो पदार्थ असल्यास हवा अशी सर्वांस इच्छा पाहिजे; व त्याला स्वतः अंगची कांहीं किंमत पाहिजे.

३. तो पदार्थ आकारानें लहान असून प्रमाणानें त्याचें मौल्य फार असावें ह्मणजे तो सांठवून ठेवण्यास जागा थोडी लागावी, व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं तो सहज नेतां यावा.

या तीन गुणांपैकीं पहिला गुण, ह्मणजे नाणें करण्यास 'पसंत केलेल्या पदार्थांचें मौल्य नेहमीं सारखें राहिलें पाहिजे' हा जर नाण्यांत नसेल, तर सर्व जिनसांच्या किंमती दररोज कमी जास्ती होऊन देवघेवींत व व्यापारांत पराकाष्ठेचा घोटाळा होऊन जाईल. हल्लीं नाणें रुप्याचें केलेलें आहे. रुप्याची किंमत वरचेवर फारशी चढत उतरत नाहीं. अशा वेळीं एका पागोट्याची किंमत दहा रुपये, एका धोतराची पांच रुपये, व एका घोड्याची शंभर रुपये, अशा किंमती आहेत. अशी कल्पना करूं कीं, एका मनुष्यास दुसऱ्याचें शंभर रुपये कर्ज देणें असेल, तर त्या रुपयांऐवजीं त्यानें सावकारास दहा पागोटीं, अगर वीस धोतरजोडे, अथवा एक घोडा दिला असतां चालेल. पण समजा कीं, देशांत एक रुप्याची खाण सांपडून हवें तितकें रुपें निघूं लागलें. असें झाल्यानें रुपें स्वस्त होईल, ह्मणजे त्याच्या बदला पूर्वीं जेवढे जिन्नस येत होते, त्यापेक्षां हल्लीं कमी येऊं लागतील. जर देशांतलें रुपें एक-

दस दुप्पट झालें, तर ज्या पागोट्यास पूर्वी दहा रुपये येत होते, त्याला हल्लीं वीस येऊं लागतील; व एका घोड्यास दोनशें रुपये किंमत पडेल. ज्या मनुष्यास शंभर रुपये कर्ज होतें, त्याला पूर्वी कर्जाच्या मोबदल्यांत जितके जिन्नस द्यावे लागले असते, त्याच्या अर्धे हल्लीं दिले ह्मणजे बस होईल; परंतु त्यामुळें सावकाराचा फार तोटा होईल. मोठमोठे व्यापार बहुधा रोकड पैशानें न करितां जिनसांनींच होतात. या जिनसांची एकंदर किंमत रुपयांनीं होऊन देणेंघेणें काढिलें जातें. तेव्हां पैशाची किंमत दररोज कमजास्त झाल्यानें हजारों व्यापाऱ्यांच्या दररोजच्या व्यवहारांत फार मोठी गडबड होऊन कितीएक दिवाळीं रोज निघूं लागतील.

वरील विवेचन समजण्यास एक सोपें उदाहरण घेऊं. कोणी सरकारी नोकर आहे. त्यास दरमहा शंभर रुपये पगार मिळतो. त्या शंभर रुपयांपैकीं पन्नास रुपये तो धान्य वगैरे खाण्याच्या पदार्थांकडे खर्च करितो, पंचवीस रुपये कपडे खरेदी करण्याकडे व बाकीचे किरकोळ खर्चांत खर्च करितो. कांहीं कारणानें रुपें एकदम स्वस्थ झालें, तर त्याची किंमत फार कमी होईल. त्याचे मोबदला पूर्वी जितके जिन्नस येत होते, तितके आतां येणार नाहींत. शंभर रुपयेवाले नोकरास पाहिज्याइतकें धान्य, अगर इतर जिन्नस आतां मिळणार नाहींत. ह्मणजे त्याचा पगार कमी झाला नसतांही तो पूर्वीपेक्षां भिकारी झाला, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. सरकारास दरसाल कोट्यावधि रुपये खर्चावे लागतात, व जिकडे जिकडे हे रुपये

खाल्यांत हाकाहाक होईल. तसेंच रोकड वेतन पावणारे सरकारी अगर घरगुती नोकर, पेनशनदार, मजूर, वगैरे सर्व लोकांची एकदम ओरड सुरू होईल. आतां उलट कल्पना करूं कीं, देशांत रुपें कमी झाल्यानें त्याची किंमत फार वाढली ह्मणजे तें महाग झालें. रामाला आपल्या जमिनीबद्दल शंभर रुपये सारा सरकारांत भरावयाचा आहे. बाजरीचे दरमणास दोन रुपये येत होते, तेव्हां त्याला सारा भरण्यासाठीं ५० मण बाजरी विकावी लागे. नाणें महाग झाल्यानें आतां एक मण बाजरीस दोन रुपये येत नाहींत, पुष्कळ कमी येतात. असें झाल्यानें सारा पुरा करण्यास शेतांतील मालापैकीं पुष्कळ अधिक माल विकावा लागतो. अनुभवावरून सर्वांस माहीत असेल कीं, सरकारचा सारा देण्याची तारीख जवळ आली कीं, देशांतले हजारों रुपये एकदम तिजोरींत जाऊन पडतात, ह्मणजे थोडा वेळ ते रुपये नाहींसे होतात, असें ह्मटल्यास हरकत नाहीं. रुपये कमी झाले, ह्मणजे ते फार महाग होतात, व त्याच्या ऐवजीं शेतकरी लोकांस नेहमींपेक्षां पुष्कळ अधिक धान्य द्यावें लागतें. त्या वेळीं ह्मणजे हप्ता भरण्याच्या वेळीं धान्य फार स्वस्त होतें, हें सर्वांस माहीत आहेच. धान्य स्वस्त दरानें विकावें लागल्यामुळें शेतकरी लोकांचें नुकसान होतें, हें उघड आहे.

इंग्लंड देशाला सरासरी १७–१८ कोट रुपये भरावे लागतात. इंग्लंडांत सोन्याचें नाणें आहे; व हिंदुस्थानांत रुप्याचें नाणें आहे. हे रुपये इंग्लंडांत पौंड नांवाच्या सोन्याच्या नाण्यानें भरावे लागतात. अलीकडे कितीएक दिवस रुप्याचें मौल्य पाउंडाच्या मानानें फार कमी झालें आहे. याचीं कारणें पुष्कळ आहेत, त्यांचा येथें विचार करण्याची जरूर नाहीं. परंतु रुप्याचें मौल्य उतरल्यामुळें दरसालची पौंडाच्या रूपानें मुकरर रक्कम भरण्यास इकडून नेहमींपेक्षां तीन चार कोट रुपये इंग्लंडांत जास्त पाठवावे लागतात !! हिंदुस्तानचें दरसाल इतकें नुकसान विनाकारण होत आहे. हें नुकसान फक्त ज्या पदार्थाचें नाणें केलें आहे ( रुपें ), त्याच्या मौल्यांत कमजास्तपणा झाल्यानें होतें. याकरितां नाणें होण्याची योग्यता पदार्थांत येण्यासाठीं त्याचें मौल्य नेहमीं बदलतां कामा नये. बाजरीसारख्या पदार्थाचा उपयोग जर नाण्याच्या जागीं केला, तर तिचें मौल्य दररोज बदलणारें असल्यामुळें, दररोज सर्व जिनसांची किंमत कमी जास्त होऊन, चोंहोंकडे फार घोंटाळा होऊन जाईल.

१ इंग्लंडांतील हिंदुस्थानचे सेक्रेटरी व त्यांच्या खात्याचा खर्च, आरमारचा खर्च, लष्कराचा खर्च, सर्व प्रकारच्या पेन्शनदार लोकांचा खर्च, इ० खर्च मिळून वरील मोठी रक्कम दरसाल हिंदुस्थानास भरावी लागते; व ती रोकड भरली न जातां व्यापारांत वजावाट केली जाते. म्हणजे वरील किंमतीचा माल इकडून तिकडे जातो, व त्याचे मोबदला कांहीं मिळत नाहीं.

५–९१८–२०००

सोनें व रुपें यांचें मौल्य जरी थोडेंबहुत बदलतें, तरी इतर सर्व पदार्थांपेक्षां त्यांच्या मौल्यांत फरक फारच थोडा होतो; यामुळें नाणें याच पदार्थांचें केलें जातें. नाणें होण्यास इतर आवश्यक गुणही या धातूंच्या अंगीं दुसऱ्या पदार्थांपेक्षां जास्त आहेत.

दुसरा गुण—नाणें होण्यास पदार्थाच्या अंगीं स्वतःचेंच कांहीं मौल्य पाहिजे, व ते पदार्थ सर्वांस हवे असले पाहिजेत. कवड्या, शिंपा, बदाम, इत्यादि पदार्थांस अंगचें मौल्य नाहीं, ह्मटलें तरी चालेल. श्रमावांचून ते हवे तितके मिळतात. त्यांच्या अंगीं सौंदर्य, शोभा, चकाकी, वगैरे नसल्यामुळें लोकांस ते आवडत नाहींत. सोन्यारुप्यांची गोष्ट वेगळी. या धातु मिळविण्यास फार श्रम व खर्च करावा लागतो, यामुळें त्यांना अंगचेंच पुष्कळ मौल्य असतें. त्या फार दिवस टिकतात; चकचकीत व सुंदर दिसतात; सर्वत्र लोक त्यांचे डागिने कारितात; या व इतर कारणांकरितां सर्वांस त्या हव्याशा होतात; यामुळें नाणें करण्यास या धातु फार लायक होत.

तिसरा गुण—अंगीं मौल्य पुष्कळ असून थोडी जागा व्यापणें, ह्मणजे किंमतीच्या मानानें पाहतां सांठवून ठेवण्यास जागा थोडी लागणें, व सुलभ रीतीनें स्थलांतर करितां येणें, हे गुण सोनें व रुपें यांच्या अंगीं पूर्णपणें आहेत, हें उघड आहे. हिऱ्याच्या अंगीं हे गुण धातूंपेक्षांही अधिक अंशानें आहेत खरे, तथापि नाणें करण्यास हिरा योग्य होणार नाहीं. कारण हिऱ्यावर शिक्का वगैरे मारिता येत नाहीं. लहान लहान नाणीं करण्यास तर तो अग-

दींच निरुपयोगी. त्याचे बारीक तुकडे करण्यास फार अवघड; व मोठ्या हिऱ्याचे तुकडे केले असतां, त्याची सगळी किंमत नाहींशी होते. या सर्व कारणांनीं हिरा नाण्याप्रमाणें वापरण्याच्या अगदीं उपयोगी नाहीं, हें सहज ध्यानीं येईल. अगदीं ल्हान नाणीं करण्यास सोनें देखील उपयोगी नाहीं. तशा ठिकाणीं रुप्याचा उपयोग करितात व फारच हलकीं नाणीं तांब्याचींही करितात.

विशेष ठिकाणीं कवड्या, बदाम, कातड्याचे तुकडे, छाप मारलेले कागदाचे तुकडे, इत्यादींचा नाण्याप्रमाणें उपयोग करितात. पण या पदार्थांत वरील प्रकारचे गुण नसल्यामुळें, त्याचा नाण्याप्रमाणें सर्वत्र उपयोग होत नाहीं.

संपत्ति ह्मणजे काय, हें मागें सांगितलेंच आहे. नाणें संपत्ति नव्हे; तर अदलाबदल करण्याचें हें एक सुलभ साधन आहे. या दोन गोष्टी पक्या ध्यानांत ठेविल्या असतां पुष्कळ लोकांच्या नेहमीं मोठमोठ्या चुका होतात, त्या टळण्याचा संभव आहे. कितीएकांचें असें ह्मणणें आहे कीं, आपल्याजवळ नाणें फार झालें, ह्मणजे आपण श्रीमंत होऊं. तसेंच आपल्या देशांत नाणें वाढलें असतां देश धनाढ्य झाला असें होईल. विचारांअंतीं ही समजूत खरी नाहीं, हें सहज समजेल. देशांतील इतर वस्तु, ज्यास संपत्ति म्हणतां येईल, त्या जशाच्या तशाच राहून नाणें मात्र वाढेल, तर देशास कांहींएक फायदा झाला नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कल्पना करा कीं, एके दिवशीं सकाळीं कांहीं ईश्वरी चमत्कारानें देशांतील सर्व मनुष्यांच्या जवळचें नाणें एकदम दुप्पट झालें. जो तो

दुप्पट पैसे पेढींत निघाले. असें झाल्यानें देश दुप्पट श्रीमंत झाला, असें ह्मणतां येईल काय? नाहीं. कारण एखादा मनुष्य बाजरी विकत घेण्यास जाईल, तर बाजरीवाला त्याला ह्मणेल कीं, 'तुझ्या पैशाची मला जरूर नाहीं. माझ्या घरीं होते त्याच्या दुप्पट पैसे मजजवळ आज झाले आहेत; ह्मणून तुला बाजरी पाहिजे असेल, तर पूर्वीपेक्षां दुप्पट पैसे दिले पाहिजेत.' तसेंच बाजरीवाला कापड-वाल्याकडे गेला, तर कापडवालाही त्याजपाशीं पूर्वीच्या दुप्पट पैसे मागेल, व असेंच सर्व जिनसांबद्दल दुप्पट दुप्पट पैसे देणें पडतील. असें झाल्यानें सर्व जिनसांची किंमत मात्र वाढली. अथवा पूर्वी एकादी जिन्नस घेण्यास जितके पैसे पडत असत, त्याच्या दुप्पट आतां पडू लागले, इतकेंच मात्र झालें. यासाठीं देशांत नाणें वाढल्याचा परिणाम असा झाला कीं, तो धनाढ्य न होतां उलटें सगळ्या जिनसांची किंमत मात्र वाढली.

---

## भाग ३

## पदार्थांची किंमत कशानें ठरली जाते.

मागील भागांत नाण्याविषयीं कांहीं विचार झाला. देशांत नाणें कमी झालें अगर वाढलें, तर देश दरिद्री झाला किंवा सधन झाला असें ह्मणतां येत नाहीं, हें स्पष्ट करण्यांत आलेंच आहे. आतां निरनिराळ्या पदार्थांची किंमत (मौल्य व किंमत यांतील भेद सांगण्यांत आलाच आहे.

तेव्हां सोईसाठीं यापुढें ' मौल्य ' या शब्दाबद्दल ' किंमत ' हाच शब्द वापरला असतां हरकत नाहीं, असें समजून किंमत हाच शब्द सर्व ठिकाणीं वापरला आहे ) कशी ठरली जाते, व तें कोणकोणत्या कारणांनीं कमी जास्त होते, यांचा या भागांत थोडक्यांत विचार करूं.

पदार्थांची किंमत कशानें ठरली जाते, याचा विचार करितेवेळीं पदार्थांचे साधारणपणें तीन वर्ग कल्पिले असतां हरकत नाहीं.

१ ज्या पदार्थांचा सांठा आहे त्यापेक्षां जास्त मुळींच वाढवितां येत नाहीं, असले पदार्थ. उ० उत्तम कारागिराच्या हातचीं काढलेलीं चित्रें, जुनीं नाणीं, इ०

२ ज्यांचा सांठा वाढविणें असेल, तर त्या प्रमाणानें ते उत्पन्न करण्यास लागणारा खर्च ( ज्याला ' उत्पादनव्यय ' असें अर्थशास्त्रांत नांव आहे ) ही वाढवावा लागतो. उ० धान्य इ० शेतकीचें उत्पन्न, खाणीचें उत्पन्न इ०

३ ज्यांचा सांठा, उत्पादन व्यय वाढविल्याशिवाय वाढवितां येतो असले पदार्थ. उ० यंत्रांच्या साह्यानें तयार झालेले पदार्थ.

वरील तीन वर्गांतील पदार्थांचा विचार करितांना ' उत्पादन व्यय ' किंवा ' उत्पत्तीचा खर्च ' म्हणजे काय, हें समजणें जरूर आहे. सबब त्याचा विचार प्रथम केला पाहिजे.

पदार्थाचा ' उत्पत्तीचा खर्च ' म्हणजे तो पदार्थ तयार होण्यास सुरवात झाल्यापासून बाजारांत येऊन विकला जाईपर्यंत, त्यावर होणारा सर्व प्रकारचा खर्च होय. धान्य

तयार होऊन बाजारांत विकलें जाईपर्यंत त्यावर पुष्कळ प्रकारचा खर्च होतो. जमीन तयार करणें, बीं विकत घेणें, तें पेरणें, धान्य उगवलें ह्मणजे रक्षण करणें, तें कापणें, मळणें, वाहून घरीं आणणें, बाजारांत घेऊन जाणें, इत्यादि प्रकारांनीं पुष्कळ खर्च त्या धान्याप्रीत्यर्थ केला जातो. त्याशिवाय शेतकीस लागणारे बैल विकत घेणें, विहिरी खणणें, नांगर, आऊतें वगैरे करणें, ह्यांसही मोठा खर्च लागतो. हें सर्व भांडवल, व वरील प्रकारचे श्रम करीत असतां लागणारा सगळा खर्च, यांचा समावेश उत्पादन व्ययांतच होतो. उत्पत्तीच्या खर्चाचे मुख्य मोठे दोन भाग आहेत. १ पदार्थ उत्पन्न करितेवेळीं जे श्रम करावे लागतात, त्यांबद्दलची 'मजुरी' (याचा समावेश चल भांडवलांत केला जातो, हें मागें सांगितलेंच आहे). २ पदार्थ उत्पन्न करण्यास जें अचल भांडवल लागतें त्या अचल भांडवलाबद्दलचा 'नफा' अथवा 'व्याज.' एक भाग श्रमाबद्दलची मजुरी, व दुसरा भाग भांडवलावरील नफे. या दोहोंखेरीजही आणखी कांहीं गोष्टींचा समावेश उत्पत्तीच्या खर्चांत केला जातो; पण त्या येथें सांगण्याची जरूर नाहीं.

उत्पत्तीचा खर्च ह्मणजे पदार्थ तयार होत असतां मजुरी इत्यादि लागणारा खर्च, व त्या कामीं गुंतलेल्या भांडवलावरील नफा अगर व्याज हें समजलें; परंतु इतक्यानेंच पदार्थांची किंमत कशी ठरते हें समजावयाचें नाहीं. पदार्थांची किंमत ज्या नियमांनीं ठरते, ते सांगण्यापूर्वीं, 'पुरवठा' ह्मणजे काय, व 'खप' कशाला ह्मणतात,

हें समजलें पाहिजे. 'पुरवठा आणि खप' यांचा पदार्थांच्या किंमतीशीं कसा संबंध असतो, हें प्रथम पाहावणें जरूर आहे.

पुरवठा व खप यांचें साधारण स्वरूप सर्वांस माहीत आहेच. विक्रीकरितां तयार असलेल्या पदार्थांचे संग्रहास 'पुरवठा' ह्मणावयाचें; व विकत घेण्यास तयार असलेल्या गिऱ्हाइकांच्या संख्येस 'खप' हें नांव द्यावयाचें. बाजारांत विकण्यासाठीं शिल्लक असलेल्या साखरेस, साखरेचा 'पुरवठा' ती विकत घेण्यास तयार असणारे गिऱ्हाइकांची संख्या हा तिचा खप होय. कोणताही जिन्नस थोडा असून, घेणारे पुष्कळ असतील, तर 'पुरवठा' थोडा व 'खप' फार, असें ह्मटलें पाहिजे. जेव्हां 'पुरवठा' थोडा असून 'खप' फार असतो, तेव्हां त्या जिनसांची फार चणचण होते, व तो महाग महाग होत जातो. तसेंच जिन्नस फार महाग होत चालला कीं, त्याचा खपही कमी कमी होत जाऊन, शेवटीं फारच थोडें गिऱ्हाईक राहतें. असें होतां होतां शेवटीं पुरवठा व खप हीं समतोल झालीं, ह्मणजे त्या पदार्थांची किंमत मुकरर होते. यावरून साधारणपणें असें ह्मणतां येईल कीं, पदार्थांची किंमत मुकरर होणें, ती याचा पुरवठा व खप ही समान झाली ह्मणजे होते. खप वाढूं लागला कीं, किंमत वाढते, आणि खप कमी झाला कीं किंमतही उतरूं लागते. अशा रीतीनें लटपट होतां होतां अखेरीस जेव्हां खप व पुरवठा सारखे होतील, तेव्हां किंमत कायमची ठरेल. उदाहरणार्थ असें मानूं कीं, घोडा एक आहे व विकत घेणारे पांच जण आहेत.

सर्वजण १०० रुपये किंमत देण्यास तयार आहेत. तेव्हां शंभरापेक्षां त्या घोड्याची किंमत कमी तर होणार. नाहींच; पण घेणार पुष्कळ असल्यामुळें शंभरापेक्षां अधिक किंमत जो देईल त्यास घोडा मिळेल. शंभरापेक्षां जास्त किंमत देण्यास पांचांपैकीं दोन मनुष्य कबूल नाहींत, ते गळून पुढें तीनच गिऱ्हाइकें राहतील. तिघेही सवाशें रुपये देण्यास कबूल आहेत, पण त्यापेक्षां जास्त देण्याची दोघाची मर्जी नाहीं, तेव्हां सवाशेंपर्यंत किंमत चढेल. तितकी चढल्यावर सर्व गिऱ्हाईक नाहींसें होऊन फक्त एकच मनुष्य राहील; ह्मणजे जितके घोडे तितके घेणारे, अथवा जेवढा पुरवठा तेवढाच खप झाला कीं, त्या घोड्याची किंमत पुढें वाढणार नाहीं. सवाशें रुपयांपेक्षां थोडीबहुत जास्त किंमत होऊन नंतर मुकरर होईल. यावरून दिसेल कीं, जेव्हां घोड्यांचा पुरवठा कमी होतो, व खप जास्त होता, तेव्हां त्याची किंमत एकसारखी वाढत गेली; व जसजशी किंमत वाढू लागली तसतसें गिऱ्हाईक होऊं लागलें, अगर खप कमी होऊं लागला; व शेवटीं जेव्हां पुरवठा व खप बरोबर झाला, तेव्हांच घोड्याची किंमत मुकरर झाली.

वर सांगितल्याप्रमाणें पुरवठा व खप कमजास्त झाल्यानें किंमतींतही चढउतार होतो खरा; तथापि साधारणपणें किंमत ठरणें ती पदार्थाच्या उत्पादनव्ययाच्या खर्चाच्या मानानें ठरली जाते, ज्या पदार्थाचा पुरवठा पाहिजे तेवढा वाढवितां येतो, त्याची किंमत उत्पादनव्ययाच्या आंत बाहेर असते. खप फार वाढल्यामुळें असल्या पदार्थांची किंमतही उत्पादनव्ययापेक्षां पुष्कळ जास्त होईल खरी; पण ती फार

दिवस तशी राहणार नाहीं. उत्पादनव्ययापेक्षा एकाद्या जिन-सेची किंमत फार येऊं लागली असतां, व्यापारी लोकांस पुष्कळ नफा राहूं लागेल, आणि त्या आशेनें ते लोक ती जिन्नस अधिक तयार करूं लागतील. त्या विशेष धंद्यांत पुष्कळ भांडवल पडून त्या जिनसांचा पुरवठा अधिक वाढूं लागला कीं, तिची किंमत कमी कमी होत जाईल, व उत-रतां उतरतां ती शेवटीं उत्पादनव्ययाच्या बरोबरीच्या सुमारास येऊन ठेपेल. असेंच उलट प्रकारांतही होईल. एकाद्या जिन-सेचा पुरवठा फार असून खप कमी असल्यामुळें, तिची बाजारची किंमत उत्पादनव्ययापेक्षां पुष्कळ कमी असूं शकेल, पण थोड्या दिवसांनीं व्यापारांत आपल्यास तोटा होतो असें पाहून, व्यापारी लोक आपलें भांडवल त्या धंद्यांतून हलकें हलकें काढून घेतील; व त्यामुळें उत्पत्ती कमी होऊं लागून त्या जिनसांचा पुरवठा कमी होईल. आणि तसें झालें असतां किंमत वाढूं लागेल, व वाढतां वाढतां ती उत्प-त्तीच्या खर्चाचे जवळ जवळ येऊन ठेपेल. यावरून असें ह्मणतां येईल कीं पुरवठा व खप यांचें कमीजास्तपणामुळें किंमत जरी अधिकउणी होते, तरी तो अधिकउणेपणा कायम न रहातां, ती हमेशा कांहीं एका मुकरर आंकड्या-च्या आंतबाहेर घोटाळत असते, आणि हा मुकरर आंकडा ह्मटला ह्मणजे 'उत्पत्तीचा खर्च' अथवा उत्पादनव्यय हा होय. ह्मणून कोणत्याही पादर्थाची किंमत साधारणपणें हमेशा त्याच्या उत्पत्तीच्या खर्चाचे आंतबाहेर असते. मात्र पुरवठा व खप यांच्यामुळें तींत नेहमीं चढ उतार होण्याचें सुरूं असतें.

पदार्थांची किंमत ठरण्याच्या कामीं, उत्पत्तीचा खर्च, पुरवठा व खप यांचा कसा संबंध असतो, हें सांगण्यांत आलें. आतां याच संबंधानें आणखी एका गोष्टीचा विचार करणें जरूर आहे. पदार्थांस जी किंमत येते, ती मुख्य दोन कारणांनीं येते. १ त्यांचा 'उपयोग' व ते मिळविण्याचें 'काठिण्य'. प्रत्येक वस्तूस किंमत येण्यासाठीं हीं दोन्हीं कारणें तींत असलींच पाहिजेत. इतकेंच कीं, कोठें एक कमी असेल, व दुसरें जास्त असेल. यांपैकीं एक कारण जेथें मुळींच नसेल, तेथें त्या वस्तूस किंमत मुळींच येणार नाहीं. जसें—हवा ही मनुष्यांचा जीव रक्षण होण्यास अत्यंत आवश्यक आहे. तिचा 'उपयोग' इतका मोठा आहे, तथापि ती मिळण्यास मुळींच कठीण नाहीं. हवी तितकी बिनआयासानें मिळूं शकते; ह्मणून हवेस किंमत येत नाहीं. पण हीच हवा ज्या ठिकाणीं मिळण्यास कठीण पडते—समुद्रांत बुडी मारण्यास केलेल्या घांटेंत, अथवा कोळशाच्या वगैरे खाणींत, ती सहज मिळत नाहीं, तेथें तिला फार किंमत पडते. तसेंच कोणा तरुण सदृढ मनुष्यास अत्यंत श्रमानें तयार केलेली हेमगर्भाची मात्रा दिली, तर तिजबद्दल तो कांहीं किंमत देणार नाहीं. मात्रा करण्यास फार आयास व खर्चही झाला असेल, तथापि जोंपर्यंत त्या तरुण मनुष्याची प्रकृति उत्तम मजबूत आहे, तोंपर्यंत मात्रेचा त्याला काहीं 'उपयोग' नाहीं, व तिजबद्दल तो कांहींएक देणार नाहीं. पण त्याच माणसाची प्रकृति बिघडून त्रिदोष होण्याची वेळ येऊन पोहोंचतांच, तिची किंमत द्यावी तेवढी थोडीच. यावरून किंमत येण्या-

स पदार्थाच्या अंगीं 'उपयुक्तता,' व 'तें मिळविण्याचें काठिण्य,' हे दोन गुण अवश्य असले पाहिजेत.

किंमत साधारणपणें कशानें ठरते, याचा येथवर विचार झाला. आतां वर पदर्थांचे तीन वर्ग केले आहेत, त्यांपैकीं प्रत्येक वर्गांतील पदार्थांची किंमत कोणत्या कारणांनीं मुकरर होते तें पाहूं.

पहिल्या वर्गांतील पदार्थ, 'ह्मणजे ज्यांचा पुरवठा कोणत्याही रीतीनें वाढवितां येत नाहीं,' त्यांची किंमत 'उत्पत्तीच्या' खर्चाच्या मानानें ठरली जात नाहीं. त्यांचा पुरवठा वाढवितां येत नाहीं, ह्मणून त्यांची किंमत त्यांचे कमजास्ती 'खपाच्या' मानानेंच ठरली जाते. या वर्गांत येणारे पदार्थ ह्मटले ह्मणजे, जुन्या वेळच्या कारागिरांच्या हातचीं चित्रें वगैरे, हस्तकौशल्याचीं कामें, जुनीं नाणीं, हस्ताक्षरें व प्राचीन पुस्तकें, मोठया रस्त्यावरील नाक्याच्या जागा, इत्यादि होत. उत्तम चितान्यानें काढलेल्या शिवाजी राजाच्या एकाद्या दुर्मिळ तसबिरीची किंमत, तसबीर काढण्यास लागलेल्या खर्चाच्या प्रमाणानें ठरली जाणार नाहीं. ती तयार करण्यास खर्च जरी अगदीं थोडा लागला असला, तथापि ती घेण्यास गिऱ्हाइकें फार असतील, तर तिची किंमत अतिशय होईल; व किंमत वाढतां वाढतां गिऱ्हाईक कमी होत जाऊन, एकच माणूस गिऱ्हाईक राहीपर्यंत किंमत चढेल, व नंतर ती वाढण्याचें बंद होऊन मुकरर होईल. ही जी किंमत मुकरर झाली ती केवळ पुरवठा व खप या दोहोंच्या समीकरणानें झाली. यांत उत्पत्तीच्या खर्चाचा कांहीं संबंध राहिला नाहीं.

दुसऱ्या वर्गांतील पदार्थ, ह्मणजे ज्यांचा पुरवठा वाढवितां येतो, पण पुरवठा जसजसा वाढवावा तसतसा उत्पत्तीचा खर्चही वाढतो. या वर्गांतील पदार्थांत बहुधा शेतकीपासून, खाणींतून, वगैरे उत्पन्न झालेल्या पदार्थांचा समावेश होतो. यांची किंमत ठरणें ती मुख्यत्वेंकरून त्यांच्या 'उत्पत्तीच्या खर्चाच्या' मानानें ठरते. उदाहरणार्थ, असें मानूं कीं, कांहीं लोकांनीं कोंकणासारख्या प्रदेशांत जाऊन वसाहत केली. एका बाजूस डोंगर व दुसऱ्या बाजूस समुद्र असल्यामुळें, लागवडीस थोडीबहुत असलेली जमीन सर्व लागवड होऊन गेली. कांहीं वर्षांनीं त्या प्रदेशांतील लोकवस्ती फार वाढली त्यामुळें पूर्वीं जेवढें धान्य तेथील लोकांस उपजीविकेस लागत असे, त्यापेक्षां हल्लीं फार अधिक लागूं लागलें. हें अधिक लागणारें धान्य कोठून आणावें, हा प्रश्न सहज उत्पन्न झाला. उत्तम उत्तम जमिनी पूर्वींच लागवड होऊन गेल्या. कांहीं निकृष्ट प्रतीच्या जमिनी राहिल्या असतील त्या लागवड करून, अथवा हल्लीं असलेल्या जमिनींतच खत वगैरे जास्त घालून, अधिक लागणारें धान्य उत्पन्न केलें पाहिजे. निकृष्ट प्रतीच्या जमिनी लागवडींत आणिल्या, अगर असलेल्या जमिनींतच खत वगैरे घातलें, तरी खर्च जास्त लागेल हें उघड आहे. ह्मणून धान्य अधिक हवें असेल, तर उत्पत्तीचा खर्चही वाढला पाहिजे हें स्पष्ट आहे. उत्पत्तीचा खर्च वाढविल्याशिवाय धान्याचा पुरवठा वाढवितां येणार नाहीं हें जरी अगदीं खरें आहे, तथापि एक गोष्ट पूर्ण लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हा पुरवठा उत्पादनव्ययाच्या प्रमाणानें वाढत जात

नाहीं. जसजसा पुरवठा वाढविण्यास प्रयत्न करावा, तसतसा खर्च प्रमाणापेक्षां जास्त लागतो. खर्चाच्या बरोबरीनें उत्पन्न वाढलें जात नाहीं, आणि धान्याची किंमत उत्पत्तीच्या खर्चाच्या धोरणानें ठरली जाते. ह्मणून जसजशी धान्याची अधिक उत्पत्ति करावी, तसतसा उत्पादनव्यय प्रमाणापेक्षां जास्त लागल्यामुळें त्याची किंमतही वाढेल, अर्थात् धान्य महाग होईल, हें उघड आहे. देशांत जसजशी अधिक धान्याची जरूर लागेल, ह्मणजे देशांत जसजशी लोकसंख्या जास्त होईल, अगर जसजसें धान्य परदेशास पाठविलें जाईल, तसतसा धान्याचा खप अधिक होत जाईल. हें धान्य उत्पन्न करण्यास चांगल्या जमिनी शिल्लक नाहींत म्हणून नेहमीं हलक्या प्रतीच्या व गैरसोईच्या जमिनी लागवडीस आणणें भाग पडेल; व निकस जमिनी लागवडींत आणण्याची खटपट केल्यानें उत्पत्तीचा खर्च प्रमाणापेक्षां जास्त वाढून धान्य नेहमीं महाग होत जाईल. आतां उत्पत्तीच्या खर्चांत दोन गोष्टींचा समावेश झालेला असतो असें मागें सांगितलेंच आहे. १ मजुरी व दुसरा किरकोळ खर्च (चल भांडवल), २ आणि अचल भांडवलावरील (बैल, नांगर, विहीर इ० चा खर्च) नफा किंवा व्याज. उत्पत्तीच्या खर्चाचे हे दोन मुख्य घटकावयव आहेत; यांपैकीं कोणताही एक भाग वाढला कीं, उत्पत्तीचा खर्च जास्त झालाच. जमीन लागवड करण्यास मजुरी, खत, वगैरे किरकोळ खर्च जास्त लागू लागेल, अथवा शेतकरी जास्त नफा घेण्याची इच्छा राखील. या दोहोंपैकीं कोणतीही एक गोष्ट घडली, तरी उत्पत्तीचा खर्च वाढला पाहिजे.

६-९१८-२०००

केल्यानें उत्पत्तीचा खर्च वाढला आहे; तो या दोन घटकावयवांपैकीं कोणता जास्त झाल्यानें वाढला हें पाहिलें पाहिजे. निकृष्ट जमीन वहीत करणाऱ्या शेतकऱ्यानें आपण जास्त नफा घेण्याचा ठराव केल्यानें उत्पत्तीचा खर्च वाढला आहे, किंवा मजुरी आणि किरकोळ खर्च अधिक होऊं लागल्यानें तसें झालें आहे, हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. आपण घेतलेल्या उदाहरणांत जो उत्पत्तीचा खर्च वाढला आहे, तो मेहनत, मजुरी वाढल्यानें झाला आहे, नफ्याचा अंश वाढल्यामुळें नाहीं. निकृष्ट जमिनीच्या मालकास नफा जास्त मिळत नाहीं; इतकेंच नाहीं, तर त्या जमिनीवर खर्च अधिक होत असल्यानें नफ्याचा अंश उलट कमी होत जातो, हें समजण्यास फारसें कठीण नाहीं.

आतां देशांत लोकसंख्या वाढल्यानें, किंवा धान्य परदेशांत पाठविण्याची जरूर पडूं लागल्यानें, किंवा इतर कोणत्याही कारणांनीं जर देशांत अधिक धान्य उत्पन्न करण्याची जबरदस्ती झाली, तर वाईट जमिनी लागवडींत आणाव्या लागतील, हें उघड आहे. आणि तसें झाल्यानें धान्याचा उत्पत्तीचा खर्च वाढेल, व तें अर्थात् महाग होईल.

देशांत धान्य महाग झालें असतां शेतकऱ्यास फार चांगलें, त्यांना फार फायदा होऊं लागतो, असा कितीएक लोकांचा साधारण समज आहे; आणि जसजसें धान्य महाग होत जाईल तसतसे शेतकरी गबर होत जातील, असें कांहीं लोक समजतात. परंतु ही समजूत चुकीची आहे. कारण धान्य महाग झालें कीं, शेतकऱ्यांचा नफा वाढलाच

असें हमेशा होत नाहीं. निरकृष्ट जमीन लागवडींत आणि-ल्यामुळें धान्याची जी किंमत वाढली, ती शेतकऱ्याचा नफा वाढल्यामुळें नव्हे, तर धान्य उत्पन्न करण्यास मजुरी वगैरेचा खर्च जास्त लागल्यानें उत्पत्तीचा खर्च वाढून आली आहे. सबब धान्य महाग झालें असतां, शेतकऱ्यांचा मोठा फायदा होतो हें ह्मणणे केवळ भ्रांतिमूलक आहे. उलटें धान्याची किंमत वाढली असतां, शेतकऱ्यांस पूर्वी जेवढा नफा राहत असे, त्यापेक्षां कमी राहूं लागण्याचा नेहमीं मोठा संभव आहे. धान्याची किंमत वाढली असतांही, शेतकऱ्यांस फायदा अधिक न होतां उलट तोटाच जर होईल, तर दिवसेंदिवस ते अत्यंत निकृष्टावस्थेस येऊन पोंचतील यांत आश्चर्य तें काय! ही खुद्द शेतकरी लोकांची—कीं, ज्या लोकांस धान्याची महर्गता झाली असतां हितावह आहे असें समजलें जातें, त्यांची गोष्ट झाली. शेतकऱ्यां-शिवाय ज्या इतर सर्व लोकांस नेहमीं उपजीविकेस धान्य विकत घ्यावें लागतें, त्यांची, धान्य महाग झाल्यानें, काय दशा होईल हें सांगण्याची फारशी गरज नाहीं. उपजीविकेस लागणारा सर्व प्रकारचा खर्च फारच वाढेल. एक धान्य महाग झालें कीं, सर्व प्रकारच्या मजुरीचे दर वाढतात; पण मजुरी जास्त मिळाल्यानें मजुरांचा खरा फायदा झाला असें मुळींच नाहीं. कारण अधिक मजुरी वाढली, तितका पोटास अधिक खर्च लागतो, पदरांत कांहीं पडत नाहीं. लंकेतील न्हाव्याची गोष्ट सर्वांस ठाऊक आहेच. एका न्हाव्यानें ऐकिलें कीं, लंकेंत एक हजामत केली, तर तीन सोन्याच्या विटा मिळतात. हें ऐकून तो तिकडे गेला, पण

जोडा घेण्यास एक वीट पडूं लागली, जिकडून तिकडून सारखेच. हें पाहून तो परत आला. सर्व प्रकारच्या धंद्याची मजुरी वाढली कीं, हरएक प्रकारच्या जिनसांचा उत्पत्तीचा खर्च वाढला, हें स्पष्ट आहे. आणि उत्पत्तीचा खर्च वाढला असतां, त्या जिनसेची किंमत वाढलीच पाहिजे. यामुळें एक धान्य महाग झालें कीं, तें विकत घेण्यासच तेवढा खर्च अधिक होईल; इतकेंच नाहीं, तर इतर सर्व वस्तूंची किंमत एकदम वाढून निर्वाहाचा सर्व खर्च प्रमाणाबाहेर होऊं लागेल, व सर्वांची हातातोंडाशीं गांठ पडेल. मिळवावें तितकें पोटासच पुरेनासें झालें, तर देशांत भांडवलाचा संचय होण्याची बिलकुल आशा उरणार नाहीं. भांडवल नाहींसें झाल्यानें धंदे कसे चालावे व मजुरांचें पोषण कसें व्हावें, हा मोठा प्रश्न आहे. देशांत तयार झालेल्या सर्व जिनसांची किंमत वाढली असतां त्या कोणी सहसा घेणार नाहीं. परंतु वस्तु घेतल्यावांचून तर चालण्यासारखें नाहीं तेव्हां अर्थात् त्यांच्या ऐवजीं कोट्यावधि रुपयांचा स्वस्त माल परदेशांतून येण्याची सुरुवात होईल. त्यामुळें लाखों मजुरांस काम नाहींसें होईल. कायदेशीर एकही धंदा उरला नाहीं, व उपजीविका तर झाली पाहिजे, म्हणून जो तो शेतकी करूं लागेल, तर शेतकींत सर्व मजुरांचा समावेश होईल असा तो धंदा नाहीं. शेतकीचा धंदा सुधारावा, त्या धंद्यांत आहे त्यापेक्षां जास्त भांडवल घालून त्या धंद्यास उत्तेजन द्यावें, याकामीं आपल्या देशांत हल्लीं कितीएक लोकांचें लक्ष लागलें आहे, असें दिसतें. अशा लोकांनीं वरील गोष्टी

अवश्य विचारांत घेण्यासारख्या आहेत. या लहानशा पुस्तकांत या विषयासंबंधीं अधिक विचार करण्यास सवड नाहीं; ह्मणून हें विषयांतर सोडून मुख्य विषयाकडे वळलें पाहिजे.

पदार्थांचे तीन वर्ग सांगितले. त्यांपैकीं येथपर्यंत दुसऱ्या वर्गातील पदार्थांबद्दल, ह्मणजे ज्या पदार्थांचा पुरवठा वाढविणें असेल, तर उत्पत्तीचा खर्च प्रमाणापेक्षां जास्त करावा लागतो, त्यांच्याविषयीं विचार झाला. आतां तिसऱ्या वर्गातील पदार्थांचा ह्मणजे उत्पत्तीचा खर्च न वाढतां, ज्या पदार्थांचा पुरवठा वाढवितां येतो, अशा विषयीं विचार करणें आहे. या वर्गांत यंत्रानें तयार होणाऱ्या पदार्थांचा समावेश होतो. त्यांची किंमत ठरणें ती उत्पत्तीच्या खर्चावरूनच ठरते. उत्पत्तीच्या खर्चांत बहुधा मजुरीचा भाग फार मोठा असतो. उदाहरणार्थ— एकादें पागोटें घेतलें असतां, त्यांत वास्तविक कापसाची किंमत पाहिली, तर एक रुपया अगर दोन रुपये असेल पण पागोट्याची किंमत २५।३० रुपये पडते. ही एवढी किंमत पागोटें तयार होईपर्यंत जी अनेक तऱ्हेची मजुरी त्यावर करावी लागते त्या मजुरीची आहे. पागोटें तयार करण्यास इतकी मजुरी न करावी लागेल अशी कांहीं युक्ती योजिली असतां, पागोट्याच्या उत्पत्तीचा खर्च कमी होईल, व त्याला इतकी किंमतही पडणार नाहीं. सूत काढणें, कापड विणणें, इत्यादि कामें हातांनीं न करितां, त्याकामीं यंत्रांचा उपयोग केला असतां मजुरी फार कमी लागते. यंत्राच्या योगानें थोड्या वेळांत अतिशय उत्पत्ति

होऊन मजुरी फार थोडी लागल्यामुळें खर्च अत्यंत अल्प होतो. शिवाय उत्पत्तीच्या कामीं यंत्राचा उपयोग केला असतां, श्रमविभागापासून होणारा फायदा उत्कृष्ट रीतीनें घेतां येतो. आगगाडीच्या यंत्राकडे लक्ष दिलें असतां, वरील गोष्ट चांगली लक्षांत येईल. हजारों खंडी ओझें अत्यंत अल्प काळांत शेंकडों कोस नेण्यास यंत्रांचें साहाय्य मिळाल्यामुळें, मजुरीचा केवढा खर्च वांचला जात आहे बरें? हजारों गाड्या, हजारों बैल, लाखों माणसें लाविलीं तरी न होणारें काम केवळ थोड्याशा खर्चानें अल्प काळांत सहज होतें!! कापडाच्या गिरणींत एका दिवसांत जेवढा माल तयार केला जातो, तितका माल तयार करण्यास शेंकडोंपट खर्च केला व हजारों लोक लाविले, तरी कित्येक दिवसांत तो हातांनीं तयार होणार नाहीं. छापखान्यांच्या कारखान्याचीही अशीच गोष्ट आहे. एकादें दोन पैशास मिळणारें वर्तमानपत्र हातांनीं लिहून प्रसिद्ध करावयाची पाळी येईल, तर काय परिणाम होईल, याचें वर्णन करण्याची गरज नाहीं. यावरून हें स्पष्ट आहे कीं, हरएक कामीं मजुरीचा खर्च कमी करणें असेल, तर तें काम हातांनीं न करितां, होईल तेथपर्यंत त्यांत यंत्रांचा उपयोग केला पाहिजे. यंत्रांचा अधिक उपयोग करणें असेल, तर कारखाने मोठ्या पायावर काढिले पाहिजेत. कारखाना जसजसा वाढवावा तसतसा माल अधिक उत्पन्न होऊन, खर्च उलटा कमी कमी होत जातो. ह्मणजे जसजसा माल अधिक उत्पन्न करावा, तसतसा उत्पत्तीचा खर्च फार न होतां उलट तो कमी लागू लागतो; आणि उत्प-

त्तीचा खर्च झाला, ह्मणजे अर्थात् यंत्रानें झालेले पदार्थ स्वस्त मिळूं लागतात.

वरील विवेचनावरून स्पष्ट समजेल कीं, शेतकीचें उत्पन्न व यंत्राच्या साह्यानें होणारे पदार्थ, यांत फार मोठा फरक आहे. दोन्ही एकमेकांच्या अगदीं उलट आहेत असें ह्मटलें तरी चालेल. शेतकीचें उत्पन्न वाढविणें झालें, तर जसजसें उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करावा, तसतशा प्रमाणानें उत्पत्तीचा खर्च जास्त लागू लागतो; त्यामुळें पिकणारे जिन्नस महाग होतात. पण यंत्रांच्या साह्यानें होणाऱ्या जिनसांचा पुरवठा वाढविणें असेल, तर जसजसा पुरवठा वाढवावा तसतसा उत्पत्तीचा खर्च अधिक न होतां, उलटा कमी होत जातो; व तेणेंकरून जिन्नस स्वस्त होऊं लागतात.

सारांश, वस्तूंच्या तीन प्रकारांपैकीं पहिल्या प्रकारच्या जिनसांचा पुरवठा मुळींच वाढवितां येत नाहीं. त्यांची किंमत ठरणें ती पुरवठा व खप यांच्या समीकरणानें ठरते. पुष्कळ खप असेल तेव्हां किंमत वाढतां वाढतां अखेरीस खप कमी होऊन खप व पुरवठा दोन्ही जेव्हां समसमान होतील, तेव्हां किंमत मुकरर ठरली जाईल.

दुसरा प्रकार—शेतकी वगैरेपासून होणारे मालाचा. या जिनसांचा पुरवठा वाढवितां येतो खरा, पण तो उत्पत्तीचा खर्च प्रमाणापेक्षां जास्ती केल्याशिवाय नाहीं. अर्थात् पुरवठा वाढविला कीं, त्या वस्तु महाग होतात. पहिल्या वर्गांतील जिनसांची किंमत वाढत चालली कीं, त्यांचा खप कमी होऊं लागतो. ह्मणजे ते जिन्नस महाग झाल्यानें घेण्यास

कोणी तयार होत नाहींत, गिऱ्हाइकें कमी होतात. परंतु धान्य उपजीविकेस अवश्य असल्यामुळें किंमत कितीही वाढली, तरी त्याचा खप कमी करतां येत नाहीं; सर्वांस धान्य पाहिजेच आहे. गिऱ्हाइकें आहेत तितकींच आहेत; तीं कमी होत नाहींत, ह्मणून खपापेक्षां धान्य कमी असेल, तर पुरवठा वाढविण्याचें काम सुरूंच राहिलें पाहिजे; व प्रमाणापेक्षां जास्त उत्पत्तीचा खर्च केल्यावांचून पुरवठा वाढवितां येत नाहीं, ह्मणून धान्याची किंमत तसबिरीच्या किंमतीप्रमाणें गिऱ्हाइकें बंद पडून मुकरर न होतां हमेश वाढतच राहील. ती अखेर जेव्हां मोठ्या लढाईमुळें, अगर महामारी वगैरे रोगांच्या सातीनें, अथवा मोठ्या दुष्काळानें देशांतील लोकसंख्या कमी होईल, किंवा परदेशांत धान्य पाठविण्याचें बंद होईल, तेव्हांच कमी होऊन मुकरर होण्याचा संभव आहे.

तिसरा प्रकार—यंत्रापासून होणारे पदार्थांचा पुरवठा शेतकीच्या उत्पन्नाप्रमाणेंच वाढवितां येतो. पण तो वाढविण्यास उत्पत्तीचा खर्च जास्त करावा न लागतां, उलटा कमी लागतो. या जिनसांच्या पुरठ्यापेक्षां जेव्हां त्यांचा खप फार असेल, तेव्हां कांहीं वेळ त्यांची किंमत वाढेल; पण ती फार वेळ टिकणार नाहीं. जिनसांस किंमत फार येऊन नफा बरा होतो असें कारखानदारांस समजतांच, ते आपआपले कारखाने वाढवून पुष्कळ उत्पत्ति करूं लागतील;

व तेणेंकरून अर्थात्‌च पुरवठा वाढून तो व खप बरोबर झाल्यामुळें किंमत उतरेल.

आपल्या देशांतील व इतर देशांतील कितीएक लोकांचें असें मत झालेलें दिसतें कीं, हिंदुस्थान देश शेतकीच्या कामास फार सोईवार आहे, सबब हिंदुस्तानांतील लोकांनीं फक्त शेतकीच करावी; आपलें सर्व भांडवल शेतीच्या कामीं घालावें; सर्व मेहनत शेतकीवर करावी; इतर यांत्रिक वगैरे धंदे करण्याच्या खटपटींत फारसें पडूं नये. हिंदुस्थानांतील लोकांनीं फक्त धान्य विकविण्याचा धंदा करावा, आणि आपलें धान्य देऊन इतर देशांतून यंत्रानें तयार झालेले पदार्थ घ्यावे, ही समजून किती अनिष्टकारक आहे, हें आतां ज्यास्त विवेचन करून सांगण्याची गरज नाहीं. शेतकीचें उत्पन्न जसजसें वाढवावें तसतशी धान्याची किंमत वाढून नफ्याचा अंश कमी कमी होत जातो; व धान्य महाग झाल्यानें एकंदर देशांतील सर्व धंद्यांचे दर वाढून सर्व वस्तु महाग होतील, सर्व धंद्यांतील नफे कमी होतील, मजूर उपाशीं मरूं लागतील, व लवकरच सर्व देश फार विपन्नदशेस येऊन पोंचेल. विचारी व राजकारणी पुरुषांनीं या गोष्टींचा विचार अवश्य करावा.

याप्रमाणें तिन्ही प्रकारच्या जिनसांचे किंमतीचा विचार झाला. या पुढील प्रकरणांत संपत्तीची वांटणी कशी होते याचा विचार करणें आहे.

# भाग १
## संपत्तीची वांटणी

संपत्ति उत्पन्न होण्यास अवश्य कारणें जमीन, मेहनत, व भांडवल हीं आहेत. हें मागील प्रकरणांत सांगण्यांत आलेंच आहे. ज्याअर्थी संपत्ति उत्पन्न होण्याचीं मुख्य कारणें तीन आहेत, त्याअर्थी उत्पन्न झालेल्या संपत्तीची वांटणीही तीन भागांनींच झाली पाहिजे. एक भाग जमिनीचा, दुसरा मेहनतीचा, व तिसरा भांडवलाचा. अथवा ज्या तीन वांटण्या व्हावयाच्या, त्या जमिनीचा ( १ ) '**मालक**', ( २ ) श्रम करणारा '**मजूर**', ( ३ ) व भांडवलवाला '**सावकार**', या तिघांतच झाल्या पाहिजेत.

उत्पन्न झालेल्या संपत्तीचा जो भाग जमिनीच्या मालकास मिळतो त्याला '**सारा**' असें ह्मणतात. श्रम करणाऱ्या मजुराकडे जो अंश जातो त्याला '**मजुरी**' ह्मणतात. व भांडवलवाल्या सावकाराच्या वांट्यास जो भाग येतो, त्याला '**नफा**' असें नांव देण्यांत येतें. याप्रमाणें उत्पन्न झालेल्या संपत्तीची वांटणी, सारा, मजुरी व नफा, अशा तीन विभागांनीं होते. हे विभाग कोणत्या प्रमाणांनीं होतात, त्यांचा परस्पर संबंध कसा आहे, एकांत कांहीं कमजास्त झालें असतां, दुसऱ्यांत आपोआप कसा फेरफार होतो, याबद्दल अर्थशास्त्रांत पुष्कळ उत्तम सिद्धांत ठरलेले आहेत, त्यांचें प्रसंगानुसार पुढें दिग्दर्शन करण्यांत येईल.

सारा, मजुरी व नफा, अशा उत्पन्न झालेल्या संपत्तीच्या तीन वांटण्या वर सांगण्यांत आल्या. त्या सर्व कितीएक ठिकाणीं एकाच मनुष्यास मिळतात, व कितीएक ठिकाणीं निरनिराळ्या मनुष्यांचे वांटणीस येतात. जेथें जमीन इनामी शेतकऱ्याच्या मालकीची आहे, मजुरीही तो स्वतः करतो, व शेतीस लागणारा खर्चही त्याचाच असतो, तेथें वरील तिन्ही भाग त्याला एकट्यालाच मिळतील. जेथें जमिनीचा मालक वेगळा, मजूर निराळा, व भांडवलवाला तिसराच असेल, तेथें तीन निरनिराळ्या इसमांस दरएकास एक एक भाग असे मिळतील. जमीन शेतकऱ्याची असून तो स्वतः मजुरी करील, मात्र भांडवल सावकारापासून घेईल, तर दोन भाग ( सारा व मजुरी ) शेतकऱ्यास, व तिसरा भाग ( नफा ) सावकारास मिळेल. तसेंच जमिनीचा मालक निराळा असून शेतकरी फक्त मजुरी करितो व खर्चही आपणच करितो, तर सारा जमिनीच्या मालकास मिळेल, व मजुरी आणि नफा हीं दोन्ही शेतकऱ्यास जातील. याप्रमाणें स्थितिविशेषानें निरनिराळे विभाग निरनिराळ्या मनुष्यांस मिळतील. या तिन्ही विभागांचा अनुक्रमें विचार करावयाचा आहे; ह्मणून प्रथम ‘ जमिनीचा सारा ’ याचा विचार करूं.

## भाग २

## जमिनीचा सारा.

---o*o---

प्राचीनकाळीं हिंदुस्थानांत जमिनीवर राजाची मालकी

नसे. जो कोणी आपल्या खर्चानें व श्रमानें जंगल वगैरे साफ करून जमीन लागवडीस आणील, त्याच्या मालकीची ती जमीन समजली जात असे. राजाचा फक्त, जमिनीच्या उत्पन्नांतून षष्ठांश, घेण्याचा हक्क असे. राजास हा जो षष्ठांश मिळे तो ' जमिनीचा सारा ' नव्हे, तर संरक्षण करण्याबद्दल एक प्रकारचा करच होता. कालांतरानें व राजक्रांतीमुळें पूर्वस्थिती बदलून, देशांत बहुतेक भागांत सर्व जमिनीची मालकी राजाची मानली जात आत आहे; व राजास हल्लीं जमिनीबद्दल लोकांकडून जें कांहीं मिळतें तें संरक्षणाबद्दल कराच्या रूपानें नव्हे, तर आपली जमीन उपभोग करण्यास तो लोकांस देतो, त्याबद्दल कांहीं मोबदला अथवा भाडें घेतो, असें ह्मटसें तरी चालेल. जमिनीच्या उपभोगाबद्दल तिच्या उत्पन्नांतुन मालकास जो अंश, मोबदला अथवा भाडें, या रूपानें दिला जातो, त्यास ' जमिनीचा सारा ' असें ह्मणतात. हा सारा घेण्याचे दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार ' देशरिवाजानें अगर विशेष ठराव करून ' सारा घेणें, जसें उत्पन्नाचा अर्धा, तिसरा, पांचवा हिस्सा वगैरे. दुसरा प्रकार ' चढाओढीनें सारा घेणें ' ह्मणजे देशरिवाज वगैरे कांहीं लक्षांत न घेतां जो जास्त सारा देण्यास तयार होईल त्यास जमीन देऊन सारा घेणें. सारा घेण्याचा पहिला प्रकार अगदीं सुलभ आहे, व तो स्पष्ट करण्यास फारशी अडचण पडणार नाहीं. परंतु दुसरा प्रकार समजण्यास अंमळ कठीण असल्यामुळें, त्याचा विचार प्रथम करून, नंतर पहिल्या प्रकाराचा करितां येईल.

जमीन उत्पन्न करणें हें मनुष्याच्या हातीं नाहीं. ती

ईश्वरकृत असल्यामुळें तिजवर कांहीं विशेष व्यक्तीचें स्वामित्व असावें, किंवा सरकारचें स्वामित्व असावें, या वाद-ग्रस्त गोष्टीचा विचार आपल्यास येथें करण्याची गरज नाहीं. जमिनीला सारा कां येतो, याचा विचार करितेवेळीं, जमीन कोणाच्या तरी मालकींत येऊन पडली आहे, मग ती वाजवी रीतीनें असो, अगर गैरवाजवी रीतीनें असो, असें मानून चाललें पाहिजे.

जमीन ही वस्तु अशा प्रकारची आहे कीं, तिचा पुर-वठा मुक़रर झालेला आहे. असलेल्या जमिनीपेक्षां कृत्रिम उपायांनीं जमीन जास्त वाढवितां येत नाहीं. ह्मणजे जमीन ही, पदार्थांचे मागें जे तीन वर्ग सांगितले, त्यांपैकीं पहिल्या वर्गांतील आहे असें ह्मटलें पाहिजे. पुरवठा वाढवितां येत नाहीं, आणि जमिनीचा खप तर सर्वत्र आहेच, व दिवसें-दिवस तो अधिकच होणार, कमी होण्याचा संभव नाहीं; याकरितां पुरवठा जेवढाचा तेवढाच राहिल्यानें, व खप हमेशा वाढत असल्यामुळें, जमिनीची किंमत दिवसेंदिवस वाढली पाहिजे हें अगदीं स्पष्ट आहे. जमिनीची किंमत वाढली पाहिजे हें ह्मणण्याचा अर्थ असा कीं, जमिनीच्या उपभोगाबद्दल पडणारें भाडें, अथवा ज्याला ' सारा ' असें आपण ह्मटलें आहे, तो नेहमीं वढत असला पाहिजे, हें सहज समजेल. आतां हा सारा सर्वत्र सर्व प्रकारचे जमि-नीस सारखा कां असत नाहीं, व निरनिराळ्या ठिकाणीं कमजास्त कशा रीतीनें होतो, हें पाहणें आहे.

जमिनीला जो सारा येतो तो दोन कारणांनीं येतो; पहिलें कारण तिचा सुपीकपणा, व २ ती उत्तम सवडीच्या

ठिकाणीं असणें. या दोन गुणांपैकीं ज्या जमिनींत एकही गुण नाहीं, तिला कोणीही सारा देणार नाहीं. जी जमीन खडकाळ आहे व जींत पीक मुळींच होत नाहीं, ती अगदीं उत्तम ठिकाणीं ह्मणजे गांवाच्या अगदीं नजीक असली, तरी तिला सारा येणार नाहीं. तसेंच अति उत्तम पिकाऊ जमीन असून, ती गैरसोईच्या ठिकाणीं असेल, तर तिलाही सारा येणार नाहीं; जसें—गुजराथेंतील पंच-महालांतील जमीन, गायकवाडींतील सोनगड व्याऱ्याकडील जमीन. या जमिनी जरी फार पिकाऊ आहेत, तरी तेथें जंगल फार, हवापाणी वाईट, वस्ती चांगली नाहीं, रस्ते वगैरे प्रवासाचीं साधनें अपूर्ण, अशा वाईट ठिकाणीं त्या असल्यामुळें, त्यांचा सारा यावा तसा येणार नाहीं.

सारा येण्याचीं मुख्य दोन कारणें, तीं पिकाऊपणा व सोय, तीं जसजशीं कमीज्यास्त होतील, तसतसा साराही कमजास्त होईल. एका जमिनीपेक्षां दुसरी जमीन अधिक पिकाऊ असेल, तर पहिलीपेक्षां दुसरीस सारा जास्त येईल. नीरस जमिनीपेक्षां सुपीक जमिनीस सारा अधिक आला पाहिजे, हें समजण्यास सुलभ आहे. पण नीरस जमिनीस तरी सारा काय हिशेबानें किती घ्यावा, हें समजणें अंमळ कठीण आहे. यास्तव त्याचा थोडा अधिक विचार करूं.

प्रत्येक देशांत कांहीं जमिनी इतक्या खराब व गैर-सोईच्या असतात कीं, त्या लागवडीस आणिल्या असतां त्यांतून फक्त मजुरीचा खर्च, व त्यांत घातलेल्या पैशाचें साधारण हक्कें व्याज, हीं मोठ्या मुष्किलीनें निघतात.

अशा जमिनीस सारा येणार नाहीं, हें उघड आहे. कारण, जबरीनें असल्या जमिनीवर सारा बसविलाच, तर खर्च झालेल्या पैशाचें अगदीं व्याजही सुटणार नाहीं. ह्मणजे भांडवलावर नफा मुळींच उरणार नाहीं, व जमीन तोट्यानेंच वहीत करावी लागेल. पण नेहमीं असें करून चालणार नाहीं. ह्मणून तसल्या जमिनीवर सारा घेऊं लागले कीं, लागलीच ती लागवड होण्याची बंद पडेल. शेतकरी लोक दरसाल शेंकडों बिघे जमिनींचे राजीनामे देतात, त्याचें कारण हेंच आहे.

वर सांगितल्या प्रकारची जमीन, लागवडींत असलेल्या जमिनीपैकीं, अगदीं हलक्या पायरीची समजली पाहिजे, व तिला 'लागवडींतील शेवटली जमीन' असें ह्मणतात. लागवडींतील शेवटल्या जमिनीपेक्षांही वाईट दुसऱ्या जमिनी पुष्कळ असूं शकतील; परंतु त्या लागवडींत येत नाहींत. लागवडींत आणिल्या कीं तोटा होतो, अशा प्रकारच्या त्या असतात. फक्त ज्या वेळेस धान्य महाग होईल, त्या वेळेसच मात्र त्या जमिनी लागवड करण्यास सवड होते; ह्मणून त्यांचा विचार येथें करण्यांत येत नाहीं.

'लागवडींतील शेवटल्या जमिनीस' सारा येणार नाहीं, हें वरील विचारावरून स्पष्ट झालेंच. आतां या शेवटल्या जमिनीपेक्षां वरच्या दरजाच्या जमिनींत जितकें अधिक उत्पन्न होईल, तितका त्या जमिनीचा सारा होय; ह्मणजे उत्पत्तीचा खर्च व झालेलें उत्पन्न यांतील जें अंतर तें सारा होय. आतां अमुकच जमीन लागवडींतील शेवटची हें कशावरून ठरतें, हें पाहिलें पाहिजे. अमुकच जमीन लाग-

वडींतील शेवटची समजावयाची, असा सर्वसाधारण एक धोपट नियम घालून देतां येणार नाहीं. निरनिराळ्या ठिकाणीं, निरनिराळ्या वेळीं लागवडींतील शेवटच्या प्रतीची जमीन फारच वेगवेगळ्या प्रकारची असूं शकेल. कोणती जमीन लागवडींतील शेवटली हें ठरणें, त्या वेळच्या धान्याचे किंमतीवर अवलंबून आहे. कारण त्या जमिनींत झालेल्या धान्याची किंमत व तें उत्पन्न करण्यास लागणारा 'उत्पत्तीचा खर्च' हीं हमेश बरोबर असलीं पाहिजेत. धान्य स्वस्त झालें असतां, लागवडींतील शेवटल्या जमिनींत तें करण्यास जो खर्च लागला होता, तो वसूल होईनासा होईल; ह्मणून ती जमीन लागवड करण्याची सोडून दिली पाहिजे. जसजसें धान्य स्वस्त होत जाईल, तसतशा हलक्या हलक्या जमिनी लागवडींतून निघून जाऊन, लागवडींतील शेवटली जमीन एकेक पायरी वर चढत जाईल. तसेंच जसजसें धान्य महाग होत जाईल, तसतशी लागवडींतील शेवटली जमीन खालच्या पायरीला उतरत जाईल. कारण धान्य महाग झाल्यानें कमी उत्पन्नाच्या जमिनी वहीत करणें फायदेशीर होईल. पूर्वी ज्या जमिनी लागवडींतील शेवटल्या होत्या, ह्मणजे ज्यांना मुळींच सारा येत नसे, त्या जमिनीला हल्लीं सारा येऊं लागेल; व त्यांच्यापेक्षां हलक्या जमिनी आतां लागवडींतील शेवटच्या जमिनी मानल्या जातील. यावरून धान्य महाग झालें कीं, लागवडींतील शेवटली जमीन खालच्या पायरीवर येते, व पूर्वी ज्या जमिनीस सारा येत नसे, त्या जमिनीस सारा येऊं लागतो, असें झालें.

'देशांतील लोकसंख्या वाढल्यानें जमिनीचे सारे वाढतात,' असा एक अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे. आपण आतांच पाहिलें कीं, जमिनीचे सारे वाढणें, हें लागवडींतील शेवटली जमीन खालच्या पायरीवर आल्यावांचून होत नाहीं. आणि लागवडींतील शेवटली जमीन खालच्या पायरीवर येण्यास धान्य महाग झालें पाहिजे, तरच ती जमीन लागवड करण्याचा खर्च भागेल. आतां धान्य महाग होणें तें त्याचा खप वाढल्याशिवाय होणार नाहीं. देशांत जसजशी लोकसंख्या वाढेल, तसतसा धान्याचा खप अधिक वाढतो. लोकसंख्या वाढल्यानें धान्याचा खप वाढतो, खप वाढला असतां तें महाग होतें. धान्य महाग झालें, ह्मणजे लागवडींतील शेवटली जमीन खालच्या पायरीवर येते, व तसें झालें ह्मणजे सारे वाढलेच पाहिजेत. कारण कोणत्याही जमिनीचा सारा ह्मटला ह्मणजे, त्या जमिनीचें उत्पन्न व लागवडींतील शेवटल्या जमिनीचें ( कीं, जिला सारा मुळींच येत नाहीं अशींचें ) उत्पन्न, यांतील अंतर होय; आणि हें अंतर वाढलें कीं, सारे वाढले असेंच ह्मणावयाचें.

मागें सांगितलेंच आहे कीं, जमिनीच्या उत्पन्नाच्या तीन वांटण्यांपैकीं सारा हा जमिनीच्या मालकास मिळतो. तेव्हां जसजसे सारे वाढतील तसतसा जमिनीच्या मालकास अधिक फायदा होईल, हें खरें आहे; पण इतर सर्व लोकांचा त्यांत फार तोटा आहे. कारण धान्य महाग झाल्यावांचून तर सारे वाढत नाहींत; आणि एक धान्य महाग झालें कीं, सगळ्या जिनसांची किंमत एकदम वाढते. निर्वाहास लागणाऱ्या शेंकडों वस्तु महाग झाल्यानें उपजीविकेचा खर्च

प्रमाणापेक्षां फार अधिक होऊं लागतो; आणि गरीबगुरिबांस खाण्याची पंचाईत पडते. सर्वत्र महर्गता झाल्यानें जो तो कफल्लक. संचय व भांडवल कोठेंच नाहीं. त्यामुळें मजुरांसही धंदा मिळेनासा होऊन चोहोंकडे मोठी दुर्दशा उडून जाते.

कितीएक लोकांचा असा समज आहे कीं, देशांतील लोकसंख्या जेवढी वाढेल तेवढा देश समृद्ध होतो. लोकसंख्या वाढणें हें देशाच्या सुस्थितीचें लक्षण आहे, असें ते मानतात. ही समजूत सर्व स्थलीं बरोबर आहे, असें ह्मणतां येत नाहीं. कारण देशांत लोकसंख्या वाढल्यानें धान्याचा खप वाढतो. देशांतील उत्तम जमीन सर्व लागवड होऊन गेली असल्यामुळें, वाढलेल्या खपाकरितां नीरस जमिनी लागवड कराव्या लागतात; व तेणेंकरून धान्याच्या उत्पत्तीचा खर्च वाढून, देशाचें काय नुकसान होतें, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. उपजीविकेचा खर्च न वाढतां जर लोकसंख्या वाढू शकेल, तर मात्र देशाचें कांहीं नुकसान नाहीं. आस्ट्रेलिया किंवा अमेरिकेसारख्या देशांत, जेथें सुपीक जमीन हवी तेवढी मोकळी पडली आहे, मजुरांची संख्या थोडी आहे, तेथें लोकसंख्या वाढल्यानें कदाचित् फायदा होईल, हें खरें आहे. पण हिंदुस्थानासारख्या जुन्या दाट वस्तीच्या देशास ती गोष्ट लागू पडणार नाहीं. येथें चांगली जमीन फारशी मोकळी राहिलेली नाहीं; ह्मणून या देशांतील लोकसंख्या वाढली असतां, याची सुस्थिति न होतां उलट दुःस्थितीच होईल.

लोकांची दुसरी एक चुकीची अशी समजूत आहे कीं, 'सारे वाढले असतां धान्य महाग होतें.' साऱ्याचें खरें

स्वरूप सांगितलेंच आहे; त्यावरून समजलेंच असेल कीं, धान्याची किंमत कमजास्त होणें, ती सारे वाढल्यानें होते असें नाहीं. धान्याची किंमत ठरणें ती, लागवडींतील शेवटल्या जमिनींत तें उत्पन्न करण्यास लागणाऱ्या, उत्पत्तीच्या खर्चानें ठरली जाते. तसल्या जमिनींत केलेल्या धान्याचा खर्च निघेल, इतकी त्याची किंमत आलीच पाहिजे; व या जमिनीस तर सारा मुळींच येत नाहीं. तेव्हां धान्याची किंमत मुकरर झाली, ती सारा नसणाऱ्या जमिनींत तें करण्यास लागणाऱ्या खर्चानें झाली. ह्मणून किंमत ठरण्यांत साऱ्याचा विचार मुळींच करण्यांत आला नाहीं, म्हटलें असतां चालेल. कदाचित् अशी कल्पना केली कीं, सगळ्या जमिनींचे सारे एकदम माफ केले तर धान्य स्वस्त होईल कीं काय, हें पाहिलें पाहिजे. पण तसें मुळींच होणार नाहीं. सारे माफ केले, तर जमिनीच्या मालकांचें नुकसान होऊन, शेतकऱ्यांस फायदा होईल, इतकेंच कायतें. धान्याच्या किंमतींत त्यामुळें फेरफार होणार नाहीं. कारण धान्य स्वस्त होईल, तर लागवडींतील शेवटली जमीन कांहीं पायऱ्या वर चढली पाहिजे; ह्मणजे पुष्कळ जमीन लागवडींतून निघून गेली पाहिजे. लागवडींत असलेली पुष्कळ जमीन कमी झाल्यानें धान्य कमी उत्पन्न होईल, व एकंदर धान्याचा पुरवठा कमी होईल. पण धान्याचा पुरवठा कमी होऊन निभणार नाहीं. पूर्वींइतकें धान्य उत्पन्न झालेंच पाहिजे, ह्मणून पूर्वींइतक्या सर्व जमिनी लागवड केल्याच पाहिजेत. ह्मणजे निकृष्ट जमिनी लागवडींतून काढून टाकतां येत नाहींत; व जर हलक्या जमिनी लागवड करणें भाग

आहे, तर धान्य स्वस्त होऊन चालणार नाहीं. कारण लागवडींतील शेवटल्या जमिनींत तें करण्यास लागणारा खर्च निवेल, इतकें तें महाग असलेंच पाहिजे; मग त्या जमिनीवर सारा घेतला असो, अगर माफ केला असो.

एवढा वेळ सारा घेण्याच्या दोन रिवाजांपैकीं दुसरा ह्मणजे ज्या ठिकाणीं सारे स्पर्धेनें अथवा चढाओढीनें ठरले जातात, त्याचा विचार करण्यांत आला. कांहीं ठिकाणीं सारे चढाओढीनें मुकरर न होतां, देशरिवाजाप्रमाणें अगर विशेष करारानें ठरले जातात. रिवाजाप्रमाणें सारे मुकरर होणें, ह्मणजे जमिनीचे उत्पन्नाचा अमुक अंश मालकानें घ्यावा असा रिवाज असतो; जसे, भागबटाईचा रिवाज इत्यादि. बंगाल्यांत सारे एकदम सरकारी ठरावानेंच मुकरर करून टाकिले आहेत, त्यांत कमीजास्त होऊं शकत नाहीं. त्या रिवाजास 'परमेनेंट* सेटलमेंट' असें ह्मणतात. भागबटाई इ० रिवाजास अनुसरून सारा घेतल्यामुळें, जमिनीचे मालकास व शेतकऱ्यास नफा व नुकसान तंतोतंत समसमान होतें. तो रिवाज सुरू असल्यानें शेतकऱ्यास तर अत्यंत सुलभता होते. त्याचें पूर्णपणें स्पष्टीकरण करण्यास येथें अवकाश नाहीं. बंगाल्यांत 'परमनेंट सेटलमेंट' असल्यामुळें, व जमिनीची मालकी लोकांकडे असल्यानें, जमीनदारास फार मोठा फायदा राहतो. आणि जमिनीचे आपण धनी आहों, आपलें स्वत्व तिजवरून निघणार नाहीं, अशी लोकांची पूर्ण खात्री असल्यामुळें, नेहमीं ते लोक जमिनींत भांडवल घालून तिची सुधारणा करितात, व त्यामुळें अधिक उत्पत्ति

* जे सारे कधीं कमजास्त होत नाहींत तसला रिवाज.

होऊन मजुरास व देशास व परंपरेनें सरकारासही फायदा होतो. मुंबई वगैरे जिल्ह्यांत, ज्यास रयतवारी ह्मणतात त्या रिवाजाप्रमाणें सारा घेतला जातो. या रिवाजाप्रमाणें जमिनीची मालकी लोकांकडे नाहीं. तिचे मालक सरकार आहे. असला रिवाज हिंदुस्थानाशिवाय, तुर्कस्तान, ईजिप्त, इराण इ० देशांत मात्र आहे. सरकार नेहमीं सारा मात्र घेतें, पण जमीन सुधारण्यास भांडवल कधींच खर्चीत नाहीं. भांडवल खर्च करून जमीन सुधारण्याचा बोजा रयतेवरच पडतो. सरकारी जमीन हवी तेव्हां अनेक सबबींनीं आपल्या ताब्यांतून जाईल, अथवा सरकार आपले सारे मर्जीस येईल तेव्हां व तितके वाढवील, सबब—भाडेकरी जसा भाड्याचें घर नीटनेटकें करण्याच्या भानगडींत पडत नाहीं, तद्वत्—लोकही गांटचें भांडवल खर्च करून जमीन सुधारण्याच्या खटपटींत फारसे पडत नाहींत. यदाकदाचित् भांडवल खर्च करून जमीन सुधारलीच, तर त्या सुधारणेपासून होणारा सर्व लाभ रयतेस मिळत नाहीं. सारे वरचेवर बदलत असल्यामुळें बहुधा सरकारासच विशेष फायदा मिळतो. जमीन आपली नाहीं, व सुधारणा केली असतां मिळावा तसा फायदा आपल्यास मिळत नाहीं, असें लोकांस एकवेळ वाटूं लागलें, ह्मणजे ते जमीन सुधारण्यास मागेंपुढें पाहतात, व तिच्यावर पैसा खर्च करण्यास त्यांची हिंमत होत नाहीं. जमीन वहीत करो अगर पडीत राखो, सारे बिनचूक दरसाल खात्यांतील सगळ्या जमिनींवर भरावे लागत असल्यानें, सर्व जमीन जशी होईल तशी लागवड करावीच लागते. एकादे वर्षींही ती पडीत टाकून चालत नाहीं; कारण जमीन

साल जमीन एकसारखी वहीत होत असल्यानें, व तिची मेहनतमशागत वरील कारणांमुळें नीट होत नसल्यानें, ती दिवसेंदिवस निःसत्व होत जाऊन तींत नीटसें उत्पन्न होईनासें होतें. पीक कमी झालें, ह्मणजे भागबटाई रिवाजाप्रमाणें सारा आपोआप कमी होतो; तसा रयतवारी रिवाजानें होत नाहीं. एक वेळ बसलेले सारे कमी होण्याची तर मुळींच आशा नसते, उलट ते सरकार वाढवितें; त्यामुळें शेतकऱ्यास नफा राहिनासा होतो, आणि तोटा होऊं लागल्यामुळें, अर्थात् जमिनी सोडल्याशिवाय गत्यंतर नसतें. पण जमिनी सोडून परिणाम लागत नाहीं. खावयास पाहिजे. शेतीच्या धंद्याशिवाय लोकांस दुसरा धंदा नसल्यानें, कांहीं झालें तरी पोटासाठीं जमीन लागवड केल्याशिवाय उपायच चालत नाहीं. ह्मणून तोटा सोसूनही लोक जमिनी वहीत करण्याचें अगदीं कडेलोट होईपर्यंत सुरूच ठेवतात. उत्पन्न थोडें होऊन सारा फिटला नाहीं, ह्मणजे कर्ज काढावें. कर्ज तरी फेडावें कशानें? अखेरीस कर्जाचे पायीं घरादाराचा लिलांव होतो व जमीन सरकार हिसकावून घेतें. घरदार गेलें; निर्वाहाचें साधन एक जमीन तेंही नाहींसें झालें; त्यामुळें लाखों लोक निरुद्योगी होऊन भीक मागत फिरूं लागतात. त्यांस मोलमजुरी सुद्धां मिळत नाहीं. सरकारचेंही बरेंच नुकसान होतें. बरीच जमीन पडीत राहिल्यानें एकंदर धान्य कमी उत्पन्न होऊन महर्गता फार होऊं लागते. अशांत एकादे वर्षीं, पाऊस पडला नाहीं कीं, सगळ्या देशभर भयंकर दुष्काळ पडण्याची भीति येऊन पडते, व कोट्यवधि लोकांचे नुसते

जीव रक्षण करण्याची पंचाईत पडून, लाखों लोक मृत्युमुखांत पडतात. मुंबई इलाख्यांत व मद्रास इलाख्यांतील कांहीं भागांत, रयतवारी रिवाज जारीनें सुरू आहे. तेथील रयतेची काय स्थिति आहे, हें अनुभवानें पुष्कळांस पाहण्यास सांपडेल. मुंबई इलाख्यांत तर रयतेची स्थिति सुधारण्यास विशेष कायदे करण्याची जरूर पडली आहे. दुष्काळ इतके वारंवार व भयंकर पडूं लागले आहेत कीं, त्यांचे निवारणासाठीं स्वतंत्र कायमचा फंड काढणें सरकारास भाग पडलें आहे. मद्रास इलाख्यांत मागल्या दहाबारा सालची सरासरी पाहिली असतां, दरसाल ३५००० * इसमांचे जमिनीची विक्री ( लिलांव ) सरकारांतून करण्यांत आली आहे, असें दिसेल. इतक्या लोकांची जमीन, जिच्याशिवाय त्यांना दुसरें निर्वाहाचें साधन नाहीं, ती गेल्यावर त्या लोकांच्या कुटुंबांची व मुलाबाळांची काय दशा होत असेल? या लोकांस निर्वाहाचें साधन दुसरें कांहीं मिळालें आहे काय? दुसरा कोणता धंदा हे लोक करितात, हें समजल्यास फार बरें होईल. सालोसाल हाच क्रम चालू राहील, तर देशाची काय दशा होईल, तें कळण्यास फारसा विचार करण्याची जरूर नाहीं. या परिणामावरून रयतवारी रिवाज सरकारास व

* India सन १८९६ च्या जून महिन्याचा अंक पान १८० मध्यें दिलेलें कोष्टक पहा. सालवार आंकडे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८८३–८४ | ८४–८५ | ८५–८६ | ८६–८७ | ८७–८८ | ८८–८९ |
| १३०७१४ | ६३६१० | ४१८३३ | ३०९१५ | ३५१७० | १७३४६ |
| ८९–९० | ९०–९१ | ९१–९२ | ९२–९३ | ९३–९४ | |
| ११३१९ | १०९१५ | ११११८ | १२४०० | १४१९८ | |

रयतेस हितकारक आहे किंवा कसें, हें रयतेचे व देशाचे हित चिंतक आणि राजकारणी पुरुष यांनीं विचार करून पहावें.

जमिनीच्या उत्पन्नापैकीं जो भाग साऱ्याचे रूपानें येतो, तो ज्यांस घेण्याचा आहे, त्यांनीं तो कोणत्या रिवाजानें घ्यावा, किती घ्यावा, तो कशा रितीनें घेतला असतां आपल्यास, रयतेस, व देशास हितकर होईल, हें फार विचार-पूर्वक ठरवावें.

उत्पत्तीचे जे तीन वांटे—सारा, मजुरी व नफे, त्यांपैकीं साऱ्याविषयीं, ह्मणजे जमिनीचे मालकास जो भाग मिळतो, त्याविषयीं विचार येथवर झाला. पुढील भागांत मजुरीविषयीं ह्मणजे झालेल्या उत्पत्तीपैकीं मेहनतीबद्दल मजुरांस जो अंश मिळतो, त्याविषयीं विचार करूं.

## भाग ३

### मजुरीविषयीं.

०*०

भांडवलाचे, अचल ( गुंतून पडलेलें ) भांडवल व चल ( फिरतें ) भांडवल, असे दोन भेद सांगितले. अचल भांडवलांत हत्यारें, यंत्रें, कारखान्याचीं घरें, वगैरेंचा समावेश होतो, आणि चल भांडवलांतून मजुरास मजुरी मिळते, असें मागें सांगण्यांत आलेंच आहे. ज्याअर्थी हें भांडवल जसजसें वाढेल, तसतसा मजुरांचा विशेष फायदा आहे; व कोणत्याही कारणांनीं हें भांडवल कमी होऊं लागलें कीं, तितक्या अंशानें मजुरांचा तोटा होत जाईल.

मजुरीचे दर ठरणें, ती कमीजास्त होणें, या गोष्टी, जसा जमिनीचा सारा स्पर्धेनें ठरला जातो, तशाच स्पर्धेनें मुकरर होतात. ज्यांच्याजवळ भांडवल आहे, ते लोक मजुरांस जितकी मजुरी कमी देतां येईल, तेवढी कमी देण्याचा प्रयत्न नेहमीं करतात; आणि मजुरांचा यत्न नेहमीं जास्त मजुरी मिळविण्याचा असतो. पुष्कळ लोकांस एकदम मजुरांची जरूर लागते; आणि कामें नाहींशीं झालीं, ह्मणजे मजुरीचे दर उतरतात.

तर मग मजुरीचे दर कशानें ठरले जातात, हें समजणें फारसें कठीण नाहीं. मजुरांस देण्याकरितां वेगळा काढलेला भांडवलाचा जो भाग, अथवा देशांतील चल भांडवल, आणि एकंदर मजुरांची संख्या, यांच्या परस्पर प्रमाणानें मजुरी हमेशा ठरली जाते. एकंदर भांडवल मजुरांच्या एकंदर संख्येवर वांटलें जावयाचें आहे. ह्मणून जर भांडवल जेवढेंचे तेवढेंच राहून मजुरांची संख्या वाढेल, तर दरएक मजुरास भांडवलाचा जो अंश मिळावयाचा तो कमी मिळूं लागेल; ह्मणजे मजुरीचे दर कमी होतील. तसेंच मजुरांची संख्या जितकीच्या तितकीच राहून, भांडवल कमी झालें असतांही तोच परिणाम होईल. भांडवल वाढून मजुरांची संख्या कायम राहील, अथवा भांडवल जेवढेंचें तेवढेंच राहून मजूर कमी होतील, तर मजुरी वाढेल.

वरील विचारावरून दिसून येईल कीं, मजुरीचे दर वाढणें हें देशाचे सुस्थितीचें दर्शक आहे. मजुरीचे दर वाढण्यास भांडवलांची वृद्धि झाली पाहिजे. भांडवलाची वृद्धि न करितां इतर कृत्रिम उपायांनीं मजुरी वाढविण्याचा

८-५१८-१००१

यत्न केला असतां, तो निष्फळ होईल. भांडवलाची वृद्धि होणें हें संचयाचें फळ आहे. आणि संचय होण्यास सर्व वस्तु स्वस्त होऊन उपजीविकेचा खर्च कमी झाला पाहिजे. वस्तु स्वस्त होणें आहेत, तर त्यांच्या उत्पत्तीचा खर्च कमी झाला पाहिजे; आणि उत्पत्तीचा खर्च कमी होणें, तो उत्पत्तीच्या कामीं यंत्रांचा उपयोग केल्याशिवाय होत नाहीं, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे.

उत्पत्तीच्या कामीं यंत्राचा उपयोग केल्यानें दुसऱ्या रीतीनें भांडवल वाढलेंसें होतें; तें असें कीं, यंत्राच्या साहाय्यानें उत्पत्ति होऊं लागल्यामुळें, उत्पत्तीचा खर्च पुष्कळ कमी लागतो, व त्यामुळें भांडवलाचा बराच अंश बचला जातो. हा बचलेला भाग भांडवलांत अधिक झाला असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. एका कारखानदारापाशीं १००० रुपये भांडवल असून, तो आपल्या कारखान्यांत ४०० मजुरांस काम देतो, असें मानूं. दरेक मजुरास दोन रुपयांप्रमाणें ८०० रुपये मजुरीचे, व दोनशें दुसरा खर्च त्याला होत असे. कांहीं दिवसांनीं कारखानदारानें यंत्रें आणून त्यांच्या साहाय्यानें उत्पत्ति करण्यास आरंभ केल्यामुळें, उत्पत्तीचा खर्च शेंकडा दहा रुपये कमी लागूं लागला असें मानिलें, तर त्याचे एकंदर १०० रुपये वांचलेसें होईल. उत्पत्ति पूर्ववत् होत असून व पूर्वींइतकी मजुरांस मजुरी मिळत असून, ही जी शिल्लक राहिली, तितकें भांडवल अधिक झालें, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. हें शंभर रुपये भांडवल उपयोगांत आणिलें असतां, दरेक मजुरास पूर्वींपेक्षां चारआणे मजुरी जास्त मिळेल, अथवा

दरएकास २ रुपयेप्रमाणें ५० नव्या मजुरांस रोजगार मिळेल.

चल भांडवलांतून मजुरांस मजुरी मिळते, ह्मणून मजुरांची स्थिति सुधारणें असेल, तर या प्रकारचें भांडवल वाढविलें पाहिजे. पण चल भांडवल वाढत जाईल तसतशी जर मजुरांची संख्या वाढत गेली, तर त्यांची स्थिति सुधारणार नाही हें उघड आहे. ज्याप्रमाणें सुपीक जमीन, हवापाणी उत्तम, वगैरे अनुकूल गोष्टी असतील. तेथें नानातऱ्हेचें वृक्ष, भाजीपाला इत्यादींची समृद्धी असते, त्याप्रमाणेंच ज्या देशांत संपत्ति पुष्कळ, लोकांचे राहण्याचे रिवाज चांगले, मजुरांस मजुरी चांगली, तेथें लोकसंख्या बरीच झपाट्यानें वाढत असते. लोकसंख्या कशी व कोणत्या रीतीनें वाढते, यासंबंधानें ' माल्थस ' नांवाच्या एका विद्वान् ग्रंथकर्त्यानें चांगलें प्रतिपादन केलेलें आहे. त्याचे ह्मणण्याचा सारांश असा आहे कीं, लोकसंख्या इतक्या झपाट्यानें नेहमीं वाढत आहे कीं, तो क्रम कांहीं वर्षे अव्याहत चालू राहील, तर पृथ्वीवर उभें राहण्यासही जागा उरणार नाहीं. पण तसें होत नाहीं. लोकसंख्या वाजवीपेक्षां जास्त न वाढावी या हेतूनें सृष्टीकर्त्यानें कांहीं प्रतिबंध ठेविलेले आहेत. लढाया, दुष्काळ, रोगांच्या साथी, तुफानें, धरणीकंप, वगैरे अनेक दैविक कारणांनीं पुष्कळ लोकसंव्हार होत असतो. कांहीं सुधारलेल्या देशांत लोकसंख्या कृत्रिम उपायांनीं कमी करण्याचा यत्न सुरू आहे. उदाहरणार्थ, फ्रान्स देश. परंतु अशा उपायांनीं लोकसंख्या आटोक्यांत राखतां येईल किंवा नाहीं, याचा संशय आहे.

तसेंच ज्या देशांत कृत्रिम उपायांनीं लोकसंख्या कमी करण्याचे यत्न जारी आहेत, त्यांच्या नीतिमत्तेविषयीं काय अनुमान करावें, याबद्दल विचारच आहे.

मजुरीविषयीं विचार करीत असतां, लोकसंख्यावृद्धीच्याही विचार करणें जरूर पडतें. कारण देशांतील लोकसंख्या ज्या मानानें कमीजास्त होते, त्या मानानें मजुरीचे दरावर अधिकउणा परिणाम होतो. देशांतील भांडवल न वाढतां, लोकसंख्या वाढेल, तर दोन परिणाम होतात. एक तर भांडवलापैकीं दरेकास जो अंश मिळत असे, त्यापेक्षां कमी मिळूं लागेल, ह्मणजे मजुरी थोडी मिळेल; व दुसरी लोकसंख्या वाढल्यानें धान्याचा खप वाढून तें महाग होतें. इकडे मजुरी कमी झाली, तिकडे धान्य महाग झालें. यामुळें मजुरांस पुरेपुर पोटास मिळेल. हिंदुस्थानासारख्या देशांत—ह्मणजे जेथें भांडवल मुळींच वाढत नाहीं ह्मटलें तरी चालेल; आणि लोकसंख्या मात्र, देशांत दंगेधोपे, लढाया, इत्यादि बंद होऊन सर्वत्र शांतता झाल्यामुळें, एकसारखी अव्याहत वाढत चालली आहे, अशा देशांत—मजुरीचे दर काय आहेत, व मजुरांची स्थिति कशी आहे, हें पाहिलें असतां, वरील सिद्धांत अगदीं यथार्थ आहेत, हें सहज अनुभवास येईल.

मजुरीचा विचार करीत असतां, दुसऱ्या एका सिद्धांताचा विचार होतो; तो असा कीं, ' जिन्नस महाग झाल्यानें ते तयार करणारे मजुरांची मजुरी वाढते असें सर्वत्र होत नाहीं. ' नुकतेंच सांगण्यांत आलें कीं, मजुरीचे दर ठरणें, हें देशांतील भांडवल, व मजुरांची संख्या, ह्यांचे प्रमाणावर

अवलंबून असतें. मग जिनसांची किंमत वाढल्यानें मजुरीचे दरांत कसा फेरफार होतो हें पाहिलें पाहिजे.

पदार्थाची किंमत उत्पत्तीच्या खर्चावरून ठरते; आणि उत्पत्तीच्या खर्चांत पुष्कळ गोष्टींचा समावेश होतो. माल तयार करण्यास मजुरी, भांडवलाबद्दल नफा, माल नेण्याआणण्याचा खर्च, कच्च्या मालाची किंमत, त्यावर पडणारी जकात, इत्यादि अनेक प्रकारचे खर्च मिळून उत्पत्तीचा खर्च होतो. ह्या निरनिराळ्या खर्चांपैकीं कोणताही एखादा खर्च वाढला कीं, लागलीच उत्पत्तीचा खर्च जास्त होऊन जिनसांची किंमत वाढेल. नेण्याआणण्याचा खर्च, कच्च्या कामाची किंमत, जकाती, ही सर्व वाढलीं, व मजुरी जितकीच्या तितकीच राहिली, तरी जिन्नस महाग होतीलच. यावरून किंमत वाढली असतां मजुरी वाढलीच पाहिजे, असें ह्मणतां येणार नाहीं.

एखाद्या जिनसेची किंमत वाढली असतां, ती करणाराची मजुरीही थोडे दिवस वाढूं शकेल, पण लवकरच ती पूर्व ठिकाणीं येऊन बसेल. कल्पना करा कीं, एका जातीच्या कापडाची किंमत फार वाढली. किंमत फार येऊं लागून नफा फार होतो, असें पाहून इतर लोक आपआपलें भांडवल त्या प्रकारचें कापड करण्याच्या कारखान्यांत घालूं लागतील. यामुळें त्या विवक्षित धंद्यांत भांडवल जास्त झालें, पण तसल्या प्रकारचें कापड करणारे मजुरांची संख्या एकदम वाढवितां येणार नाहीं. मजूर पूर्वी इतकेच राहून भांडवल वाढल्यामुळें, मजुरांस मजुरी जास्त मिळूं लागेल हें खरें आहे; तथापि ही स्थिति फार वेळ टिकणार

नाहीं. ज्या कारखान्यांतील भांडवल कापडाचे कारखान्यांत घालण्यांत आलें, त्या कारखान्यांतील मजूर रिकामे पडले, ते लवकरच कापडाच कारखान्यांत शिरूं लागतील; व त्यामुळें कापडाचे कारखान्यांतील मजुरांची संख्याही वाढेल. भांडवल वाढलें त्यामुळें मजुरांचे दर वाढले होते. आतां मजुरांची संख्या वाढली, त्यामुळें पुनः मजुरी कमी होऊं लागेल. शिवाय नवीन भांडवल येऊन कापडाची अधिक उत्पत्ति होऊं लागल्यानें, त्याचा पुरवठा लवकरच वाढेल; व पुरवठा वाढल्यानें किंमत कमी होऊं लागेल. किंमत कमी झाली व मजुरी वाढली असतां, व्यापाऱ्यास नफा थोडा राहूं लागेल; आणि नफा फारसा होईनासा झाला, ह्मणजे व्यापारी हळके हळके कापडाचे कारखान्यांतून आपलें भांडवल काढून घेऊं लागतील, व त्यामुळें पुनः मजुरीचे दर पूर्व ठिकाणीं येऊन ठेपतील.

ज्याअर्थी मजुरीचे दर स्पर्धेनें ठरतात हें सिद्ध झालें, त्याअर्थी आळशी व निरुद्योगी लोकांस फुकट खावपास घालण्यानें मजुरांचें व एकंदर सगळ्या देशाचें नुकसान होतें, हें लक्षांत येण्यासारखें आहे. आळशी लोकांचे हातून कोणत्याही तऱ्हेची संपत्तीची उत्पत्ति होत नाहीं, सबब जेवढा त्यांचे पोषणास खर्च लागतो, तेवढा अनुत्पादक व्ययच होय, व तेवढ्या मानानें ते देशांतील भांडवल कमी करितात. शिवाय पुष्कळ लोक निरुद्योगी राहिल्यानें, खरें काम करणारे लोक फार थोडे उरतात, व त्यामुळें मजुरीचे दर वाढतात. दरएक कामास अधिक मजुरी पडून, देशांतील भांडवलाचा बहुतेक भाग विनाकारण मजुरींतच खर्च

होऊन जातो, आणि त्यामुळें उत्पत्ति फार कमी होऊं लागते. दिवसेंदिवस देशांतील संपत्तीचा व भांडवलाचा ऱ्हास होत जातो. शिवाय ज्या मजुरांस मजुरी जास्त मिळूं लागते, त्यांचाही त्यामुळें खरा फायदा होतो असें नाहीं; कारण मजुरीचे दर वाढल्यानें उत्पत्तीचा खर्च वाढून पदार्थ महाग होतात. त्यामुळें मजुरांस पोषणाचा खर्चही अधिक होऊं लागतो. ह्मणून जास्त मजुरी मिळाल्यानें त्यांचा जो वास्तविक फायदा व्हावा, तो होत नाहीं. निरुद्योगी लोकांस आयतें खावयास घालून देशांत आळशांची संख्या वाढविण्यापेक्षां धर्म वगैरे करणें, तो विद्यावृद्धि इ. उत्तम कामांकडे केल्यास देशाचा फार मोठा फायदा होईल, हें धार्मिक लोकांस सांगण्याची फारशी जरूर आहे असें नाहीं.

मजुरीचे दर साधारणपणें कोणत्या कारणांनीं ठरतात, त्यांचा विचार एवढा वेळ झाला. आतां निरनिराळें धंद्यांत मजुरीचे दर कमजास्त होण्याचीं काय कारणें आहेत, तीं पाहिलीं पाहिजेत. हीं कारणें आडम स्मिथ नांवाच्या ग्रंथकारानें दिलेलीं आहेत; तीं थोडक्यांत खालीं दिलीं आहेत.

१. **पहिलें कारण.**—धंद्याची मनोरंजकता किंवा निरसता, तसेंच त्यापासून प्राप्त होणारा मोठेपणा किंवा हलकेपणा. जसें, कोळशाचे खाणींत काम करणारास अगर खाटकाचा धंदा करणारास इतर धंद्यापेक्षां जास्त मजुरी मिळेल.

२. **दुसरें कारण.**—कामाची सुलभता अथवा काठिण्य; व तें शिकण्यास कमीजास्त लागणारा खर्च. जसें, कांचेचीं भांडीं करण्यास शिकणें फार कठीण आहे, व खर्चही फार

लागतो; उत्तम गाणें शिकणें फार श्रमाचें व खर्चाचें काम आहे. ह्मणून या धंद्यांतील मजुरांस मजुरी जास्त मिळेल.

३ तिसरें कारण.–धंदा सतत चालणारा किंवा तुट मुदतपर्यंत चालणारा असेल, त्या मानानें मजुरी कमीजास्त होईल. जसें मीठ पिकण्याचा धंदा बारा महिने चालत नाहीं, फक्त उन्हाळ्यांत तो चालतो; यामुळें त्या धंद्यांतील मजुरास जास्त मजुरी मिळते.

४. चवथें कारण.–सोंपलेलें काम जास्त भरंवशाचें असतें त्या वेळीं मजुरीचे दर अधिक असतील. जसें, जवाहिऱ्याचे घरचे नोकर; एंजिन ड्रायव्हर, गार्ड्स, पोलीस, पोष्ट खात्यांतील लोक, तिजोरीकडील लोक, वगैरेंवर फार भरंवशाचीं कामें सोंपलेलीं असतात; ह्मणून त्यांस मजुरी अधिक दिली पाहिजे.

५. पांचवें कारण.–हातीं धरलेला धंदा साध्य होण्याचा कमीजास्त संभव असेल, त्या मानानें मजुरीही कमीजास्त होईल. जसें, शिंप्याचा धंदा साध्य होण्यापेक्षां वकिलाचा धंदा साध्य होण्याची खातरी कमी. सबब वकिलाचे धंद्यांत मजुरी जास्त मिळेल.

या पांच कारणांनीं जरी निरनिराळ्या धंद्यांतील मजुरीचे दर कमीजास्त होतात; तथापि मजुरीचे दर ठरणें, तें देशांतील चल भांडवल, व मजुरांची संख्या यांचे प्रमाणावर अवलंबून असतें. हा जो सर्वसाधारण सिद्धांत आहे, त्यास कोणत्याही रीतीनें बाध येत नाहीं.

येथपर्यंत जमिनीचे मालक व मजूर यांस मिळणारा जो उत्पन्न झालेल्या संपत्तीचा भाग, ह्मणजे ' सारा '

आणि ' मजुरी ' त्याचा विचार करण्यांत आला. आतां संपत्ति उत्पन्न होण्याचें तिसरें कारण जें भांडवल, त्या भांडवलाचा, ह्मणजे भांडवलाचें ' व्याज ' ह्मणतात, त्याबद्दल विचार करणें राहिलें आहे. तो पुढील भागांत करण्यांत येईल.

## भाग ४

## भांडवलावरील नफे.

संपत्ति उत्पन्न करण्यास मुख्य तीन गोष्टींची आवश्यकता आहे; जमीन, श्रम, व भांडवल, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. उत्पन्न झालेले संपत्तीची वांटणीही या तीन भागांनींच झाली पाहिजे; म्हणजे जमिनीचे मालक, श्रम करणारे मजूर, व भांडवलवाले सावकार, या तिघांमध्यें उत्पन्न झालेली संपत्ति वांटली जाते, हें सांगून जमिनीचे सारे, व मजुरांची मजुरी, या दोन गोष्टींचा विचार मागील भागांत करण्यांत आला. आतां या भागांत राहिलेलें तिसरें कारण जें ' भांडवल ' यास मिळणारा जो संपत्तीचा भाग, ज्यास ' नफा ' अथवा ' व्याज ' असें साधारणपणें ह्मटलें जातें, त्याविषयीं विचार करणें आहे.

पुढें उत्पत्ति व्हावी या हेतूनें वेगळा ठेविलेला संपत्तीचा जो भाग, त्यास भांडवल असें ह्मणतात, हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. भांडवल हें संचयाचें फळ आहे, आणि उत्पत्ति होण्यास त्याचा व्यय झाला पाहिजे, या गोष्टींचेंही विवेचन मागें झालेंच आहे. आतां संचय कसा होतो

व त्याचा व्यय कशा प्रकारें होईल, हें पाहिलें पाहिजे. ऐष-आरामाचे पदार्थ घेणें बंद करून, अनेक प्रकारच्या सुखा-पैकीं कांहीं सुखें सोडून देण्याचा मनाचा निग्रह झाल्याशिवाय संचय होणार नाहीं. संचय करणें हें सोपें काम नाहीं. जवळ असलेला पैसा चैनबाजींत इकडे तिकडे उडवून गंमत करणें सर्वांस बरें वाटतें. पण संचय करण्यास मनाचा मोठा अवरोध करावा लागतो. संचय करण्यास जर एवढे आयास करावे लागतात, तर ज्यांनीं ते सोसून मोठ्या कष्टानें संचय केला आहे, ते लोक कांहीं तरी बदला मिळाल्याशिवाय आपण केलेल्या संचयाचा फायदा इतर लोकांस फुकट घेऊं देण्यास कबूल होणार नाहींत हें उघड आहे. दुसऱ्यांनीं केलेल्या संचयाचा उपयोग अगर व्यय कोणास करणें झाल्यास त्याबद्दल कांहीं तरी मोबदला संचयास मिळाला पाहिजे. हा मोबदला कशांतून घ्यावयाचा ? संचयाचा उपयोग जर उत्पत्तीच्या कार्यांत करून घेणें असेल, तर उत्पन्न होणारे संपत्तींतूनच कांहीं अंश संचयवाल्यास मिळाला पाहिजे. हा जो, होणारे उत्पत्तीचा अंश, संचयवाल्यास अथवा भांडवलवाल्यास त्याचे संचयाचे अथवा भांडवलाचे उपयोगाबद्दल मिळतो, त्याला ' भांडवलाचा नफा ' असें अर्थशास्त्रांत नांव आहे.

' भांडवलाचा नफा ' व ' भांडवलाचें व्याज ' ह्यांत भेद आहे. उत्पत्तीचे कामीं अगर इतर कोणत्याही कामीं, वापरण्यासाठीं कर्जाऊ दिलेल्या पैशाचे मोबदला जें व्याज मिळतें, त्यास व्याज ह्मणतात. व्याज मिळविणारा मनुष्य उत्पत्ति करीत नाहीं, धंदा चालविण्याची जोखीम त्याजवर

नाहीं. जेव्हां जोखीम व खर्च सोसावा न लागतां दिलेल्या पैशाबद्दल मोबदला मिळतो, तेव्हां त्या मोबदल्यास ' व्याज ' असें ह्मणतात.

जसें, सरकारी बँकेंत पैसे ठेविल्यानें ते बुडण्याची जोखीम अगर धास्ती मुळींच नाहीं, व ठेविल्यास पैशावर बँकवाले जे धंदे करतात, त्यांजवर देखरेख ठेवण्यास जो खर्च करावा लागत असेल, तो खर्चही बँकेंत पैसे ठेवणारास करावा लागत नाहीं. ह्मणून बँकेंतील पैशाबद्दल जो मोबदला मिळेल, तें व्याज समजलें जाईल. बँकेंत पैसे ठेविले असतां व्याज शेंकडा ४ रुपये मिळतें. बँकेंत न ठेवितां ते दुसऱ्या कोणास कर्जाऊ दिले, तर व्याज अधिक मिळेल; पण पैसे बुडण्याची भीतिही बँकेपेक्षां अधिक राहील. ह्मणून बँकेंतील व्याजाचे दरापेक्षां इतर ठिकाणीं जेवढें कांहीं अधिक मिळेल, तें वास्तविक पाहतां व्याज नसून पैसे बुडण्याचे जोखमेचा मोबदला आहे, असें समजलें पाहिजे. स्वतः एखादा धंदा करण्यांत जोखीम आहे, त्याजवर देखरेख राखण्यासही खर्च लागतो, अशा धंद्यांत पैसे घातले असतां, ब्यांकेचे व्याजापेक्षां जर कांहीं जास्त मिळणार नाहीं, तर तसल्या धंद्यांत पैसा कोणीही घालणार नाहीं. ब्यांकेचे व्याजापेक्षां जें कांहीं मिळेल, तें फक्त व्याजच नसून त्यांत धंद्याची जोखीम व देखरेखीचा खर्च वगैरेंचा समावेश असतो; त्या सर्वांस मिळून ' नफा ' हें नांव आहे. ज्या धंद्यांत जोखीम फार व देखरेख करण्यास खर्चही पुष्कळ त्यांत घातलेल्या पैशाबद्दल ह्मणजे भांडवलाबद्दल ' नफा '

फार मोठा मिळाला पाहिजे. धान्याचा व्यापार करण्यापेक्षां फुलांचा व्यापार करणारा नफा जास्त मिळण्याची इच्छा ठेवील; कारण धान्यापेक्षां फुलें लवकर बिघडून नासून जाण्याचा संभव विशेष असतो, यामुळें फार दक्षता ठेवावी लागते. यावरून ध्यानांत येईल कीं, एखाद्या धंद्यांत घातलेल्या भांडवलाबद्दल व्याज, व त्याशिवाय जोखीम आणि देखरेखीचा खर्च, याबद्दल कांहीं जास्त मोबदला आला पाहिजे. ह्मणून व्याज, धंदा चालण्याची जोखीम, आणि त्याचे देखरेखीचा खर्च, या सर्वांस मिळून भांडवलाचा 'नफा' असें ह्मणतात. नफा हा व्यापक शब्द असून त्यांत व्याजाचा समावेश होऊन जातो. यावरून व्याज आणि नफा हे एक नसून भिन्न आहेत, हें ध्यानांत येईल.

वरील विचारावरून ध्यानीं येईल कीं, सर्व प्रकारचे धंद्यांत 'व्याजाचा दर' बहुधा सारखा असूं शकेल, परंतु नफ्याचा दर सारखा असणार नाहीं. निरनिराळे धंद्यांत कमीजास्त जोखीम असते, व देखरेखीचा खर्चही कमजास्त असतो, सबब त्यांतील नफेही, जोखीम व देखरेखीच्या खर्चाचे प्रमाणानें कमीजास्त असले पाहिजेत. जसजशी जोखीम जास्त, तसतसा नफा अधिक, हें उघड दिसून येईल.

धंद्यांत जोखीम कमीजास्त असल्यानें नफा कमीजास्त होतो हें समजलें. आतां देशांत लोकसंख्या वाढल्यामुळें नफ्यावर काय परिणाम होतात, तें पाहूं. देशांत लोकसंख्या जास्त झाल्यानें मजुरीचे दर कमी होतात, असें मागील भागांत सांगण्यांत आलेंच आहे. तोच नियम भांडवलाव-

रील नफ्यास लागू पडतो. लोकवस्ती जसजशी वाढत जाईल, तसतसे भांडवलावरील नफे कमी कमी होत जातात. ' जमिनीचा सारा ' यापर्यंत सांगितल्याप्रमाणें लोकसंख्या वाढली असतां, निकृष्ट प्रतीच्या जमिनी लागवडींत आणणें भाग पडतें. असल्या जमिनींत धान्य उत्पन्न करण्यास मेहनतीचा व इतर खर्च प्रमाणापेक्षां अधिक होतो; ह्मणजे विवक्षित खर्चापासून जितकें उत्पन्न चांगल्या जमिनींत होत होतें, तेवढें उत्पन्न नीरस जमिनींत होत नाहीं. खर्च वाढला व उत्पन्न कमी झालें. भांडवलाबद्दल मोबदला व श्रमाबद्दल मोबदला मिळावयाचा तो झालेल्या उत्पन्नांतूनच. तें उत्पन्नच कमी झालें, तर त्यांतून भांडवलाबद्दल व श्रमाबद्दल जे भाग मिळावयाचे (नफा व मजुरी) ते अर्थात् कमी होतील. यावरून स्पष्ट होतें कीं, जसजशी लोकसंख्या वाढेल, तसतसा धान्याचा खप जास्त होईल; आणि त्यामुळें, नीरस जमिनी लागवडींत आणाव्या लागून नफे कमी होतील. परदेशांत धान्य फार गेल्यानेंही हाच परिणाम होतो, हें निराळें सांगण्याची जरूर नाहीं. कारण लोकसंख्या देशांत जास्त झाली, अगर देशांतील धान्य परदेशांत फार गेलें, तरी देशांत धान्याचा खप फार वाढतो; आणि तो वाढला म्हणजे लागवडींतील शेवटली जमीन खालीं उतरेल; आणि लागवडींतील जमीन खालीं उतरली कीं, उत्पत्तीचा खर्च प्रमाणापेक्षां जास्त झाल्यानें, नफे व मजुरी हीं दोन्हीही कमी होतात. हिंदुस्थान देशांत लोकसंख्या झपाट्यानें वाढत आहे. दर दहा वर्षांनीं शेंकडा दहा टक्के ती वाढत आहे. तसेंच व्यापाराच्या चमत्कारिक पद्धतीमुळें व परकीय सत्ते-

मुळें, कोट्यावधि खंडी धान्य परदेशांत पाठविणें भाग पडतें. यामुळें या देशांत धान्याचा खप अतोनात वाढून हलक्या-सलक्या, खडकाळ व अत्यंत भयंकर खराब हवेंतील जमिनी लोक निरुपायानें लागवड करूं लागले. त्याचा परिणामः अर्थात् उत्पत्तीचा खर्च वाढून या धंद्यांतील नफे व मजुरी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे, हें अनुभवी लोकांचे ध्यानांत आलेंच असेल.

आतां धान्याचा खप वाढला म्हणजे लागवडींतील शेवटली जमीन खालीं उतरते, आणि लागवडींतील शेवटली जमीन खालीं उतरली ह्मणजे जमिनीचे सारे वाढतात, हें याच भागांत मागें सांगण्यांत आलेंच आहे. ‘ धान्य महाग झालें असतां जमिनीचे सारे वाढले पाहिजेत. ’ असें **रिकार्डो** नांवाच्या ग्रंथकर्त्याच्या मताचें तात्पर्य आहे. रयतवारी रिवाजाप्रमाणें सारे ठरविण्यांत येतात, ते याच मताचे तत्वास अनुसरून बहुधा ठरविले जातात. अशा रीतीनें सारे घेण्यांत आल्यामुळें काय परिणाम होतात, याचें स्पष्टीकरण मागें करण्यांत आलेंच आहे. हल्लीं वरील विचारावरून तीच गोष्ट निराळ्या स्वरूपानें सिद्ध केली आहे. ह्मणजे एकंदर परिणाम या देशांत असा होत आहे कीं, देशांत लोकसंख्या वाढून व परदेशांत पुष्कळ धान्य पाठविलें जाऊन, धान्याचा खप फार वाढत आहे. खप फार वाढला कीं, उत्पत्तीचा खर्च वाढून मजुरीचे दर व भांडवलावरील नफे कमी होतात. इकडे याच कारणासाठीं, ह्मणजे धान्याचा खप जास्त झाल्यामुळें, **रिकार्डोचे** मताप्रमाणें सारे वाढतात. हें तत्व ध्यानांत ठेवून रयतवारी

रिवाज देशांत सुरू करून सरकार आपले सारे एकसारखे वाढवीत आहे. त्यामुळें मजुरीचे दर व नफे यांवर दोन्ही बाजूंनीं अनिष्टकारक परिणाम होत चालला आहे. कारण धान्याचा खप वाढल्यानें एकंदर उत्पन्न खर्चाचे प्रमाणानें वाढत नाहीं, हें तर सिद्धच आहे. उत्पन्न कमी झालें, तर त्याचे जे तीन विभाग व्हावयाचे—जमिनीचे मालकाचा अंश अथवा सारा, मजुराचा अंश अथवा मजुरी, व भांडवलवाल्याचा अंश अथवा नफा—ते तिन्ही कमी झाले पाहिजेत. पण जमिनीचे मालक सरकार आहे, तें फार बलिष्ठ आहे, तें आपला भाग कमी न करितां उलट जास्त जास्त वाढवीत आहे, यामुळें गरीब मजूर व शेतीवर उपजीविका करणारे कोट्यावधि लोक यांचा अंश, ह्मणजे मजुरी व नफे, हा दोन्हीकडून कमी होत चालला आहे. हें विचार करण्यासारखें आहे.

यावरून लक्षांत येईल कीं, देशांत लोकसंख्या वाढल्यापासून फार अनिष्ट परिणाम होतात. एका बाजूनें जमिनीचे सारे चढले जातात, व दुसऱ्या बाजूनें भांडवलावरील नफे कमी होतात, व मजुरीचे दर उतरतात. जमीन सरकारची आहे, ह्मणून साऱ्याचे मालकही तेच आहेत. त्या साऱ्यापैकीं लोकांस कांहीं परत मिळत नाहीं. सरकार जरी जमिनीचे मालक आहे, तरी जमीन सुधारण्याचे कामीं तें कांहीं खर्च करीत नाहीं. जमिनींत घातलेलें भांडवल व मेहनत सगळी लोकांचीच आहे, ह्मणून भांडवलावरील नफा व मेहनतीबद्दल मजुरी तेवढी मात्र कायती लोकांस मिळते. परंतु लोकसंख्या वाढल्यानें नफा व मजुरी दोन्ही

कमी होतात. नफा कमी झाल्यानें देशांतील भांडवल कमी कमी होतें; आणि मजुरी कमी झाल्यानें मजुरांस पोटापुरतें खाण्यास न मिळाल्यामुळें ते अशक्त होतात, व त्यांचे हातून व्हावी तितकी व व्हावी तशी मजुरी होऊं शकत नाहीं. सारे वाढले; भांडवल नाहींसें झालें; जें थोडें राहिलें त्याजवर मिळणारा नफा फार कमी झाला; मजुरी कमी झाली, व मजुरांस पुरतेसें खाण्यास मिळेना; मेहनत कमी होऊन व्हावी तितकी उत्पत्ति होईनाशी झाली; उत्पन्न झालेलें धान्य दरसाल जास्त जास्त बाहेर जाऊं लागलें; शेतीखेरीज दुसरे बहुतेक धंदे बसून गेले; या सर्व गोष्टी एकत्र झाल्या असतां देशाची काय स्थिति होईल, याची सहज कल्पना करितां येईल.

या विषयासंबंधानें कितीएक लोकांचा एक मोठा गैरसमज आहे; त्यामुळें फार घोटाळा होऊन नुकसानही होतें. याकरितां त्याविषयीं कांहीं जास्त विचार करून तो दूर करणें अवश्य आहे. पुनरुक्तीचा दोष पतकरूनही हें करणें ज़रूर दिसतें.

'खप पुष्कळ होऊं लागला कीं, जिनसांची किंमत वाढते; जिनसांच्या किंमती वाढल्या असतां नफे वाढतात; नफे वाढले कीं, अर्थात् जिन्नस तयार करणारांचा फायदा होतो. धान्य महाग होत जाईल, तसतसे शेतीचे धंद्यांतील नफे अधिक होत जाऊन शेतकऱ्यांचा फायदाच झाला पाहिजे,' असा पुष्कळ लोकांचा बळकट समज झालेला दिसतो. हा समज फार नुकसानकारक आहे; तो भ्रांतिमूलक आहे. हें कसें तें पुरतेपणीं समजलें पाहिजे.

मागील भागांत सांगण्यांत आलें आहे कीं, पदार्थांची किंमत ठरणें ती साधारणतः उत्पत्तीच्या खर्चाचे प्रमाणानें ठरली जाते. उत्पत्तीच्या खर्चांत पुष्कळ गोष्टींचा समावेश होतो. मजुरी, जकात, कच्च्या मालाची किंमत, नेण्याआण्याचा खर्च, नफा ह्मणजे भांडवलावरील व्याज, जोखमीबद्दल मोबदला, देखरेखीचा खर्च, या सर्वांचा समावेश उत्पत्तीच्या खर्चांत होतो. यांपैकीं कोणताही एकादा खर्च वाढला कीं, उत्पत्तीचा खर्च वाढेल. मजुरी वाढली, अथवा जिन्नस नेण्याआणण्याचा खर्च, किंवा जकात, अगर धंदा करणाराची जोखीम, किंवा देखरेखीचा खर्च जास्त होईल. नफा ह्मणजे भांडवलावरील व्याज जेवढेंचें तेवढेंच राहून उत्पत्तीचा खर्च वाढूं शकेल, आणि उत्पत्तीचा खर्च वाढला कीं, किंमत वाढली पाहिजे. परंतु अशा रीतीनें किंमत वाढली असतां नफा वाढत नाहीं, हें उघड आहे.

पदार्थांची किंमत वाढली असतां मजुरी वाढत नाहीं, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. त्याचप्रमाणें नफ्याचीही गोष्ट आहे. किंमत वाढल्यानें जशी मजुरी जास्त वाढत नाहीं, तसाच नफाही जास्त होत नाहीं. नफ्याचें स्वरूप काय आहे, हें पूर्णपणें लक्षांत ठेविलें पाहिजे. उत्पत्तीच्या खर्चापेक्षां जितकी जास्त उत्पत्ति होईल, तो नफा समजला पाहिजे. तयार झालेल्या जिनसांस बाजारांत जास्त किंमत आली, तर त्यास नफा समजण्याची साधारण लोकांची चाल आहे. परंतु तो वास्तविक पाहतां नफा नव्हे; नफ्याचें स्वरूप निराळें आहे. तयार झालेला जिन्नस विकला जावो किंवा न जावो, तो तयार करण्यांत

जो नफा व्हावयाचा, तो जिन्नस तयार झाल्याबरोबर होऊन चुकलाच आहे. ह्मणजे जिनसा तयार करीत असतां जो खर्च लागला, त्यापेक्षां जितकी जास्त उत्पत्ति झाली तितका नफा आहे. हे उत्पन्न झालेले जिन्नस विकले गेले, तरच नफा झाला, नाही तर नाहीं, असें नव्हे. जिन्नस विकले गेल्यानें मात्र भांडवल, जें मालाच्या रूपानें बनून राहिलें असतें, तें खुलें होतें, व पुनः उत्पत्ति करण्यास तें कामास येतें. त्याशिवाय विक्रीपासून कांहीं एक जास्त होत नाहीं. जिन्नस विकले जाणें, यांत उत्पत्ति जास्त करण्याची शक्ति नाहीं. उत्पत्ति जास्त करण्याची शक्ति श्रमाचे अंगीं आहे. या शक्तीमुळें उत्पत्ति होते, आणि श्रमाचे अंगची ही उत्पत्ति करण्याची शक्ति जसजसी जास्त वाढेल, तसतसे नफे जास्त होत जातील, हें उघड आहे. मजुरास जेवढें खाण्यास देत होतों, तितकेंच देऊन जर पूर्वीपेक्षां हल्लीं कांहीं युक्तीनें दुप्पट उत्पत्ति होऊं लागेल, तर नफा दुप्पट होईल, हें सहज लक्षांत येईल. हा दुप्पट नफा झाला, तो माल विकला गेला ह्मणून झाला, असें नव्हे. तर श्रमाचे अंगीं दुप्पट उत्पत्ति करण्याची शक्ति आली ह्मणून झाला. उत्पत्तीच्या खर्चाचे प्रमाणानें उत्पत्ति अधिक होईल, तरच नफा जास्त होईल. नफा होणें, तो उत्पत्तीचा खर्च आणि होणारें उत्पन्न, यांचे प्रमाणावर अवलंबून आहे. तयार झालेले जिन्नस स्वस्त किंवा महाग विकले जातील, त्यावर नफ्याचें कांहीं एक धोरण नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे.

आतां पदार्थांची किंमत ठरते, ती हमेष उत्पत्तीच्या खर्चाचे मानानेंच ठरते, हें जरी खरें आहे, तथापि पुरवठा

व खप यांत जसजसें कमीजास्त होत जाईल, तसतशी किंमत कमीजास्त होते, असेंही मागें सांगण्यांत आलें आहे. कोणत्याही जिनसांचा खप वाढला असतां किंमत वाढते, हें खरें आहे. परंतु किंमत वाढली असतां नफा वाढलाच पाहिजे, असें मात्र नाहीं. मागें जिनसांचे तीन वर्ग सांगितले. १ ला वर्ग–जुनीं नाणीं, मयत कारागिरांचे हातचीं दुर्मीळ चित्रें वगैरे, ज्यांचा पुरवठा वाढवितां येत नाहीं, असले पदार्थ. (२) दुसरा वर्ग–शेतकीचें उत्पन्न, ज्याचा पुरवठा वाढवितां येतो, पण जितका खर्च करावा त्या मानानें पुरवठा न वाढतां, जसजसें उत्पन्न अधिक करण्याची खटपट करावी, तसतसा उत्पन्नाचे मानापेक्षां खर्च जास्त होतो. आणि (३) तिसरा वर्ग–यंत्रांचे सहायानें होणारे पदार्थ.

या तीन वर्गांपैकीं पहिल्या वर्गाचे पदार्थांचा खप वाढेल तितका चांगला. कारण त्यांची किंमत उत्पत्तीच्या खर्चाचे मानानें न ठरतां, केवळ पुरवठा व खप यांचेच प्रमाणानें ठरते. तिसरे वर्गांतील पदार्थांचाही खप वाढेल तितकें चांगलेंच. कारण खप वाढेल तसतशी उत्पत्ति मोठ्या पायावर होऊं लागून उत्पत्तीचा खर्च कमी होत जातो, अर्थात् उत्पत्तीच्या खर्चाचे प्रमाणापेक्षां उत्पन्न जास्त होऊं लागतें. ह्मणून असल्या प्रकारचे जिनसांचा खप वाढला असतां, नफा फार होऊं लागतो, हें उघड आहे. मात्र येथें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, हा नफा होतो, तो तयार झालेल्या जिनसांची किंमत अधिक आल्यानें नव्हे, तर ते तयार करण्यास उत्पत्तीचा खर्च कमी लागूं लागल्यामुळें नफा वाढला. हें अधिक स्पष्ट समजण्यासाठीं एक उदाहरण घेऊं:—

कल्पना करा कीं, गिरणींत कापडांचा एक गट्ठा तयार करण्यास पांच रुपये खर्च पडत असे व त्याची किंमत १० रुपये येत असे, तेव्हां दर गठ्यास नफा पांच रुपये राहत होता, हें उघड आहे. कांहीं दिवसांनीं खप वाढल्यामुळ उत्पत्ति फार होऊं लागली, व त्यासाठीं कारखाने मोठ्या पायावर चालूं लागल्यानें उत्पत्तीचा खर्च पुष्कळ कमी झाला. ह्मणजे तो एका गठ्यास पांचाचे बदल्यांत दोनच रुपये होऊं लागला. आतां या गठ्यांची किंमत पूर्वींप्रमाणें १० रुपये न येतां, आठच रुपये येऊं लागले, तरी पण नफा पूर्वींपेक्षां जास्त राहूं लागेल. पूर्वीं पांच रुपये नफा होत होता, तो आतां सहा रुपये येऊं लागला; ह्मणजे गठ्याची किंमत दोन रुपये कमी झाली असतांही नफा एक रुपया वाढला. यावरून जिनसांची किंमत वाढल्यानेंच नफा जास्त होतो, असें नाहीं. बाजारांतील किंमत कमी झाली असूनही नफा जास्त झाला, हें वरील उदाहरणावरून दिसून आलें. यास्तव नफा होणें, तो जिनसांचे किमतीवर अवलंबून नसून, उत्पत्तीचा खर्चच कमी झाल्यावांचून तो कधींही व्हावयाचा नाहीं.

आतां जिनसांचा दुसरा वर्ग जो शेतकीचें उत्पन्न, त्यासंबंधानें पाहूं. याप्रकारचे जिनसांचा खप वाढला असतां किंमतही वाढते. यांचा खप वाढल्यामुळें उत्पत्ति वाढविण्याचा प्रयत्न करावा, तर प्रमाणापेक्षां उत्पत्तीचा खर्च जास्त वाढतो. उत्पत्तीचे खर्चांत नफ्याशिवाय इतर पुष्कळ गोष्टींचा समावेश होतो. त्या वाढतात ह्मणून धान्य उत्पन्न करण्याचा खर्च वाढतो, नफे वाढल्यामुळें उत्पत्तीचा खर्च

वाढतो, असें मुळींच नाहीं. कारण धान्याचा खप जास्त होऊं लागल्यानें हलक्या प्रतीच्या जमिनी लागवडींत आणाव्या लागतात, व त्यामुळें मजुरी वगैरे खर्च वाढतो. हलकी जमीन लागवड करणारांस नफा फार मिळतो, ह्मणून त्या जमिनींत धान्य उत्पन्न करण्याचा खर्च वाढतो, असें नसतें. ह्मणून शेतीचा माल अधिक उत्पन्न करण्याची खटपट केली, तर नफा न वाढतां उत्पत्तीचा खर्च मात्र जास्त होतो; आणि उत्पत्तीचा खर्च वाढला कीं, किंमत वाढते. तात्पर्य, किंमत वाढली असतां नफा जास्त होत नाहीं, हें उघड आहे. जर धान्याची किंमत वाढली असतां शेतकऱ्यांचे नफे वाढत नाहींत, हें सिद्ध झालें, तर धान्याचा खप वाढणें चांगलें, तें महाग होण्यापासून शेतकऱ्यांचा फायदा आहे, हें ह्मणणें केवळ्या चुकीचें आहे, हें सहज ध्यानांत येईल. असें जरी आहे, तरी मोठे मोठे लोक, धान्य महाग झालें तर शेतकऱ्यांचा फायदा होतो, असें प्रतिपादन करितात, व 'सरकारानें आपले सारे खुशाल वाढवावे, कारण धान्य महाग झाल्यानें शेतकऱ्यांचे नफे वाढले आहेत, तेव्हां वाढलेला सारा ते खुषीनें भरूं शकतील,' असें ह्मणतात. हा समज अत्यंत अहितकारक आहे, हें समजण्यासाठीं अंमळ विस्तारानें लिहिण्याची जरूर वाटल्यावरून विस्तार केला आहे.

वरील विचारावरून लक्षांत येईल कीं, लोकसंख्या वाढल्यानें देशाचें हित होत नाहीं. धान्य परदेशांत फार जाऊं लागून, त्याचा खप जास्त झाल्यानें तें महाग होईल, तर शेतकऱ्यांचा फायदा होत नाहीं. धान्य महाग झालें

असतां व सारे वाढले असतां, शेतकऱ्यांचे नफे फारच कमी होतात. शेतकऱ्यांस नफा कमी होऊं लागल्यानें, त्यांना संचय करण्यास सवड रहात नाहीं; त्यामुळें शेतीचे कामीं भांडवल कमी कमी होत जातें. शेतीचे कामांतील भांडवल कमी झाल्यानें मजुरीचे दर कमी होतात, तसेंच पुष्कळ मजुरांस काम मिळेनासें होतें. आणि भांडवल नसल्यानें व मजूर कमी झाल्यानें, देशांतील एकंदर धान्याची उत्पत्ति कमी होते. देशांत संपत्तीची उत्पत्ति कमी झाली असतां तो समृद्ध न होतां उलट दिवसेंदिवस निकृष्ट दशेस येऊन पोंचल, यांत किंचितूही संशय नाहीं.

हिंदुस्थान देशाची स्थिति याप्रमाणेंच झाली आहे कीं नाहीं; कांहीं लोकांचे म्हणण्याप्रमाणें, तो पूर्वीपेक्षां जास्त समृद्ध होत चालला आहे, किंवा दादाभाई नवरोजी वगैरे विचारी पुरुष, तो भिकारी होत चालला आहे, असें ह्मणतात, त्यांचे मताप्रमाणें तो दरिद्री होत चालला आहे; हें वरील विचारांवरून, ज्याचें त्यानेंच अनुभवानें पाहिलें असतां, लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

येथपर्यंत संपत्तीची वांटणी कोणत्या रीतीनें कशी होते, याचा विचार झाला. संपत्ति उत्पन्न होण्याचीं तीन कारणें, १ जमीन, २ श्रम व ३ भांडवल हीं आहेत; ह्मणून उत्पन्न झालेली संपत्तीही या तीन भागांनींच वांटली गेली पाहिजे. १ जमिनीचा सारा, २ श्रमाबद्दल मजुरी, व (३) भांडवलाचा नफा, असे उत्पन्न झालेल्या संपत्तीचे ३ विभाग होतात. या तिन्ही विभागांचा यथावकाश विचार झाला. आतां 'संपत्तीची अदलाबदल' या प्रकरणाकडे पुनः वळलें पाहिजे.

# प्रकरण ३ रें

## भाग १

## परकीय देशांशीं व्यापार.

परकीय देशांशीं व्यापार, कर, इ० विषय तिसऱ्या प्रकरणांत न येतां, वास्तविक रीतीनें पाहतां त्या खंडाच्या पहिल्या प्रकरणांत येणें रास्त होतें. परंतु हे विषय समजण्यापूर्वी, 'संपत्तीची वांटणी' या दुसऱ्या प्रकरणांत सांगितलेले विषयाची माहिती असणें जरूर होतें. पण ते विषय समजण्यासही पहिल्या प्रकरणांतील 'मौल्य व किंमत' या विषयांचें यथार्थ स्वरूप समजण्याची अवश्यकता होती. याकरितां 'अदलाबदलीचा' विषय संबंध न ठेवितां, त्यांतील कांहीं भाग वेगळा पाडून, त्याचा विचार पहिल्या प्रकरणांत केला; व कांहीं भाग, परकीय देशांशीं व्यापार इ० शेंवटी ठेऊन, त्याचें एक स्वतंत्रच प्रकरण केलें आहे. या व्यवस्थेमुळें विषय समजण्यास सुलभता होईल, असें वाटल्यावरून तसें केलें आहे.

व्यापार ह्मणजे काय? अदलाबदल कशास ह्मणावें? जिनसांची अदलाबदल अथवा व्यापार कां सुरू होतो? त्यापासून फायदे काय? त्यांत न्यूनाधिक्य काय कारणांनीं कसें होतें? या प्रश्नांचा विचार या प्रकरणांत करणें आहे.

प्रथम असे प्रश्न उत्पन्न होतात कीं, अदलाबदलीचा उपयोग काय? दोन जिनसांची अरसपरस देवघेव केल्या-

पासून फायदा काय? दोन्ही जिनसांची किंमत बहुधा सारखीच असावयाची, मग एक जिन्नस देऊन त्याचे बदली दुसरा घेत बसण्याचें काय प्रयोजन? असल्या देवघेवीनें नवीन जिन्नस निर्माण होत नाहीं, अर्थात् देवघेवीनें किंवा व्यापारानें संपत्ति उत्पन्न होत नाहीं. यासाठीं व्यापार करण्यापासून काहीं एक फायदा नाहीं, असें कितीएक लोकांचें ह्मणणें आहे.

काहीं लोक असें समजतात कीं, अदलाबदलीपासून किंवा व्यापारापासून जर फायदा होतो असें मानिलें, तर एकाचा फायदा झाला असतां अर्थात् दुसऱ्याचें नुकसान झालेंच पाहिजे; एक श्रीमंत होईल, पण दुसरा लुटला जाईल; व्यापारापासून दोघांस फायदा कधींही व्हावयाचा नाहीं; व्यापारापासून नवीन जिन्नस कधींच उत्पन्न होत नाहींत; तो केवळ दुसऱ्यास फसविण्याचा व लुबाडून घेण्याचा एक लुच्चेगिरीचा धंदा आहे.

प्रथमदर्शनीं हें ह्मणणें खरें आहे असा भास होईल; पण विचार केला असतां अदलाबदलीपासून फार मोठा उपयोग आहे, हें लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

अदलाबदलीपासून नवीन जिन्नस उत्पन्न होत नाहींत, हें खरें आहे. तथापि अदलाबदलीपासून पदार्थांच्या अंगचे गुण वाढतात. सर्वांस सर्व पदार्थांचा उपयोग असतोच, असें नाहीं. एका मनुष्याजवळ छत्री आहे, परंतु त्यास कोठें बाहेर जावयाचें नसल्यानें तिचा त्याला उपयोग नाहीं. दुसऱ्या एका मनुष्याजवळ बाजरी आहे, ती त्याचे खपापेक्षां जास्त असल्यामुळें तिचा उपयोग होत नाहीं. आतां

छत्रीवाल्याची छत्री व बाजरीवाल्याची बाजरी हीं दोन्हीही निरुपयोगीं पडलीं आहेत; पण जर छत्रीवाल्यास बाजरी पाहिजे असेल, व बाजरीवाल्यास छत्रीची जरूर लागेल, तर दोघांनीं आपापल्या जिनसाची अदलाबदल केली पाहिजे. अशी अदलाबदल करून ज्यास जी जिन्नस हवी ती मिळाली, ह्मणजे त्या जिनसेचा उपयोग फार होतो. हा अदलाबदलीपासून मोठा लाभ आहे. पदार्थांची उपयोगिता वाढविणें, हा अदलाबदलीचा किंवा व्यापाराचा मुख्यत्वें मोठा उपयोग आहे. हा उपयोग अदलाबदल करणारे उभयतांसही झालाच पाहिजे; तो एकासच होईल असें घडूं शकणार नाहीं. अदलाबदलीनें जर एकाचें नुकसान व दुसऱ्याचा फायदा होतो असें असेल, तर त्या दोघां इसमांचे दरम्यान अदलाबदल किंवा व्यापार मुळींच सुरू होणार नाहीं.

मागें सांगण्यांत आलेंच आहे कीं, एकादे जिनसेस एकादे विवक्षित ठिकाणीं संपत्ति ह्मणतां येणार नाहीं; परंतु तीच जिन्नस जर दुसरे ठिकाणीं नेली, तर तिला संपत्तीचें रूप येईल. नदीचे कांठीं जाऊन बसलें असतां पाणी फुकट मिळतें, ह्मणून तेथें पाणी हें संपत्ति होणार नाहीं; परंतु तेंच पाणी कालवे बांधून पाटानें लांब शेतीचे कामास घेऊन गेलें असतां, त्यास संपत्तीचें रूप प्राप्त होतें. एकादा पदार्थ एका मनुष्याचे ताब्यांत असतां, संपत्ति होऊं शकणार नाहीं; पण तोच दुसऱ्याचे ताब्यांत गेला कीं, लागलीच त्यास संपत्ति ह्मणावें लागेल. अदलाबदल किंवा व्यापार यापासून पदार्थ प्रत्यक्ष ‘ निर्माण ’

१०-९१८-२०००

होत नाहींत, हें खरें आहे; तथापि ते एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं व एकाचे ताब्यांतून दुसऱ्याचे ताब्यांत गेल्यामुळें त्यांचे अंगीं एका प्रकारची उपयुक्तता उत्पन्न होते. पदार्थ जमिनींतून उत्पन्न होतात, श्रमानें ते एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं नेले जातात, व त्यांचे अंगीं विशेष योग्यता उत्पन्न होते. श्रमापासून संपत्ति उत्पन्न होते, असें मागें सांगितलें आहे. अदलाबदलीपासून अथवा व्यापारापासून असेंच कार्य घडतें. त्यापासून साक्षात् पदार्थ उत्पन्न होत नाहींत, तथापि पदार्थांचे अंगीं उपयुक्तता उत्पन्न करण्याचें काम घडतें. याकरितां अदलाबदल किंवा व्यापार यापासून संपत्ति उत्पन्न होते, असें ह्मणावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं. आपल्याला नको आहे तो जिन्नस दुसऱ्यास देऊन, त्याजपासून आपल्यास हवा तो जिन्नस घेणें, यापासून वस्तूंची उपयुक्तता फार वाढते. ह्मणून अदलाबदल अगर व्यापार, हें संपत्ति वाढविण्याचें एक जबरदस्त साधन आहे. तसेंच वस्तूंची अदलाबदल सुरू झाली असतां, ती करणारे दोन्ही पक्षांसही निःसंशय लाभ होतो, असें पुढील विवेचनावरूनही चांगलें लक्षांत येईल. आतां व्यापारापासून जर दोन्ही पक्षांस फायदा आहे, तर हा व्यापार दोन मनुष्यें, दोन प्रांत, किंवा दोन दूरदूरचे देश, यांचे दरम्यान केव्हां सुरू होईल? दोन मनुष्यांजवळ दोन निराळ्या वस्तु आहेत. पहिल्याजवळ आहे ती दुसऱ्याजवळ नाहीं, व दुसऱ्याजवळ आहे ती पहिल्यापाशीं नाहीं; उभयतांसही आपल्याजवळ नसलेल्या वस्तूची अपेक्षा आहे. अशा वेळीं दरेकजण आपल्याजवळ असलेली वस्तु

आपले खपापुरती ठेऊन, बाकीची दुसऱ्यास देऊन त्याज पाशीं असलेली जिन्नस आपण घेईल, हे स्पष्ट आहे. पण दोन नजीकचे प्रांत अथवा दूरदूरचे देश यांचे दरम्यान हा देवघेवीचा प्रकार कां घडावा ? एका देशांत ज्या वस्तु उत्पन्न होतात, त्या दुसरे देशांत नाहींत ह्मणून, किंवा एका देशापेक्षां दुसरे देशांत कांहीं जिन्नस कमी खर्चानें तयार होऊं शकतात ह्मणून, त्या दोन देशांचे दरम्यान व्यापार सुरू होतो; किंवा हीं दोन्ही कारणें नसलीं तरीही व्यापार सुरू होतो, हें पाहिलें पाहिजे. कांहीं देशांत कांहीं जिन्नस मुळींच उत्पन्न होऊं शकत नाहींत. अशा वस्तु परकीय देशांतून आणिल्या असतां मोठेसें आश्चर्य नाहीं. अशा वस्तु मिळविण्यासाठीं दोन देशांनीं परस्पर व्यापार सुरू केलाच पाहिजे. परंतु अशा शेंकडों वस्तु आहेत कीं, त्या आपल्या देशांत हव्या तितक्या उत्पन्न होत असतांही परकीय देशांतून आणिल्या जातात; याचें कारण काय असावें ? आपल्या देशांत तयार करण्यापेक्षां दुसऱ्या देशांत त्या कमी खर्चानें तयार होतात, ह्मणजे त्या तिकडे स्वस्त मिळतात, ह्मणून असें होतें कीं काय ? कदाचित् हें कारण खरें असेल; तथापि एवढ्या ह्मणण्यानेंच निर्वाह होत नाहीं. आपल्या देशापेक्षां जेथें वस्तु कमी खर्चानें केल्या जातील, ह्मणजे जिकडे त्या स्वस्त असतील तेथूनच नेहमीं त्या आपल्या देशांत आणिल्या जातील, आणि इतर ठिकाणाहून आणिल्या जाणार नाहींत, हें ह्मणणें बरोबर होईल काय ? विचार केला असतां, होणार नाहीं असें दिसेल.

दुसऱ्या देशांत एकादा जिन्नस आपल्या देशापेक्षां कमी खर्चानें तयार होत नसूनही तो तेथून आणिला जाईल. कल्पना करा कीं, धान्य व कोळसे हीं दोन्ही इंग्लंडापेक्षां हिंदुस्तानांत कमीं खर्चानें तयार होण्याची सवड आहे. असें आहे, ह्मणून हिंदुस्तान या दोन्ही वस्तु इंग्लंडांतून आणण्याचे भरीस कधींच पडावयाचें नाहीं, असें नेहमी घडतें काय ? नाहीं. कोळसे जरी हिंदुस्तानांत इंग्लंडपेक्षां कमी खर्चानें काढले जातात, तथापि हिंदुस्तानांतून धान्य इंग्लंडास पाठविलें जाऊन त्याचे बदला कोळसे तिकडून नेहमीं आणिले जातील. दुसऱ्या देशापेक्षां एकादा जिन्नस आपल्या देशांत कमी खर्चानें तयार होत असतांही, तो बाहेरून आणिला जाईल, ही गोष्ट प्रथमदर्शनीं अंमळ विलक्षणशी भासते; यास्तव ती नीट समजण्यासाठीं उदाहरणानें स्पष्ट केली पाहिजे.

आपण मानिलें आहे कीं, हिंदुस्तानांत धान्य व कोळसे दोन्हीही इंग्लंडपेक्षां थोड्या खर्चांत तयार होऊं शकतात. कांहीं धान्य व कांहीं कोळसे तयार करण्यास हिंदुस्तानांत शंभर शंभर दिवस लागतात; आणि तितकेंच धान्य व तितकेच कोळसे उत्पन्न करण्यास इंग्लंडांत दीडशें दिवस मेहनत करावी लागते, अशी कल्पना केली. आतां, शंभर दिवसांत तयार केलेलें धान्य हिंदुस्तानानें इंग्लंडास पाठविलें; तितकेंच धान्य तयार करण्यास इंग्लंडास दीडशें दिवस मेहनत करावी लागली आहे, ह्मणून हिंदुस्तानांतून पाठविलेलें धान्य इंग्लंडांतील दीडशें दिवसांत तयार झालेल्या धान्याबरोबर होईल; व त्याचे मोबदल्यांत तेथें दीडशें

दिवसांत झालेले कोळसे मिळतील. पण इंग्लंडांत दीडशें दिवसांत झालेले कोळसे हिंदुस्तानांतील शंभर दिवसांत निघालेल्या कोळशांबरोबर आहेत. ह्मणून शंभर दिवसांचे मेहनतीचें धान्य हिंदुस्तानानें इंग्लंडांस पाठविलें असतां, हिंदुस्तानांत शंभर दिवसांत जेवढे कोळसे तयार झाले असते, तितकेच मिळाले; जास्त मिळाले नाहींत. या व्यापारापासून कोणत्याही देशास कांहीं फायदा न होतां उलटा नेण्याआणण्याचा खर्च मात्र विनाकारण झाला. याकरितां वरीलप्रमाणें स्थिति असेल, तेव्हां हिंदुस्तान व इंग्लंड यांच्या दरम्यान व्यापार मुळींच सुरू होणार नाहीं. हिंदुस्तानांत धान्य व कोळसे दोन्ही तयार करण्यास थोडा खर्च लागत असूनही येथून तीं नेलीं असतां इंग्लंडास कांहीं फायदा झाला नाहीं; सबब इंग्लंड हिंदुस्तानांतून धान्य व कोळसे यांपैकीं कांहींच नेणार नाहीं, अर्थात् या दोन देशांचे दरम्यान व्यापार सुरू होणारच नाहीं, हें लक्षांत येईल.

यावरून जेथें माल कमी खर्चानें तयार केला जातो, तेथूनच तो हमेष आणिला जाईल असें नाहीं. तर मग एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं माल केव्हां पाठविला जातो, कशी स्थिति असली ह्मणजे दोन देशांत व्यापार सुरू होतो, हें समजणें फार अगत्याचें आहे.

वरील उदाहरणांत दोन्ही जिन्नस तयार करण्यास दोन्ही देशांत लागणारे खर्चाचें प्रमाण सारखेंच आहे. ह्मणजे हिंदुस्तानांतील १०० दिवसांचे धान्यास इंग्लंडांत १५० दिवस लागतात; व हिंदुस्तानांतील १०० दिवसांचे कोळशांसही इंग्लंडांत १५० शेंच दिवस लागतात, असें

मानिलें होतें. ज्या वेळीं हें प्रमाण सारखें होतें, त्या वेळीं या दोन देशांत व्यापार मुळींच सुरू होऊं शकला नाहीं, हें आपण आतांच पाहिलें. तर मग दोन देशांचे दरम्यान व्यापार सुरू राहण्यास कशी स्थिति असली पाहिजे? ज्या जिनसांचा व्यापार होणें आहे, त्यांच्या मधलें प्रमाण दोन्ही देशांत सारखेंच असून उपयोगी नाहीं. तें भिन्न असलें पाहिजे. वरील उदाहरण पुन: घेऊन पुढें चालूं. हिंदुस्तानांत शंभर दिवसांत होणारे कोळसे इंग्लंडांत दीडशें दिवसांत होतात. परंतु शंभर दिवसांत हिंदुस्तानांत होणारें धान्य मात्र दोनशें दिवसांपेक्षां कमी दिवसांत इंग्लंडांत उत्पन्न करितां येत नाहीं, असें मानूं. अशी स्थिति असेल, तर दोन्ही देशांत लागलीच व्यापार सुरू होईल. दीडशें दिवसांत तयार केलेले आपले कोळसे इंग्लंडानें हिंदुस्तानांत पाठविले; ते कोळसे हिंदुस्तानांत शंभर दिवसांत तयार होणारे कोळशांबरोबर आहेत, ह्मणून त्यांचे बदला हिंदुस्तानांत शंभर दिवसांत तयार झालेलें धान्य मिळेल. पण हें शंभर दिवसांत हिंदुस्तानांत तयार झालेलें धान्य इंग्लंडांत दोनशें दिवसांचे मेहनतीबरोबर आहे. तें तयार करण्यास इंग्लंडांस दोनशें दिवस खपावें लागतें. ह्मणून आपले दीडशें दिवसांचे मेहनतीचे कोळसे देऊन, ज्या धान्यास दोनशें दिवस मेहनत करावी लागली असती, तें धान्य इंग्लंडास हिंदुस्तानापासून मिळालें. ह्मणजे या अदलाबदलींत ५० दिवसांचे मेहनतीची बचत इंग्लंडास राहिली. याप्रमाणें दरएक खेपेस पन्नास दिवसांचे मजुरीचा फायदा इंग्लंडास होऊं लागल्यामुळें, हिंदुस्तानाशीं इंग्लंडचा व्यापार हमेशा

जारी सुरू राहील; व तसें झालें ह्मणजे हिंदुस्तानांत कोळसे नेहमीं इंग्लंडमधूनच येऊं लागतील. हिंदुस्तानांत शंभर दिवसांत तयार होणारे कोळशांस इंग्लंडांत दीडशें दिवस मेहनत करावी लागली आहे; ह्मणजे हिंदुस्तानापेक्षां इंग्लंडांत कोळसे महाग असतांही हिंदुस्तानांत ते नेहमीं इंग्लंडहूनच येत जातील. तेव्हां आपले देशांत स्वस्त दरानें माल तयार होत असूनही, तो परकीय देशांतून अधिक खर्चानें तयार झालेला असा आणिला जातो. आपलें शंभर दिवसांच्या मेहनतीचें धान्य देऊन जे कोळसे हिंदुस्तानानें घेतले आहेत, ते तयार करण्यास इंग्लंडांत जरी अधिक खर्च झाला असला, तथापि ते हिंदुस्तानास शंभर दिवसांच्या धान्याचे मोबदल्यांत मिळाले आहेत. ह्मणून कोळसे येथेंच उत्पन्न न करितां इंग्लंडांतून आणिल्यानें हिंदुस्तानाचा कांहीं एक गैरफायदा झाला नाहीं. तसा कांहीं फायदाही झाला, असें नाहीं. तथापि ज्याअर्थीं या व्यापारापासून इंग्लंडास फार मोठा फायदा आहे, त्याअर्थीं या दोन्ही देशांचे दरम्यान देवघेव हमेश सुरू राहील, व हिंदुस्तानांत इंग्लंडपेक्षां थोड्या खर्चांत कोळसे तयार होत असतांही ते नेहमीं तीकडूनच आपले देशांत आणिले जातील, हें लक्षांत येण्यासारखें आहे.

वर जी कल्पना केली आहे, तशी व्यापाराची स्थिति असेल, तर हिंदुस्तानास कांहीं फायदा होणार नाहीं, असें पहाण्यांत आलें. परंतु व्यापार सुरू झाला ह्मणजे सर्वच फायदा दरम्यानचे एका देशासच मिळूं शकत नाहीं. दोन देशांच्या व्यापारापासून जो फायदा होणें, तो अंशतः दोन्ही देशांसही

झाला पाहिजे. तसें न होईल, तर ज्या देशास फायदा नाहीं तो देश विनाकारण दुसऱ्या देशाचे फायद्यासाठीं व्यापाराची उठाठेव करीत बसणार नाहीं. वर जो पन्नास दिवसांचे मजुरीचा फायदा इंग्लंडास होतो म्हणून सांगितलें, तो सर्व फायदा इंग्लंडच राखूं लागेल, तर हिंदुस्तान देश विनाकारण इंग्लंडशीं देवघेव करण्याची भानगड कशासाठीं करील? आपल्या फायद्यापैकीं कांहीं अंश हिंदुस्तानास देण्यास इंग्लंड तयार असेल, तर इंग्लंडशीं व्यापार सुरू करण्यास हिंदुस्तान कबूल होईल. होणारे फायद्यांतून कांहीं अंश हिंदुस्तानास मिळाला पाहिजे. एकंदर नफ्यापैकीं जेवढा अंश हिंदुस्तानास मिळेल तितक्या अंशानें तो इंग्लंडचा कमी होईल. ह्मणजे एकंदर फायदा दोन्ही देशांत विभागला जाईल, एकटे इंग्लंडासच तो पचणार नाहीं. हिंदुस्तानास जर फायदा होणें आहे, तर शंभर दिवसांचें धान्य पाठवून शंभर दिवसांतच हिंदुस्तानांत तयार होतील इतकेच कोळसे मिळाल्यास बस्स होणार नाहीं. यापेक्षां कांहीं अधिक कोळसे इंग्लंडापासून हिंदुस्तानास मिळणें जरूर आहे. ह्मणजे इंग्लंडांत दीडशें दिवसांत जेवढे कोळसे तयार होतात, त्यापेक्षां कांहीं अधिक कोळसे इंग्लंडानें हिंदुस्तानास दिले पाहिजेत. यावरून इंग्लंडास तेथें तयार करण्यास दोनशें दिवस लागणारें जें धान्य मिळालें, त्याचे बदला 'दीडशांपेक्षां जास्त व दोनशांपेक्षां कमी' इतके दिवसांच्या मेहनतीचे कोळसे हिंदुस्तानास द्यावे लागतील; अर्थात् इंग्लंडास दरखेपेस जो ५० दिवसांचे मजुरीचा फायदा होत असे, त्यापैकीं थोडा अंश आतां कमी होऊन तो हिंदुस्ता-

नास मिळूं लागेल. ९० दिवसांचा एकंदर नफा इंग्लंड व हिंदुस्तान या दोन देशांत वांटला जाईल. असें झालें ह्मणजे अन्योन्य व्यापारापासून जो फायदा होतो, तो सर्व एका देशासच मिळूं शकत नाहीं. दोन्ही देशांस तो मिळाला पाहिजे; कारण तसें न होईल, तर व्यापारच चालणार नाहीं.

अदलाबदल होणाऱ्या जिनसांच्या दरम्यानचें प्रमाण दोन्ही देशांत सारखें होतें, तेव्हां त्या देशांचे दरम्यान व्यापार सुरू होऊं शकला नाहीं; तेंच प्रमाण वेगळें वेगळें झाल्याबरोबर दोन्ही देशांचे दरम्यान व्यापार सुरू झाला, हें वरील विवेचनावरून ध्यानांत आलें असेल. आतां दोन्ही जिनसांचे प्रमाणांत हा जो फरक असला पाहिजे ह्मणून सांगितलें, तो किती असला पाहिजे? किती कमजास्तपणा असल्यानें हा व्यापार सुरू होईल? साधारणपणें पाहतां दोन देशांचे दरम्यान व्यापार सुरू राहण्यास हा फरक,माल नेण्याआणण्याचा खर्च वजा जातां कांहीं थोडा नफा राहील, इतका असला पाहिजे. वरील उदाहरणांत मानूं कीं, नेण्याआणण्याचा खर्च पांच दिवसांचे मजुरीइतका आहे. सबब हिंदुस्तानांत १०० दिवसांत झालेल्या धान्यास इंग्लंडांत १९० दिवस अधिक पांच दिवस, अधिक नफ्याचे दिवस, ह्मणजे एकशें पंचावन दिवसांपेक्षां कांहीं जास्त दिवस लागले पाहिजेत; इतका फरक असणें जरूर आहे. इतका फरक नसेल, तर आपल्या देशांत माल विकल्यानें व्यर्थ खर्च होईल.--उत्तम कसबी सोनारानें आपला सर्व वेळ व आपले सर्व श्रम नकशीकाम करण्यांत न घालवितां भट्टीसाठीं कोळसे पाडणें, सोनें गाळणें, भाता फुंकणें, वगैरे हलक्या कामांत

खर्च केले, तर त्याचे श्रमाचा दुरुपयोग झाला असें होतें, व त्याचे हातून चांगलें महत्वाचें नकशीकाम व्हावें तितकें होऊं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें दरेक देशानें आपलेसाठीं निरनिराळे सर्वच जिन्नस उत्पन्न करण्याची सुरवात केली, तर सर्व देशांत सारखी सोय नसल्यामुळें एकंदर सर्व देशांत उत्पत्ति कमी होऊन, सर्वच देशांत गैरफायदा होईल. असें न होतां, ज्या देशांत जो जिन्नस करण्यास उत्कृष्ट सवड आहे तेथेंच तो केला जाईल. तर उत्पत्ति फार होऊन श्रम व भांडवल हीं जीं उत्पत्तीचीं साधनें, त्यांचा पूर्णत्वानें उपयोग झालासें होईल. तसेंच तो होऊं लागल्यानें त्या धंद्यांतील कसब फार वाढून तो जिन्नस करण्याचे कामीं अत्यंत सुधारणा होते, व दिवसेंदिवस नवीन युक्त्या व शोध लागत जाऊन पदार्थ तयार करण्याचा उत्पत्तिखर्च कमी होत जातो, त्यामुळें पदार्थ स्वस्त होऊन सर्व देशांचा मोठा फायदा होत जातो.

हिंदुस्तानांत धान्य थोड्या खर्चांत पुष्कळ उत्पन्न होत असेल, तर हिंदुस्तानानें धान्यच उत्पन्न करावें. कोळसे अगर लोखंड इंग्लंडांत जर अल्प श्रमानें व थोड्या खर्चानें निघत असेल, तर इंग्लंडानें आपलें लक्ष विशेषेंकरून याच जिनसा करण्याकडे द्यावें. असें केल्यानें दोन्ही देशांचा फायदा होऊन सर्वच केल्यानें जितका फायदा होतो तितकाच तो दुसऱ्या देशीं पाठविल्यानें होईल, तर परदेशास माल कोणीही पाठविणार नाहीं हें उघड आहे.

दोन देशांशीं व्यापार सुरू झाला असतां कोणत्या प्रकारचे लाभ होतात, हें वरील विवेचनावरून लक्षांत आलेंच

असेल. एक तर आपल्या देशांत न होणारे पदार्थ परकीय देशांतून आपल्यास मिळतात, हा अति मोठा फायदा. परंतु दुसरा मोठा फायदा हा आहे कीं, दरेक देशाची उत्पादक शक्ति पूर्णपणें उपयोगांत आणिली जाते. श्रमविभागापासून जसा श्रमाचे उत्पादक शक्तीचा पूर्णपणें लाभ मिळतो, तद्वतच दोन देशांत व्यापार सुरू असल्यानें घडतें. सर्वच जिन्नस सर्व देशांत चांगले तयार होतात असें नाहीं. कांहीं जिन्नस एका देशांत चांगले होतात. कांहीं दुसरे देशांत तयार होण्याची उत्तम सोय असते. जो जो जिन्नस जेथें जेथें करण्याची उत्तम सोय आहे, तेथें तो तो न करितां, इतर ठिकाणीं तो करण्यांत येईल, तर विनाकारण श्रम व भांडवलाचा पदार्थ स्वस्थ मिळूं लागेल. असें न करितां सर्वच पदार्थ जर सगळे देश आपआपल्या पुरते निरनिराळे उत्पन्न करण्याची खटपट करतील, तर विनाकारण उत्पत्तिखर्च वाढून सगळे जिन्नस महाग होतील, व सर्वच देशाचें नुकसान होईल.

## भाग २ रा

## दोन देशांचे दरम्यान ज्या वस्तूंचा व्यापार होतो त्यांचे किंमतीविषयीं.

मागील भागांत दोन देशांत व्यापार केव्हां सुरू होतो, व्यापारापासून कोणास कसा लाभ होतो, आपला तयार झालेला माल एकंदर दुसऱ्या देशांत केव्हां पाठवील, यावि-

षयीं साधारणतः विचार करण्यात आला. आतां या भागांत दोन देशांतील अदलाबदल होणाऱ्या जिनसांची किंमत काय धोरणानें कायमची मुकरर होते तें पाहणें आहे.

जिनसांची किंमत त्यांचे उत्पत्तीच्या खर्चाचे मानानें साधरणतः असते, असें मागें सांगण्यात आलें आहे. ज्या वेळीं अदलाबदल होणारे जिन्नस दोन्ही देशांत उत्पन्न होतात, व त्यांचे उत्पत्तीच्या खर्चाचे मानानें प्रमाण सारखेंच असतें, तेव्हां त्यांची किंमत उत्पत्तिखर्चाचे मानानें मुकरर होते हेंही मागें सांगण्यांत आलें आहे. परंतु अशा वेळीं देवघेव सुरू होत नाहीं. व्यापार सुरू होण्यास अदलाबदल होणारे जिनसांचें प्रमाण दोन्ही देशांत भिन्न भिन्न असलें पाहिजे. अशा वेळीं जिनसांची किंमत ठरणें ती उत्पत्तीच्या खर्चाचे प्रमाणानेंच ठरली जाते कीं काय; दोन देशांत व्यापार सुरू झाला असतां अदलाबदल होणारे जिनसांची किंमत मुकरर होण्यास हाच नियम लागू होतो कीं काय; हें पाहिलें पाहिजे. बारीक विचार केला असतां दिसेल कीं, परकीय देशांतून आणलेल्या जिनसांची किंमत तो तयार करण्यास त्या देशांत लागलेल्या उत्पत्तीच्या खर्चाचे धोरणानें ठरली जाते असें नाहीं. तर मग बाहेरून येणारे पदार्थांची किंमत कोणत्या नियमांनीं मुकरर होते, याचें उत्तर थोडक्यांत असें देतां येईल कीं, 'बाहेरून येणाऱ्या जिनसाची किंमत, तो जेथें आणला असेल तेथें त्याचे मोबदला जो पदार्थ मिळूं शकेल, त्या पदार्थाचे उपत्तिखर्चानें मुकरर होते.'

उदाहरणार्थ समजा कीं, हिंदुस्तानांत कापड इंग्लंडांतून येतें, आणि त्याचे बदला धान्य इकडून इंग्लंडांत जातें.

कापडाचा एक गठ्ठा हिंदुस्थाननें घेतला असतां एक खंडी धान्य द्यावें लागतें, अशी कल्पना करा. या वेळीं कापडाची किंमत हिंदुस्थानांत किती आहे, असा प्रश्न केला असतां उत्तर देतां येईल काय ? इंग्लंडांत तें तयार करण्यास जितका खर्च लागला असेल, तितकी त्याची किंमत हिंदुस्थानांत आहे असें ह्मणतां येईल काय ? नाहीं. कारण कापडाचे एका गठ्यास मुकरर धान्य ह्मणजे एक खंडी मिळून चुकलें आहे. कमजास्त धान्य देण्यास हिंदुस्थान कबूल करीत नाहीं, ह्मणून कापडाची किंमत इंग्लंडांत कितीही असो, परंतु, हिंदुस्थानांत ती एक खंडी धान्यच आहे, ह्मणजे एक खंडी धान्य उत्पन्न करण्यास हिंदुस्थानास जे श्रम करावे लागतात तितकी आहे, अथवा कापडाचे बदला मिळणारा जिन्नस जें धान्य, त्याचा हिंदुस्थानांत जो त्याचा उत्पत्तीचा खर्च असेल तितकी किंमत इंग्लंडांतून येणारे कापडाची मुकरर झाली. एक गठ्ठा कापड तयार तयार करण्यास इंग्लंडांत दहा दिवस मजुरी करावी लागली असेल, ह्मणून तें हिंदुस्थानांत आल्यावर त्याची किंमत दहा दिवसांचे मेहनतीइतकीच राहील असें नाहीं. त्याचे मोबदला एक खंडी धान्य मिळालें आहे, तेव्हां तें धान्य पिकविण्यास जी मेहनत लागली असेल, तितकी किंमत कापडाची आहे असें समजावयाचें. कदाचित् एक खंडी धान्य तयार करण्यास हिंदुस्थानांत वीस दिवस श्रम करावे लागत असतील, तरी पण इंग्लंडांत दहा दिवसांचे श्रमानें झालेल्या कापडाची किंमत हिंदुस्थानांत दहाच दिवसांचे श्रमाइतकी न होतां वीस दिवसांचे मेहनतीइतकी झाली.

११-६१८-२०००

एक गठ्ठा कापडाचे बदल्यांत हिंदुस्थान एक खंडी धान्य न देतां कदाचित् पाऊण खंडी धान्य कधीं देईल, व कधीं सव्वाखंडीही देण्यास तयार होईल. ह्मणजे दहा दिवसांचे श्रमानें इंग्लंडांत तयार झालेल्या कापडाची किंमत हिंदुस्थानांत कधीं पंधरा दिवसांचे श्रमाबरोबर होईल, व कधीं पंचवीस दिवसांचे मेहनतीइतकी होईल. यावरून कापडाची किंमत कशानें मुकरर होईल हा प्रश्न उत्पन्न होतो. याचें उत्तर असें देतां येईल कीं, कापडाचे मोबदल्यांत जितकें धान्य देण्याचें हिंदुस्थान ठरवील, अगर कबूल करील, किंवा शर्ती करील, किंवा हिंदुस्थानास भाग पडेल, त्या शर्तीप्रमाणें कापडाची किंमत ठरणार आहे. यावरून असें ह्मणतां येईल कीं, दोन देशांत व्यापार सुरू झाला असतां दुसरीकडून आलेल्या मालाचे मोबदला आपआपला जितका माल देण्यास दरेक कबूल करील, अथवा ठरवील, त्या शर्तीस अनुसरून अदलाबदल होणारे जिनसांची किंमत ठरली जाते.

आतां, दोन देश आपआपला माल मोबदला करतील अशा शर्ती कशा ठरल्या जातात, त्या कशानें मुकरर होतात, हें पाहिलें पाहिजे. एक देश आपला माल दुसरे देशास पाठवील तो काय शर्तीवर? कापडाचा एक गठ्ठा इंग्लंडांतून आणला असतां मोबदला बरोबर एक खंडी धान्य हिंदुस्थानांतून द्यावें लागतें याचें कारण काय? एका गठ्ठयास एक खंडी धान्य ही किंमत कोणत्या नियमांस अनुसरून मुकरर झाली आहे? दोन्ही जिनसांचे उत्पत्ति खर्चानें ही किंमत मुकरर झाली आहे काय? विचा-

केला असतां 'नाहीं' असें ह्मणावें लागेल. कापड व धान्य दोन्हींही इंग्लंडांतच झालीं असतीं, अगर दोन्हीही हिंदुस्थानांतच झालीं असतीं, तर त्यांचा अरस परस मोबदला त्यांचे ज्या त्या देशांतील उत्पत्तीच्या खर्चाचे मानानें झाला असता हें खरें आहे. परंतु, सर्व कापड इंग्लंडांत तयार होतें, व सर्व धान्य हिंदुस्थानांत तयार होतें, असें मानल्यामुळें, ज्या त्या देशांतील उत्पत्तिखर्चाचे प्रमाणानें या जिनसांचा परस्पर मोबदला होत नाहीं; याचें कारण लक्षपूर्वक बारीक विचार केल्याशिवाय समजण्यासारखें नाहीं. पुरवठा व खप यांचे नियम पूर्णपणें लक्षांत असल्याशिवाय वरील भानगडीचे प्रश्नाचा उलगडा होऊं शकणार नाहीं.

कल्पना करा कीं, दहा खंडी धान्याची किंमत हिंदुस्थानांत पंधरा गठ्ठे कापडाबरोबर आहे, व तीच इंग्लंडांत वीस गठ्ठ्यांबरोबर आहे. अशी स्थिति असेल तेव्हां इंग्लंडांतून कापड आणण्यांत हिंदुस्थानास फायदा होईल, व हिंदुस्थानांतून धान्य नेणें इंग्लंडास नफ्याचें होईल. दरेक देश दोन्ही जिन्नस आपणच उत्पन्न करील, तर हिंदुस्थानांत दहा खंडी धान्यास पंधरा गठ्ठे कापड मिळेल, व इंग्लंडांत तें वीस गठ्ठे मिळेल. असा दोन्ही देशांत निरनिराळा भाव राहील. परंतु दरेक देश दोन्ही जिन्नस आपणच उत्पन्न न करितां, फक्त एकच जिन्नस उत्पन्न करीत आहे, आणि उत्पन्न केलेला एकच जिन्नस मोबदला करून दुसरीकडे झालेला जिन्नस घेत आहे, असें मानिलें आहे. अशी स्थिति असेल तेव्हां दोन्ही देशांत कापडाचा सारखा एकच दर राहील. हिंदुस्तानांत निराळा व इंग्लंडांत निराळा असे

दोन वेगळे दर रहाणार नाहींत. आतां हा एकच दर कोणता राहूं शकेल? जर दहा खंडी धान्यास पंधरा गठ्ठे कापड मिळण्याचा भाव दोन्ही देशांत राहील, तर या व्यापारांत हिंदुस्थानांत खास कांहींएक नफा न मिळतां सर्व फायदा इंग्लंडच घेऊन जाईल. कारण आपले पंधरा गठ्ठे देऊन इंग्लंड दहा खंडी धान्य हिंदुस्थानांतून आणील, त्या धान्याची किंमत इंग्लंडांत वीस गठ्ठे आहे. तेव्हां दरेक खेपेस पांच गठ्ठे फायदा इंग्लंडास होत जाईल. हिंदुस्थानास मुळींच फायदा नाहीं. आतां उलट कल्पना करूं कीं, दोन्ही देशांत दहा खंडी धान्याची किंमत वीस गठ्ठे आहे. दोन्ही देशांत हाच भाव राहील तर इंग्लंडास या व्यापारापासून कांहींच फायदा होणार नाहीं. सगळा नफा हिंदुस्थानासच मिळेल. कारण दहा खंडी धान्यानें हिंदुस्थानांत फक्त पंधरा गठ्ठेच बनूं शकतात, परंतु इंग्लंडाशीं व्यापार सुरू झाल्यानें वीस गठ्ठे मिळूं लागले. दरेक खेपेस पांच गठ्ठे नफा राहूं लागला. ही सर्व गोष्ट खरी आहे, परंतु, मागें सांगण्यांत आलें आहे कीं, दोन देशांचे दरम्यान व्यापार सुरू झाला असतां, व्यापाराचा सर्वच फायदा एकाच देशास मिळूं शकत नाहीं. तो दोन्ही देशांत विभागला पाहिजे, नाहीं तर व्यापार बंद पडेल. यासाठीं वरील व्यापारांत होणारा सगळा फायदा हिंदुस्थानासच मिळणार नाहीं, तसाच तो सगळाच इंग्लंडासही राखतां येणार नाहीं. ह्मणून दहा खंडी धान्याची किंमत पंधरा गठ्ठेही मुकरर होऊं शकणार नाहीं, तसेंच ती वीस गठ्ठेही कायम ठरवीं जाणार नाहीं. जर दोन्ही देशास लाभ होणें

आहे, तर ती किंमत पंधरा व वीस गठ्ठे यांचे दरम्यान कोठें तरी मुकरर होईल. कल्पना करा कीं, हा भाव अठरा मुकरर झाला. असें झालें असतां पंधरा गठ्यापेक्षां तीन गठ्ठे दर दहा खंडीमागें हिंदुस्थानास मिळूं लागल्यानें दरेक खेपेस तीन गठ्ठे नफा हिंदुस्थानास राहूं लागेल. व इंग्लंडास दहा खंडी धान्य तयार करण्यास वीस गठ्ठे कापडाइतका खर्च लागतो, तें धान्य आतां अठरा गठ्ठे दिले असतां मिळूं लागलें, ह्मणून दरेक खेपेस इंग्लंडासही दोन गठ्यांची बचत राहूं लागली. ह्मणजे जो एकंदर पांच गठ्ठे नफा होतो, तो, हिंदुस्थानास तीन व इंग्लंडास दोन गठ्ठे याप्रमाणें वाटला गेला. आतां अठरा गठ्यांचा भाव मुकरर होईल तर काय परिणाम झाला हें आपण पाहिलें; पण हा अठरा गठ्ठे भाव काय कारणांनीं मुकरर होईल ? सतरा गठ्ठे किंवा एकोणीस गठ्ठे कां होणार नाहीं ? व जो भाव मुकरर होईल तो काय नियमांनीं ? आपला मूळचा प्रश्न असा आहे कीं, हिंदुस्थानांतील धान्य व इंग्लंडांतील कापड परस्पर अदलाबदल होणें आहे. तें कोणते मुकरर भावानें होईल ? तो मुकरर भाव कोणत्या कारणांनीं, कोणत्या नियमांनीं ठरला जाईल ? अमुकच दरानें धान्य व कापड अदलाबदल केलें जाईल हें कशानें ठरलें जाईल ?

वरील भानगडीचें प्रश्नांचें थोडक्यांत उत्तर ह्मटलें ह्मणजे ‘ खप व पुरवठा. ’ हें होय. दोन देशांतील जिनसांचा परस्पर मोबदला होण्याचा ‘ दर ’ त्या जिनसांचा जसा ‘ पुरवठा ’ असेल व त्यांचा जसा ‘ खप ’ असेल त्या

मानानें ठरेल. ' दहा खंडी धान्याबद्दल अठरा गठ्ठे कापड ' असा भाव आपण वर धरला आहे. इंग्लंडास जितक्या धान्याचा खप आहे, तितकें धान्य हिंदुस्थानांत आहे, व हिंदुस्थानास जेवढें कापड पाहिजे आहे, तेवढें इंग्लंडाजवळ आहे. ह्मणजे खप व पुरवठा दोन्ही देशांत समसमान आहेत. तेव्हां वर सांगितलेला दहा खंडी धान्यास अठरा गठ्ठे कापड हा दर मुकरर झाला आहे, असें आपण मानूं.

कल्पना करा कीं, हिंदुस्थानास एक हजार गठ्ठे कापडाचा खप आहे, तर वरील दराप्रमाणें कापडाचे मोबदला अठराशें खंडी धान्य हिंदुस्थानानें दिलें पाहिजे. पण समजा कीं, इतके धान्याचा इंग्लंडास खप नाहीं. दर दहा गठ्ठयास अठरा खंडीप्रमाणें नऊशें गठ्ठयांचें जितकें धान्य होईल, तेवढेंच इंग्लंडास पुरेसें आहे. मग जास्त शंभर गठ्ठे पूर्वीचे दरानेंच धान्य घेण्याकरितां त्याचा खप नसल्यामुळें इंग्लंड पाठविणार नाहीं. पण हिंदुस्थानास हे शंभर गठ्ठे आल्यावाचून चालण्यासारखें नाहीं. त्याला पुरापुर एक हजार गठ्ठयांचा खप आहे. सबब हे जास्ती लागणारे शंभर गठ्ठे मिळविण्यास, दर दहा गठ्ठयांस अठरा खंडी धान्यापेक्षां कांहीं जास्त धान्य दिल्यावांचून ते मिळणार नाहींत. ह्मणून हिंदुस्थान तें देण्यास तयार होईल. जास्ती भावानें ह्मणजे समजा कीं, एकोणीस खंडीप्रमाणें धान्य मिळेल तर इंग्लंड तें मोठ्या खुषीनें घेईल. अशा रीतीनें इंग्लंडांत धान्याचा खप कमी झाल्यानें तें स्वस्त झालें. पूर्वी दहा गठ्ठयांस अठरा खंडी धान्य मिळत असे, तें हल्लीं एकोणीस खंडी मिळूं लागेल. धान्याचा खप कमी झाला, तरी त्याची

किंमतही कमी झाली, ह्मणजे तें स्वस्त झालें. व तें स्वस्त झालें यामुळें पुन्हां त्याचा खप वाढला. अठरा खंडीप्रमाणें भाव होता त्या वेळीं इंग्लंडास तें नकोसें होतें. परंतु एकोणीस खंडीचा भाव होतांक्षणींच पुन्हा जास्त धान्य घेण्यास इंग्लंड तयार झालें. ह्मणजे धान्य स्वस्त होतांच इंग्लंडांत त्याचा खप पुन्हा वाढला असें झालें.

दर दहा गड्ड्यांस अठरा खंडी धान्य मिळत होतें, तेव्हां खप व पुरवठा हे समसमान होते. धान्याचा खप कमी झाला कीं, लगेच तें स्वस्त झालें; अठरा खंडींचें तें एकोणीस खंडी मिळूं लागलें, व धान्य स्वस्त झाल्याबरोबर त्याचा खप जो बंद पडला होता तो पुन्हां वाढला. ह्मणजे एकोणीस खंडी तें मिळूं लागलें कीं, लोक तें घेऊं लागले. इंग्लंडात तें नकोसें होतें तरी स्वस्त मिळाल्यामुळें त्यानें घेण्याची सुरवात केली, व पुन्हां खप आणि पुरवठा समसमान झाले, व नंतर एकोणीस खंडीचा भाव मुकरर झाला. खप व पुरवठा समसमान झाल्यावांचून कोणत्याही पदार्थाची किंमत मुकरर होत नाहीं, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे.

खप व पुरवठा हे अनेक कारणांनीं हमेश बदलले जातात. ते अमुक वेळीं अमुकच असतील असें निश्चित नाहीं. ह्मणून दोन देशांचे दरम्यान अदलाबदल होणारे पदार्थांचे मधला भावही मुकरर असा कधींच ठरवितां येणार नाहीं. पदार्थांचा खप कमी होईल; तशी किंमत उतरेल, व किंमत उतरली कीं पुन्हां खप जास्त होऊं लागेल, ह्मणजे खप आणि पुरवठा यांत जसें कमजास्त होत

कमी भाव व जास्तींत जास्ती भाव मात्र कायमचे ठरले जातील, व ते भाव अदलाबदल होणाऱ्या वस्तूंच्या ज्या त्या देशांतील उत्पत्तिखर्चानें मुकरर होतील. या दोन हद्दी मुकरर झाल्या म्हणजे नक्की भाव, त्यांचे दरम्यान कोठें तरी कायम होईल. व तो खप व पुरवठा यांचे कमीजास्त मानानें वेळोवेळीं चढउतार होऊन ठरेल.

वरील विचारावरून ध्यानांत येईल कीं, दोन देशांचा परस्पर व्यापार सुरू झाला असतां, होणारा सर्वच फायदा एक देशास मिळावयाचा नाहीं. दोन्ही देशांत तो वांटला जाईल. पण तो नेहमीं सारखेच हिश्यानें दोन्ही देशांस मिळेल असें नाहीं. एकास कमी व एकास जास्ती असा तो असेल. तो कमी कोणास व जास्त कोणास मिळेल, याबद्दल साधारण नियम असा सांगतां येईल कीं, व्यापार करणारे दोन देशांपैकीं दरएकाचा फायदा, त्या देशांत बाहेरून येणारे मालाच्या खपाचे उलट प्रमाणानें असतो, ज्या देशांतील मालाचा बाहेर खप फार आहे, त्या देशास परकीय देशाशीं व्यापार केल्यापासून अधिक फायदा होईल. बाहेर जाणारा माल परकीय लोकांस हवासा असल्यामुळें, तो घेण्यासाठीं मोबदल्यांत ते आपला माल पुष्कळ देऊं लाग-तात, यामुळें कोणत्याही देशांतून बाहेर जाणारे मालाची फार चणचण असेल तर, बाहेरून देशांत येणारा सगळा माल त्या देशास स्वस्त पडतो. म्हणजे नफ्याचा अंश त्या देशास फार मिळतो. तसेंच उलटपक्षीं दुसऱ्या देशांतून येणारे मालाची आपल्यास फारशी जरूर नसली, अर्थात्

त्याचा आपल्यास खप कमी असला, तर तो माल आपल्यास स्वस्त पडतो. ज्यांना दुसऱ्याचे मालाची फारशी गरज नाहीं, त्यांना तो स्वस्त मिळतो हें उघड आहे. ज्या देशास परदेशांतील मालाचा खप फारच थोडा, व परदेशास मात्र याचे मालाची अतोनात जरूर, त्याला परदेशाशीं व्यापार केल्यानें अत्यंत फायदा होईल. थोड्याशा खर्चानें तयार केलेल्या जिनसांचे बदलीं त्यास परदेशांतून बहुमोलाचे पुष्कळ जिन्नस मिळूं शकतील. या विचारावरून एक अत्यंत महत्वाचा सिद्धांत सिद्ध होतो; तो हा कीं, बाहेर जाणारे मालापेक्षां बाहेरून देशांत येणारा माल जास्त असेल, तरच त्या देशास फायदेशीर होतो.' हा सिद्धांत प्रथमदृष्ट्या चमत्कारिकसा भासेल; परंतु विचारांतीं तो सर्वथैव खरा आहे, अशी खातरी झाल्यावांचून राहणार नाहीं. हा सिद्धांत फारच महत्वाचा आहे, परंतु त्याचें स्पष्टीकरण करण्यास येथें सवड नसल्यामुळें व हें योग्य स्थळ नसल्यामुळें याबद्दल विशेष विचार पुढें करण्यांत येईल.

उत्पत्तिकार्यांत यंत्राचें सहाय अतोनात घेण्याचें सुरू करून किंवा कांहीं नवीन युक्ति काढून पदार्थ स्वस्त रीतीनें तयार करण्याची एखाद्या देशानें युक्ति काढली असतां अत्यंत नफा होऊं लागतो. परंतु दुसरे देशाशीं व्यापार सुरू असेल तर त्यापासून होणारा सर्व लाभ जरी त्या देशासच मिळूं शकणार नाहीं, तरी फार मोठा अंश त्या देशास मिळेल. कारण नवीन युक्तीनें जिन्नस थोड्या खर्चांत होऊं लागल्यानें एक तर नफ्याचा अंश पुष्कळ राहील हें तर उघडच आहे. शिवाय थोड्या खर्चांत पदार्थ झाल्यामुळें

त्याची किंमत उतरेल; व ते स्वस्त होतील. ते स्वस्त झाले की त्यांचा खप वाढेल; आणि ज्या देशांतील मालाचा खप नेहमीं वाढत आहे, त्यास व्यापाराचा अत्यंत फायदा मिळतो हें आतांच सांगितलें. यावरून उत्पत्तीचे कामीं यंत्राचा उपयोग व नवीन शोध देशांत जसजसे जास्त निघतील, तसतसा देशाचा फायदा होईल हें लक्षांत येईल.

वरील विचारावरून इंग्लंड व हिंदुस्थानचे सांप्रतचे स्थितींत किती जमीन अस्मानीचा तफावत आहे, हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. हिंदुस्थानासारख्या प्रचंड देशांतील कोट्यावधि लोकांस इंग्लंडांत तयार होणाऱ्या हजारों जिनसांचा मोठा जबरदस्त खप आहे. हिंदुस्थानचा बहुतेक व्यापार इंग्लंडचेच हातीं आहे. इंग्लंडांत तयार होणारा माल दररोज नवीन शोध होऊन यंत्रानें तयार होत असल्यामुळें, तो स्वस्त होऊं लागतो; त्यामुळें तर तिकडील मालाचा खप अतोनात वाढतो. काश्मीरांत तयार होणाऱ्या शालजोड्या पूर्वी फार महाग पडत, पण हल्लीं गरीबगुरीब सुद्धां विलायती बनाती वापरूं लागले आहेत. सारांश इंग्लंडांत तयार होणारें हरएक तऱ्हेचें सामान, निरनिराळ्या प्रकारचें कापड, लोकरीचीं वस्त्रें, लोखंडी सामान, धातूचें सामान, लांकडी पदार्थ, कांचेचें सामान, चामड्याच्या वस्तू, बुकें, स्टेशनरी, भांडीं, कागद, शाई, लेखण्या, इ० लाखों जिनसांचा दिवसेंदिवस मोठा खप होत चालला आहे. कारण त्या वस्तु तिकडे लोक फार उत्पन्न करूं लागले आहेत. खप अतिशय वाढल्यानें व्यापारांत होणारे नफ्याचा बहुतेक अंश इंग्लंडासच मिळतो असें म्हटलें असतां फारसा

प्रत्यवाय येणार नाहीं. हिंदुस्थानांतून धान्य वगैरे जे जिनस इंग्लंडांत जातात, तसले जिनस दुसऱ्या देशांतूनही तेथें येतात. ह्मणून हिंदुस्थानांतूनच जाणारे जिनसांचा इंग्लंडांत असावा तेवढा खप नसल्यामुळें, व इंग्लंडचे मालाचा खप हिंदुस्थानास अपरिमित असल्यामुळें, हिंदुस्थानांतील धान्य इंग्लंडास पडावें त्यापेक्षां बरेंच जास्त स्वस्त पडतें, व इंग्लंडास तें पाडून घेण्यास सांपडतें.

हिंदुस्थानाची स्थिति याचे अगदीं उलट आहे. राजकीय हरकती एका बाजूस ठेवल्या तरी, हिंदुस्थानाची सांप्रतची स्थिति चमत्कारिक दिसते. देशांत परकी देशांतील मालाचा खप फार मोठा झाला आहे व तो खप दिवसेंदिवस अनेक कारणांनीं वाढत चालला आहे. या सगळ्या मालाचे मोबदला देण्यास फक्त धान्य वगैरे शेतीचाच कायतो माल. इतका पुष्कळ शेतीचा माल इंग्लंडास घेण्याची जरूर नाहीं, ह्मणजे त्या देशांत इकडून जाणारे सर्व धान्यास खप आहे असें नाहीं. परंतु इंग्लंडांतून इकडे येणारे सगळे मालाचा हिंदुस्थानास जो खप आहे, तो कमी होत नाहीं. तेव्हां तो माल घेण्याकरितां आपलें धान्य स्वस्त दरानें विकल्याशिवाय हिंदुस्थानास उपाय नाहीं. ह्मणजे इंग्लंडांतील मालाचे मोबदला सरळ व्यापार चालला असतां हिंदुस्थानास जें द्यावें लागलें असतें, त्याचेपेक्षां अतोनात अधिक माल देणें पडतो. शिवाय धान्य हें शेतकीचें उत्पन्न आहे. मागें पदार्थांचे जे तीन वर्ग आहेत ह्मणून सांगितले, त्यापैकीं शेतीचा माल हा दुसरे वर्गांत घातला आहे. ह्मणजे याचा पुरवठा जेवढा वाढवावा तेवढा उत्पत्तिखर्च प्रमाणा-

पेक्षां जास्त वाढत जातो. इंग्लंडांतील मालाचा इकडे दिवसेंदिवस अधिक खप होऊं लागल्यानें, तो घेण्यासाठीं तिकडे दिवसेंदिवस अधिक धान्य पाठविण्याची जरूर पडत चालली आहे. उत्तम जमिनी सर्वच अगोदर लागवड होऊन गेल्यामुळें, हलके प्रतीच्या जमिनी लागवडींत घेऊन हें अधिक लागणारें धान्य उत्पन्न करावें लागतें; त्यामुळें आपलें धान्य दिवसेंदिवस थोड्या खर्चांत न होतां उलट तें पिकविण्यास जास्त जास्त खर्च लागूं लागतो; म्हणून तें स्वस्त न पडतां महाग पडूं लागतें. व जसजसें हें अधिक महाग होतें, तसतसा इंग्लंडांत याचा खप कमीच होत जातो. परंतु इंग्लंडचे मालाचा खप वाढत असल्यामुळें घेतलेल्या मालाबद्दल धान्य जसें जाईल त्या भावानें इंग्लंडचे पदरीं बांधावें लागतें; व इंग्लंडास तें पाडून घेण्यास फावतें. त्यामुळें नफ्याचा अंश हिंदुस्थानास कांहींच राहूं शकत नाहीं. उलट असें होतें कीं, देशांत जेवढा अधिक माल येतो; त्यापेक्षां पूर्वी जितका माल द्यावा लागत असे त्यापेक्षां इंग्लंडांत जाणारा माल सारखे प्रमाणानें वाढत जात आहे. परदेशाशीं व्यापार सुरू ठेवल्यानें, व तिकडील मालावांचून चालत नसल्यामुळें, आलेल्या मालाचे मोबदला देण्याकरितां धान्य उत्पन्न करण्यासाठीं देशांत असेल नसेल तेवढें सर्व भांडवल एका शेतींतच गुंतून पडतें. आणि शेतींत उत्पन्न झालेला सर्व माल व्यापाराच्या अशा स्थितीमुळें बाहेर पाठवावा लागतो. त्यामुळें धान्य, जें उपजीविकेचें मुख्य साधन, तें या देशांत महाग होऊन जातें. धान्य महाग झाल्यानें सगळ्या वस्तु महाग होतात, व त्यामुळें उपजी-

विकेचा सगळाच खर्च वाढतो, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. उपजीविकेचा खर्च वाढल्यामळें मजुरी वाढते. मजुरीचे दर वाढले तरी मजुरांची स्थिति न सुधारतां दिवसेंदिवस ती निकृष्ट दशेस येऊन पोंचते. सर्व वस्तू महाग झाल्यानें व मजुरी वाढल्यानें उत्पत्तिखर्च वाढतो, आणि तेणेंकरून देशांतील एकंदर संचय कमी होतो. संचय न झाल्यानें भांडवल नाहींसें होतें. मग मोठमोठया कारखान्यांचें नांव कशाला पाहिजे! सर्वत्र दारिद्र्य होऊन लोकांस जेमतेम खावयास मिळण्याची दिवसेंदिवस मारामार पडत चालली आहे. हिंदुस्थानची स्थिति सुधारत चालली आहे, असें ह्मणणारांनीं या गोष्टींचा विचार करणें योग्य आहे. अशी स्थिति होत चालली असल्यामुळें, शेतकीचे कामीं जास्त भांडवल घातल्यानें काय परिणाम होतील, हें पाहण्याचें काम वाचकांवरच सोंपवून, हें विषयांतर पुरें करितों.

---

## भाग ३

## परकीय देशाशीं व्यापाराचे बाबातींतील कांहीं गैरसमज.

दोन देशांचा परस्पर व्यापार सुरू झाला असतां काय काय फायदे होतात, हें मागील भागांत सांगण्यांत आलेंच आहे. तथापि या विषयाचे संबंधानें लोकांचे फार गैरसमज असल्यामुळें, त्या गोष्टींचा पुन्हा थोडा जास्त विचार करण्याची आवश्यकता दिसते.

परकीय देशाशीं व्यापाराचे बाबतींत 'आडम स्मिथ' नांवाचे विख्यात ग्रंथकाराचें असें मत होतें कीं, 'परदेशाशीं

१२-६१८-२०००

व्यापार केल्यानें फायदा म्हटला म्हणजे, 'आपल्या खपास पुरून जास्त उरलेला माल खपला जातो, व गुंतून पडलेलें भांडवल नफ्यासहित परत वळतें' इतकेंच. परदेशाशीं व्यापार केल्यानें जे फायदे होतात, त्यांचें हें खरें स्वरूप नव्हे, हें मागील विचारावरून ध्यानांत आलेंच असेल. 'फाजील पडलेला माल खपण्यास सोय होते' असें म्हटलें म्हणजे, असा अर्थ निष्पन्न होतो कीं, 'देशास आपल्या खपास पुरून उरेल इतका फाजील माल तयार करण्याची जबरदस्तीच पडली आहे कीं काय कोण जाणें.' 'हा माल कोठें खपला नाहीं तर त्याचा नाश होऊन जाईल.' 'किंवा मुळींच कोणी तयार करणार नाहीं, व त्यामुळें तो करण्यास लागणारें भांडवल निरुपयोगी पडून राहील.' व 'तो तयार करण्यांत गुंतलेले मजूर उपाशीं मरतील.' या सर्व समजुती चुकीच्या आहेत. जबरदस्तीनें कोणताही देश फाजील माल उत्पन्न करणार नाहीं. आपल्या खपास नको आहे, व दुसऱ्या कोणास देण्याची जरूर नाहीं, असा माल उत्पन्न करण्याची खटपट कोणीही करणार नाहीं. तर मग देशांत फाजील माल कां उत्पन्न होतो ? याचें उत्तर असें आहे कीं, परकीय देशांत तयार होणाऱ्या पुष्कळ वस्तू असतात. त्या आपल्या देशांत स्वस्त दरानें मिळूं शकत नाहींत. परकीय देशांत तयार झालेला माल स्वस्त दरानें आपल्यास मिळावा, एवढ्याचसाठीं त्या मालाचे मोबदला देण्याकरितां हा फाजील माल तयार केला जातो. हा फाजील माल बाहेर जाण्याचें बंद केलें असतां तो उत्पन्नच केला जाणार नाहीं; आणि त्यांत गुंतलेले लोक भांडवल व मजूर

मोकळे होतील. परंतु हा माल उत्पन्न न केला तर बाहेरून येणाऱ्या वस्तूंचे मोबदला देण्यास जवळ माल नसल्यामुळें, बाहेरील देशांतून येणारा मालही बंद पडेल, आणि या मालाची तर जरूर आहे, यासाठीं आपले देशांतच करण्याची योजना झाली पाहिजे. आणि असें झाल्यानें, फाजील माल करण्याचें बंद होऊन वांचलेली मेहनत व भांडवल हीं बाहेरून येत असलेला माल आपले येथेंच करण्याचे कामीं लाविलीं जातील. मोकळें पडलेलें भांडवल निरुपयोगी होईल असें नाहीं, व मजूर उपाशी मरतील असेंही नाहीं. मात्र हा माल आपले देशांत उत्पन्न करण्यास साधनें असावीं तशीं नसतील, तर तो तयार होण्यास अधिक खर्च लागून महाग पडेल. यामुळें शेवटीं माल वापरणाऱ्या गिऱ्हाइकांस जास्त किंमत पडून त्याचा गैरफायदा होईल. हा गैरफायदा होऊं नये, बाहेर स्वस्त तयार झालेला माल आपल्यास थोड्या किंमतींत घेतां यावा, एवढ्याच हेतूनें परदेशाशीं व्यापार करावयाचा. आपले देशांत फाजील तयार झालेला माल खपविण्यासाठीं दुसऱ्या देशाशीं तो करावयाचा, असें नाहीं, हें लक्षांत येईल.

परदेशाशीं व्यापार केल्यानें दुसऱ्या देशांत तयार झालेला माल आपल्यास स्वस्त दरानें मिळतो. आपले देशांतच तो केला असतां महाग पडतो, ह्मणून तो बाहेरून आणावयाचा. कांहीं किंमतीस आपल्या देशांत जितका माल मिळेल, त्याचेपेक्षां जास्त माल परदेशांतून मिळाला पाहिजे तरच आपला फायदा आहे. ह्मणजे मोबदला देण्यास आपल्याजवळ जो माल आहे त्याबद्दल देशांतले देशांत जो

माल मिळत होता त्यापेक्षां परदेशांतून जास्त माल मिळूं लागला पाहिजे, ह्मणजे माल आपण बाहेर पाठवूं त्याचे बदल्यांत अधिक अधिक माल परदेशांतून आपल्या देशांत आला पाहिजे. अथवा जावक माल जितकाचा तितकाच राहून जर देशांतील आवक माल वाढत जाईल, तर देशास फार फायदा आहे असें समजलें पाहिजे. व्यापाराचा सर्व फायदा काय तो बाहेरून अधिक माल आल्यानें होतो. बाहेरील येणारा माल कमी होऊन त्याचे मोबदला आपले देशांतून बाहेर जाणारा माल वाढेल तर आपलें फार नुकसान आहे. साधारण लोकांची समजूत अशी आहे कीं, देशांतून माल बाहेर गेला असतां चांगलें. आवक मालापेक्षां जावक माल जास्त असला तरच देशास फायदा असें कांहींचें ह्मणणें आहे. हा समज भ्रांतिमूलक आहे. कारण आपण दुसऱ्यास जें देऊं त्यापेक्षां ज्यास्त त्या देशांतून आपल्यास मिळेल त्यांत फायदा आहे. आपण जें दुसरे देशास अधिक देऊं त्यांत काय फायदा ?

'देशांतून बाहेर जाणारे मालापेक्षां बाहेरून देशांत येणारा माल जास्त असेल तरच व्यापार त्या देशास फायदेशीर असतो.' हा सिद्धांत मागील भागांत सांगण्यांत आला आहे. हा सिद्धांत प्रथमदृष्ट्या विलक्षण दिसतो ह्मणून त्याचा विचार विस्तारानें करणें जरूर होतें, सबब त्या ठिकाणीं करण्यास अवकाश नसल्यामुळें आतां त्याविषयीं अधिक विचार करणें आवश्यक आहे. परदेशास जास्त माल पाठविण्यांत फायदा नाहीं. परदेशांतून जास्त माल आपले देशांत आणल्यापासून अधिक फायदा आहे, ही गोष्ट नीटपणें सम-

जून पक्की ध्यानांत ठेवणें फार अगत्याचें आहे. प्रथम एक गोष्ट लक्षांत ठेवावयाची कीं, बाहेरून माल आपले देशांत न आणतां, आपले देशांतून मात्र तो बाहेर पाठवावयाचा या ह्मणण्याचा कांहीं अर्थच होत नाहीं. व्यवहार सुरू झाला असतां जें आपण देऊं, त्याचे मोबदला कांहीं तरी घेतलेंच पाहिजे. व्यापार किंवा देवघेव किंवा अदलाबदल याचा अर्थ नुसतें देणेंच असा नाहीं, तर देणेंघेणें असा आहे. देशांतून माल पाठविला तर त्याचे बदल्यांत बाहेरून घेतलाच पाहिजे. देशांतून जो माल बाहेर पाठविणें तो धर्मार्थ तर पाठवावयाचा नाहींच. त्याचे मोबदला कांहीं तरी आलेंच पाहिजे. आतां आपल्या मालाचा मोबदला किती यावा ? तो कमी आलेला चांगला, किंवा जास्त आलेला चांगला ! अर्थात् जास्त मोबदला मिळेल तर चांगलें. देशांतून बाहेर पाठविलेल्या मालास 'जावक' व देशांत त्याचे बदला येणारे मालास 'आवक' माल ह्मणतात. ह्मणून जावक मालाचे बदला आवक माल जितका अधिक येईल तितकें चांगलें हें स्पष्ट आहे. अनेक तऱ्हेच्या वस्तू व माल, यांचा संपत्ति या शब्दानें बोध होतो. ही संपत्ति, बनेल तोंपावेतों बाहेरून देशांत अधिक न आणितां तो देशांत असलेली संपत्ति बाहेर जास्त काढून टाकिल्यानें देश समृद्ध होईल काय ?

याच गोष्टीचा, एक उदाहरण घेऊन विचार करूं. परकीय देशाशीं सुरू असलेला व्यापार साधारणपणें 'सम व्यवहार' असला पाहिजे. आवक व जावक मालाची बरोबरी असली, किंवा आवक मालाची जावक मालानें फिर्‍-

फाट झाली, ह्मणजे त्या व्यवहारास ' सम व्यव
ह्मणतात. सम व्यवहार असतां इंग्लंडांतून हिंदु
लाख कापडाचे ताके आणिते, व त्याचे मो
लाख मण धान्य देतें, असें मानिलें, तर हि
जावक माल साठ लाख मण धान्य आहे, व आ
साठ लाख ताके आहेत. हिंदुस्थानानें जास्त
पाठविण्याचें मनांत आणलें; समजा कीं, सत्तर
धान्य हिंदुस्थान बाहेर पाठविण्यास इच्छितें; परं
लाख मण जास्त धान्याचा इंग्लंडास खप नाहीं.
धान्य इंग्लंड पूर्वीचे दरानें घेणार नाहीं. या ट
मणांचे बदला दहा लाख ताके तें देणार नाहीं. स
आठ लाख ताके दिले तर दोन लाख
हिंदुस्थानचें नुकसान झालें असें होईल,
हिंदुस्थानाचा जावक माल सत्तर लाख मण धान्
आवक माल अठ्ठावन्न लाख ताकेच झाला.
मालापेक्षां जावक माल जास्त झाला असतांही फायद
दोन लाख ताक्यांचें नुकसानच झालें. यावरून
मालापेक्षां जावक माल जास्त असला पाहिजे असे
अगदीं चुकीचें आहे, हें सहज लक्षांत येईल. य
दुसरे बाजूनें विचार केला असतां काय परिणाम
पाहूं. हिंदुस्थान साठ लाख मण धान्य इंग्लंडास
अमेरिकेंतून अगर ईजिप्टमधून धान्य मिळाल्यामुळें
स्थानाचे धान्याची त्यास विशेष जरूर राहिव
हिंदुस्थानास तर साठ लाख ताके इंग्लंडपासून घेतल
जरूर नाहीं, तर मग ते मिळण्यास लाख मणांपेक्षा

अधिक धान्य दिलें पाहिजे. येथें जावक माल जरी वाढला तरी त्याचे मोबदला मिळणारा आवक माल जितक्याचें तितकाच राहिला आहे. जावक माल जास्त झाल्यानें उलट नुकसान झालें.

आवक मालापेक्षां जावक माल जास्त असला ह्मणजे फायदा होतो, हें कांहीं लोक निराळ्या तऱ्हेनें दाखविण्याचा प्रयत्न करितात. त्यांचें ह्मणणें असें असतें कीं, होणारी देवघेव नेहमीं आपल्या लाभांत असली पाहिजे. याचा अर्थ व्यापारानें लोकांकडे आपलें नेहमीं घेणें निघालें पाहिजे. हिंदुस्थानानें जर एक कोटीचा माल इंग्लंडांत पाठविला, तर त्याचे मोबदला ऐशीं लाखांचाच माल आणावा; व वीस लक्ष रुपये इंग्लंडकडे हिंदुस्थानचें घेणें रहावें. इंग्लंडकडे नेहमीं कर्ज रहात जाईल; असें झाल्यानें हिंदुस्थानास फायदा आहे. हें कर्ज शेवटीं रोख रुपये किंवा सोनें, जवाहीर, वगैरे देऊन इंग्लंडास फेडावें लागेल. येथें जावक माल जास्त आहे, व आवक माल कमी आहे, यावरून आपण जास्त बाहेर पाठवून बाहेरील माल थोडा घेतला, त्यामुळें वीस लाख रुपये देशांत जास्त आणले, व तितके मानानें हिंदुस्थानदेश श्रीमान झाला, अशी त्यांची समजूत आहे. आतां ही समजूत किती चुकीची आहे, हें थोडा विचार केला असतां लक्षांत येईल. एक तर या ह्मणण्या-वरूनच आवक मालापेक्षां जावक माल जास्त नाहीं असें होतें. एक कोटीचा जावक माल आहे, व आवक माल ऐशीं लाखांचा असून वीस लाख रुपये रोख किंवा सोनें किंवा जवाहीर आहेत. सोनें अथवा जवाहीर हा एक

प्रकारचा मालच समजला पाहिजे. संपत्ति ह्मणजे सोनें, नाणें, जवाहीर एवढेंच नव्हे; तर अनेक तऱ्हेचा माल संपत्तीच होय. देशांत माल आला काय आणि जवाहीर आलें काय सारखेंच आहे. किंबहुना, सोनें, चांदी, जवाहीर हाही एक प्रकारचा व्यापाराचा मालच आहे. ह्मणून ८० लाखांचा इतर माल व २० लाखांचा, सोनें, चांदी इ० प्रकारचा माल, मिळून एकंदर आवक माल एक कोटी-चाच झाला.

यांत कांहीं नफाही नाहीं व तोटाही नाहीं. कापड, कोळसे इ० प्रकारचे मालाऐवजीं, सोनें, चांदी, हिरे, हा माल आला, एवढाच काय तो भेद. पैसा हीच काय ती संपत्ति. पैशाशिवाय इतर वस्तु संपत्ति नव्हत," ही समजूत चुकीची आहे, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. यावरून वीस लाख रुपये देशांत आणले ह्मणजेच देश संपत्तिमान झाला, व ते न आणतां त्याच किंमतीचा माल देशांत आणला असतां देश संपत्तिमान् झाला नसता, हें ह्मणणें बरोबर नाहीं, व हें जास्त स्पष्ट करून सांगण्याची कांहीं जरूर नाहीं.

आतां देशांत माल न येऊं देतां रोकडा पैसा आणला असतां काय परिणाम होईल ? देश श्रीमान होईल किंवा कसें ? देशांतून बाहेर माल पाठवून त्याचे बदल्यांत हा पैसा आलेला आहे. देशांतील संपत्ति एक स्वरूपांत होती, ती रूपांतर होऊन पैशांचे रूपानें परत आली आहे इतकेंच काय तें. जितकी संपत्ति बाहेर गेली होती, तितकीच परत आली आहे, जास्त आलेली नाहीं. यावरून देश पूर्वीपेक्षां श्रीमंत तर झाला नाहीं याबद्दल बिलकूल शंका नाहीं. पण

देशांत जास्त पैसे झाल्यानें मात्र कांहीं विलक्षण फेरफार होतात, याविषयीं थोडेंसें विवेचन मागें करण्यांत आलेंच आहे. या स्थळींही थोडा जास्त विचार करूं. आपण मानिलें आहे कीं, एक कोटीचा माल हिंदुस्थानानें इंग्लंडांत पाठवि[illegible] तिकडून ऐशीं लक्षाचा परत आणला, आणि वीस लक्ष रुपये आणले. हिंदुस्थानांत इतके जास्त रुपये झाल्यामुळें रुपयांचा पुरवठा वाढला. पुरवठा वाढल्यानें त्यांची किंमत फार कमी झाली. ज्या जिनसास एक रुपाया पडत असे त्यास सव्वा रुपया पडूं लागेल. ह्मणजे सर्व जिनसा महाग झाल्या असें होईल. सर्व जिनसांची किंमत वाढेल. देशांत पैसा जास्त झाल्यानें तो श्रीमंत वगैरे न होतां प्रथम सर्व जिनसांच्या किंमती वाढतात; इतकाच काय तो परिणाम होतो. सर्व वस्तू महाग झाल्यानें अर्थात्, पूर्वीं एक कोटी रुपये ज्या मालाची किंमत होती, त्याची किंमत हल्लीं सव्वा कोटी होईल. जिनसांची किंमत वाढली ह्मणजे त्या कोणी घेत नाहींत, हें उघड आहे. हिंदुस्थानांतील माल महाग झाल्यानें त्याचा इंग्लंडांत खप कमी होईल. इंग्लंडांत याचे उलट परिणाम होईल. पैसा कमी झाल्यानें ह्मणजे वीस लक्ष रुपये कमी झाल्यानें तिकडे सर्व वस्तू स्वस्त होतील. वस्तू स्वस्त झाल्या ह्मणजे त्यांचा खप वाढतो, हें मागें सांगितलेंच आहे. हिंदुस्थानांत महागाई झाली, व इंग्लंडांत स्वस्ताई झाली, त्यामुळें हिंदुस्थानांतील मालाचा खप कमी झाला, व इंग्लंडांतील मालाचा खप वाढला. ज्या देशाचे मालाचा खप नाहीं, त्याला व्यापारांत नुकसान, व ज्याचे मालास खप

फार त्यास नफा जास्त होतो, हें आपल्यास माहीत आहे. यामुळें या व्यापारांत हिंदुस्थानास नुकसान व इंग्लंडास नफा असा परिणाम झाला. हिंदुस्थानांत माल येऊं न देतां पैसा अधिक आल्यानें असा अहितकारक परिणाम होत असून तो देशांत जास्त आल्यानें देश श्रीमंत होतो, असें कांहीं लोक ह्मणतात, हें त्यांचें अज्ञान होय. याचा दुसरा परिणाम असा होईल कीं, हिंदुस्थानांत महागाई झाल्यानें, व इंग्लंडांत स्वस्ताई असल्यानें, इंग्लंडांतून अधिक माल हिंदुस्थानांत येण्याची सुरुवात होऊं लागेल. हिंदुस्थानांतून माल इंग्लंडांत जाण्याचें मात्र कमी कमी होईल. ह्मणजे हिंदुस्थानाचा आवक माल वाढत चालला, व जावक माल कमी होत गेला. असें होतां होतां, शेवटीं आवक व जावक माल बरोबरीला येतील, ह्मणजे माल कमी आणून इंग्लंडकडे जे वीस लक्षांचें नेहमीं घेणें काढण्याचा हिंदुस्थानचा बेत होता, तो बेत सिद्धीस जाऊं शकत नाहीं. दोन देशांत व्यापार सुरू झाला कीं, आवक व जावक मालाची हमेशा बरोबरीच असली पाहिजे. ह्मणजे व्यवहार नेहमीं समच राहिला पाहिजे. एखादा देश आवक माल जास्त येऊं न देतां जावक माल बाहेर अधिक पाठविण्याचा प्रयत्न करील तर तो फार दिवस न चालतां, लवकरच आपोआप, तराजूचे पारड्याप्रमाणें कांहीं वेळ खालवर होऊन अखेरीस तागडी समतोल होईल. जावक व आवक मालाचे तराजूचीं पारडीं नेहमीं बरोबर असलीं पाहिजेत. अनेक कारणांनीं त्यांना धके बसून तीं खालवर झालीं, तरी लवकरच तीं पूर्व स्थितीवर येऊन बसतील, आवक व जावक मालाची

बरोबरी असणें हाच समव्यवहार ही स्थिति नसेल त्या वेळीं एक देशास फायदा, व दुसऱ्या देशास नुकसान आहे असें खास समजावें. फायदा केव्हां व नुकसान केव्हां, हें मागें सांगितलेंच आहे. देशांतून बाहेर जाणारा माल देशांत येणारे मालापेक्षां जेव्हां अधिक असेल तेव्हां त्या देशास नुकसान आहे, व याचे ऊलट स्थिति असेल तेव्हां फायदा आहे, हें आतां चांगलें लक्षांत आलें असेल.

या ठिकाणीं हिंदुस्थान देशाचे विशेष राज्यस्थितीमुळें या देशाचे व्यापाराचा चमत्कारिक प्रकार झालेला आहे तो पाहण्यासारखा आहे. ह्मणून विषयांतर होत आहे. तथापि ही फार महत्वाची गोष्ट असल्यामुळें थोडक्यांत सांगितल्यावांचून राहवत नाहीं.

हिंदुस्थान देशाचा बराच राज्यकारभार इंग्रज लोक इंग्लंडांतून चालवितात. तेथें सेक्रेटरी ऑफ स्टेट नांवाचा एक मोठा अधिकारी राहतो. त्यांचे, व त्यास जे कौन्सिलर आहेत त्यांचे, आणि सेक्रेटरीचे हपीसाचे, पगाराचा मोठा खर्च दरसाल करावा लागतो. हिंदुस्थानांतून जे शेंकडो लहान मोठे इंग्रज कामदार पेनशनें घेऊन आपल्या देशीं जातात, त्यांचीं पेनशनें विलायतेंत द्यावीं लागतात. हिंदुस्थानांत पाठविण्यासाठीं मोठें थोरलें सैन्य तयार करावें लागतें. या देशाचे संरक्षणासाठीं आरमार ठेवावें लागतें. यांचा दरसाल कोट्यावधि रुपये खर्च इंग्लंडांत होतो. लढाईचें सामान, इतर सामान वगैरेबद्दलही फार खर्च होतो. हा सर्व हिंदुस्थानानें भरावयाचा असतो, व तो इंग्लंडांत पाठवावा लागतो. या खर्चाचें सरासरी मान दरसाल

१८।२० कोट रुपये आहे. नक्की आंकडा सरकारी हिशो-बावरून मिळूं शकत नाहीं. इतके रुपये सालोसाल हिंदु-स्थानांतून इंग्लंडमध्यें पाठवावे लागतात, ही एक प्रकारची हिंदुस्थानास खंडणीच भरावी लागते असें ह्मटलें असतां चालेल. या खंडणीस 'होम चार्जेस' असें ह्मणतात. हे होम चार्जेस वाढत्या प्रमाणावर आहेत. एवढी मोठी रक्कम दरसाल या देशांतून इंग्लंडांत पाठविली जात असल्यानें, हिंदुस्थानाची सांपत्तिक स्थिति कशी होत असेल हें सांगणें नको. परंतु याविषयीं आह्मांस विचार करण्याची येथें कांहीं जरूर नाहीं. आपल्यास या स्थळीं इतकेंच पाहणें आहे कीं, ही एवढी मोठी रकम हिंदुस्थानांतून इंग्लंडास कशी पाठविली जाते, त्यामुळें दोन देशांचे व्यापारांत कांहीं गड-बड झालेली दिसते, किंवा दोन्ही देशांचा समव्यवहारच आहे, ह्मणजे दोन्ही देशांतील आवक जावक माल बरोबर आहे, हें पाहणें आहे. खालीं दिलेले आंकड्यांवरून हें स्पष्ट होईल.

हिंदुस्थानचें व्यापाराचें सोनें चांदी सुद्धां मालाचें कोष्टक.

| | १८९३-९४ | १८९४-९५ | १८९५-९६ |
|---|---|---|---|
| | रुपये. | रुपये. | रुपये. |
| जावक माल | ११०६०४०००० | ११७१४००००० | ११८६०६०००० |
| आवक माल. | ९३४८३०००० | ८३११००००० | ८६३०४०००० |
| आवकपेक्षां जावक निवळ— | | | |
| जास्त. | १७११९०००० | ३३०३००००० | ३२३०२०००० |

वरील कोष्टकावरून ध्यानीं येईल कीं, १८९३ पासून जावक माल दरसाल चढते प्रमाणावर आहे. त्या साळापेक्षां

१८९६ सालीं हिंदुस्थानांतून ८ कोटी रुपयांचा माल जास्त इंग्लंडास पाठविण्यांत आला आहे. एवढ्यावरून कदाचित् अशी कल्पना होईल कीं, हिंदुस्थानचा व्यापार एकसारखा वाढत चालला आहे, व तो फार भरभराटीचे स्थितींत आहे. परंतु हें अनुमान चुकीचें आहे. देशाचा व्यापार भरभराटींत आहे किंवा कसें हें समजण्यास फक्त जावक मालाचें आंकडे पाहूनच उपयोगी नाहीं. आवक मालाचे आंकडे पाहिजेत. आपला फायदा जावक माल जास्त पाठविण्यांत नाहीं. जावक मालाचे बदल्यांत आवक माल जास्त येऊं लागेल तरच आपला फायदा आहे, हें मागें सांगितलेंच आहे. वरील कोष्टकांतील आवक मालाचे आंकडे पाहिले असतां दिसेल कीं, १८९३ सालीं हिंदुस्थानांतील आवक माल ९३ कोटी होता, जो १८९६ सालीं ८६ कोटीच झाला, ह्मणजे उलट सात कोटींचा माल हिंदुस्थानांत कमी आला. आतां सन १८९३ सालीं हिंदुस्थानाची जी स्थिति होती त्यांत केवढा मोठा फरक १८९६ सालीं झाला तें पहा. त्या सालापेक्षां या सालीं ८ कोटींचा माल जास्त पाठविला असून हिंदुस्थानास त्या सालापेक्षां उलट ७ कोटींचा माल कमी मिळाला!! ह्मणजे समव्यवहार एका बाजूसच राहून १८९३ पेक्षां १८९६ सालीं हिंदुस्थानास एकंदर १५ कोटींची जास्त तूट सोसावी लागली हें उघड आहे.

---

टीपः—हे आंकडे इंडिया नांवाचें मासिक पुस्तकाचे जुलई १८९६ चे अंकावरून घेतले आहेत, व तें सरकारी रिपोर्टांतून तेथें घेतले आहेत.

१३-६१८-२०००

सालोसालचे जे आवक व जावक मालाचे आंकडे दाखविले आहेत त्यांवरून कदाचित् कोणाची अशी समजूत होईल कीं, हिंदुस्थानचा आवक मालापेक्षां जावक माल अधीक आहे, त्याअर्थी, हा व्यापार हिंदुस्थानास हितावह आहे; दरसाल, हिंदुस्थानाचें घेणें इंग्लंडाकडे निघत आहे, तें कर्ज इंग्लंड, सोनें, चांदी, वगैरेचे रूपानें फेडीत असेल; परंतु ही समजूत खोटी आहे. जे आंकडे दाखविले आहेत, त्यांत आलेल्या व गेलेल्या सोन्याचांदीचा समावेश केला गेला आहे. जे आंकडे दाखविले आहेत त्यांशिवाय इंग्लंडांतून, सोन्याचे अथवा रुप्याचे रूपानें हिंदुस्थानास कांहीं-एक मिळण्याचें उरलेलें नाहीं. तसेंच हिंदुस्थानाचें घेणेंही कांहीं इंग्लंडकडे उरलेलें नाहीं. जेवढा माल इंग्लंडनें पाठविला, त्यापेक्षां एक छदामही जास्त देणें राहिलें नाहीं. यावरून पाहतां स्पष्ट दिसेल कीं, सन १८९६ सालीं हिंदुस्थानानें जो माल पाठविला त्यापेक्षां त्याला सरासरी ३२½ कोटींचा माल कमी मिळाला, व इंग्लंडकडे घेणेंही कांहीं राहिलें नाहीं; मग आतां काय समजावयाचें ? हिंदुस्थानाचे आवकमालापेक्षां ३२½ कोटीचा जास्त माल पाठविला हा हिंदुस्थानास नफा झाला काय ? हा माल कोठें गेला; व कशा तऱ्हेनें गेला हें आतां पाहूं.

होमचार्जेसच्या रूपानें दरसाल सरासरी १८।२० कोट रुपये हिंदुस्थानानें इंग्लंडास भरावे लागतात असें वर नुकतेंच सांगण्यांत आलें. हे रुपये हिंदुस्थानसरकार रोकड जहाजांत भरून पाठवीत नाहीं. हिंदुस्थानांतील कांहीं व्यापाऱ्यांस हिंदुस्थानसरकार सांगतें कीं, आम्हीं ३० कोट

रुपये तुह्मास येथें भरूं. तुह्मी आमचे वतीनें इंग्लंडांत सेक्रेटरी आफ् स्टेटकडे भरावे. व्यापारीही रोख रुपये इंग्लंडास पाठवीत नाहींत, ते इंग्लंडांतील व्यापाऱ्याकडे माल पाठवितात, आणि सांगतात कीं, पाठविलेल्या मालाचे किंमतीपैकीं १८ कोट रुपये स्टेट सेक्रेटरीस द्यावे, व बाकीचे रुपयांचा माल आम्हांस पाठवावा. याप्रमाणें इंग्लंडांतील व्यापारी करितात. यामुळें हिंदुस्तानांतून पाठविलेल्या मालाचे मोबदल्यांत पुरापूर माल तिकडून न येतां, होमचार्जेस भरावे लागतात, तितका माल कमी येतो. हिंदुस्थानांतून घेतलेल्या मालाचे मोबदला जो माल इंग्लंडांतून इकडे आला पाहिजे त्यांत होमचार्जेसपुरती रक्कम कापून बाकीचा माल हिंदुस्थानांत येईल तरी सम व्यवहार राहूं शकेल; परंतु तसेंही होत नाहीं. होमचार्जेस आहेत त्यांपेक्षां सरासरी दुपटीपर्यंत माल कमी येतो. असें वरील आंकड्यावरून दिसतें. ही जास्त तूट आलेली दिसते, ती हिंदुस्थानास व्यापारदृष्ट्या दरसाल खोट आहे असें समजलें पाहिजे. ही खोट, हिंदुस्थान देश जितका माल बाहेर पाठवितो त्यापेक्षां कमी माल बाहेरून या देशांत येतो, ह्मणून आहे; कारण आलेल्या मालाशिवाय दुसरें कांहीं एक कर्ज हिंदुस्थानाचें दुसऱ्या देशांकडे राहिलेलें नाहीं, ह्मणून ही निव्वळ खोटच समजली पाहिजे.

येथपर्यंत दोन देशांचा व्यापार सुरू असतां काय प्रकार होतो याचा विचार होऊन, या व्यापारासंबंधानें लोकांचे कांहीं गैरसमज आहेत, त्यांचाही विचार करण्यांत आला. आतां पुढील भागांत जकाती, कर, वगैरेंचा साधारण

विचार करून त्यांमुळें व्यापारावर काय परिणाम होतात हेंही पाहण्यांत येईल.

## भाग ४

## करांविषयीं.

देशाची राज्यव्यवस्था कोणत्याही तऱ्हेची असो, सगळी सत्ता राजाचे हातीं असो अथवा प्रजेचे हातीं असो, प्रजेच्या जीविताचें व वित्ताचें संरक्षण करणें हें सरकारचें मुख्य काम आहे, व हें करण्यास पुष्कळ तजविजी कराव्या लागतात. मोठें सैन्य ठेवणें जरूर पडतें. किल्ले बांधावे लागतात. बंदोबस्तासाठीं व चोरीचपाटी बंद करण्यासाठीं पोलीस राखण्याची आवश्यकता उत्पन्न होते. न्याय करण्यासाठीं न्यायाचीं कोर्टें स्थापावीं लागतात. या सर्वांस फार मोठा खर्च लागतो; तो सरकारनें कोठून आणावा ? हा देशांतील लोकांपासूनच घेतला पाहिजे. लोकांवर कर बसवूनच हा खर्च वसूल केला पाहिजे. देशांत श्रीमंत, गरीब, बळकट, अशक्त, असे अनेक प्रकारचे लोक असतात. त्या सर्वांस सरकारचे बंदोबस्ताचा लाभ मिळतो. यासाठीं सरकारास लागणारा खर्चही सर्वांनीं सोसला पाहिजे, हें उघड आहे. परंतु सर्वांस सरकारचे संरक्षणाची सारखीच जरूर लागते असें नाहीं. तसेंच खर्चाचा फाळा देण्यास सर्वांस सारखी शक्ति असते असेंही नाहीं. ह्मणून सर्वांपासून सरसकट एक सारख्याच प्रमाणानें हा खर्च वसूल करितां कामा नये हें उघड आहे. तर मग कोणत्या प्रमाणानें हा

खर्च वसूल करावा ? कर बसविणें ते काय धोरणानें बसवावे, हें मोठें पंचाइतीचें काम आहे. हे बसवितांना मोठमोठ्या लोकांच्या फारच चुका होतात; व त्या चुकांचें परिणामही फार भयंकर होतात. फ्रान्स देशांत जी मोठी राज्यक्रांति झाली; ती मोठ्या लोकांवर कर न बसवितां गरीबगुरीबांवर कर बसविल्यामुळें झाली. यासाठीं कर बसविणें ते फार विचारानें बसविले पाहिजेत.

करांचे बाबतींत "आडम स्मिथ" नांवाच्या ग्रंथकारानें मुख्य चार नियम सांगितले आहेत.

१ कर बसविणें तें सर्वांवर सारखा बोजा पडेल अशा रीतीनें बसवावे. ह्मणजे ज्याचें जसें उत्पन्न असेल, अथवा ज्यास जशी संरक्षणाची जरूर लागेल त्या धोरणानें त्यांवर कराचा बोजा टाकिला पाहिजे.

२ कराची रक्कम अनियमित असूं नये; ती मुकरर असावी. कर देण्याची वेळ, तो भरण्याचा प्रकार, व रक्कम हीं सर्वांस समजतील अशीं स्पष्ट असावीं.

३ कर भरण्यास जी वेळ योग्य असेल, व जी रीत सुलभ पडेल त्या वेळीं व त्याच रीतीनें तो घेत जावा.

४ वसूल करण्यास फारच कमी खर्च लागेल, अशा रीतीचा कर असला पाहिजे. वसूल करण्यांत फार खर्च न होतां बसविलेल्या कराचा होईल तितका अधिक अंश सरकारचे घरांत आला पाहिजे.

या चार नियमांपैकीं शेवटले तीन नियम स्पष्ट आहेत. परंतु पहिला नियम कोणते एखादे विवक्षित कराचे संबंधानें साधणें फार कठीण आहे. कल्पना करा कीं, एक

मनुष्याचे कुटुंबांत दहा माणसें आहेत, व दुसऱ्याचे कुटुंबांत दोनच आहेत. दोघां गृहस्थांस उत्पन्न सारखेंच आहे. आतां मिठावर जर कर बसविला, तर त्याचा बोजा जास्त मनुष्यांचे कुटुंबवाल्यावर विनाकारण अधिक पडेल. कारण त्याचे कुटुंबांत मिठाचा खप विशेष आहे. ज्याचे कुटुंबांत थोडीं मनुष्यें आहेत, त्याचें उत्पन्न दुसऱ्या गृहस्थाइतकेंच असतांही त्यावर कराचा बोजा कमी पडेल. सबब हा कर उत्पन्नाचे मानानें सारखा बसला असें ह्मणतां येणार नाहीं. बरें, 'ज्या प्रमाणानें सरकारापासून संरक्षण मिळतें, त्या प्रमाणानें कर असावेत' असें म्हटलें, तरी पण हें साधणेंही कठीण आहे. कारण हें धोरण ठेविलें असतां दरेक मनुष्याचे जीवाचे संरक्षणाबद्दल कर बसवावे लागतील; तसेंच दरेकाचे माल-मिळकतीचाही तपास करण्याची जरूर पडेल. कोणाचे जीवाची किंमत किती हें ठरविणें दुरापास्त होईल. त्याच-प्रमाणें दरेकाची मालमिळकतही नक्की करीत बसणें अशक्य होय. या कारणांमुळें आडम स्मिथचा पहिला नियम व्यवहा-रांत अमलांत आणणें मोठेंच मुष्किलीचें काम आहे. बहुधा तो उपयोगांत आणतां येत नाहीं म्हटलें तरी चालेल. ज्या-वेळीं एकच कर बसविणें आहे, त्यावेळीं तर या धोरणा-प्रमाणें मुळींच चालतां येणार नाहीं. पुष्कळ कर बसविणें

*टीपः*—देशी संस्थानांत लोकांवर अनेक प्रकारचे कर, वेरे, अगर बाबती बसविलेल्या आढळतात, तो प्रकार गैर आहे असें केवळ ह्मणतां येणार नाहीं. तसेंच त्या सर्व बंद करून त्यांचे ऐवजीं सर-सकट एकच कर बसविला तर सुधारणा झाली, असेंही खात्रीनें ह्मणतां येणार नाहीं.

असतील, तर कदाचित् ज्याचे त्याचे शक्तीप्रमाणें कर बसविण्यास सवड सांपडेल.

दुसरा नियम अगदीं स्पष्टच आहे. कोणापासून किती कर घ्यावयाचा हें नक्की नसेल, तर सगळाच घोटाळा होईल; कर वसूल करण्यांत फार लबाड्या होतील, व लोक नाडले जातील. तसेंच अमुक प्रकारानें ह्मणजे पैशाचे रूपानें, किंवा धान्याचे रूपानें कर भरावयाचा हेंही निश्चित असलें पाहिजे. तें नसेल तर लोकांस फार त्रास व नुकसान होण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें कर भरण्याची वेळही मुकरर करून सर्वांस स्पष्ट समजली पाहिजे. कारण त्या वेळेपूर्वी लोक सावध राहून कराचा पैसा भरण्याची तरतूद काढून ठेवतील.

तिसरा नियम असा कीं, योग्य वेळीं कर भरणें पडला ह्मणजे सर्वांस त्रास कमी होईल. अवेळीं कर वसूल केल्यानें कोणासही फायदा न होतां, सर्वांस अडचण व त्रास होईल; तसेंच नुकसानही होईल. जमिनीवरचा सारा घेणें तो धान्य पिकल्यावर न घेतां, पावसाळ्यांत घेतला तर शेतकऱ्यास फार अडचण व नुकसान होईल. पदार्थांवर बसविलेले जकातीचा बोजा शेवटीं ते जिन्नस विकत घेऊन वापरणारावर पडतो. जिन्नस वापरणारा ही जकात केव्हां भरील? अर्थात् तो ज्यावेळीं जिन्नस विकत घेईल, त्यावेळीं तो आपले भागाचा कराचा अंश भरील. परंतु सरकारानें जकातीचे पैसे वसूल करावयाचे ते कसे करावे? माल विकत घेणारा दरेक माणूस माल घेण्यास जाईल, तेव्हां दुकानदाराचे दुकानावर शिपाई बसवून गिऱ्हाईक माल विकत

घेते वेळीं वसूल करण्याचें मांडलें तर फारच घोटाळा होईल, व सरकारास पैसे वसूल करणें अवघड पडून लोकांसही अत्यंत पीडा व हरकत होईल. यासाठीं जकातीचा बोजा शेवटीं जरी माल वापरणारावरच पडावयाचा आहे, तथापि ती वसूल करणें ती अगोदरच जिन्नस विकणारापासूनच करणें फायदेशीर व सुखावह होईल.

चवथा नियम असा कीं, कर निश्चित असल्यानें, अथवा तो अवेळीं वसूल केल्यानें, अगर भलत्याच रीतीनें बसविला गेला असल्यामुळें, तो वसूल करण्यास फार खटपट पडून पुष्कळ लोक ठेवावे लागतात; व त्यामुळें खर्च पुष्कळ होतो; आणि लबाडी होऊन लोक फसले जातात. लोकांचे घरांतून करानिमित्त पुष्कळ पैसा गेला, तरी सरकारचे तिजोरींत यावा तितका पैसा येत नाहीं. त्यामुळें लोक विनाकारण गांजले जातात; आणि सरकारास फायदा होत नाहीं. याकरितां वसूल करण्यास खर्च कमी लागेल, असल्याच प्रकारचा कर बसविला पाहिजे.

या चवथ्या नियमाप्रमाणें पाहिलें असतां लक्षांत येईल कीं, जिन्नसांवर जकात बसविणें असेल तर ती कच्च्या मालावर न बसवितां, विक्रीसाठीं तयार झालेल्या मालावर बसवावी. कापड तयार होण्याचे पूर्वी कच्च्या मालावर ह्मणजे कापसावर जकात न बसवितां, कापसाचा माल तयार झाल्यावर त्या मालावर बसविली असतां फायदेशीर होईल. माल तयार होईपर्यंत कापूस अनेक व्यापाऱ्यांचे हातून जातो. त्या प्रत्येकास मागल्यानें भरलेल्या जकातीसुद्धां सर्व रकम नफ्यासुद्धां खर्चासुद्धां सव्याज भरावी लागते. ' अ '

म कांहीं कापूस खरेदी केला. त्यावर त्यास १००० रुपये जकात पडली अशी कल्पना केली. पुढें त्यानें आपला माल 'ब' स विकला. तो एकंदर पडलेल्या रकमेवर शेंकडा १० रुपये नफा घेऊन दिला असें धरूं. तेव्हां 'ब' स जकातीबद्दल शंभर रुपये जास्त ह्मणजे एकंदर ११०० रुपये भरावे लागतील. 'ब' पासून 'क' नें तो माल पुन्हां घेतला. तेव्हां सेंकडा १० रुपयेप्रमाणें 'क' स जकातीचे रकमेबद्दल १२१० रुपये द्यावे लागतील. सरकारांत जकात मूळ १००० रुपयेच घेतली आहे. परंतु त्या १००० रुपयांबद्दल हल्लीं 'क' चे घरांतून १२१० रुपये गेले, ह्मणजे सरकारचे पदरांत पडले त्यापेक्षां २१० रुपये जास्त गेले. असाच क्रम माल शेवटीं गिऱ्हाइकाचे पदरांत पडेपर्यंत चालणार, व दरेक वेळीं चक्रवाढ व्याजानें ही रकम वाढत जाऊन, हें सर्व ओझें अखेरीस गिऱ्हाइकांवर विनाकारण पडेल. कच्च्या मालावर जकात घेतल्यानें याप्रमाणें सरकारांत आलेल्या जकातीच्या रकमेच्या कदाचित् दुप्पट पैसेही गिऱ्हाइकांचे घरांतून जाऊन, सरकारचे तिजोरींत फार थोडी रकम पोंहोचेल. याकरितां आडम स्मिथचा ४ था नियम पूर्णपणें अमलांत आणणें आहे, तर 'कच्च्या' मालावर सुरुवातीसच जकात न बसवितां होईल तितक्या अंशानें माल तयार होऊन, तो वापरणाराचे हातीं जाण्याचे संधीस बसवावी; ह्मणजे कराचें विनाकारण जास्त ओझें माल वापरणारावर पडणार नाहीं.

# भाग ५ वा.

## प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांविषयीं.

कोणत्याही प्रकारचा कर बसविला असतां त्याचा वास्तविक बोजा कोणावर बसेल हें पाहणें अवश्य होतें. परंतु हें नीट समजण्यास, प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर ह्मणजे काय, याचें ज्ञान पूर्णपणें असणें जरूर आहे.

अमुक मनुष्यानें कर भरला पाहिजे असें विवक्षित असून त्याच मनुष्यापासून जेव्हां तो वसूल केला जातो, अर्थात् ज्याचेवर कराचा बोजा पडावयाचा त्याचेचपासून तो घेण्यांत येतो, तेव्हां त्यास ‘ प्रत्यक्ष कर ’ ह्मणतात.

पण जेव्हां हेतु असा असतो कीं, ज्या मनुष्यापासून कर वसूल केला जातो, त्याचेवर कराचा बोजा न पडतां त्यानें कराबद्दल आपलें झालेलें नुकसान दुसऱ्या मनुष्यापासून भरून घ्यावें, तेव्हां त्या प्रकारास ‘ अप्रत्यक्ष कर ’ ह्मणतात. हा कर ज्या मनुष्यावर त्याचा बोजा वास्तविक पडतो, त्याचेपासून प्रत्यक्ष वसूल न करतां तिसऱ्याच माणसापासून तो घेण्यांत येतो. जसें—परदेशांतून येणारे मालावर बसविलेली जकात. ही जकात माल उत्पन्न करणारा अगर तो देशांत आणणारा यांपासून वसूल करण्यांत येते. परंतु त्या जकातीचा शेवटचा बोजा त्यांचेवर पडत नाहीं. हे लोक जकातीची रक्कम मालाचे किंमतीवर चढवीत जातात व शेवटीं माल विकत घेणारे लोकांवर तिचा सगळा बोजा पडतो; कारण माल खपला ह्मणजे जकातीचे रकमेसुद्धां

किंमत वसूल होते. ह्मणून व्यापाऱ्यांनीं प्रथम जकातीबद्दल भरलेले पैसे त्यांचे घरांतून न जातां त्यांना गिऱ्हाइकांपासून परत मिळतात. उदाहरणार्थ, विलायतेंतून येणारे कापडावरील जकात; मिठावरील जकात; अफूवरील जकात; मोठाल्या शहरांत येणारे मालांवर म्युनिसिपालिटी घेते त्या जकाती. या सर्व जकाती अप्रत्यक्ष कर होत.

---

# भाग ५ (अ)

## प्रत्यक्ष करांविषयीं.

प्रत्यक्ष कर असतात ते 'उत्पन्नाचे' अथवा 'खर्चाचे' धोरणानें बसविले जातात. ज्याची जशी कमाई असेल, अथवा ज्याचा जसा खर्च असेल त्या मानानें त्याचपासून मुकरर ठरविलेल्या धोरणानें कर घेण्यांत येतो. जसें—घरांवरील कर, गाड्यांवरील कर, भंगीपट्टी, इनकमट्याक्स, लायसेन्स ट्याक्स, लोकलफंड, पाण्यावरील कर, इत्यादि. हे प्रत्यक्ष कर होत.

'उत्पन्नांत' तीन गोष्टींचा समावेश होईल. जमिनीचा सारा, नफा व मजुरी. कोणाचेंही उत्पन्न पाहिलें तर या तीन प्रकारांपैकीं कोणत्या तरी एखाद्या प्रकारचें तें असतें.

जमिनीचे साऱ्यावर बसविलेला कर जमिनीचे मालकांस द्यावा लागेल. हा प्रत्यक्ष कर आहे. याचा बोजा मालकावरच पडेल. कारण कोणत्याही उपायानें तो दुसऱ्यावर ढकलतां येणार नाहीं. साऱ्याचे रकमेवर कर बसल्यामुळें, मी धान्य महाग विकीन असें जमीनीचे मालकास ह्मणतां

येणार नाहीं. कराची रकम धान्य महाग विकून वसूल करीन असें तो ह्मणेल, तर त्याला धान्य महाग विकतां येणार नाहीं. साऱ्यावर कर बसल्यानें धान्याचे किंमतींत फेर पडणार नाहीं. कारण, मागें सांगितलेंच आहे कीं, धान्याची किंमत निकृष्ट प्रतीचे जमिनींचे उत्पत्तिखर्चानें ठरली जाते. व अशाप्रकारचे जमिनीवर तर सारा मुळींच नसतो. सबब सारे आणि धान्याची किंमत यांचा कांहीं संबंध नाहीं. ह्मणून साऱ्यावर जर कर बसविला तर त्याचें ओझें जमिनीचे मालकावरच पडेल. धान्याचे गिऱ्हाईकांवर तें टाकतां येणार नाहीं. जमिनीचे मालकानें प्रत्यक्ष तो कर आपल्या पिशवीतूनच भरला पाहिजे. हिंदुस्थानांत बहुधा सर्व जमिनीचें मालक सरकार आहे. तेव्हां साऱ्यावर कर बसविला असतां सरकारावरच कर बसविल्याप्रमाणें होईल. बंगाल प्रांत जेथें 'जमीनदारी' रिवाज आहे, आयोध्या प्रांत जेथें 'तालुकदारी' रिवाज असतो, त्या प्रांतीं व मुंबई, मद्रास, वगैरेकडे जे इनामदार आहेत त्यांना मिळणारे साऱ्यांवर जर कर बसविला, तर तो जमिनीचे मालकांस द्यावा लागेल हें उघड आहे. त्याचा बोजा लोकांवर कोणत्याही रीतीनें टाकतां येणार नाहीं.

नफ्यावर बसविलेल्याचा कराचा बोजा साऱ्यावरील कराप्रमाणेंच तो भरणारावरच पडला पाहिजे. परंतु पुढें त्याचा असा परिणाम होण्याचा संभव आहे कीं, कर बसल्यामुळें नफे कमी होऊं लागतील; त्यामुळें संचय कमी होऊन दिवसेंदिवस देशांतील भांडवल कमी कमी होत जाईल; व अखेरीस मजुरांचें नुकसान होईल.

आतां मजुरीवर बसविलेल्या करांविषयीं विचार करूं. वरील दोन प्रकारचे उत्पन्नांसारखा मजुरीचा प्रकार नाहीं. मजुरी दोन तऱ्हेची असेल. एक साधारण अशिक्षित मजुरांची मजुरी; व दुसरी विद्वान् व कलाकौशल्य जाणणारांची मानसिक अथवा शारीरिक श्रमांबद्दल मजुरी. या दुसऱ्या प्रकारचे लोकांस विद्या संपादन करण्यास लागणारा खर्च व श्रम यापेक्षां मजुरी बहुधा अधिक मिळते; व त्यांचे उत्पन्नावर कर बसविला असतां, ते आपल्या अधिक उत्पन्नांतून देऊं शकतात. यामुळें त्या सर्व कराचा बोजा त्यांजवरच पडतो. तो दुसऱ्यांवर ढकलतां येत नाहीं. पहिल्या प्रकारचे साधारण लहानसहान मजुरांचाही याचप्रमाणें प्रकार आहे. परंतु या लोकांवर कर बसविला असतां त्यांची कमाई फारच कमी होऊन, त्यांस नीट रीतीनें खाण्यापिण्यासही मिळत नाहींसें होतें. कितीएकांचें ह्मणणें असें आहे कीं, मजुरांपासून कराचे रूपानें घेतलेला पैसा देशांतले देशांतच खर्च होतो, यामुळें त्यांस मजुरी मिळून पुन्हा तो त्यांचेच हातांत जातो, सबब मजुरांपासून कर घेण्यास कांहीं हरकत नाहीं. विचार केला असतां, ही केवळ भ्रांति आहे असें दिसेल. मागें सांगितलेंच आहे कीं, अनुत्पादक रीतीनें खर्च केलेल्या पैशानें मजुरांचें पोषण केलेसें होत नाहीं. सरकारचा बहुतेक खर्च अनुत्पादकच असतो. त्यापासून मजुरांचें पोषण झालें असें ह्मणतां येणार नाहीं. याकरितां, साधारण मजुरांवर कर बसविला असतां, त्यांची स्थिति वाईट झालीच पाहिजे. शिवाय, कर बसल्यामुळें मजुर अधिक मजुरी मागूं लागतील. व मजुरी जास्त देणें पडली ह्मणजे त्यांना कामावर लावणें

१४-६१८-२०००

कारखानदारांवर हा एक दुसरा करच बसला असें ह्मणावें लागेल. कारखानदारांवर स्वतंत्र कर आहेच; आणि मजुरा बद्दलही कर त्यांस भरावा लागेल. हा दुसरा कर बसल्यानें कारखानदारांचें भांडवल कमी होईल व त्यामुळें मजुरांचाच गैरफायदा आहे. शिवाय, कर बसवितांना, त्यांचा बोजा मजुरांवर पडावा असा जो हेतु होता, तो तेथें सिद्धीस न जातां कर भांडवलवाल्यांवर पडला; ह्मणून प्रत्यक्ष कर बसविण्याचा हेतु असूनही तो अप्रत्यक्षच झाला.

निरनिराळ्या प्रकारचे उत्पन्नाचा हा बारीक विचार न करितां, सरसकट सगळ्या उत्पन्नावरील कर ज्यास 'इन्‌कम्‌ ट्याक्स्‌' प्राप्तीवरील कर असें ह्मणतात, तो बसविणें झाल्यास साधारणतः पुढील गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे. प्रथम, हा कर कांहींएक मुकरर रकमेच्या उत्पन्नापेक्षां कमी उत्पन्नावर बसविण्यांत येत नाहीं. ही माफीची मुकरर रक्कम ठरविणें ती उपजीविकेस अवश्य लागणारे खर्चापेक्षां फारशी अधिक असत नाहीं (२) या मुकरर केलेल्या रकमेपेक्षां आधिक उत्पन्नावर प्रमाणानें कर बसविला जातो. (३) उत्पन्नांतून संचय केलेल्या भागावर ह्मणजे भांडवलाप्रमाणें उपयोग करण्यासाठीं काढलेल्या रकमेवर कर बसवूं नये. इन्‌कम्‌ट्याक्स्‌ बसवितांना मोठी अडचण 'उत्पन्न' निश्चित करण्याची असते. सारा, पगार व वर्षासनें हीं लवकर निश्चित होतात. पण कांहीं धंदा करणारे लोकांची प्राप्ति निश्चित नसते; तसेंच व्यापाराचे नफेही शाश्वत नसतात; त्यामुळें कर बसविण्यास अडचण पडते. या विषयाचा या-

पेक्षां अधिक विचार करण्याची फारशी गरज दिसत नाहीं. ह्मणून थोडक्यांत सांगितलें आहे.

## भाग ६ वा.

## जिनसांवर बसविलेले व दुसरे अप्रत्यक्ष करांविषयीं.

जिनसांवर बसविलेले कर यांचा साधारण अर्थ ह्मटला ह्मणजे, जिन्नस उत्पन्न करणारांवर अगर ते गिऱ्हाइकांचे हातीं पडतील तोंपर्यंत त्यांचा व्यापार करणारांवर बसविलेले, परंतु वास्तविक जे गिऱ्हाइकांसच भरावे लागतात, ते कर असा आहे. अमुक रीतीनें धंदा चालवावा, अमके ठिकाणींच तो करावा, झालेला माल अमुक प्रकारानेंच सांठवून ठेवावा, तो अमुक रीतीनेंच विकावा, अमुक रस्त्यानेंच घेऊन जावा, इत्यादि हरकत करणारे अनेक नियम कर वसूल करण्याचे सोईसाठीं केले असल्यामुळें, कारखानदारांस व व्यापाऱ्यांस अनेक अडचणी व त्रास सोसावे लागतात. सरकारच्या हुकुमाशिवाय इतर रीतीनें हवी तेथें उत्पत्ति करण्याची बंदी असल्यामुळें, फायदेशीर रीतीनें उत्पत्ति होऊं शकत नाहीं. कारखान्यांची सुधारणा होत नाहीं. अशा चोहोंकडून अडचणी आल्यामुळें, विनाकारण पुष्कळ खर्च करावा लागतो. उत्पत्तीचे कामीं वाजवीपेक्षां अधिक भांडवल कारखानदारांस घालावें लागतें. त्यावर योग्य नफा त्यांस मिळालाच पाहिजे. या सर्वांचा योग्य मोबदला मालाची किंमत वाढविल्याशिवाय कारखानदारांस मिळण्यास इतर

मार्ग नाहीं. हा सर्व जास्ती खर्चाचा बोजा तयार झालेल्या मालावरच लादला जातो; त्यामुळें कराची रकम जरी थोडी असते, तरी जिनसांची जेवढी किंमत वाढावी त्यापेक्षां फारच अधिक ती वाढली जाते. अशा प्रकारच्या अडचणीमुळें कारखाना सुरू ठेवण्यांत भांडवल फार मोठें लागूं लागतें. या तऱ्हेच्या अप्रत्यक्ष जकाती अथवा कर देशांत उत्पन्न झालेल्या, दुसऱ्या देशांतून आणिलेल्या, अथवा एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जात असलेल्या, अगर आपल्या देशांतून परकी देशांत पाठविलेल्या मालावर बसविलेले असतात. कर कोणत्याही वेळीं वसूल केले जावोत, ते बसल्यामुळें जिनसांचा उत्पत्तिखर्च वाढला जातो. व स्वाभाविक रीतीनें उत्पत्तिखर्च वाढला असतां जे परिणाम होतात, तसेच परिणाम, तो कृत्रिम रीतीनें कर बसवून वाढविल्यानेंही होतात.

जिनसा उत्पन्न होतेवेळीं, देशांत येतेवेळीं, त्याची विक्री होतेवेळीं, इत्यादि कोणतेही वेळीं त्यांवर कर बसला, तरी त्याचा परिणाम एकसारखाच होतो, ह्मणजे त्या जिनसांच्या किंमती व मोल्य हीं वाढतात. जिनसाचीही किंमत वाढणें ती किमानपक्षीं कराचे रकमेइतकी तरी वाढली जाते. जकातीची रकम थोडी असतां मालाची किंमत पुष्कळ कां वाढते, याचें कारण पुढील विचारावरून लक्षात येईल.

काहीं जिनसांवर ते उत्पन्न करते वेळींच, जकात बसविली जाते. या जकातीचे सपाट्यांतून लुचेगिरी करून कोणास निसटून जातां येऊं नये, ह्मणून व्यापारास अड-

थळे आणणारे अनेक प्रकारचे नियम सरकारास करावे लागतात. कांहीं धंदे ल्हानसहान हव्या त्या माणसास हव्या त्या ठिकाणीं करण्याची मोकळीक ठेवण्यांत येत नाहीं: विशेष ठिकाणीं ते करावे लागतात, व ज्यांचेपाशीं मोठें भांडवल असेल त्यांसच तें झेपतात. असले मोठे भांडवल-वाले लोक थोडे असतात. कारखाने चालविण्याचें काम थोड्या लोकांचे हातीं आलें, ह्मणजे स्पर्धा नाहींशी होऊन त्या जिनसांची ' मनापोली ' ( एकाच व्यापाऱ्यास व्यापार करण्याची परवानगी ठेऊन बाकीच्यांस बंदी असते, त्यास ' मनापोली ' ह्मणतात ) होते. मग त्यांची किंमत हवी तितकी वाढविणें अगर कमी करणें, हें व्यापाऱ्यांच्या मुठींत राहतें. कोणत्याही जिनसांची ' मनापोली ' झाली असतां, एकंदर देशाचें मोठें नुकसान होतें. तें सविस्तर सांगण्यास स्थलसंकोचामुळें सवड नाहीं.

मीठ, अफू, दारु, व ताडी, यांवर बसविलेले कर वरील प्रकारांचीं उत्तम उदाहरणें आहेत. कर चुकवितां येऊं नये. व तो सुलभ रीतीनें वसूल व्हावा, ह्मणून अमुक ठिकाणीं मीठ उत्पन्न करावें, अमुक रीतीनें तें व्हावें, अमुक प्रकारानें सांठवावें, जो तपासण्यास येईल त्यास पाहिजे त्यावेळीं तपासूं द्यावें, असे नियम झाल्यामुळें व्यापारास किती त्रास, हरकत व नुकसान होतें हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे, सरकारी नियमांस अनुसरून व्यापार करण्यास खरा उत्पत्तिखर्च व कराची रकम यांपेक्षां फारच अधिक खर्च करावा लागतो, व तो सर्व मीठ विकत घेणारावरच बसला पाहिजे. हें सांगण्याची गरज आहे असें नाहीं.

येथपर्यंत जिनसांवर बसविलेल्या जकातींचा साधारणपणें विचार झाला. आतां निरनिराळ्या प्रकारचे जिनसांवर जकाती बसविल्यानें काय परिणाम होतात, तें पाहूं. सर्व प्रकारच्या जिनसांवर जकात बसविली असतां परिणाम एक सारखाच होतो असें नाहीं. चैनीचे पदार्थांवर जकाती बसविणें, व पोषणास अवश्य लागणाऱ्या वस्तूंवर ती बसविणें, यांचे परिणामांत महदंतर पडतें. धान्य, अगर मीठ अशा उपजीविकेस अवश्य लागणारे पदार्थांवर जकात बसविली असतां, दोन प्रकारचे परिणाम होतील. एक तर जकात बसल्यामुळें किंमत वाढून गरीब लोकांस उपजीविकेची पंचाईत होईल; अगर कदाचित् महर्गता झाली असतांही मजुरीचे दर वाढल्यामुळें, मजुरांचें कांहीं नुकसान झालें नाहीं असें घटकाभर मानिलें, तरी मजुरीचे दर वाढले कीं नफा कमी झालाच पाहिजे. आणि नफा कमी झाला कीं, भांडवल कमी होऊन मजुरी कमी होते. अथवा जमलेलें भांडवल कमी न करितां कारखानदारही जास्त मजुरी आपले प्राप्तींतून देत जातील, तर त्यांचें नुकसान होईल. उपजीविकेचे पदार्थांवर जकात बसविली असतां, या दोहोंपैकीं कोणता तरी एक परिणाम झालाच पाहिजे. हा कर मजुरांवर पडला, तर त्यांचे निर्वाहाची पंचाईत पडून त्यांची स्थिति बिघडेल. असें न होतां मजुरीचे दर वाढले जाऊन भांडवलवाल्याची प्राप्ति कमी होईल, तर कराचें ओझें जें मजुरांवर पडावयाचें तें कारखानदारांवर पडूं लागेल. कारखानदारांस स्वतःचे खाण्याचे पदार्थांवरील जकात द्यावी लागतच आहे. शिवाय मजुरांबद्दल बोजाही त्यांजवरच

पडल्यामुळ, त्यांना दुहेरी [illegible] मागील भागांत सांगितलेंच आहे कीं, साधारण मजुरांचे मजुरीवर बसलेला कर भांडवलवाल्यांस नफ्यांतून द्यावा लागतो. उपजीविकेचे पदार्थांवर बसविलेल्या कराचा परिणामही याच प्रकारचा होतो. ह्मणजे त्याचा बोजाही भांडवलवाल्यांवर पडतो. ह्मणून अशा प्रकारचा दुहेरी कर अन्यायाचा, व देशांतील संपत्तीचे वृद्धीस अहितकारक आहे, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. ह्मणून साधारण उपजीविकेचे पदार्थ, जसें:—मीठ, तेल, तूप, साखर, लांकडें, घास, जाडा भरडा कपडा, साधारण लोकांच्या वापरण्यांत येणारीं धातूंचीं भांडीं, इत्यादि पदार्थांवर जकाती बसविणें, हें देशास फायदेशीर नाहीं हें लक्षांत येईल.

आतां निर्वाहास अवश्य लागणाऱ्या पदार्थांशिवाय इतर पुष्कळ पदार्थ असे दिसतील कीं, ते चैनिखातर वापरण्यांत येतात. असल्या पदार्थांवर जकाती बसविल्या, तर परिणाम अहितकारक होणार नाहीं. अनेक जातींचीं अत्तरें, उंची भारी किमतीचीं वस्त्रें, किमती मद्यें, बहुमोलाचें कांचेचें सामान, सुंदर गाड्या, व असलेच अनेक खाण्याचे, पिण्याचे व वापरण्याचे पदार्थांचा नेहमीं मोठा खप असतो; हा सगळा व्यय बहुधा अनुत्पादकच असतो; ह्मणून यांवर जकाती बसून त्याची किंमत वाढली, तरी देशाचें नुकसान होईल असें नाहीं. यासाठीं जकाती बसवितेवेळीं जिन्नस मुकरर करण्याचें काम फार विचाराचें आहे. पुष्कळ ठिकाणीं या बाबतींत व्हावा तसा विचार झालेला दिसून

येत नाहीं; आणि फार घातक परिणाम होत असतांही, जकातीं तशाच कायम ठेविलेल्या पाहण्यांत येतात.

'इनूकम् ट्याक्स' ( प्राप्तीवरील कर ) चा परिणामही, निर्वाहाचे पदार्थांवर बसविलेल्या जकातीप्रमाणेंच झाला पाहिजे. परंतु तो बसवितांना एक उत्तम युक्ति योजितात, त्यामुळें हा परिणाम टळला जातो. हलक्या उत्पन्नाचे लोक वजा करून टाकिलें असल्यामुळें, साधारण मजूर तर या कराचे सपाट्यांतून अजीबात सुटून जातात. यामुळें या कराचा बोजा भांडवलवाल्यांवर दुबार बहुधा पडत नाहीं. उंच प्रतीची मजुरी अथवा धंदा करणारे डाक्टर, वकील, मुनीम वगैरे लोकांचा बहुधा संचयापेक्षां खर्चच अधिक असतो. या लोकांच्या उत्पन्नावर कर बसविला, तर त्यापासून संचय कमी होऊन भांडवल फारसें कमी होईल, ही भीतिही धरण्याचें कांही विशेष कारण नसतें. आतां कांहीं थोडे व्यापाऱ्यांचे नफे कमी होऊन भांडवल कमी होईल खरें, तरी पण धान्य, मीठ इत्यादि उपजीविकेचे पदार्थांवर कर बसविण्यापेक्षां इनूकमट्याक्स बसविला असतां बरें; तो अन्यायाचा होणार नाहीं.

येथपर्यंत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांविषयीं विवेचन करण्यांत आलें. आतां कराचे या दोन प्रकारांपैकीं कोणता प्रकार हमेष उत्तम, कोणते प्रकारानें सरकारानें कर बसविले असतां चांगलें, तें पाहून हे प्रकरण संपवूं.

प्रत्यक्ष कर हा, ज्यांचेवर कराचा बोजा पडावयाचा असेल, त्यांचेचपासून वसूल करण्यांत येतो असें मार्गें सांगितलेच आहे. इनूकमट्याक्स, इत्यादि कर याच

स्वरूपाचे आहेत. पूर्वी मुसलमानांचे वेळीं 'जेझिया' नांवाचा कर दर माणसीं घेण्यांत येत असे. इंग्लंडांत पोल-ट्याक्स नांवाचा कर दर माणसीं घेण्यांत येत असे. असल्या प्रकारचे कर लोकांस फार त्रासदायक भासतात. कर बसवितेवेळीं मिळकतीचा तपास होऊं लागतो. कर वसूल करणारांचे वर्तनानें लोकांचीं मनें बिथरून जातात. उत्पन्न नक्की करण्याचें काम कठीण असल्यानें पुष्कळ लोकांवर जुलूम होतो, व बरेंच वेळां अन्यायही होतो. असे प्रकार घडत असल्यानें लोकांस करामुळें सरकारचा जुलूम भासूं लागतो. आणि प्रजेस असंतोष वाटून प्रसंगीं राज्यासही अपाय होण्याची भीति राहते. सबब दूरदर्शी राज्यकर्ते आहेत ते बनेल तोंपावेतों असले कर न बसवितां अप्रत्यक्ष करच बसविण्याची तजवीज करतात.

अप्रत्यक्ष करांचीं उदाहरणें ह्मटलीं ह्मणजे, बहुधा निर्वाहास लागणारे पदार्थांवरील जकाती होत. मिठावरील जकात, कापडावरील जकात, अफूवरील जकात, हे कर असले जिन्नस वापरणाऱ्या लक्षावधि लोकांपासून वसूल न करितां, कांहीं थोड्या या जिनसांचे व्यापाऱ्यांपासून ठोक रकमेनें घेण्यांत येतात. या करांमुळें जरी त्या जिनसांची किंमत वाढून ते गिऱ्हाइकांस महाग पडतात, तथापि कराचा बोजा रयतेस भासत नाहीं. कर नक्की करण्यापासून व इसमवार वसूल करण्यापासून लोकांस त्रास होत नाहीं. प्रजेचीं मनें क्षुब्ध होत नाहींत. यासाठीं असले कर बनेल तोंपावेतों बसविण्याची राज्यकर्त्यांकडून तजवीज होते. आतां असले कर बहुधा निर्वाहाचे पदार्थांवर बसविले जातात, व त्यामुळें

त्यांचा बोजा श्रीमंत लोकांपेक्षां गरीब लोकांवरच फार पडतो, ह्मणून कराविषयीं आडम्‌स्मिथचे जे चार मुख्य सिद्धांत त्यांपैकीं पहिल्या सिद्धांताचे विरुद्ध हे कर बसले जातात असें होतें. तो सिद्धांत असा आहे कीं, ज्याची जशी ऐपत असेल तितकाच त्याचेवर कराचा बोजा पडावा. मिठावरील करापासून काय परिणाम होतो तें पाहूं. मिठावरील कर इतका भारी आहे कीं, तो जुलमी आहे असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. जें मीठ तयार करण्यास केवळ एक आणाच खर्च होतो, त्या मिठावर सरकारांनीं अडीच रुपये कर बसविला आहे !! कितीही दरिद्री मनुष्य असला, भीक मागणारा असला, तरी हिंदुस्थानांत त्याला मिठावांचून कधींही चालावयाचें नाहीं. हिंदुस्थानांत २९।३० कोट माणसें आहेत, इतक्यांसही मिठाची जरूर खरीच. दरेक माणसास सरासरी दररोज एक तोळा मीठ अवश्य लागतें, ह्मणजे दरमहिन्यास सरासरीनें दरेकास एकशेर मीठ लागतें, अथवा वर्षास बाराशेर मीठ दरमाणशीं लागतें. हातावर रोजिंदा मजुरी करून अथवा भीक मागून निर्वाह करणारीं कुटुंबें लक्षावधि आहेत. दरएक कुटुंबांत नवराबायको व एक मूल अशीं तीन माणसें गणलीं, तर त्या कुटुंबास वर्षाचे एक मण मीठ पाहिजे, व त्यावर जकात २½ रुपये पडते. ह्मणजे अत्यंत दरिद्री अशा लक्षावधि कुटुंबापासून सरकार दरसाल २½ रु. कर घेतें. या कराचे सपाट्यामधून एकही जिवंत मनुष्य सुटूं शकत नाहीं. हा काय लहान जुलूम आहे? इनकमट्याक्स बसवितांना दरसालचे ९०० रुपयांखालचे प्राप्तीचे लोकांवर कर बसविण्यांत येत नाहीं

पण मिठावरील कर पांचशें, चारशें, तीनशें, दोनशें, शंभर, पन्नास रुपयांचे प्राप्तीवाल्यांपासून व ज्यांना प्राप्ति नसून केवळ भीक मागणारे लोक आहेत, त्यांपासूनही तो घेतला जातो. इतका जुलमी कर अन्य कोठें घेण्यांत येत असेल असें दिसत नाहीं.

हल्लीं विलायतेंतील येणारे कापडावर जकात बसविली होती, त्यामुळें तिकडील लोकांनीं ओरड केल्यानें हिंदुस्थानांत हलक्या प्रतीचा जाडा भरडा कपडा तयार होत होता, त्यावरही सरकारानें जकात घेण्याचा ठराव केला आहे. हा ठरावही जुलमी आहे. कारण या जकातीचा बोजा श्रीमंत लोकांवर न पडतां गरीब लोकांवरच पडत आहे. विलायतेंतून येणारे कापड उच प्रतीचें असल्यानें तें अर्थात् चैनीचे पदार्थांत गणलें तरी चालण्यासारखें आहे तें बहुधा श्रीमंत लोकांचेच वापरण्यांत येतें. या कापडावर जकात बसली, तर तिचा बोजा श्रीमंत व चैनी लोकांवर पडून तो सोसला जाईल व देशाचें नुकसान होणार नाहीं. हिंदुस्थानांत होणारा कपडा जाडाभरडा असून तो गरीब लोकांचेच वापरण्यांत येतो. तो महाग झाल्यानें जकातीचा बोजा गरीब लोकांवरच पडतो. मिठाचे कराचे बोज्यानें वांकून गेलेल्या रयतेवर ही कापडाची जकात लादल्यानें काय परिणाम होईल तें विचारी लोकांस सहज समजण्यासारखें आहे.

हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न सरासरी ८०।८९ कोट आहे. यापैकीं फार मोठा भाग ह्मणजे बहुधा निमे ४० कोट रुपये जमिनीच्या साऱ्याचें उत्पन्न आहे. हिंदुस्थानांत जमिनीवर पोट भरणारे लोक शेंकडा ९५ असतील असा अंदाज

आहे. हे लोक बहुधा अत्यंत गरीब स्थितींतलेच आहेत. शेतांत चांगलें उत्पन्न होणें, हें पाऊसपाणी चांगलें असण्यावर आहे. बहुधा दहापांच वर्षांत एखादें वर्ष चांगलें पिकतें. सरकारांनीं सारा भरण्याचा जो 'रयतवारी' रिवाज काढला आहे, त्यामुळें पीक होवो अथवा न होवो, सारा बिनचूक भरावा लागतो. हा सारा फार वाढल्यानें गरीब लोकांवरच त्याचा बोजा पडतो, कारण सारे वाढले तरी धान्याची किंमत वाढली जात नाहीं. त्यामुळें शेतकरी लोकांस नुकसान सोसावें लागतें. या कराचे सपाट्यांतूनही कोणी सुटूं शकत नाहीं.

जमीन, मीठ व कपडा या तीन जिनसांवर कर बसविलेले आहेत, ते किती समंजसपणाचे, व देशास फायदेशीर आहेत, तें विचाराअंतीं दिसून येईल. या करांचा बोजा दुसऱ्या देशांवर यत्किंचितही न पडतां सर्वच आपल्या देशावर पडतो. कर अथवा जकाती अशा तऱ्हेनें बसवाव्या कीं, त्यांचा बोजा आपले देशावर न पडतां दुसरे देशावर टाकतां येईल. हें कोणत्या रीतीनें करावें ते समजणें कठीण आहे, ह्मणून त्याचा विचार पुढचे भागांत स्वतंत्रपणें करण्यांत येईल.

## भाग ७ वा

# परकीय देशांशीं होणाऱ्या व्यापारावरील करांविषयीं.

दरएक देशांत राज्यसत्ता चालविणारे सरकारास द्रव्याची फार जरूर लागते, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. आतां हें द्रव्य देशांतील लोकांपासूनच घेतलें पाहिजे, व तें कर, जकाती, इत्यादिरूपानें घेतलें जातें, हें खरें आहे; तथापि दरेक देशाचे सरकारचा हेतु असा असतो कीं, आपल्या सत्तेखालील आपल्या देशांतील लोक सुखी असावे, आपला देश धनाढ्य असावा, आपल्या देशांतील लोकांवर राज्य चालविण्याचे खर्चाचा बोजा फारसा पडूं नये, बनेल तोंपर्यंत हा खर्च परभारे बाहेरचे देशांतून काढावा, असें दरेक देशास वाटणें रास्त आहे. हेतु पार पाडण्यास एकच रस्ता आहे. तो हा कीं, आपले देशाचा दुसरे देशांशीं व्यापार होतो; त्या व्यापारावर, जकाती, कर इत्यादि बसवून त्यांचा शेवटचा बोजा आपल्या देशावर पडूं न देतां तो दुसऱ्या देशावर टाकितां येईल, अशा युक्त्या योजिणें. तर मग, परकीय देशांशीं चालणारे व्यापारावर जकाती बसविण्याचा मुख्य हेतु हा आहे कीं, राज्याचा गाडा हांकण्यास लागणारे खर्चाचा बोजा आपले देशावर न पडतां, तो बनेल तितका परकी देशांवर टाकितां यावा. अशा जकाती बसविण्याचा दुसरा एक हेतु असतो. तो असा कीं, आपले देशांतील धंदेरोजगारास उत्तेजन यावें, व परकी देशांतील धंद्यांमुळें ते बसून जाऊं नयेत. त्यांचें संरक्षण व्हावें म्हणून

परकी देशांशीं जो व्यवहार होतो, त्यावर जकाती वगैरे बसवून हरकती उत्पन्न कराव्या. हे दोन हेतु पूर्णपणें लक्षांत ठेविले पाहिजेत. या हेतूंपैकीं पहिला हेतु लक्षांत ठेऊन प्रथम विचार करून, संरक्षणादाखल ज्या जकाती असतात, त्यांचा पुढें एका स्वतंत्र भागांत विचार करण्याचें योजिलें आहे.

राज्याचे खर्चासाठीं उत्पन्न करावयाचा पैसा परकी देशांशीं चालणारे व्यापारावर जकाती बसवून करावयाचा आहे. या जकाती कशा बसवाव्या ?

परकीय देशांशीं चाललेल्या व्यापारावर त्या दोन प्रकारांनीं बसवितां येतील. प्रथम (१) देशांत येणारे मालावर (२) देशांतून बाहेर जाणारे मालावर. प्रथमदर्शनीं या दोन्ही प्रकारचे जकातींचा बोजा माल वापरण्यास घेणारांवर पडेल असें वाटेल, ह्मणजे आवक (आयात) मालावरील जकात आपले देशांतील लोकांस भरावी लागेल, व जावक (निर्गत) मालावरील जकात दुसऱ्या देशांतील लोकांवर पडेल. पण वास्तविक स्थिति अशीच असेल असा नियम नाहीं. ही स्थिति फार घोंटाळ्याची आहे. ती बारीक रीतीनें लक्षांत आणिली पाहिजे. प्रथम जावक मालावर जकात बसविली असतां काय होईल तें पाहूं.

जावक मालावर जकात बसविली असतां आपल्यावर व आपल्या गिऱ्हाइकांवर इतक्या चमत्कारिक तऱ्हेनें निरनिराळे परिणाम होतात कीं, ते अमुकच, व अमक्या तऱ्हेनें त्यास होतील, असें सांगणें फार कठीण पडतें. व जकात बसविल्यावरही तिजपासून फायदा होतो किंवा नाहीं, अथवा

ज्या हेतूनें ती बसविण्यांत आली, तो हेतु साध्य झाला किंवा नाहीं हें खात्रीनें सांगवत नाहीं. तथापि साधारणपणें असें ह्मणतां येईल कीं, आपले देशांतून बाहेर जाणारे पदार्थांवर कर बसविला असतां त्याचा बोजा कांहीं तरी अंशानें दुसऱ्या लोकांवर पडेल. पण खात्रीनें हें केव्हां घडेल? आपल्या मालाची दुसऱ्या देशास फार जरूर असेल, आपले मालाचा खप तिकडे फार असेल व तो कमी होण्याचा संभव मुळींच नसेल, तर मात्र जावक मालावरील जकात बसविली असतां देशास फायदेशीर होईल.

जावक मालावर जकात बसविण्याचा हेतु वर सांगितलाच आहे कीं, आपणास जो पैसा पाहिजे, त्याचा बोजा आपल्या लोकांवर न पडतां, आपला माल घेणारे दुसऱ्या देशांतील लोकांवर तो पडावा. सर्व प्रकारचे जावक मालावर कर बसविला, तर हा हेतु सिद्ध होत नाहीं. कितीएक जिनसांवर कर बसविला तर तो साध्य होतो, पण कितीएकांवर बसविला असतां परिणाम उलट होतो, व दुसऱ्यावर ओझें न जातां उलटें तें आपल्यावरच येतें. ही गोष्ट उदाहरणानें स्पष्ट केली पाहिजे.

मागें सांगितलेंच आहे कीं, देशांतील जावक माल व आवक माल एकमेकांचे बरोबर असतात; तसेंच परकीय व्यापारापासून फायदा होणें तो आपल्या मालाचा दुसऱ्यास जसा खप असेल त्या मानानें होतो. हिंदुस्थानांतून आफ्रिकेंत कापड जातें असें मानू. या कापडावर जकात बसविली. आफ्रिकेंत हिंदुस्थानाखेरीज दुसऱ्या पुष्कळ ठिकाणांहून कापड जातें. हिंदुस्थानचे कापडावर जकात बसल्या-

मुळें त्याची किंमत थोडीबहुत वाढली. दुसरीकडून आलेलें कापड स्वस्त असल्यामुळें, हिंदुस्थानाचे कापडाचा खप कमी होईल. यामुळें कराचा प्रथम परिणाम असा झाला कीं, आपला माल बाहेर कमी जाऊं लागेल. जावक माल कमी झाला असतां तो देऊन आपण जो नेहमीं आवक माल आणितों, तो अर्थात् कमी झाला पाहिजे. याप्रमाणें जावक व आवक दोन्ही माल कमी झाल्यानें, देशाचा व्यापार खालावून देशाची संपत्तीही कमी होईल. परकीय व्यापारानें देशास नफा होतो, त्यामुळें भांडवल व श्रम यांचा यथायोग्य उपयोग होऊन उत्पत्ति फार वाढते, हें मागें सांगितलेंच आहे. परकीय देशांशीं व्यापारच कमी झाला असतां हे फायदे कोठून मिळतील? याकरितां ज्या जावक मालाची स्पर्धा करणारे दुसरे पुष्कळ देश आहेत, जकात न बसवितांही ज्या मालाचा व्यापार केवळ जेमतेम चालतो, त्या मालावर जर निर्गत जकात बसविली तर आपले मालाचा खप कमी होण्याचा संभव फार आहे. ह्मणून तशी जकात बसविणें फायदेशीर होणार नाहीं.

आतां याचे उलट दुसरें उदाहरण घेऊं:—अमेरिकेंतून उत्तम प्रकारचा कापूस इंग्लंडांत येतो. अमेरिका जर आपल्या कापसावर थोडी जकात बसवील, तर तितक्या मानानें तेथील कापसाचा खप कमी व्हावा खरा; परंतु अनुभवानें असें कळलें आहे कीं, दुप्पट अगर तिप्पट जरी किंमत दिली, तथापि अमेरिकेसारखा कापूस कोणत्याही देशांत मिळत नाहीं. त्याचा खप इंग्लंड वगैरे देशांत अतोनात आहे. जकातीमुळें तो कमी होण्याचा संभव नाहीं.

अमेरिकेस कापसाची 'मनापोली' आहे असें म्हटलें तरी चालेल. याचप्रमाणें हिंदुस्थानांतून चीनमध्यें कोट्यावधी रुपयांची अफू जाते. अफूशिवाय चीनचें चालत नाहीं. दुसऱ्या देशांतून चांगली अफू फारशी तिकडे जात नाहीं. जशी अमेरिकेस कापसाची 'मनापोली' आहे, तशी हिंदुस्थानास अफूची 'मनापोली' आहे असें ह्मटलें तरी चालेल. अशा ठिकाणीं मात्र जावक मालावर जकात बसविल्यानें आपलें ओझें दुसऱ्यावर पडतें व फायदा होतो. अफूवरील नुसतें जकातीचें उत्पन्न सरकारास दरसाल ५।६ कोट आहे. या जकातीचा सर्व बोजा चीन देशावर पडतो. जावक मालावर जकात बसविली असतां फायदा होतो, यांची सर्वोत्कृष्ट उदाहरणें ह्मटलीं ह्मणजे, अमेरिकेचा कापूस व हिंदुस्थानची अफू हीं होत. याखेरीज तिसरें इतकें उत्तम उदाहरण सांपडणें कठीण आहे. तरी पण पुष्कळ जिनसांवर जावक जकात बसवितां येईल असें अनुभवानें कळून येईल.

येथपर्यंत जावक मालावरील जकातीचा विचार झाला. आतां आवक मालाचे जकातीबद्दल विचार करूं.

आवक मालावरील जकातीचा विचार करितांना एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, ही जकात संरक्षणादाखल असूं नये. संरक्षण ह्मणजे काय, व तें असावें किंवा नसावें, याबद्दल विचार पुढें करण्यांत येईल. हल्लीं इतकेंच सांगणें बस आहे कीं, ही जकात इतकी पुष्कळ असतां कामा नये, कीं तेणेंकरून बाहेरील माल येण्याचें बंद होऊन, आपल्याच देशांत तो उत्पन्न करणें फायदेशीर होईल. ही जकात जर इतकी भारी ठेवण्यांत येईल, तर

दोन्हीं देशांचा व्यापार बंद होऊन जाईल, व मागें सांगि-तलेले व्यापाराचे सर्व फायदे नाहींसे होतील.

तर मग ज्या प्रकारचे जकातीचा आपण विचार करीत आहों ती अशी असली पाहिजे कीं, जकातीमुळें आवक मालाचा खप थोडाबहुत कमी झाला असतांही बाहेरून माल आणण्याची आवश्यकता पूर्वीप्रमाणेंच कायम राहील. जकात बसविण्याचा हेतु संरक्षण नसून केवळ देशाचें उत्पन्न वाढविण्याचे हेतूनेंच ती बसविली आहे, असें मानून विचार करणें आहे.

देशाची जमा वाढविण्याचे हेतूनें आवक मालावर जकात बसविली असतां जावक मालावरील जकातीप्रमाणेंच निरनिराळे परिणाम होतात. आवक जकातीचा साधारण परिणाम असा असतो कीं, तिचा बोजा आपल्या देशांतील लोकांवर पडतो. पण केव्हां केव्हां तो दुसऱ्या लोकांवरही लोटला जातो. तो केव्हां लोटला जातो तें पाहूं.

आवक मालावर जकात बसविली असतांही, त्याचा खप कमी न होतां पूर्वीइतकाच राहील, तर ज्या देशांतून तो माल येतो त्या देशाचें कांहीं नुकसान नाहीं. खप कायम राहिल्यामुळें बाहेरून येणारा माल पूर्वीइतकाच येत जाईल. व त्याचे मोबदल्यांत जो या देशांतून माल मिळत असे तित-काच मिळेल, मात्र जकात बसल्यामुळें मूळ किंमत व जकात मिळून एकंदर रक्कम आपल्यास भरावी लागेल. जकातीमुळें आवक मालाची किंमत वाढून तो महाग पडूं लागल्यामुळें, आपलेच देशांतील लोकांवर तिचा बोजा पडला असें होईल.

णगणं पाहतां आपलेच देशावर पडतो असें जरी आहे, तथापि आवक जकातीचा परिणाम बहुश: असा होतो कीं, तिजमुळें बाहेरून येणारा माल महाग होतो. माल महाग झाल्यानें त्याचा खप थोडा तरी कमी होतोच. बाहेरून येणारे मालाचा खप कमी झाला असतां आवक जकातीचा सगळाच बोजा आपल्यावर न पडतां तो अंशतः दुसऱ्या देशावर वांटला जातो. अशा प्रसंगीं आवक जकात बसविणें आपल्यास फायदेशीर होतें. कल्पना करा कीं, इंग्लंडांतून कापड येऊन त्याचे बदला हिंदुस्थानांतून धान्य जातें. हिंदुस्थानांत येणारे कापडावर आवक जकात बसली, यामुळें इंग्लंडास कापडाचे मोबदला मिळणारी रक्कम पूर्वीइतकीच मिळत असून हिंदुस्थानास मात्र जकातीचे रकमेइतकी ती अधिक भरावी लागली. पूर्वीइतक्याच कापडास जकातीमुळें जास्त किंमत पडूं लागल्यानें कापडाचा खप कांहीं थोडा कमी होईल. खप कमी झाला ह्मणजे कापडाबद्दल हिंदुस्तानाकडून दरसाल इंग्लंडास जी रक्कम पोंचावयाची ती अर्थात् कमी होईल. परंतु हिंदुस्थानांतून इंग्लंडांत जें धान्य जातें त्याचा खप तिकडे आहे तितकाच कायम आहे. धान्याबद्दल इंग्लंडपासून जी रक्कम हिंदुस्थानास घेणें निघत असे ती जितकीच्या तितकीच राहिली आहे. पूर्वी धान्याबद्दल घेण्याची रक्कम कापडाबद्दल देण्याचे रकमेनें भागली जात असे; आतां तसें होत नाहीं. धान्याबद्दलचें घेणें कापडाचे देण्यानें फिटलें जात नाहीं. हिंदुस्थानांतून जितक्या किंमतीचा माल जातो, तितक्या किंमतीचा परत न येतां कमी किंम-

तीचा येतो. या दोन्ही रकमांची वजाबाकी होतां, कांहीं रोख रक्कम इंग्लंडनें हिंदुस्थानास दिली पाहिजे. हिंदुस्थानाचें कर्ज इंग्लंडकडे राहूं लागेल; तें कर्ज रोकड रक्कम इकडे पाठवून इंग्लंड फेडील अशी कल्पना केली. तर पुष्कळ रक्कम हिंदुस्थानांत आल्यानें या देशांत पैसा पुष्कळ होईल व इकडील जिनसांच्या किंमती वाढतील. इंग्लंडांतून रोकड रक्कम इकडे येऊं लागल्यानें तिकडे जिनसांचा भाव उतरेल, तिकडे सर्व जिन्नस स्वस्त होतील. हिंदुस्थानांत धान्य महाग होईल व इंग्लंडांत कापड स्वस्त होईल. ह्मणजे आपल्या धान्याबद्दल इंग्लंड पूर्वीपेक्षा अधिक किंमत देईल व हिंदुस्थानास अधिक कापड व पूर्वीपेक्षां स्वस्त अशा दरानें मिळूं लागेल.

वरील विचारावरून ध्यानांत येईल कीं, आवक मालावर जकात बसविल्यानें सरकारचें उत्पन्न वाढून आपले देशावर माल महाग झाल्यानें जो जकातीचा बोजा पडला असता तो पडत नाहीं, तो दुसऱ्या देशावर पडला जातो. देशांतील लोकांवर कर बसवून उत्पन्न करण्यापेक्षां, कांहीं प्रसंगीं आवक मालावर जकात बसविली असतां आपले लोकांवर बोजा न पडतां, आपला माल घेणारे लोकांवर तो परभारा पडतो, व तेणेंकरून आपला मोठा फायदा होतो. बाहेरून येणारे कापडावर जकात बसल्यानें कापड महाग होईल, लोकांस अधिक खर्च पडूं लागेल, व त्यामुळें उपजीविकेचा खर्च वाढून गरीब लोकांची दुर्दशा होईल, असें जें कित्येक लोकांचें ह्मणणें आहे तें चुकीचें आहे. कारण जकातीमुळें पहिल्यानें जरी कापड महाग झालें, तरी तें तसेंच फार दिवस

राहत नाहीं; लवकरच त्याचा खप कमी होऊन तें आपोआप स्वस्त होईल. त्यामुळें लोकांचें कांहीं नुकसान होणार नाहीं. उलट जकातीचें उत्पन्न मात्र आपल्यास निव्वळ मधल्यामध्यें सांपडून, इकडील धान्य महाग झाल्यामुळें त्याबद्दल किंमतही अधिक येऊं लागेल. असा दुहेरी फायदा होईल.

वरील विवेचनांत आवक व जावक जकातीचे गुणदोष सांगण्यांत आले. या दोहोंपैकीं उत्तम जकात कोणती? कोणत्या प्रकारची जकात बसविली असतां फायदेशीर होईल? याबद्दल सर्वसाधारण असा नियम सांगण्याचें काम फार कठीण आहे. जकात बसविण्याचे बाबतींत साधारणपणें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, जकात बसविणें ती उपजीविकेचे अवश्य पदार्थांवर असूं नये. चैनीचे पदार्थांवर असली तरी हरकत नाहीं. व थोडे खपणाऱ्या पुष्कळ पदार्थांवर जकात न बसावेतां, पुष्कळ खपणाऱ्या थोड्यावरच ती बसविली असतां, वसूल करण्यास सुलभ पडून खर्च फार होत नाहीं, व लोकांस त्रास कमी होतो. ग्लॅडस्टन साहेब प्रधान असतांना, त्यांनीं जकातीचे यादींत ३००।४०० जिन्नस होते ते सर्व कमी करून चार पांच जिनसांवरच जकात ठेविली. गायकवाड सरकारचे राज्यांतही नवीन बंदोबस्त झाल्यावर, पेटलाद वगैरे परगण्यांत अनेक पदार्थांवर जकाती होत्या त्या बंद करून, एक तंबाखूवरच कायम ठेविली. यामुळें जकात वसूल करण्याचा खर्च कमी लागून लोकांस सुख झालें; व सरकारचें उत्पन्नही फारसें कमी झालें असें नाहीं.

---

## भाग ८ वा.

### अप्रतिबद्ध व्यापार व संरक्षण.

परदेशांशीं होणारे व्यापावर जकाती बसविण्याचे दोन हेतु असतात असें मागें सांगण्यांत आलें. (१) सरकारचें उत्पन्न वाढविणें, व (२) देशांतील धंदे व हुन्नरांचें संरक्षण करणें; या दोन प्रकारांपैकीं पहिल्याचा विचार मागील भागांत करण्यांत आला. या भागांत संरक्षणाविषयीं विचार करणें आहे.

अप्रतिबद्ध व्यापार अथवा खुला व्यापार, ज्यास इंग्रजींत 'फ्री ट्रेड' असें ह्मणतात, त्याचें स्वरूप बहुधा, परदेशांशीं व्यापाराविषयीं जें विवेचन करण्यांत आलें आहे, त्यावरून अप्रत्यक्ष रीतीनें लक्षांत आलेंच असेल. आतां अप्रतिबद्ध व्यापार ह्मणजे काय, संरक्षण कशास ह्मणावें यविषयीं सविस्तर विचार करूं. अप्रतिबद्ध व्यापार ह्मणजे दोन देशांचे दरम्यान असलेले व्यापारास कोणत्याही तऱ्हेची कृत्रिम हरकत नसणें; त्याचा व्यापार मोकळ्या रीतीनें होणें. येणारे अगर जाणारे मालावर अडचणीच्या जकाती बसवून माल येण्याजाण्याचा प्रतिबंध न करितां, ज्या देशांत जो उत्तम होईल तो बाहेर पाठवून, बाहेरून जो पाहिजे तो माल आणण्याची पूर्ण स्वतंत्रता असली, ह्मणजे 'अप्रतिबद्ध व्यापार' ह्मणावें.

ह्मणणें असें आहे कीं, व्यापारास संरक्षण असलें पाहिजे. व्यापाराचें परदेशांतून आपले देशांत जो

माल येतो तो येऊं देऊं नये. त्या मालावर जबर जकाती बसवून, अथवा तो न येण्याविषयीं कडक कायदे करून तो आपले देशांत येण्याचें बिलकूल अथवा अंशतः बंद करून टाकायाचें, याला संरक्षण ह्मणतात. बाहेरून माल येण्याचें बंद झालें ह्मणजे अर्थात् तो आपले देशांत तयार होईल, ह्मणजे आपले देशांतील व्यापारास उत्तेजन मिळेल. आपले येथील धंदे व हुन्नर बसून न जातां ऊर्जितदशेस येतील, ह्मणून त्यांचें 'संरक्षण' झालें असें ह्मणावयाचें. आपणास लागणाऱ्या जिनसांपैकीं देशांत होण्यासारख्या असतील तेवढ्या बाहेरून न येऊं देतां, आपले देशांतले देशांतच त्या उत्पन्न केल्यानें, देशास फार मोठा फायदा होईल; देशांतील व्यापार फार भरभराटीस येईल; परदेशचा माल आपले देशांत येऊं दिल्यानें, सगळ्या देशाचें अपरिमित नुकसान होतें; सबब अनेक उपायांनीं तो येण्याचें बंद करून, आपलेच देशांत तो उत्पन्न करावा; असें संरक्षणवादी लोकांचें ह्मणणें आहे.

देशांतील लोकांची स्थिति पाहिली असतां निराळेंच प्रकारची दिसते. दरेक गिऱ्हाईक बाजारांत जिन्नस विकत घेण्यास गेलें कीं, चांगला व स्वस्ता जिन्नस हुडकावयास लागतें. एकच प्रकारच्या दोन मालांत जो कमी किंमतीस मिळेल तो गिऱ्हाईक घेतें. मग तो आपले देशांत झालेला असो, कीं परकी देशांतून आलेला असो. देशांत झालेला माल घेतला असतां आपले देशांतील व्यापारधंद्यास उत्तेजन मिळेल, ह्मणून महाग पडला तरी तोच माल घ्यावा, अशी साधारण लोकांची समजूत नसते. जो तो स्वस्त माल

घेतो. बाहेरून आलेला जिन्नस असो किंवा आपले देशांत झालेला असो; स्वस्त मिळाला ह्मणजे आपला फायदा आहे, महाग जिन्नस घेतल्यानें नुकसान होतें, अशी दरेक जणाची समजूत असते. परंतु 'संरक्षणवादी' तर ह्मणतात कीं, बाहेरून माल आपले देशांत आला असता आपला तोटा आहे; तो महाग पडला तरी देशांतले देशांतच तयार करावा, व तोच सर्वांनीं घ्यावा; बाहेरील माल देशांत येऊं देऊं नये.

तर मग संरक्षणवाद्यांचे मताप्रमाणें ज्यांत देशाचा फायदा आहे त्यांत व्यक्तिमात्रांचा तोटा होतो, असा विरोध कां यावा? व्यक्तिमात्रांचें हित तेंच देशाचें हित असलें पाहिजे. व्यक्तिमात्रांचें ज्यांत नुकसान आहे त्यांत देशाचा फायदा आहे, हें ह्मणणें बरोबर होणार नाहीं. शिवाय परकीय देशाशीं चालणाऱ्या व्यापाराविषयीं किहीत असतां मागें सांगण्यांत आलेंच आहे कीं, दोन देशांचें दरम्यान व्यापार चालणें तो दोन्ही देशांचे हित असल्यावांचून सुरूच होणार नाहीं. परदेशांतून माल आपले देशांत आणला जातो, तो त्या देशाचा फायदा व्हावा ह्मणून नव्हे. तो आपल्या देशांत तयार केला असतां त्यास पुष्कळ श्रम व भांडवल खर्च करावें लागलें असतें, तें व्यर्थ खर्च करणें न पडावें ह्मणून त्यापेक्षां कमी श्रम व भांडवल खर्च करून, दुसरा एखादा जिन्नस आपण तयार करतों, आणि तो जिन्नस बाहेरून येणारे मालाचे मोबदला देऊन तिकडील माल आपण घेतों, तेव्हां बाहेरील माल आपल्यास थोड्या श्रमानें व खर्चानें मिळाला असें होतें. बाहेरील स्वस्त मिळणारा हा माल

घेण्याचें आपण बंद करूं, अगर त्यावर जबरदस्त जकात बसवून तो येण्याचें आपोआप बंद पडेल असें करूं, तर तो माल आपल्या देशांतच अधिक खर्चानें व श्रमानें करावा लागेल. कारण मालाची आपल्यास जरूर आहे, आणि बाहेरून येण्याचा तो बंद झाला, यामुळें आपल देशांत तो करण्यास जास्त श्रम व भांडवलाचा विनाकारण व्यर्थ खर्च झाला असें होईल. जास्त खर्च लागल्यामुळें हा तयार झालेला माल गिऱ्हाइकांस महाग पडेल, परंतु त्यामुळें तो तयार करणारांस नफा अधिक होईल असें मुळींच नाहीं. माल तयार करणारांस फायदा नसून तो घेणाऱ्या गिऱ्हाइकांस मात्र नुकसान, असा परिणाम होईल, थोड्या खर्चानें जिन्नस मिळत असतां, ह्मणजे थोड्या खर्चानें आपण कांहींएक जिन्नस तयार करून तो मोबदला देऊन बाहेरचा स्वस्त माल मिळत असतां, तो न घेतां, आणि कमी खर्चानें होणारे जिन्नस करण्याचें बंद करून, ज्यास अधिक खर्च लागतो तो जिन्नस जास्त खर्च झाला तरी बेहेत्तर आहे पण करावयाचा, असा आग्रह धरल्यानें देशांतील तो माल घेणारांचें व इतर सर्वांचेंच नुकसान आहे.

'संरक्षण' असावें, त्यापासून फायदा होतो, असें ह्मणणारे, आपलें मत सिद्ध करण्यास जीं कारणें दाखवितात त्यांपैकीं मुख्य हें आहे कीं, दुसऱ्या देशांतल्या धंद्यांस उत्तेजन देऊन, तेथील मजुरांस मजुरी देऊन त्यांचें पोषण करावें, त्यापेक्षां आपल्या देशांत धंदे चालवावे, व आपल्या देशांतील लोकांस उद्योग द्यावा, हें चांगलें. प्रथमदर्शनीं हें ह्मणणें फार चांगलें दिसतें. परंतु विचार केला असतां याचें

१६–९१८–२०००

उत्तर सहज देतां येईल. संरक्षणानें दुसऱ्या देशांतील मजुरांचें काम बंद होऊन आपल्या देशांतील मजुरांस तें मिळेल, हें ह्मणणें रास्त होणार नाहीं. मागें सांगितलेंच आहे कीं, 'आयते तयार झालेले जिन्नस विकत घेतल्यानें मजुरास धंदा, व त्यांचें पोषण आपण केलें असें होत नाहीं.' दुसऱ्या देशांत तयार झालेला माल आपण विकत घेतला, ह्मणून तिकडील मजुरांस आपण रोजगार दिला, हें ह्मणणें चुकीचें होईल. त्या देशांत भांडवल आहे, ह्मणून त्यावर तिकडील लोकांचा निर्वाह होत आहे. तें भांडवल आपलें नाहीं, ह्मणून त्यावर ज्या मजुरांस रोजगार मिळतो, तो आपण त्यांना दिला असें कसें म्हणतां येईल? बाहेरील माल आपण विकत न घेतल्यानें वास्तविक प्रकार असा होतो कीं, आपल्या देशांतीलच एका वर्गाचे मजुरांचें काम जाऊन तें दुसऱ्यास मिळतें. आवक माल येत असे तेव्हां नेहमीं त्याचे बदला आपल्यास जावक माल पाठवावा लागत असे. आवक माल बंद केला, तर त्याचे बदला जाणारा जावक मालही बाहेर जाण्याचें बंद होईल. मग अर्थात् तो तयार करण्याचीही जरूर राहणार नाहीं. तो तयार करण्याचे कामीं गुंतलेले मजूर रिकामे पडतील. त्यांनां कांहीं धंदा नाहींसा होईल. फार झालें तर बाहेरून येत असलेला माल बंद करून तो इकडे करण्याची सुरुवात केल्यामुळें, नवीन उभारलेल्या धंद्यांत या रिकामे झालेल्या मजुरांपैकीं कांहींस काम मिळेल. परंतु ज्या वस्तु थोडया श्रमानें व खर्चानें बाहेरून आल्यानें मिळत होत्या त्या अधिक श्रमानें व खर्चानें आपण घरीं करूं लागलों, यामुळें पूर्वीपेक्षां अधिक मजुरांस

काम मिळणार नाहीं, इतकेंच नाहीं, तर भांडवल पूर्वीइतकेंच असल्यामुळें उलटें कमी मजुरांचें पोषण होईल.

वरील विचारांवरून ध्यानांत आलें असेल कीं, आपल्या देशांतील मजुरांस काम मिळावें, ह्मणून 'दुसऱ्या देशांतील येणारा माल बंद करून अधिक खर्चानें कां होईना, पण तो आपल्या देशांतच उत्पन्न करावा,' हें ह्मणणें अर्थशास्त्र-दृष्ट्या चुकीचें होईल. तसें केल्यानें निराळे मजुरांस काम मुळींच न मिळतां, पूर्वी चालत असलेले धंदे बंद पडल्या-मुळें त्या धंद्यांतलेच कांहीं रिकामे पडलेले मजूर हा नवीन माल तयार करण्याचे कामीं उपयोगांत येतील, इतकेंच मात्र होईल. परंतु संरक्षणामुळें अधिक खर्च होईल तें नुक-सान सहन करावें लागेल.

आतां येथें इतकें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, दुसऱ्या देशांतून येणारे मालपैकीं कांहीं प्रकारचा माल आपण बंद केला. अगर त्याजवर जकात बसविली, परंतु आपला जाणारा माल त्या देशास बंद करितां येत नाहीं, अशी कदाचित् स्थिति असेल. समजा कीं, इंग्लंडाहून हंड्या, झुंबरें, दारू वगैरे पदार्थ येण्याचें हिंदुस्थानानें बंद केलें. ते बंद केल्यापासून आपलें फारसें अडत नाहीं. पण आपलें धान्य जें इंग्लंडांत जातें तें त्यास बंद करितां येत नाहीं. धान्या-वांचून इंग्लंडचें चालत नाहीं. अशा स्थितींत आपल्या देशाचा जावक माल अधिक होईल, व आवक कमी होईल. तेव्हां अर्थात् जावक-आवकाची वजावाट होतां बाकी राहील तो रोख पैसा इंग्लंडनें इकडे पाठविला पाहिजे. रोख पैसा हिंदु-स्थानांत आला ह्मणजे पैशाचा पुरवठा वाढल्यानें इकडे

धान्य महाग होईल, व त्याचे मोबदला इंग्लंडास पूर्वीपेक्षां अधिक माल हिंदुस्थानांत पाठविणें भाग पडेल. तसेंच पैशाची इंग्लंडांत चणचण झाल्यानें तेथें सर्व जिनसांची किंमत उतरेल; व हिंदुस्थानानें बंद केलेल्या जिनसांशिवाय इतर कापड, वगैरे अनेक पदार्थ हिंदुस्थानास पूर्वीपेक्षां स्वस्त मिळूं लागतील. ह्मणजे जबरदस्तीनें जकात बसवून कांहीं प्रकारचा माल येण्याची जर बंदी केली, तर दुसऱ्या प्रकारचा माल आपणांस स्वस्त मिळेल. *ही गोष्ट अगदीं खरी आहे. याप्रमाणें जर कांहीं जिनसांवर जकात बसवून ते येण्याचे बंद करितां येईल, तर मात्र आपल्यास फायदा होईल हें निर्विवाद आहे. परंतु हा फायदा, जेथपर्यंत दुसऱ्या देशानें आपल्यासारखीच आपले इकडून जाणारे मालावर जकात बसविली नाहीं, तोंपर्यंतच मिळेल, पुढें मिळणार नाहीं. दोन्ही देशांनींही जकाती बसविल्या ह्मणजे विनाकरण दोघांचेंही नुकसान होईल.

'संरक्षण' असावें यासाठीं आणखीं कारणें दाखविण्यांत येतात. तीं अशीं कीं, ( १ ) देशाची गुजराण झाली पाहिजे; ( २ ) देशाचें संरक्षण झालें पाहिजे; ( ३ ) जेथें कचा माल उत्पन्न होतो तेथेंच माल तयार झाला असतां, नेण्याआणण्याचा जो रिकामा खर्च होतो तो होणार नाहीं, व तितका फायदा होईल; ( ४ ) ज्या देशांत धान्य फार पिकतें त्या देशानें आपलें धान्य फार फार बाहेर पाठवि-

* टीप—हिंदुस्थानांतून कच्छ वगैरे ठिकाणाहून चांदी, सोनें इ. धातूंचें नकशीचें सामान इंग्लंडांत जातें त्यावर तिकडे जकात बसविण्यांत आलेली आहे. त्यामुळें इंग्लंडास फायदा होतो व हिंदुस्थानचे व्यापारास मोठा गैरफायदा होतो.

ण्याचा प्रघात सुरू ठेविला, तर जमिनींतून धान्याची उत्पत्ति झपाट्यानें होऊं लागल्यामुळें ती लवकर निकस होईल, व त्यामुळें देशाचा अक्षयचा गैरफायदा होईल. इ०.

या सर्व कारणांचा थोडा थोडा विचार करणें जरूर आहे. प्रथम, देशाची गुजराण झाली पाहिजे. अन्नवस्त्रावांचून राहण्याची त्यास पाळी येऊं नये ह्मणून बाहेरील पदार्थ न घेतां सर्व लोकांनीं ते आपल्याच देशांत उत्पन्न करण्याची तजवीज केली पाहिजे. समजा कीं, इंग्लंडाहून स्वस्त पडतें ह्मणून कोट्यावधींचें कापड हिंदुस्थानांत येतें. हिंदुस्थानांत यामुळें कापडाचे कारखाने बंद पडत जाऊन कांहीं दिवसांनीं कापड कसें तयार करावें हेंही कोणास समजणार नाहीं अशी स्थिति होईल. असें झालें असतां दोन तऱ्हेचें नुकसान होण्याचा संभव आहे. एक कापडासाठीं आपल्यास नेहमीं इंग्लंडावरच अवलंबून बसावें लागेल, व त्यामुळें इंग्लंडास कापडाची 'मनापोली,' सांपडेल; व अफूप्रमाणें त्याची हवी तशी किंमत वाढविली, तरी ती हिंदुस्थानास देणें जरूर पडेल. दुसरें, बाहेर लढाया वगैरे सुरू होऊन इंग्लंडांतील माल हिंदुस्थानांत येईनासा झाला, तर मग एकदम नागवेंउघडें फिरण्याची पाळी येईल.

परंतु असें होण्याची कितपत भीति आहे, हें मात्र नीट पाहिलें पाहिजे. हल्लींचे स्थितींत तरी निदान सर्व देशांस हवी तिकडे व्यापार करण्याची मोकळीक आहे. इंग्लंडांतून हिंदुस्थानास कापडाचा सर्व पुरवठा झाला पाहिजे असें नाहीं. इंग्लंडहून कापड न आलें तर दुसरे स्वतंत्र देश फ्रान्स, जर्मनी, रशिया, अमेरिका वगैरे देशांतून कापड

इतकें येणार नाहीं, अशी भीति धरण्याचें मुळींच कारण नाहीं. हिंदुस्थानाशीं व्यापार सुरू केल्यानें फायदा होतो असें दिसेल, तर ते फायदा बुडवितील असें कधींही होणार नाहीं.

२ दुसरें, देशाचें संरक्षण व्हावें ह्मणून कितीएक गोष्टी अधिक खर्चानेंही कराव्या लागतात. याचा संबंध राजकीय व्यवहाराशीं अधिक आहे, ह्मणून त्याजविषयीं येथें अधिक कांहीं सांगण्याची गरज नाहीं. प्रत्येक देशानें आपले संरक्षणार्थ परकीय देशावर अवलंबून राहणें चांगलें नव्हे. म्हणून अधिक खर्च पडला तरी सोसून संरक्षणास लागणाऱ्या वस्तु देशांतच तयार केल्या पाहिजेत. बंदुका, दारू, शिपाई, जहाजें, खलाशी, इंजिनियर, वैद्य, इत्यादि तयार करण्याचे कामीं खर्चाकडे पाहतां कामा नये. अधिक खर्च झाला असतांही आपल्या देशांत तयार करणें अवश्य आहे. सर्व स्वतंत्र देशांनीं या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे. हिंदुस्थानासारख्या परतंत्र देशास याचा कांहीं उपयोग नाहीं.

३ तिसरें, कितीएकांचें ह्मणणें असें आहे कीं, ज्या ठिकाणीं कच्चा माल उत्पन्न होतो, तेथेंच कारखाने काढून माल तयार करविला, तर नेण्याआणण्याचें जें भाडें पडतें तें विनाकारण खर्च न होऊन देशास फायदा होईल. हिंदुस्थानांत कापूस पिकतो तो येथून इंग्लंडांत पाठविण्याचा खर्च, नंतर कापड तयार झाल्यावर तें पुन्हा इकडे आणण्याचा खर्च, असे खर्च विनाकारण न करितां तो कापूस येथेंच ठेऊन त्याचें कापड येथेंच तयार केलें, तर भाडेंखर्च पडणार नाहीं. ह्मणून बाहेरील कापड न घेतां आपल्या येथेंच कापड तयार करावें.

हें कारण संयुक्तिक दिसतें, पण त्यांत तथ्य नाहीं. कारण भाडयाचा खर्च कोणावरही पडो, तो सगळा जातेवेळचा व येतेवेळचा देऊन, जर आपल्यापेक्षां दुसऱ्याचा माल स्वस्त पडतो, तर तोच घेण्यांत फायदा होईल. कापूस इंग्लंडास पाठवून तिकडून कापड तयार करून आणण्यास भाडेखर्च अतिशय पडून किफायत राहीनाशी झाली, ह्मणजे हिंदुस्थान आपला कापूस तोट्यानें तिकडे पाठविण्यास कधींही तयार होणार नाहीं. येथेंच करखाने निघून कापड बनूं लागेल. असें होतांना प्रथम कांहीं दिवस खर्च फार होऊं लागेल. नवीन धंदा उत्पन्न करून त्यांत दुसऱ्या देशांशीं टक्कर मारण्याची शक्ति अंगीं येईपर्यंत, कांहीं दिवस या नवीन सुरू झालेल्या धंद्यांचें 'संरक्षण' करणें जरूर पडेल, व 'संरक्षण' देणें तें इतक्या पुरतेंच दिलें, तर अर्थशास्त्रदृष्ट्या चुकीचें होईल असें ह्मणतां येणार नाहीं.

४ चवथें ज्या देशांतून धान्य वगैरे शेतकीसंबंधीच पदार्थ बाहेर जातात, त्यांस विशेषेंकरून लागू आहे. मागें अनेक वेळां सांगण्यांत आलेंच आहे कीं, इतर कारखाने पाहिजे तेवढे वाढवून हवी तितकी उत्पत्ति करितां येते, तसें जमिनीचें नाहीं. कोणत्याही देशांत लागवडींत आणण्यासारखी जमीन बेताचीच असते. देशांतली वस्ती जसजशी जुनी होत जाईल, तसतशी ही सर्व जमीन लागवडींत येऊन चुकेल व दरसाल त्याच त्या जमिनींतून पीक वारंवार काढून घेत गेलें ह्मणजे तिचा कस कमी होतो, हें आतां सर्वांस पक्कें कळलें आहे. कस कमी झाला असतां पूर्वीप्रमाणें उत्पन्न होणार नाहीं, व देशाचा अक्षयचा गैर-

फायदा झाला असें होईल. हें वास्तविक आहे, तथापि विचार केला असतां ही भीति बाळगण्याचेंही विशेष कारण आहे असें दिसत नाहीं. धान्याची उत्पत्ति करण्यास फारच खर्च लागूं लागला असतां धान्य उत्पन्न करण्याचें बंद करून, तो देश हलके हलके आपलें भांडवल दुसऱ्या धंद्यांत घालण्याची सुरवात करील. आपल्या उपजीविकेपुरतेंच धान्य तो उत्पन्न करून, मोकळें झालेलें भांडवल या देशांतून जो माल त्या देशांत येत असेल, तो तयार करण्याचे कामीं उपयोगांत आपोआप आणील. दुसऱ्या देशांतून येणारा माल जबरदस्तीनें बंद करण्याची गरज पडणार नाहीं. या नवीन होणारे मालासही वर सांगितल्याप्रमाणें कांहीं थोडे दिवस 'संरक्षण' दिलें असतां, अर्थशास्त्राचे नियमाविरुद्ध होईल असें नाहीं.

वरील ३ऱ्या व ४ थ्या कारणांच्या विचारावरून एक सिद्धांत सिद्ध होतो. तो असा कीं, 'दुसऱ्या देशांत उत्पन्न होणारा माल संरक्षण देऊन आपल्या देशांतच उत्पन्न करणें, हें सामान्य रीतीनें पाहतां गैरफायद्याचें असून, अर्थशास्त्राचे नियमांचे अगदीं विरुद्ध आहे, असें मागें सिद्ध केलें आहे; तथापि कांहीं विशेष प्रसंगीं संरक्षण दिलें असतां फार मोठा फायदा होतो; व संरक्षण देणें हें अर्थशास्त्राचे नियमांस पूर्णपणें अनुसरूनच होतें.' आस्ट्रेलियाप्रमाणें ज्या देशांत नुकतीच वसाहत झाली आहे, किंवा हिंदुस्थानाप्रमाणें जो देश फार प्राचीन कालापासून वसाहत झालेला असल्यामुळें, तेथील सर्व जमीन लागवडींत येऊन चुकली आहे, व शेतकीखेरीज दुसरा धंदा ज्या देशांत आतां ह्मणण्यासारखा उरला नाहीं, तेथें जर शेतकीशिवाय एखादा धंदा उत्तम रीतीनें चाल-

ण्याचा संभव असेल, तर कांहीं दिवसपर्यंत त्या धंद्यास 'संरक्षण' देणें अत्यंत हितकारक होईल. देशांत नवीन धंदे सुरू करण्याची चांगली सवड असली, तरी पण कांहीं काळपर्यंत दुसऱ्या देशांशीं स्पर्धा करण्याचें सामर्थ्य त्या देशाचे अंगीं येणार नाहीं. नवीन सुरू केलेला धंदा नीट सुरळीत चालेपर्यंत संरक्षणाची जरूर पडेल. परंतु हें फार दिवस ठेवितां कामा नये. धंदा एकवार सुरळीत चालू झाला, व दुसऱ्या देशांशीं टक्कर मारण्याचें सामर्थ्य एकवार अंगीं आल्यानंतर जर हें संरक्षण सुरूच ठेविलें, तर मात्र मागें सांगितल्याप्रमाणें फार गैरफायदे होतील.

या विषयाचे संबंधानें प्रसिद्ध अर्थशास्त्रवेत्ते मिल्ल साहेब यांचे विचार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. त्याचा सारांश पुढें लिहिल्याप्रमाणें आहे. 'कांहीं जिन्नस उत्पन्न करण्याचे बाबतींत एका देशास दुसऱ्या देशावर जें वर्चस्व मिळालेलें असतें, तें केवळ त्या देशानें ते जिन्नस उत्पन्न करण्याची सुरवात लवकर केल्यामुळें असतें. ते जिन्नस त्या देशांत चांगले उत्पन्न होण्यास तेथें कांहीं स्वभावसिद्ध अधिक सोय असते असें नाहीं. पुष्कळ दिवस करीत आल्यामुळें अनुभव व कौशल्य वाढून एकास दुसऱ्यापेक्षां माल चांगला तयार करितां येतो इतकेंच. ज्या देशास उत्पत्ति करण्यास नवीन आरंभ करणें आहे, व विशिष्ट देशाशीं स्पर्धा करणें आहे, त्यांत प्रथम पुष्कळ दिवस फायदा न होतां उलटा तोटाच होईल हें उघड आहे. हा तोटा कोणीं सोसावा? ज्यानें कारखाना काढिला त्यावर हा घालणें रास्त नाहीं; व कोणताही कारखानदार तोटा सोसून तो चालविण्यास तयार

होणार नाहीं. कारखाना सूरू झाल्यामुळें सर्व देशाचा फायदा आहे, त्या अर्थी तोटाही सर्व देशानेंच सोसावा हें रास्त. सर्व देशांचे मालक सरकार आहेत, तेव्हां हा तोटा कसा भरून काढावयाचा याची व्यवस्था सरकारांनींच केली पाहिजे. आतां हा तोटा सर्व देशांवर सारखा वांटून देण्यास एकच उपाय आहे. तो हा कीं, परकी देशांतून येणारे मालावर जकात बसवून तो न येईसा करणें. माल महाग पडला तरी लोकांस घेणें जरूर पडेल, त्यामुळें सर्वांचा तोटा होईल. पण सर्वांचे फायद्याकरितां ही खटपट करणें आहे म्हणून हें नुकसानही सर्वांनींच सोसणें भाग आहे. असल्या प्रकारचें संरक्षण अर्थशास्त्राचे विरुद्ध होणार नाहीं. मात्र तें थोड्या काळापुर्तेंच असलें पाहिजे. तें सतत चालणार नाहीं, असें लोकांस पूर्णपणें वाटलें पाहिजे. तसेंच ज्या धंद्यास संरक्षण दिलें असेल, तो सुरू होऊन उत्तम रीतीनें चालण्याचा संभव असला पाहिजे.' शारीरिक श्रम करणें हें शरीरप्रकृतीस फायदेशीर आहे, परंतु तापानें पडलेल्या माणसाकडून श्रम करविणें वेडेपणाचें होईल. त्याला विश्रांतीच दिली पाहिजे. लहान मुलांकडून मोठ्या माणसाइतकें काम घ्यावयाचें आहे, तर त्याला आरंभापासूनच मोठ्या माणसाबरोबर खपावयास न लावितां त्याचें संगोपन करून त्याच्या अंगाची शक्ति जसजशी वाढेल, तसतसा त्याला मोकळा सोडीत गेलें पाहिजे. असें न केलें तर नाश होईल.

कांहीं वर्षांपूर्वी ईस्ट इंडिया कंपनीचे वेळीं हिंदुस्थानांतून हरतऱ्हेचा माल व कापड इंग्लंडांत जात असे. हें पाहून तेथील लोकांनीं अनेक वेळां इकडील माल न वापरण्या-

विषयीं नियम केले; पण त्याचा उपयोग न झाल्यानें अखेरीस इकडील माल वापरणारांस जबरदस्त शिक्षा करण्याचे मोठे कडक कायदे सरकारनें केले व हिंदुस्थानांतील मालावर मोठ्या जबर जकाती बसविल्या. या तजविजी होत होत्या, त्यांचे दरम्यान इंग्लंडांत कापडाचे वगैरे कारखान्यांच्या नवीन युक्त्या निघून, बाहेरून येणारें कापड कांहीं दिवसपर्यंत बंद पडल्यानें ते कारखाने चांगले भरभराटीस आले. इंग्लंडांत कापड इतकें स्वस्त व उत्तम होऊं लागलें का, हिंदुस्थानचें कापड तिकडे खपत नाहींसें झालें; इतकेंच नाहीं, तर हिंदुस्थानभर इंग्लंडाशिवाय इतर कापडच नाहींसें झालें. अशी स्थिति झाल्यावर पुढें बाहेरून माल येण्याची बंदी व ‘संरक्षण’ सुरू ठेवण्याची कांहीं जरूर उरली नाहीं. व कदाचित् सुरू ठेवलेंच असतें, तर अपायकारक झालें असतें, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. मिल्ल साहेबांचें वरील मत या उदाहरणावरून स्पष्ट लक्षांत येईल. इंग्लंडनें हल्लीं संरक्षण बंद केलें आहे तें यथायोग्यच केलें. परंतु त्याजपासून जो उपयोग व्हावयाचा तो होऊन चुकल्यानंतर तें बंद केलें आहे, आणि यापुढें तें सुरू ठेविलें तर नुकसान होईल, हें समजून तें काढण्यांत आलें, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

‘फ्रीट्रेड’ नें होणारे फायदे व संरक्षणामुळें होणारे तोटे अथवा नफे यांचा विचार बराच झाला. संरक्षणामुळें कांहीं प्रसंगीं तोटे होतात असें जरी आहे, तरी कितीएक विशेष प्रसंगीं देशाची स्थिति पाहून ‘संरक्षण’ दिलें असतां फार उपयोग होऊन देशाचें मोठें हित होतें.

हा विषय इतका महत्वाचा आहे, व हल्लीं देशी कला-कौशल्यास उत्तेजन देण्याबद्दल चोंहोंकडे इतकी वाटाघाट सुरू आहे, कीं याविषयीं जितकें जास्त लिहावें तितकें अधिक उपयोगाचें आहे. यासाठीं प्रसिद्ध व महाविद्वान् एल्फिस्टन् कॉलेजचे प्रिन्सिपॉल वर्डस्वर्थसाहेब यांनीं या विषयासंबंधानें एक पत्र ता० ३१ जानुआरी सन १८८० चे टाइम्स ऑफ् इंडिया नांवाचे इंग्रजी वर्तमानपत्रामध्यें प्रसिद्ध केलें आहे, त्याचा सारांश येथें देणें प्रशस्त वाटल्यावरून दिला आहे. त्या पत्रांत इटाली देशाचें उदाहरण त्यांनीं घेतलें आहे; परंतु देशाचा नामभेद केला, ह्मणजे सर्व विचार हिंदुस्थानास पूर्णपणें लागू पडण्यासारखे आहेत.

## वर्डस्वर्थ साहेबांचे पत्राचा सारांश.

"कांहीं लोकांचा असा समज आहे कीं, अर्थशास्त्रानें आपणास कांहीं नियम असे सांपडतात कीं, ते बेधडक हवे तेथें व्यवहारांत लागू करितां येतील. पण कोणत्याही शास्त्रानें असे नियम कधींही घालून दिलेले नाहींत, व देतांही येणार नाहींत; शास्त्रांचा उद्देश सत्यविवेचन हा होय; व्यवहारांत ते कसे लागू पाडावे हा नाहीं. शास्त्रानें आपणांस 'खरें कोणतें' एवढेंच मात्र कळूं लागेल; व त्यामुळें व्यवहारांत वागतांना आपल्या हातून अधिक चुका न होऊं देण्यास साधन सांपडेल. हीं शास्त्रोक्त मतें अमलांत केव्हां व कशीं आणावयाचीं, हें अनुभवानें व अन्य विचारांनीं ठरविलें पाहिजे."

"फ्रीट्रेडचीं मतें शास्त्ररीत्या बरोबर आहेत; पण जर फ्रीट्रेडवाले असें ह्मणतील कीं, आमचीं मतें बेधडक डोळे

मिट्न आपल्या स्थितीकडे न पाहतां तुह्मीं स्वीकारा, ह्मणजे तुमच्या देशांत संपत्तीची रेलचेल होईल, तर त्यांचें ह्मणणें वेडगळपणाचें होईल. अर्थशास्त्रानें असें सिद्ध होतें कीं, व्यवहारास कोणताही प्रतिबंध नसावा, ह्मणजे उत्पत्ति पुष्कळ होते. पण एवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, कोणत्याही देशास जर आपली स्थिति सुधारणें असेल, तर हे सिद्धांत त्यानें एकदम ग्रहण करावे. जर अर्थशास्त्र अशी जबरी करील, तर तें शास्त्र नव्हे.

'कितीएक जुन्या वस्तीचे देशांत हीं फ्रीट्रेडचीं मतें एकदम सुरू केल्यानें फार नुकसान झालें आहे. परंतु त्यामुळें शास्त्रदृष्ट्या या मतांची किंमत कमी झाली असें समजावयाचें नाहीं. प्रत्येक देशाची स्थिति इतकी भिन्न असते कीं, एकाच प्रकारचे नियम त्या सर्वांस सारखे लागू पडणें फार कठीण आहे. यासाठीं स्थितीस अनुलक्षून कांहीं फेरफार केल्याखेरीज हीं मतें हव्या त्या देशास लागू करतां येणार नाहींत. फ्रीट्रेडचीं मतें इटली देशांतील लोकांस जशीं पूर्णपणें समजलीं आहेत, तशीं दुसऱ्या कोणासही समजलीं नसतील; तरी पण गेल्या वीस वर्षांचे अनुभवावरून असें कळून आलें आहे कीं, हीं मतें एकदम व्यवहारांत सुरू केलीं ही मोठी चूक झाली. इटली देशांतील लोकांची अशी खात्री होत चालली आहे कीं, फ्रीट्रेडचे मतांत कांहीं फेरफार करून देशांतील कांहीं धंद्यांस उत्तेजन द्यावें. फ्रान्सदेशाप्रमाणें व्यवस्था ठेविली, व इंग्लंडचें उदाहरण न घेतां फ्रान्सप्रमाणेंच जर आपण चाललों, तर कल्याण आहे, असें त्यांस वाटू लागलें आहे. इटलींतील लोकांचा समज असा कां होत

१७-९१८-२०००

चालला आहे, हें येथें थोडक्यांत सांगणें जरूर आहे. कारण इटली व हिंदुस्थान या दोहोंमध्यें अतिशय साम्य आहे; व त्या देशास जें लागूं पडेल तें हिंदुस्थानासही बहुतांशीं लागू पडण्यासारखें आहे. इटली देशांत लोकसंख्या फार आहे; कलाकौशल्याचे वगैरे कारखाने फार थोडे आहेत; भांडवलाचा संचय मोठासा नाहीं; व कर्जाचा बोजा फार खराबीस आला आहे. धर्मसंबंधाची मोठी अडचण असल्यानें उत्पत्तीचे कामास अनेक हरकती येतात. एकंदर देशाची स्थिति वाईट असल्यामुळें ती सुधारण्यास रस्ते, आगगाड्या, पूल, शाळा, इत्यादि जे जे सुधारणुकीचे प्रकार पूर्वी नव्हते, ते ते सर्व हल्लींचे सरकारास करणें जरूर पडलें. शिवाय राज्यव्यवस्थेच्या संबंधानें इटलीची अशी स्थिति आहे कीं, त्या देशास मोठें सैन्य व आरमार ठेवणें जरूर पडतें. असले अनेक मोठाले खर्च भागविण्यास जमिनीचे उत्पन्नाशिवाय इटलीस दुसरा मार्ग नाहीं. जुन्या व दाट वस्तीच्या देशास जर फक्त शेतकीखेरीज दुसरे कांहीं उत्पन्नाचे धंदे नाहींत असें होईल, तर त्या देशाची अवस्था कठीण समजली पाहिजे. फक्त शेतकीवरच आधार असल्यानें एक दोन वर्षें अवर्षण झालें कीं, सगळ्या देशांत दुर्दशा. आयर्लंडचे हल्लींचे स्थितीवरून हें स्पष्ट होतें. यासाठीं मोठमोठ्या मुत्सद्यांचें आतां असें मत झालें आहे कीं, देशांत अनेक तऱ्हेचे धंदे चालले पाहिजेत, व विशेषेकरून जेथें लोकसंख्या फार व भांडवल थोडें, तेथें तर अनेक धंदे अवश्य पाहिजेतच. नवीन वसाहत झालेला प्रदेश असेल, जेथें जमीन मुबलक आहे, देशावर कर्जाचा

बोजा नाहीं, लोकसंख्या थोडी असून उद्योगी आहे, अशा ठिकाणीं फक्त शेतकीवरच निर्वाह चालेल; पण तोही त्यांचा माल खपण्यास जागा असेल तर, अशा ठिकाणीं भांडवल लौकर जमेल, व निरनिराळे धंदे लौकर निघूं लागतील. तेथें संरक्षणाचीही कदाचित् जरूर पडणार नाहीं. मिल्ल यांचें मत अशा वसाहतीस संरक्षण असावें असें आहे. पण मला तें बरोबर वाटत नाहीं. इंग्लंडच्या वसाहती व युनायटेडस्टेट्स् यांना संरक्षण नसतें, तरी त्यांचा भरभराट झाला असता. पण इटलीची स्थिति फार निराळी आहे. यंत्रानें तयार होणारे मालांत तिच्याच्यानें, इंग्लंड अगर अमेरिका, यांजबरोबर टक्कर मारवत नाहीं. यामुळें आवक मालावरील संरक्षणादाखल जी जकात होती, ती काढून टाकल्यानें हलके हलके इटलीमधील सर्व धंदे बंद पडले, अथवा बसत चालले. इटलीचे दक्षिण भागांतले लोक अगदीं भिकारी होऊन त्यांची दुर्दशा उडाली, व सर्वांस शेतकीशिवाय दुसरा धंदा उरला नाहीं. जमिनीचे *मालकांचीही तीच गत झाल्यामुळें जमिनीची सुधारणा काडीइतकीही होईना. जमिनी विकत घेऊन त्या सुधारण्यासाठीं अलीकडे बराच पैसा लोकांनीं मातींत टाकिला. पण पीक चांगलें न झाल्यामुळें, व करांच्या ओझ्यानें, त्यांस फायदा मुळींच झाला नाहीं. अशी स्थिति झाल्यामुळें उपजीविकेचे पदार्थांची किंमत दिवसेंदिवस वाढत चालली. महागाई होते तशी मजुरी न वाढल्यामुळें, मजूर उपाशीं मरूं लागले. असली भयंकर

* हिंदुस्थानांत जमिनीची मालकी लोकांकडे मुळींच नाहीं, तेव्हां सुधारण्याचें नांवच घेण्यास नको.

स्थिति फ्रीट्रेड्चीं मतें अमलांत आणणारांनीं क्षणभर लक्षांत आणावीं.

'इटलीचे दक्षिण भागास दारिद्र्यानें पूर्ण ग्रासलें आहे, यांत तर संशय नाहींच. तरी पण कस्टमखात्याचे हिशेबा-वरून दिसतें कीं, सन १८६० पासून इटलीचा व्यापार तिप्पट वाढला. यावरून असें ह्मणणें भाग पडतें कीं, इटलीचा व्यापार वाढत असतांही कांहीं भागांतील लोक दारिद्र्यानें ग्रासले जात आहेत. संरक्षणाची पद्धत सोडून देऊन फ्रीट्रेडचीं मतें अमलांत आणिल्यानें, उत्तर इटलीची स्थिति इतकी बिघडली नाहीं. पण दक्षिण इटलीचा प्रकार अगदीं वेगळा झाला आहे. व्यापार अप्रतिबद्ध झाल्यामुळें नूतन व अल्प असे धंदे तेथें होते, ते सर्व जागच्याजागीं बसून गेले; व सर्व लोकांस एका व अनिश्चित अशा शेत-कीचे धंद्याकडे वळणें जरूर पडलें. याकरितां एखाद्या गरीब कर्जबाजारी देशास इंग्लंड अथवा अमेरिका अशा प्रबल देशांशीं स्पर्धा करावयास लावून त्यांत असलेले अगदीं मोडके धंदे मुळापासून उपटून काढावयाचे, यासारखी भयंकर दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं असें ह्मटलें असतां, मोठेंसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. एकाएकीं असें करतां कामा नये. विचार केला पाहिजे. देशाचे स्थितीकडे पाहिलें पाहिजे. शहरांत व गांवढ्यांत चालणारे अशा दोन्ही प्रकारच्या धंद्यांचें मिश्रण त्या देशांत असलें पाहिजे. फ्रान्स-देशांत अशाच प्रकारचें मिश्रण आहे, ह्मणून तो देश सुखी आहे. अनुभवानें असें सिद्ध झालें आहे कीं, संपत्तीनें, अनु-भवानें, ज्ञानानें, साहसानें व इतर प्रकारांनीं ज्या दोन

देशांत साम्य नाहीं, त्या देशांत अप्रतिबद्ध ( फ्रीट्रेड ) व्यापार चालला असतां गरीब व अशक्त देश असेल त्यांचें नुकसान होईल. '

वर्डस्वर्थ साहेबांनीं इटलीविषयीं जें लिहिलें आहे तें अक्षरशः हिंदुस्थानास लागू आहे. यावरून हिंदुस्थानास 'फ्रीट्रेड' चीं मतें लागू केल्यानें फायदा होईल किंवा कसें हें वाचकांनींच पाहावें.

## उपसंहार.

एवढा वेळ जें अनेक विषयांचें विवेचन करण्यांत आलें, त्यावरून कोंकणांतील खेडेगांवांपेक्षां मुंबई शहरांत संपत्ति विशेष काय कारणानें आहे, हें लक्षांत आलेंच असेल.

संपत्ति उत्पन्न होते, ती तीन कारणांनीं:—जमीन, मेहनत व भांडवल. यांपैकीं पहिलें एक साधन शिवाय करून, मुंबईचे लोकांजवळ दुसरीं दोन्हीं विपुल आहेत. भांडवल पुष्कळ आहे, ह्मणून अनेक कारखाने निघून संपत्तीची उत्पत्ति मुबलक होते. कोंकणांत जरी जमीन आहे, तरी तेथें भांडवल नसल्यामुळें व्हावी तितकी संपत्तीची उत्पत्ति होत नाहीं. संपत्ति अधिक किंवा कमी होणें हा भांडवलाचा खेळ आहे, हें १ लें कारण.

२ रें कारण:—संपत्ति उत्पन्न झाल्यावर तिचे विभाग तीन प्रकारचे लोकांतच होतात. जमिनीचे मालक, श्रम करणारे मजूर, व भांडवलवाले सावकार. मुंबईत मजूर व सावकार हजारों असल्यामुळें मजुरी व भांडवलावरील नफे असे दोन विभाग मुंबईतील लोकांस मिळतात. कोंकणांतील लोकांस कायतें जमिनीचेंच उत्पन्न. हें उत्पन्न हवें तितकें

वाढवितां येण्यासारखें नाहीं. मुंबईतील लोक यंत्राचे साह्यानें मोठमोठाले कारखाने काढून अतिशय उत्पत्ति करितात; एका धंद्यांत नीट चालेनासें झालें, तर लगेच तेथील लोक आपलें भांडवल दुसऱ्या धंद्यांत घालतात. कोंकणांत शेतीशिवाय दुसरा धंदा नाहीं. एखादे वर्षी अवर्षण झालें कीं, चोहोंकडे हाकाहाक होते !

३ रें कारणः—अदलाबदल ह्मणजे देवघेव, व्यापार. मुंबई हें फार मोठें व्यापाराचें शहर आहे. हजारों कोसांवरील दुसऱ्या देशांतील लोकांशीं मुंबईतील लोकांचा व्यापार असल्यानें, परदेशचे व्यापारापासून जो फायदा होतो, त्याचा पुष्कळ अंश मुंबईतील लोकांस मिळतो.

आतां जर मुंबईतील लोक उत्पत्ति विपुल करितात, उत्पत्ति झाल्यानंतर संपत्तीचा फार मोठा विभागही आपणच राखतात, परदेशच्या व दुसऱ्या व्यापारापासून नफेही जर त्यांसच मिळतात, तर तेथील लोक श्रीमंत असतील यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं.